# कल्हणकृत राजतरंगिणींतील सौंदर्यस्थळें

लेखकः—गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए. एल्.एल्. बी.

* स्मरूं फणारत्नचारु हरकल्प महातरू ॥
‡ तरंगिणी कल्हणाची अनायासें चला तरूं ॥१॥

महाकवि होमर, श्रीमान व्यास आणि मोरोपंत, श्रीहर्ष, महामुनि वाल्मीकि व महाकवि शेक्स्पियर यांचा परिचय करून देण्याकरतां इलियडचें कविताबद्ध भाषान्तर, भारतामृत, नैषधसार, रामायणामृत, व शेक्स्पियरच्या नाटकांतील सौन्दर्यस्थळें हे ग्रन्थ अनुक्रमें १९१६, १९२७, १९३८, १९४० व १९४४ या वर्षी प्रसिद्ध करण्यांत आले. आता कल्हणाचा परिचय करून देण्याकरतां राजतरंगिणींतील सौंदर्य-स्थळें या नांवाचा ग्रन्थ प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**गणेश रामकृष्ण हवलदार.**
ग्रंथकर्ता

हाहि लघुग्रन्थ, वेळेला संक्षेप देण्याच्या या काळांत ज्यांना, वाचावयास वेळ नसेल त्यांनीं प्रस्तावनेनंतर एक अनुक्रमणिका दिली आहे तींत जेवढ्या सारभूत प्रकरणांची यादी तरंगवार दिली आहे तेवढी वाचल्यास कल्हणाचा परिचय वाचकांस होईल. व तसा झाल्यास प्रस्तुत ग्रन्थकर्ता आपणास कृतार्थ मानील.

नदीकांठचे दृढमूळ वृक्ष जसें तटाचें रक्षण करतात तसें कांहीं रूढ शब्दांचें रक्षण तरंगिणीनें केलेलें आहे. त्या शब्दांचा कोश, कांहीं राजांच्या व इतर पुरुषांच्या वंशावळी, कल्हणाची कालगणनेची माहिती, व इतर त्यावेळची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिति इत्यादी गोष्टींच हिती संक्षिप्तप्रकारें शेवटीं दिली आहे तीहि वाचल्यास तिचा उ ोग होईल.

## कल्हणाचें अल्पचरित्र.

कल्हण हा एका काश्मीरच्या राजाचा चंपक नावाच्या महान् अमात्याचा मुलगा असें प्रत्येक तरंगाच्या समाप्तिलेखात म्हटलेलें आहे. हा चम्पक सातव्या तरंगातील र्ष नृपति, याचा द्वारपति चम्पक, हे एकच होत. याला एक कनक नांवाचा भाऊ होता. त्याला हर्षानें एकलक्ष दिनार दिले होते.

* कल्हणाच्या नांदींतील एक श्लोक घेऊन त्यांत थोडा फरक करून हा श्लोक बनवलेला आहे.

‡ रामायण व महाभारत या ग्रन्थानंतर इतिहास म्हणून संस्कृत भाषेंत लिहिलेला हा एक भव्य ग्रन्थ आहे. पुरातन-काळीं—ग्रन्थ मग ते काव्यात्मक असोत अथवा शास्त्रीय असोत—ते छन्दोबद्ध असत—तसा हा आहे. राजतरंगिणी या शब्दाचा अर्थ राजांची नदी असा आहे. म्हणून या ग्रन्थाच्या प्रत्येक विभागाला तरंग हें नांव दिलेलें आहे तें यथार्थ आहे.

या हर्षाचा शोकमय अन्त झाल्यावर कनकानें काशीस जाऊन जीविताचा त्याग केला. व हर्षाविषयींची निष्ठा प्रकट केली. कल्हण हा निष्ठावान् शिवभक्त होता. असें प्रत्येक तरंगाच्या आरंभीं केलेल्या शिवस्तुतीवरून दिसतें. या शिवाय कल्हणाच्या कुलाविषयीं आणखी माहिती उपलब्ध नाहीं.

राजतरंगिणीच्या सात सहस्र श्लोक लांबीच्या अतःस्वच्छ जलौघांत काश्मीरी लोकांच्या संस्कृतीचें व जीवनाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. कारण कौरव पाण्डवांच्या एका समकालीन राजाच्या ( गोनदाच्या ) राज्यारोहणापासून आरंभ करून पुढील सव्वातीन साडेतीन हजार वर्षांत होऊन गेलेल्या राजांचा इतिहास या ग्रथांत आहे. त्यामुळें या ग्रथाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

राजतरंगिणी ही राजांची तरंगिणी म्हणजे नदी आहे. तींत राजे, राण्या, व मंत्री यानीं रिपूवर मिळवलेल्या विजयाचें जसें वर्णन आहे तसें वरील मंडळीवर षड्रिपूनीं मिळविलेल्या विजयाचेंहि वर्णन आहे. तरी देखील जेव्हां जेव्हा वरील मण्डळींत चांगल्या व्यक्ती निघाल्या तेव्हा तेव्हा त्यांची स्तुति कवीनें मुक्त कण्ठानें केली आहे. पण विटानें वर्णन करतांना कवीला अश्लील असें कांहीं वाटत नाहीं.

या नदीचा प्रवाह कधीं कधीं तिच्यावरून उडून मंजुळध्वनि करीत जाणाऱ्या पक्ष्यांच्या कूजिताप्रमाणें मंजुळ आहे तर तो कधीं कधीं तो फू फू करीत दुथडी वाहत जात आहे असा भास होतो.

कल्हणाची भाषा कालिदासाच्या भाषेसारखी रेशमाप्रमाणें मऊमऊ लागते व कधीं कधीं मुद्राराक्षसाचा कर्ता जो विशाख-दत्त त्याच्या भाषेसारखी कठोर लागते.

या ग्रथाला थोडासा आधार नीलमुनीच्या पुराणाचा आहे म्हणून या ग्रंथावर पुराणाची छाया पडली आहे. तिला उद्देशून तरंग तीन मधील मेघवाहन राजाची कथा सांगताना कवि म्हणतो, " अशा राजाचें असंभाव्य वाटणारें चरित्र वर्णन करताना आम्हांला लाज वाटते, पण आर्षमार्गानें ( ऋषिप्रणीत मार्गानें ) एकवार जाण्याचें ठरविल्यावर वाचकाची अभिरुचि आमच्या आड येत नाहीं. "

कल्हणाची कवि या नात्यानें योग्यता मोठी आहे. निरीक्षण-शक्ति व उल्लेखशक्ति या दोन गुणांची जोडी कल्हणाच्या ठिकाणीं जशी आढळते तशी अन्य कवींत विरळा. त्याचीं स्वभावोक्तवर्णनें तर फार सरस आहेत. अर्थालंकारांत नेहमींचीं उपमानें असतातच पण अनपेक्षित व चमत्कृतिजनक हें त्याच्या गुणाचें अगदीं संक्षिप्त वर्णन होय.

## अनुक्रमणिका

१ कल्हणाची प्रस्तावना. हींत इतिहासकाराची भूमिका कशी असावी तें कल्हणानें स्पष्ट करून सांगितलें आहे.
२ काश्मीर मण्डळ.

### तरंग १ ला

३ कविप्रशंसा.
४ श्रीमान दामोदर राजा व त्याची राणी यशोमति (स्त्रियांच्या गादीवर वारस म्हणून बसण्याविषयींच्या हक्काविषयीं श्रीकृष्णानें दिलेला न्याय.)
५ एक बौद्धधर्मीय कथा.
६ दामोदर दुसरा (रामायणाचा जुनेपणा.)
७ सुश्रवस नागाची गोष्ट
८ क्रूर राजा मिहिरकुल याची गोष्ट.
९ युधिष्ठिर राजा. त्याच्या राण्यांचा देशपरित्याग.

### तरंग २ रा

१० राजा तुजीन व दुष्काळनिवारण.
११ संधिमति आर्यराज याची गोष्ट.
१२ संधिमतीचा राजसंन्यास. वनास जाताना त्याच्या झोंपेची वेळ व जागें होण्याची वेळ; आणि वैराग्यधारण केलेला राजा.

### तरंग ३ रा

१३ राजा मेघवाहन व अहिंसा.
१४ असमाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.
१५ मातृगुप्ताची गोष्ट.
१६ मानव रणादित्य राजाची अमानुष देवी राणी.
१७ राजकन्या अनगलेखा.

### तरंग ४ था

१८ राजा प्रतापादित्य व नोणवणिजाची स्त्री नरेन्द्रप्रभा यांची गोष्ट.
१९ सार्वजनिक कार्याकरतां खासगी जमीन मोबदला देऊन घेण्याविषयींची (लॅन्ड ॲक्विझिशन ॲक्टाखालच्या पद्धतीची) गोष्ट.
२० कलियुगांतील चालू नसलेलें एक दिव्य.
२१ स्वामिनिष्ठ अमात्याची गोष्ट.
२२ ललितादित्याची राजकीय गीता.
२३ जयापीड व कमला नर्तकी यांची गोष्ट.
२४ स्पर्शसंचारी रोग व स्थानपरित्याग.
२५ शास्त्र प्रशंसा.
२६ राजा जयापीड व चतुर मंत्री देवशर्मा यांची गोष्ट.
२७ सुवर्णप्राप्तीविषयीं लोककथा.
२८ जसे राजा तसे ब्राह्मण.

### तरंग ५ वा

२९ मंत्री सूरशर्मा व त्याचा कृतमान्दार नांवाचा भाट.
२७ मोठा स्थापत्य शास्त्री (इंजिनिअर) सूय्य व त्याचें तंत्र
२८ राजा शंकरवर्मा स्वतां व्यापारी होतो.
२९ वेठ बिगार (रूढभारोढी)
३० राजाचा स्वभाव.
३१ राजवाड्यांत झालेला, डोम्ब व त्याच्या मुलींचा गायनाचा जलसा.
३२ राजाची निवड करणारी विप्रपरिषद.

### तरंग ६ वा

३३ अपहार करणाऱ्या कायस्थांविरुद्ध राजा यशस्कर याची मोहीम.
३४ राजाची जुगारबाजीविरुद्ध मोहीम.
३५ साक्षरता प्रसार.
३६ यशस्कर राजाच्या चातुर्याची गोष्ट १ ली.
३७ किस्सा, गोष्ट २ री
३८ क्षेमगुप्त व त्याचें दुराचारी विट.
३९ सिंहासनावर बसविण्यास योग्य अशा राजाची निवड करण्यांत दिद्दाराणीचें चातुर्य.

### तरंग ७ वा

४० प्रजेच्या जवळचा वित्तसंचय ओळखण्याचें साधन.
४१ अनंतदेवाचा राज्यपरित्याग व युवराजपदाचें विडंबन.
४२ सासुरवासाचा मासला.
४३ अशुचिसनाचा लोहरच्या राज्याचा राजपुत्र.
४४ निडालभट्ट वणिज व त्याची जुगारबाजी.
४५ चमक विट.
४६ मुठींत धरलेलें सांगणारा ग्राम-जोशी.
४७ विषयी कलशाचें रात्रीचें घाडस.
४८ मानवन्ताची स्वामिनिष्ठा.
४९ गुप्तस्फोट राजानें (अनंतदेवानें) केल्यावर राणीचा त्याला जाबसाल.
५० अनंत देवाच्या राणीचें अनुगमन.
५१ मनोभंग. (ही काय चीज आहे?)
५२ हर्षाचा बन्ध व मोक्ष आणि दोन आंगठ्या.
५३ हर्षाच्या चर्चा कथेचें वर्णन.
५४ स्त्री पुरुषाची राजमान्य वेशभूषा.
५५ राजाच्या मनांत प्रवेश करणारा कुशल विट
५६ राजे आपला पैसा कसा खर्च करतात.
५७ चंदलेची कथा.
५८ डामराच्या नाशाची राजाची करपद्धति.
५९ माफीची घोषणा.
६० एक दैविक चमत्कार.

## तरंग ३.

### (१) मेघवाहन.

युद्धिष्ठिराचा प्रपौत्र जो गोपादित्य त्याच्या पुत्राला, मेघवाहनाला, गान्धाराहून आणून लोकांनीं राजा केलें. त्यापूर्वी प्राग्ज्योतिष नांवाच्या देशांतील राजाच्या कन्येचें स्वयंवर तेथील राजानें मांडलें. तेथें हा गेला असतां याला राजकन्येनें माळ घातली. नरकासुरानें आणलेलें छत्र या राजाच्या डोक्यावर धरलें, तें उगीच नव्हतें. चक्रवर्ती असल्याशिवाय कोणावर तें धरावयाचें नसतें.

या राजानें प्राणिवधाचें निवारण केलें. यज्ञांत पिष्टपशूचे व घृतपशूचे बली देऊं लागले. आपल्या कोशांतील धन खर्चून यानें खाटिकांना दुसरी निष्पाप वृत्ति दिली.

मूक देवीनें एक विहार बांधला. त्याच्या अर्ध्या भागांत भिक्षाचरांच्या धर्मतत्त्वाप्रमाणें वागणारे भिक्षू व दुसऱ्या अर्ध्या भागांत, गृहस्थाप्रमाणें वागणारे म्हणून निंद्य असे गार्हस्थ्य भिक्षू, त्यांच्या स्त्रिया व पशू ठेवले.

तो राजा एकदां बाहेर विहार करीत असतां अभय मागणाऱ्या दोन तीन स्त्रिया दिसल्या. आपल्या मस्तकावर अंजलि रचून त्या म्हणाला, "आमचे पती जे नाग ते मेघरूपानें नभाचें तल झांकून स्वस्थ बसले असतां, शालिवनाची राखण करणारे कांहीं नागऱ्ये हिमवृष्टि होईल या खोट्या शंकेनें चोर चोर असें ओरडले. आपण बांधा म्हणालांत. आपल्या आज्ञेनें पाशबद्ध होऊन ते खाली पतन पावले. आमच्यावर करुणा करावी व प्रसाद व्हावा." बन्धनांतून सोडा असें राजा म्हणाला. बन्धनातून मुक्त झालेले नाग राजाला प्रणाम करून पलयांवर निघून गेले.

राजा वेलावनांत फिरत असता एक शबर, चण्डिकेसमूर अधोमुख मनुष्याचा बलि देत होता. त्याचा राजानें धिक्कार केला. शबर म्हणाला, "या उपहाराचा निषेध करशील, तर माझा रोगग्रस्त मुलगा तत्काळ मरेल. या अनाथाचें रक्षण करतोस, पण पुष्कळांचें रक्षण करणाऱ्या या माझ्या बाळाची उपेक्षा करतोस!" बळीच्या दीनवाण्या दृष्टिपातांनीं विवश होऊन राजा म्हणाला, "मी या अनाथाचें रक्षण करण्यास स्वदेह अर्पण करतो." शबर म्हणाला, "त्रैलोक्यातील जीव अर्पण करून तुझें रक्षण केलें पाहिजे. स्वप्राणाकरता राजलोक कोणाकडे पहात नाहींत. तू जग व माझ्या मुलाला जगू दे." राजा म्हणाला, "तुम्हीं वनचर सदाचारसुखेचा आस्वाद घेणारे कसे व्हाल? मरुदेशांतील लोकास जान्हवीजळातील मज्जनाचे सुख कळत नाहीं. तुझ्या मुलाला बहुत (आप्त) बन्धू आहेत. या अनाथाला नाहींत. या बलीचें रक्षण मी चण्डिकेला स्वदेह अर्पण करून करणार."

राजानें स्वशरीरावर प्रहार करण्याला तरवार उपसली तोंच आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. राजाचा हात एका दिव्य पुरुषानें धरला. ती चण्डिका, तो बली, इ. सर्व नाहींशीं झालीं. तो दिव्य पुरुष म्हणाला "मी वरुण आहें. रसातलाचा तिलक असें हें छत्र तुझ्यापुढें उभें आहे, तें पुराणपुरुषानें नरकासुरानें तुझ्या श्वशुरानें माझ्या पुरातून हरण केलें होतें. तें नाहीं म्हणजे प्रजेला प्राणहर उपद्रव होतात. तें नाहींसें व्हावें म्हणून, तुझ्या औदार्याची परीक्षा पहाण्याकरतां मी ही माया रचली. राजानें वरुणाला छत्र दिलें; व समुद्रातील बेटें जिंकण्याची राजानें इच्छा प्रदर्शित केली. वरुण म्हणाला "तुझ्याकरतां मी समुद्राचें स्तंभन करीन." छत्रासह वरुण अदृश्य झाला.

समुद्राला भाग पाडीत नतर राजा लंकेला गेला. तेथील नृपानें राक्षसाच्या शिरानीं भूषित अशा ध्वजा अर्पण केल्या व कायमची ताबेदारी प्रदर्शित केली या ध्वजाना परिध्वज म्हणतात. काश्मीरांत यात्राप्रसंगीं या राजाच्या अग्रभागीं दिसतात. राक्षसांना मांस वर्ज्य करावयास या राजानें लावलें. मांसाशन हें राक्षसाचें अन्वर्थ नाव आता रूढिवाचक शब्दात मोडू लागलें.

एक ब्राह्मण राजद्वारीं आपल्या रुग्ण पुत्राला ठेऊन म्हणाला, "दुर्गेनें मागितलेला हा पशूचा बलि तूं देऊं न देशील तर हा माझा मुलगा मरेल. ब्राह्मण आणि पशु यातील अंतर तूं वर्णगुरूनेंच ठरवावें. ब्राह्मणपुत्राच्या मृत्यूचें पाप टाळण्याकरतां व आपल्या अहिंसेचें व्रत पाळण्याकरतां राजानें स्वतांचा बलि देण्याचा निश्चय केला. सगमावर उद्भवलेल्या भोंवऱ्यात पडलेल्या सुमनाप्रमाणें स्थिति असलेलें त्याचें मन स्थिर झालें. दुर्गेनें ब्राह्मणपुत्राची प्रकृति होती तशी केली.

#### असंभाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.

पृथक्जनाना असंभाव्य वाटणारें या दिवसांतील मेघवाहनाचें वर्णन करतांना आम्हाला लाज वाटते. तथापि रचना निर्विशेष एका प्रकारच्या आर्ष मार्गानें (परपरागत सांप्रदायिक मार्गानें) जाणाऱ्या आम्हांस श्रोतृचित्ताचें अनुवर्तन करावें लागत नाहीं. श्रोत्यांना रुचेल असें लिहिण्याला आम्हीं बांधलेले नाहीं.

#### (२) प्रवरसेन; (३) हिरण्य व तोरमाण सहजोडी.

६१ जसा तो तुझा तसा तो माझा.
६२ उच्चलाला राज्याभिषेक झाल्यावर हर्षानें काय करावें, याविषयीं मन्त्र्याचा उपदेश.
६३ पराभूत हर्षाचें पलायन व त्याचा करुणास्पद अन्त.

तरंग ८

६४ उच्चल प्रथम सामादी उपायानीं अथवा अपायानीं डामराची वाट लावतो.
६५ अनुयुक्त भीमादेवानें उच्चलाला दिलेल्या दोन शिक्षा.
६६ उच्चल जनतेची प्रीति संपादन करतो.
६७ प्रजापीडक कायस्थांस उच्चल शासन करतो
६८ उच्चलानें केलेली न्यायदानाची गोष्ट. (सावकारी पाशाची गोष्ट.)
६९ उच्चल व सुस्सल यांचें स्वभाव वर्णन.
७० राज्यावर संकट आलें असतां पसरणाऱ्या वार्ता व त्यावर भरवसा ठेवणारी भोळी मंडळी.
७१ पुरोहित प्रायोपवेशन.
७२ चक्रधराच्या देवळाला लावलेली आग.
७३ सुस्सलाच्या राणीचें मरण.
७४ सुस्सलाचा वध.
७५ ती वार्ता ऐकून त्याच्या पुत्राची, सिंहदेवाची प्रतिज्ञा.
७६ सार्वत्रिक क्षमेची घोषणा.
७७ जयसिंहाच्या राज्याची आरंभिची स्थिति.
७८ जयसिंहाच्या गुणांचें वर्णन.
७९ विट पराक्रमवर्णन.
८० सुज्जीचा वध.
८१ चित्ररथावर प्राणान्तिक हल्ला.
८२ स्वामिभक्त मार्जारी.
८३ कांहीं धर्मभोळेपणा.
८४ सिल्हणाचा पराक्रम.
८५ राजाच्या विरास कवीचा शेवटला रामराम.
८६ युद्धकार्याचा गोड शेवट.
८७ संधिनतर राजाशीं भोजानें वर्तन.
८८ ग्रन्थ समाप्ति.

श्री गजानन

## (कल्हणाची प्रस्तावना)

भवत्कालाव गतार्थ प्रत्यक्षवत् पहात आहे असें दाखणारे कवी हे ब्रह्मदेवच आहेत अशा कांहीं प्राचीन कवींच्या प्रथाधारें सुव्रतानें काश्मीरच्या इतिहासावर एक प्रबन्ध लिहिला. त्याची भारती पाण्डित्यदूषित व तीव्र असल्यामुळे, तो मागें पडला. क्षेमेंद्राच्या इ. स. १०२९ ते १०६४ या अवधींत अवन्तिवर्मा राजा असता हा कवि होऊन गेला. नृपावळींत कांहीं कविकर्म असलहि, त्यानें अवधान न ठेवल्यामुळें, तींत निर्दोष असा एकहि अंश मिळत नाहीं. तरी हे ग्रन्थ, नील मुनींचें पुराण व जुन्या राजांचीं प्रशस्तिपत्रें वाचून मी भ्रम निरसन करून घेतलें. इतिहास कथन करतांना वाचा स्थिर ठेवली व राग आणि द्वेष बहिष्कृत केले; त्यामुळें राजाचा उल्हास अथवा ऱ्हास व देश आणि काल यांचें मी केलेलें वर्णन पूर्वींच्या कथात असलेल्या दोषस्पर्शीवर एक औषधच होईल आणि ज्यात अनन्त प्राक्तन व्यवहार सक्रांत झाले आहेत, अशा माझ्या ह्या सदर्भ ग्रथात कथेच्या दीर्घत्वाच्या मानानें प्रपंच दिसला नाहीं, तरी सचेतस वाचकास यातील कांहीं भाग प्रीतिजनक होईल.

हें जग क्षणभंगुर करण्यातच कायती विधिची कला दिसून येते म्हणून या ग्रंथात शान्त रसाला मूर्धाभिषेक केला आहे.

आनंदस्यदानें सरस अशा ह्या सुंदर अपापिणी राजतरंगिणीचें सेवन वाचकांनीं आपल्या श्रोत्रशुक्ति पुटानें करावें.

टीप :—इतिहासकाराची भूमिका कशी असावी तें वर कल्हणानें स्पष्ट करून सांगितलें आहे. तें इतिहास लिहिणाऱ्यानीं ध्यानात ठेवण्यासारखें आहे.

## काश्मीर मण्डळ

कल्पारंभापासून सहा मन्वन्तरें हिमालयाच्या कुशींत सतीसर नावाचें एक जलाढ्य सरोवर होतें. त्यांत रहाणाऱ्या जलोद्भवं नांवाच्या एका असुराचा नाश करून वैवस्वत मन्वन्तरांत कश्यप प्रजापतीनें त्या सरोवराच्या भूमींत काश्मीर मण्डळ निर्माण केलें. त्याचें परिपालन नील नावाचा नाग करीत असतो. या मण्डळातील पापसूदन तीर्थात काष्ठरूप उमापतीची मूर्ति स्पर्शमात्रें करून मुक्ति व भुक्ति देते. तेथें निर्जल गिरीवर सध्यादेवी जल रूपानें दृश्य होऊन, अन्वयव्यतिरेकानें पुण्यपापाचा निर्णय देते; म्हणजे ज्याला तें जलरूप दिसेल तो पुण्यवान व न दिसेल तो पापी असें निश्चित करते, तेथें भूगर्भातून स्वयंभू अग्निवर येऊन ज्वालारूपी भुजांनीं आहुति ग्रहण करतो; तेथें भेडगिरीच्या शिखरावर एका सरोवरात सरस्वती हंसरूपानें दृश्य होते; तेथें नन्दी क्षेत्रांतील देवालयात, देवांनीं अर्पण केलेल्या पूजाचन्दनाचे बिन्दू अद्यापि स्पष्ट दिसतात; तेथें शारदादेवीचें दर्शन करतांच; कविजन सेवितवाणी आणि मधुमति व सरस्वती या दोन नद्यांचें दर्शन घडतें, तेथें पृथ्वीतील तीर्थांनीं बहिष्कृत अशी जागा तिळाशानेंहि मिळत नाहीं. हें मण्डळ पुण्य बळानें जिंकता येतें, शस्त्रास्त्रानीं नाहीं; आपल्या पित्यानें, कश्यपानें, हें मण्डळ निर्माण केलें म्हणून तेथें चण्ड शु रवि ग्रीष्म ऋतूंत सुद्धां पित्याच्या गौरवानें सौम्य होतो; तेथें उच्च विद्यामंदिरें सहिमजल व त्रैलोक्यदुर्मिळ द्राक्षें हीं क्षमत्वप्रकारें आढळतात.

त्रैलोक्यीं रत्नसू श्लाघ्य कौबेरी तेथ दिग्दल ।
तेथ गौरीपती श्लाघ्य तेथ काश्मीर मण्डल ॥ ४३ ॥

*टीप:*—हे काश्मीर मण्डळाचें वर्णन कालिदासानें केलेल्या कुमारसंभवातील हिमालयाच्या वर्णनाच्या धर्तीवर आहे. शेवटल्या वाक्यांतील हिमालयाचा उत्कर्ष पायरीनें दाखविणारा सार अलंकार सुन्दर आहे.

## तरंग १ ला.

## कविप्रशंसा.

कलियुगात कौरव पांडवांच्या एका समकालीन राजापासून (पहिल्या गोनन्दापासून) तिसऱ्या गोनंदापर्यंत बावन्न राजे होऊन गेले. त्यांच्या विषयींचे वृत्तग्रंथ नष्ट झाल्यामुळें त्यांची स्मृति नाहीं, कारण त्याकाळी त्यांच्या दुर्दैवानें कीर्तिरूप काय निर्माण करणारे कविरूप ब्रह्मदेव नव्हते. ज्या महाप्रतापी राजाच्या आश्रयाखालीं जलधिरशना पृथ्वी सर्वत्र अभय असे, त्या राजाची स्मृतिसुद्धां ज्याच्या अनुग्रहावाचून राहू शकत नाहीं, त्या प्रकृतीनेंच मोठ्या अशा कविकर्माला नमस्कार असो! राजाच्या गण्डस्थळावर पाय देऊन श्री प्राप्तकरून घेणारे असे लोकतिलक राजे, जर स्वप्नातसुद्धां होऊन गेले नाहीत असे मानले जाण्याइतके, विस्मृतिमग्न होतात, तर हे कवि-भ्रातर्! तू नाहींस म्हणजे जग आंधळें म्हणावयाचें! एवढें सांगितल्यावर तुझी अधिक स्तुति करावयाला शंकराकरितां(?) स्तोत्रें कशाला रचावीं!

टीप:—वरील नष्टवृत्त झालेल्या बावन्न राजांविषयी कल्हण म्हणतो, "यापैकीं पहिले गोनन्दादि चार मी नील पुराणातून संगृहीत केले आहेत. नंतर सर्व आम्नाय (ऐतिहासिक लेख) नष्ट झाल्यामुळें पस्तीस राजे नष्टकृत्य व नष्टनाम होत्साते विस्मृति सागरात मग्न झाले. पुढले आठ हेला राजाच्या पार्थिवावलीवरून ग्रन्थप्रोक्त केले आहेत. नन्तरचे पाच छविल्लाकारानें निर्दिष्ट केले आहेत. यात अशोकापासून अभिमन्यूपर्यंतचे राजे येतात.

## १ गोनन्द १ ला

कलियुगाची सहाशें त्रेपन वर्षें उलटल्यावर हा राजा गादीवर बसला. हा प्रतापी होता. कृष्णाशीं याच्या बन्धूचें (जरासंधाचें) युद्ध चालू असतां जरासंधानें याचें साहाय्य मागितलें. यानें सैन्यानिशीं मथुरेला वेढा दिला. बलरामाशीं याचें युद्ध झालें. दोघे तुल्यबल होते. विजयसंदेहामुळें, पुष्पांची माळा जयश्रीच्या हातीं बराच वेळ राहून कोमेजून गेली. शेवटीं दोघांनीं क्षतांगानीं—गोनन्दानें रणांगनेला व बलरामानें जयश्रीला आलिंगन दिलें.

टीप:—शेवटल्या वाक्यांत तुल्ययोगिता अलंकार चांगला साधला आहे.

## २ श्रीमान दामोदर

(गादीवर बसण्याच्या स्त्रियांच्या हक्काविषयीं श्रीकृष्णानें देलेला न्याय.)

गोनन्दाचा मुलगा श्रीमान दामोदर नंतर राजा झाला. ऊर्जित राज्य प्राप्त होऊनहि पितृवधाच्या चिन्तनानें हा सुख पावला नाहीं. सिन्धुनदीच्या काठीं गान्धार नृपतीनें कन्येचें स्वयंवर मांडलें आहे. हें कळतांच याचे बाहू दृप्त झाले. याची यात्रा घाईघाईनें निघाली. याची चक्रधराशीं गांठ पडतांच चक्रधरानें सुदर्शन चक्रानें याला स्वर्ग दाखविला.

## ३ यशोमति

श्रीमान दामोदराची पत्नी यशोमति गर्भवती होती. तिला श्रीकृष्णानें राज्याभिषेक करविला. स्त्री म्हणजे पुरुषाची विलासाची(?) अशी भोग्यवस्तु आहे असें मानणारे मंत्री मत्सर करूं लागले. काश्मीरांत राजा शिवांश असतो व राणी पार्वती असते असा नील पुराणाचा आधार श्रीकृष्णानें दाखवून दिल्यावर लोक तिला प्रजेची माता व देवता मानू लागले.

(४) गोनंद तिसरा; पुढले ३५ राजे स्मृति मग्न झाले; ४०, लव; ४१, कुश, ४२, खगेन्द्र; ४३, सुरेंद्र; ४४, गोधर अन्य वंशांतील, ४५ सुवर्ण; ४६, जनक; ४७, शचीनर.

## ४८ अशोक

हा शचीनराच्या चुलत आजाचा पुत्र—शकुनीचा नातू. यानें श्रीनगर वसविलें. जैन व बौद्ध धर्मांचा स्वीकार केला. स्तूप रचिले व चैत्य बांधले. चैत्यांच्या उंचीची अवधि डोळ्यानी बघून समजत नसे.

## ४९ जलोक

यानें कोटीवेधी पारद सिद्ध करून (परिसमणि मिळवून) हीन धातूंचें कोट्यवधि सुवर्ण केलें. याच्या पत्नीनें, ईशान देवीनें, उग्र (जागृत) मातृचक्रें निर्माण केली.

व्यास शिष्यांजवळ नंदीश पुराण ऐकून राजा, नंदीशतीर्थाशीं स्पर्धा करणाऱ्या सोदर जलाचें सेवन करू लागला. श्रीनगरांत ज्येष्ठेशाचें देऊळ बांधण्यात व्यग्र झाल्यामुळें सोदरतीर्थाच्या स्नानाचा विसर पडून हा राजा मनांत उद्विग्न झाला. तों तेथें निर्जल स्थानांत जल प्रादुर्भूत झालें. रंगानें व रुचीनें तें सोदरतीर्थाशीं संवादी होतें. परीक्षा पहाण्याकरीता यानें आपला सुवर्ण कलश त्याचें तोंड बंद करून मूळ सोदरतीर्थांत टाकला. तो अडीच दिवसांनीं श्रीनगरांत उद्भूत झालेल्या जलांत निघाला. राजाचा संशयच्छेद झाला. हा राजा म्हणजे नंदीशच भोग भोगण्यास अवतरला होता. नाहींतर अशी दृष्टादृष्ट क्रियासिद्धि याला कशी प्राप्त झाली असती!

## एक बौद्ध धर्मीय कथा

एकदा एका स्त्रीची, इच्छाभोजन करण्याची, याचना या राजानें मान्य केली तिनें विकृतस्वरूप धारण करून नरमांस मागितलें. हिंसेविरुद्ध असलेल्या राजानें स्वशरीरांतून मांस

खाण्याची अनुज्ञा दिली. तेव्हां ती म्हणाली, सत्त्व पाळणारा तू बोधिसत्त्व आहेस. या शैवराजानें विचारलें "हे कल्याणि! बोधिसत्त्व म्हणालीस तो कोण?" ती म्हणाली "भगवान लोकनाथाच्या काळापासून या विश्वधारणेच्छत बोधिसत्त्वांनीं आपणाला पंचक्लेशांपासून (अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश यांपासून) मुक्त करून घेतलें आहे. ते अपराध्यास रागवत नाहींत. क्षमा करून त्यावर उपकारच करतात. आम्हीं तामसी-कृत्या असून प्रकाश व अंधार यांना विभागणाऱ्या लोकालोक पर्वतावर रहातों. तेथील काळोख्या रात्रीं फार घोर असतात. त्याचा क्षय व्हावा (आम्हाला सद्गति मिळावी) अशी आम्हीं बोधिसत्त्वांना प्रार्थना करतों. एका विहारांतील वाद्यघोषानीं तुझी झोंप मोडली. तू त्या विहाराचा नाश केलास. कदबुद्धानीं माझें ध्यान केलें. मी तुझा वध करण्यास निघालें. पण बोधिसत्त्व हाक मारून म्हणाले. 'तो महाशाक्य (बुद्ध) आहे. त्याच्या दर्शनानें तुझ्याच तमाचा क्षय होईल. त्याला हेमभार खर्च करून विहारछेदनाचें प्रायश्चित्त म्हणून विहार बांधावयास लाग.' तुझ्या सत्त्वातिरेकाची परीक्षा पाहिली. माझ्या पापाचा क्षय झाला. तुझें कल्याण असो. राजानें विहारबांधण्याचें वचन दिलें, कृत्याश्रम बांधला व त्यात कृत्येची स्थापना केली.

व्यवहार जाणणारे लोक काश्मीरात नव्हते. १ धनाध्यक्ष, २ धर्माध्यक्ष, ३ कोशाध्यक्ष, ४ सेनाध्यक्ष, ५ दूत (वकील) ६ पुरोधा व ७ दैवज्ञ एवढेच होते. हीं कर्मस्थानें अठरा करून राजानें यौधिष्ठिरी स्थिति प्राप्त करून दिली.

राज्य भोगून हा राजा पत्नीसह गिरिजापतीशीं सायुज्यत

## ५० दामोदर २ रा
## (रामायणाचा जुनेपणा व सुटसुटीतपणा)

श्राद्धसमयीं हा राजा स्नानास उठला. काहीं भुकेलेल्या ब्राह्मणांनीं आधीं भोजन मागितलें. राजा म्हणाला "स्नान करून येतों व देतों. विप्राःसर्पत साम्प्रतम्" "क्षिप्रहो! सध्या दूर सराः" विप्रांनीं शाप दिला "तू सर्प होशील!" उग्र तेजाच्या ब्राह्मणांना भिऊन असलें पाहिजे. त्यांच्या अवज्ञेनें नष्ट झालेल्या तपस्विश्रा पुनः प्राप्तीचा समय नसतो. विप्राचा प्रसाद संपादन केल्यावर विप्र म्हणाले, "एका दिवसात अशेष रामायण वाचशील तर शापमुक्त होशील.

**टीप**:—यावरून रामायण या राजाच्या पूर्वीचे असून त्याचा आकार सुटसुटीत असावा असें धरून चालणें सयुक्तिक वाटतें.

## ५१ हुष्क, जुष्क व कनिष्क

नतर वरील तीन राजे एकाच काळीं राज्य करते झाले. शाक्यसिंहाची (बुद्धाची) निर्वृत्ति होऊन शभर वर्षें उलटलीं होतीं. याचवेळीं या देशात बोधिसत्त्व नागार्जुन प्रसिद्धीस आला.

## ५२ अभिमन्यु

या राजाच्या अनुज्ञेनें चंद्राचार्यांनीं व्याकरण व भाष्य लिहिलें.

## गोनन्दीय वंशांतील २१ राजे

(१) गोनद ३ रा; (२) बिभीषण १ ला; (३) इंद्रजित्, (४) रावण; (५) बिभीषण २ रा; (६) नर अथवा किन्नर.

## सुश्रवस नागाची गोष्ट.

याच्यावेळीं एका कलोद्यानांत सुश्रवस नावाचा नाग वसत होता. एकदां विशाख नावाचा एक तरुण ब्राह्मण भर दुपारीं अध्वश्रान्त होऊन सरोवरोपकण्ठीं, एका वृक्षाखालीं बसला. पवनानें त्याचें श्रमापहरण केलें. जलस्पर्श करून तो सातू भक्षण करणार, तों नूपुरशिंजित त्याच्या कानीं पडलें. तें तत्पूर्वीं तीरविहारी हंसानीं ऐकलें. मंजरीयुक्त कुंजातून दोन चंद्रमुखी कन्या बाहेर आल्या. त्याच्या चारु नेत्राचे धवल अपांग काजळाच्या रेखेनें सुशोभित होते. त्यांना पाहूनच ब्राह्मणानें व्रीडाजड होऊन सक्तुभक्षण थांबविलें. त्या नागकन्या कच्छगुच्छ (गवताच्या शेंगा) खाऊं लागल्या. डोळे चाळवून तो प्रकार त्यानें पुन्हां पुन्हा पाहिला. कोठें यांची ही सुंदर आकृति व कोठें यांचें हें दरिद्री खाणें! या विचारानें त्याचा यानें सन्मान करून त्यांच्याकडून सांतू खावविलें. कुमायमान एका उदकक्षेपण भाण्डांत, एकाचतसात (द्रोणात) त्यांना पाणी आणून दिलें. आणि कमलाच्या पानानें त्यांना वारा घालीत तो म्हणाला "माझ्या काहीं पूर्वसुकृतीनें मला भवतीचें दर्शन झालें. विप्रसुलभ चापल्यानें हा जन काहीं प्रश्न विचारू इच्छितो. तुम्हीं कल्याणीनीं कोणती पुण्यवन्ताची जाति परिष्कृत केली! हें नीरस अन्न का खावें लागत आहे?"

तेव्हा एकजण म्हणाली, "आम्हीं सुश्रवस नागाच्या कन्या. ही मी पहिली कन्या इरावती. मला कुबेराला द्यावी असें तातानें टरविलें आहे. दुसरी कन्या ही चंद्रावती लहान आहे. स्वादुअन्न न मिळेल तर असलें अन्न आम्हीं का खाऊं नये?"

विप्रानें विचारलें "तुम्हाला ही निष्कांचनता कां प्राप्त झाली?" त्या म्हणाल्या, "त्याचें कारण ताताला विचार. कृष्ण द्वादशीला तो तक्षकाच्या यात्रेला येईल. तोय झाडणाऱ्या चुंडेवरून त्याला ओळख. आम्हीं तेथें असूं." असें म्हणून त्या फणिकन्या क्षणांत गुप्त झाल्या.

नटचारण प्रेक्षकांनीं समाकुल असा तक्षकोत्सव सुरू झाला. तेथें जाऊन द्विजानें त्या नागाला चिन्हांवरून ओळखलें. नागानें द्विजाचें स्वागत केलें. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या.

राजाचा मोठा दोष असून अकीर्तीला पात्र आहे.

## युधिष्ठिर राजाचा देश परित्याग

राजा आपली स्थिति सुधारू शकला नाहीं. यन्त्रातून सुटलेली शिळा, शिल्पी आवरू शकत नाहीं. राज्य विसस्थुल झालें. ढिलें पडलें. अन्य देशीय राजानीं मंदिराला वेढा दिला; पण राजा व राजललना यांस जाण्याची संधि दिली.

राजललनानीं प्रस्थान केलेलें पाहून पौरानी अश्रू गाळले. आपलें मण्डळ दूरदूर सरत आहे असें पाहून त्या नृपदारानीं त्याची अनुज्ञा घेण्यास त्याला अश्रुपुष्पाञ्जलि वाहिली. तेव्हा पक्षानीं गिरीकंदरांतील घरट्यांतून तेथें सवेग येऊन, पंख तांणून, तुण्ड खालीं घालून, आक्रंदन केलें. डोक्यावरून सरलेला व स्तनांवर पडलेला पदर तसाच सोडून वळलेल्या तिरप्या दृष्टीनें दुरूनच स्वदेशाकडे पाहून, कपाळाला हात लावून तारखें रडण्यातच त्या राजस्त्रियांचें बळ होतें.

राजा व राजस्त्रियांस आश्रय देणाऱ्या राजानीं नाना उपचारानीं व उचित वचनानीं राज्यभ्रंशापासून त्याचें दुःख मन्द केलें.

टीपः—या वर्णनात करुण रसाचा पोष चांगला झाला आहे.

या तरंगात विस्मृतिमग्न झालेल्या पन्नास राजांशिवाय अडतीस राजानीं सर्वांनीं मिळून एकसहस्र चतुर्दश वर्षें नउमास नउदिवस राज्य केलें.

### तरंग २ रा

(१) प्रतापादित्य, (२) जलौक

## (३) राजा तुंजीन.

या राजाचे वेळीं, चंद्रक नावाचा महाकवि, व्यासाचा जणु शिष्य, असा होऊन गेला. त्यानें सर्वजनप्रेक्ष्य असें नाटक लिहिलें.

राजा व त्याची वाक्पुष्टा दिव्यप्रभा राणी, यांचा प्रभाव पहाण्याकरता, देशात दैवी आपदा उत्पन्न झाली. हिमपातानें पाकोन्मुख शेतें नष्ट झालीं. अशनाच्या अंहक्रियेनें, लक्ष्मीकटाक्षांकित जनानी लज्जा स्वाभिमान व कुलाभिमान हीं सोडून दिलीं. कुक्षी भरण्याला आतुर, असे क्षुधेनें तप्त झालेले जन, त्याचे प्राण कण्ठगत होऊन, पत्नीप्रीति, सुतस्नेह, व पितृवात्सल्य विसरले. एकएकजण रूक्ष भाषण करीत, जगांतील जीवनाचा नाश होऊन आपलें पोषण करण्याची इच्छा करू लागला. अस्थिशेष माणसें पिशाचाप्रमाणें झगडू लागलीं. प्रेतराशींनीं देश आकुल झाला.

अशा वेळेस राजा सर्वत्र पत्नीसह फिरून मणिरत्नौषधीप्रमाणें शोभणारें आपलें दर्शन देत, कोणाची उपेक्षा न करता, अन्नदान करून प्राण्यांचें संजीवन करीत होता. त्याचें सर्व धन निःशेष झालें. मेदिनीवरचा अन्नाचा साठा संपला. राजा दुःखित होत्साता, राणीला म्हणाला 'हे देवि ! आमच्या कोठल्यातरी अपचारानें, निरपराध प्रजेवर ही दुस्तर आपदा, ओढवली असतां मी प्रजेचें रक्षण करू शकत नाहीं, तर माझ्या जीविताचा उपयोग काय ? कालदौरात्म्यानें पृथ्वी नष्टगौरव झाली आहे. हा लोक निरालोक झाला आहे. घरट्याचें दार बंद झाल्यावर, जशी खगाची तशी नराची अवस्था झाली आहे. सौजन्यामृताची वृष्टि करणाऱ्या सेवायोग्य अशा नराचा टिळा या मण्डळाला लागला नाहीं. अथवा काळानें मोहित होऊ आमचे गुण झाकले जाऊन ते येथें वसत आहेत असें म्हणावयाचें ? पुत्रवत् पालन केल्यानें पौर सुखी झालेले पाहून स्वर्गीं झोप घेणारे राजे धन्य होत ! निरुपायानें मी आपल्या तनूची आता अग्नीत आहुति देतों."

असें बोलून तो राजा करुणाविष्ट होत्साता, वस्त्रानें तोंड झाकून निःशब्दपणें रडू लागला. सर्वत्र निवात असल्यामुळें स्तिमित असलेले दीप वर मान करून जिच्याकडे कौतुकानें पहात होते, ती त्याची राणी देवतांचें स्मरण करून राजाला म्हणाली, "अधीर मनाला शोभणारी सामान्य जनांची ही कोठली स्वैर बुद्धि मनात आणलीस ? असाध्य दुःखाचा छेद करण्याचा प्रभाव अंगीं नसेल तर मोठ्यांच्या मोठेपणाची गणना कोण करील ? सत्यव्रत राजांची आज्ञा भंग करणारा इंद्र कोण ? ब्रह्मदेव कसला ? यमतरी किती दरिद्री ! पतिभक्ति जसें स्त्रियांचें व्रत, अद्रोह जसें मनुष्यांचें व्रत, तसें प्रजापालनाशिवाय दुसरें कांहीं न करणें हें जें राजांचें व्रत, तें पाळणाऱ्या व्रतींच्या अग्रस्थानीं असणाऱ्या राजा ! ऊठ ! माझें वच कधीं विपर्यस्त होतें कां ? हे प्रजापालका ! तुझ्या प्रजेला क्षुधाकृत भय नाहीं !"

हें तिचें भाषण संपलें नाहीं तोंच प्रत्येक घरात गतप्राण झालेल्या कपोतांचा समूह, रोज पडू लागला व त्यावर जनता जगू लागली. साध्वीनें निर्मिलेले हे कपोत खरोखरीचे नव्हते; राजाचा शोक व प्रजेचें दुर्भिक्ष हीं मात्र खरोखर नाहींशीं झालीं.

टीपः—वर मान करून दीपांना राणीकडे कौतुकानें पहावयाला लावून या प्रसंगाला कवीनें विशेष शोभा आणली आहे. प्राण्यांच्या करुणेनें शोभणारे जन, आपल्या धर्मचर्येला हिंसेचा कलंक लावून घेतील हें शक्य नाहीं म्हणून हे कपोत कवीनें मायानिर्मित करवले आहेत.

या चारुचरित्र स्त्रीनें एक अन्नछत्र स्थापिलें. या दोघानीं जें काय केलें त्याहून अधिक करण्याची शक्ति दुसऱ्याची नाहीं हें जाणून अरोचिकी (सुपरीक्षक) विधात्यानें यांच्या पोटीं अपत्य निर्माण केलें नाहीं. ऊंसाला फळ आणून देण्याच्या कामीं श्रम घेतले नाहींत. सुधारसाची योग्यता आपल्या रसाच्या मधुरपणामुळें विसरावयाला लावणाऱ्या ऊंसाला आणखी फळ तें काय द्यावयाचें असतें ?

टीप :—मधुरचरितांचें दांपत्य अनपत्य ठेवणें या विधात्याच्या करणीला मधुररसाच्या ऊंसाला फळ आणून न देणें या त्याच्याच करणीचा दिलेला दाखला सर्वोत्कृष्ट आहे.

(४) विजय; (५) जयेन्द्र

## संधिमति आर्यराज नामक मंत्र्याची गोष्ट

जयेन्द्र राजाचा, बुद्धिमतांत श्रेष्ठ असा संधिमति नांवाचा एक मंत्री होता. हत्तीची व राजाची चपलकर्णता नष्ट करण्याचा उपाय नाहीं. गंभीर वृत्तीचे नसलेले राजे विटांनीं बोललेल्याचा अनुवाद करीत असतात. जसा ध्वनीचा प्रतिध्वनि! हा शक्य आहे असें विटांनीं म्हणतांच राजानें त्यास वाड्यांत प्रवेश बंद करून त्याचें सर्वस्व हरण केलें. मंत्री शिवभक्तींत व दारिद्र्यात मग्न राहिला. त्याला राज्यप्राप्ति होणार अशी अश्रुतवाणी घरोघर पसरली. वाणी आपोआप पसरत नाहीं असें आप्तांनीं सांगितल्यावर राजानें संधिमतीला बन्धनात टाकलें. राजा झुरणीस लागला. दहा वर्षें झालीं. मंत्र्याचा वध केल्याशिवाय भवितव्याची प्रतिक्रिया करतां येणार नाहीं असें राजाच्या मनानें घेतलें. भस्मराशींत अल्प तेजानें उन्मेष पावणाऱ्या अग्निकणाला अतुल शक्ति देण्याचें जेव्हां विधि ठरवतो तेव्हां, तो कण विझवून टाकण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या मनात त्याच्या समीप असलेल्या तस म्हणून पातळ अशा घृतानें भरलेल्या घटाचें ठायीं पाण्यानें भरलेल्या कुंभाचा भ्रम उत्पन्न करतो. संधिमतीला राजाच्या आज्ञेनें शूळावर चढवून मारण्यांत आलें. राजाचा शोक शंकु आधीं व मग त्याचे प्राण नष्ट झाले. राजा निपुत्रिक होता म्हणून पुढें कांहीं दिवस त्याची भूमि पालकाशिवाय राहिली.

संधिमतीच्या मरणाचें वृत्त ऐकून त्याचा ईशान नामक गुरु त्याची क्रिया करण्याकरतां स्मशानांत गेला. जन्मभर दारिद्र्य, 'दहा वर्षें बन्धन, शूळावर मरण व नतर राज्यप्राप्ति असें भविष्य कपाळावर लिहिलेलें वाचून, शेवटल्या अर्थाची सिद्धि कशी होते तें पाहाण्याकरता तेथेंच वसति करून तो गुरु अस्थि राखीत बसला.

हा विधि खरोखरच आश्चर्याचा निधि आहे. अर्धरात्र झाली. दिव्यगंधाचा वास सुटला. डमरूचा घर्घर निर्घोष ऐकू आला. तेजोवलयाच्यामध्यें स्थित अशा योगिनी त्याला दिसल्या. त्यांकडे बघत एका वृक्षाआड ईशान उभा राहिला.

योगिनींनीं संधिमतीचा सापळा जुळविला. योग बळानें त्याला पूर्णांग केलें. व त्याचा उपभोग घेतला. क्षपा क्षीण झाली. योगिनी अन्तर्धान पावल्या. त्याच्या आधीं त्यांनीं ईशानाच्या कानात पुढील वाणी प्रविष्ट केली, "ईशाना! भिऊ नको. हा पृथ्वीवर प्रख्यात होईल. याला साधवून आम्हीं दिव्य केलें आहे."

संधिमतीनें गुरुला वंदन केलें. स्वप्नांतसुद्धां जो मिळावयाची आशा नव्हती त्याला गुरुनें आलिंगन दिलें, तेव्हां तो कोणत्या भूमीचें अवलंबन करून होता, त्याला किती आनंद झाला होता. तें कोण सांगेल?

हें वृत्त कळताच पौरांनीं संधिमतीलाच राजा होण्याची विनंति केली. गुरुची अनुज्ञा मिळताच ती त्यानें मान्य केली. वाद्यघोषांत पुरप्रवेश करतां त्यावर लोकांनीं वाड्यातून लाह्या उधळल्या.

सर्व प्रक्रिया यानें निस्तुष केल्या. यानें सत्तावीस वर्षें राज्य केलें. तो शम व्यसनी होता. याला वाटलें एकाद्या नटाप्रमाणें, या राज्यरूपी रंगभूमीवर, मी बरीच वल्गना केली. ती नीरस होऊन अद्याप प्रेक्षक उठून जावयास लागले नाहींत, हें माझें मोठें मी भाग्य समजतो.

दुसऱ्या दिवशीं सभा भरवून संधिमतीनें आपलें राज्य ठेवीप्रमाणें जसेंच्यातसें परत दिलें. स्वेच्छेनें टाकलेली कांत अशी नायकाकडून परत घेववता येत नाहीं तसें तें सोडलेलें राज्य, त्याच्याकडून परत घेववतां आले नाहीं.

### झोंपेच्या समयाचें वर्णन.

राजाचा वेश टाकून, पूजालिंग हातांत घेऊन, उत्तराभिमुख होऊन संधिमानानें गुहागृहें असलेल्या वनाची वाट धरली. दिवसावसान झालें. पुष्करणीवर जलपान करून त्यानें तरुतळीं पर्णाची शय्या रचली. तो तीवर आरूढ झाला. रवीचे मितोष्ण किरण पर्वतशृंगावर चढले. वनभू छायेनें शबलित झाली. प्रफुल्ल मल्लिकावेलींच्या तळीं गोपस्त्रिया सुप्त झाल्या. निर्झराच्या अम्बुपाताचा ध्वनि, वनपालानें वाजविलेल्या वेणूच्या रणितांत, मिश्र झाला. व त्या श्रान्त झालेल्या राजाला

टे भेरीच्या ध्वनीशीं स्पर्धा करणाऱ्या वनगजांच्या रसितांनीं व ंचि आणि सारस्वत पक्षांच्या शब्दांनीं त्रियामा सरत आली असं तो अनुमान करून पुढें निघाला.

### वैराग्य धारण केलेला राजा.

वैराग्य धारण करून तो नन्दीक्षेत्रांत जाऊन राहिला. अंगाला भस्म फासलेलें आहे, शिरीं जटाजूट बांधलेलें आहे, हस्तात अक्षमाला आहे, रुद्राक्षांकित त्याच्या शरीराकडे जरठमुनी पहात आहेत. अशी त्याला समत असलेली स्थिति प्राप्त झाली. शंकराचे व्रताकरता तो भिक्षेला जाई तेव्हां तापस स्त्रिया त्याचें पात्र पवित्र फुलें व फळें यांनीं भरून काढीत. कोणाजवळ जाऊन त्याची प्रार्थना करण्याचें लाघव त्याला प्राप्त झालें नाहीं.

टीपः—आरंभींची विटानुकारी राजाला प्रतिध्वनीची उपमा मार्मिक आहे. पुढें अग्निकणाला विझवण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या मनात अग्निकणाचा उन्मेष करू पाहणारा विधि तप्त घृतानें भरलेल्या घटाचा भ्रम उत्पन्न करतो या गोष्टीचा, संधिमतीला नाहींसा करण्याच्या इच्छेनें राजानें योजलेल्या संधिमतीचाच उलट उत्कर्ष करणाऱ्या उपायाला दिलेला दृष्टान्त फार उठावदार आहे. वनवासिजनांच्या झोंपेच्या काळाचें व जागे होण्याच्या काळाचें अशीं दोन्हीं वर्णनें आल्हादकारक आहेत. वैराग्ययुक्त संधिमानाचें चित्र मनांत पावित्र्य उत्पन्न करणार आहे.

या तरंगांत दहा राजांनीं मिळून एकशेंब्याण्णव वर्षें राज्य केलें.

# तरंग ३.

## (१) मेघवाहन.

युद्धिष्ठिराचा प्रपौत्र जो गोपादित्य त्याच्या पुत्राला, मेघवाहनाला, गान्धाराहून आणून लोकांनीं राजा केलें. त्यापूर्वी प्राग्ज्योतिष नांवाच्या देशांतील राजाच्या कन्येचें स्वयंवर तेथील राजानें मांडलें. तेथें हा गेला असता याला राजकन्येनें माळ घातली. नरकासुरानें आणलेलें छत्र या राजाच्या डोक्यावर धरलें, तें उगीच नव्हतें. चक्रवर्ती असल्याशिवाय कोणावर तें धरावयाचें नव्हतें.

या राजानें प्राणिवधाचें निवारण केलें. यज्ञात पिष्टपशूंचे व घृतपशूंचे बली देऊं लागले. आपल्या कोशातील धन खर्चून यानें खाटिकाना दुसरी निष्पाप वृत्ति दिली.

मूक देवीनें एक विहार बांधला. त्याच्या अर्ध्या भागांत भिक्षाचरांच्या धर्मतत्त्वाप्रमाणें वागणारे भिक्षू व दुसऱ्या अर्ध्या भागात, गृहस्थाप्रमाणें वागणारे म्हणून निंद्य असे गार्हस्थ्य भिक्षू, त्यांच्या स्त्रिया व पशू ठेवले.

तो राजा एकदां बाहेर विहार करीत असतां अभय मागणाऱ्या दोन तीन स्त्रिया दिसल्या. आपल्या मस्तकावर अंजलि रचून त्या म्हणाल्या, "आमचे पती जे नाग ते मेघरूपानें नभाचें तल झांकून स्वस्थ बसले असतां, शालिवनाची राखण करणारे कांहीं नागव्ये हिमवृष्टि होईल या खोट्या शंकेनें चोर चोर असें ओरडले. आपण त्यांचा म्हणालांत. आपल्या आज्ञेनें पाशबद्ध होऊन ते खाली पतन पावले. आमच्यावर करुणा करावी व प्रसाद व्हावा." बन्धनांतून सोडा असें राजा म्हणाला. बन्धनातून मुक्त झालेले नाग राजाला प्रणाम करून पत्न्यांसह निघून गेले.

राजा वेलावनांत फिरत असता एक शबर, चण्डिकेसमूर अधोमुख मनुष्याचा बलि देत होता. त्याचा राजानें धिक्कार केला. शबर म्हणाला, "या उपहाराचा निषेध करशील, तर माझा रोगग्रस्त मुलगा तत्काळ मरेल. या अनाथाचें रक्षण करतोस, पण पुत्रकळांचें रक्षण करणाऱ्या या माझ्या बाळाची उपेक्षा करतोस?" बळीच्या दीनवाण्या दृष्टिपातानीं विवश होऊन राजा म्हणाला, "मी या अनाथाचें रक्षण करण्यात स्वदेह अर्पण करतो." शबर म्हणाला, "त्रैलोक्यातील जीव अर्पण करून तुम्ही रक्षण केलें पाहिजे. स्वप्राणाकरता राजेलोक कोणाकडे पहात नाहींत. तू जग व माझ्या मुलाला जगू दे." राजा म्हणाला, "तुम्ही वनचर सदाचारसुखेचा आस्वाद घेणारे कसे व्हाल? मरुदेशांतील लोकास जान्हवीजळांतील मज्जनाचें सुख कळत नाहीं. तुझ्या मुलाला बहुत (आप्त) बन्धू आहेत. या अनाथाला नाहींत. या बळीचें रक्षण मी चण्डिकेला स्वदेह अर्पण करून करणार."

राजानें स्वशरीरावर प्रहार करण्याला तरवार उपसली तोंच आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. राजाचा हात एका दिव्य पुरुषानें धरला. ती चण्डिका, तो बली, इ. सर्व नाहींशीं झालीं. तो दिव्य पुरुष म्हणाला "मी वरुण आहें रसातळाचा तिलक असें हें छत्र तुझ्यापुढें उभें आहे, तें पुराणपुरुषानें नरकासुरानें तुझ्या श्वशुरानें माझ्या पुरातून हरण केलें होतें. तें नाहीं म्हणजे प्रजेला प्राणहर उपद्रव होतात. तें नाहींसें व्हावें म्हणून, तुझ्या औदार्याची परीक्षा पहाण्याकरतां मी ही माया रचली. राजानें वरुणाला छत्र दिलें, व समुद्रातील बेटें जिंकण्याची राजानें इच्छा प्रदर्शित केली. वरुण म्हणाला "तुझ्याकरतां मी समुद्राचें स्तमन करीन." छत्रासह वरुण अदृश्य झाला.

समुद्राला भाग पाडीत नतर राजा लंकेला गेला. तेथील नृपानें राक्षसांच्या शिरांनीं भूषित अशा ध्वजा अर्पण केल्या व कायमची ताबेदारी प्रदर्शित केली या ध्वजाना परिध्वज म्हणतात. काश्मीरात यात्राप्रसंगीं या राजांच्या अग्रभागीं दिसतात. राक्षसांना मास वर्ज्य करावयास या राजानें लावलें. मांसाशन हें राक्षसांचें अन्वर्थ नांव आता रूढिवाचक शब्दात मोडूं लागलें.

एक ब्राह्मण राजद्वारीं आपल्या रुग्ण पुत्राला ठेऊन म्हणाला, "दुर्गेनें मागितलेला हा पशूना बलि तूं देऊं न देशील तर हा माझा मुलगा मरेल. ब्राह्मण आणि पशु यातील अंतर तू वर्णगुरूनेंच ठरवावें. ब्राह्मणपुत्राच्या मृत्यूचें पाप टाळण्याकरतां व आपल्या अहिंसेचें व्रत पाळण्याकरतां राजानें स्वताचा बलि देण्याचा निश्चय केला. सगमावर उद्‌भवलेल्या भोंवऱ्यांत पडलेल्या सुमनाप्रमाणें स्थिति असलेलें त्याचें मन स्थिर झालें. दुर्गेनें ब्राह्मणपुत्राची प्रकृति होती तशी केली.

### असंभाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.

पृथक्‌जनांना असंभाव्य वाटणारें या दिवसांतील मेघवाहनाचें वर्णन करतांना आम्हाला लाज वाटते. तथापि रचना निर्विशेष एका प्रकारच्या आर्ष मार्गानें (परपरागत सांप्रदायिक मार्गानें) जाणाऱ्या आम्हांस श्रोतृचित्ताचें अनुवर्तन करावें लागत नाहीं. श्रोत्यांना रुचेल असें लिहिण्याला आम्हीं बांधलेले नाहीं.

(२) प्रवरसेन; (३) हिरण्य व तोरमाण सहभोजी.

## मातृगुप्ताची गोष्ट

काश्मीरात राजा हिरण्य निःसन्ततिपणानें मृत्यु पावला. त्याचा वारस पुतण्या तोरमाण, तीर्थयात्रेला गेला होता. म्हणून काश्मीरात राजा असा कोणी नव्हता. तेव्हां श्रीमान् हर्ष असें नाम धारण करणारा एक चक्रवर्ती राजा, विक्रमादित्य उज्जयनींत राज्य करीत होता. हा गुणवन्तांना सुलभ असे. मातृगुप्त ( एक कवि ) विविध आस्थानें ( राजसभा ) फिरून येथें आला. त्याला हा राजा अद्भुत वाटला. मातृगुप्तानें विचार केला. “ या राजाकडे गुणाचें चीज व्हावयाला अजलिदान करावें लागत नाहीं–आपल्या अभिप्रायाचें प्रकाशन वक्रोक्तीनें करावें लागत नाहीं–कुलवधूप्रमाणें बुद्धीला चातुर्याचें बन्धन घालावें लागत नाहीं. खलाच्या आलापाना खीळ बसते. याच्या सेवेंत गुण अनर्थकारी होत नाहींत. विद्वान् व अज्ञ यांचा समावेश एकाच शीर्षकांत (मथळ्यात) होत नसल्यामुळें गुणीजनांना मेल्यासारखें वाटत नाहीं. हा युक्तायुक्त जाणणारा अंतरज्ञ आहे. मर्जी संपादन करण्याकरता सेवकाला जे श्रम पडतात, ते हिमालयांत हिमविक्रय करण्यासारखे निष्फळ होत नाहींत. अन्यांचा प्रवेश रद्द न होणारे सेवक याच्या जवळ नाहींत. सर्वज्ञ मन्यतेनें अंध झालेल्या लोकांचा हा मुखपेक्षी होत नाहीं. याच्यासह चालणेल्या खलपाला, विपुल भर आला असता मध्येंच दुर्जात दुर्जनांना च्छेद करण्याला सांडत नाहीं. अर्थसिद्धि दूर नाहीं. आणखी भ्रमण करीत अन्य राजाची सेवा करण्यापेक्षां याच राजाची सेवा क्लेशाचें भय सोडून करावी असें त्याला वाटलें. या राजाच्या सभेचें रंजन जशा नव्या सभेचें करावें लागतें तसें करण्याचें यानें सोडून दिलें. गुणिजनांचा मध्यम झाला नाहीं.

आपली विशिष्ट योग्यता कळावी म्हणून हा मातृगुप्त, आराधनोन्मुख आहे, तरी आपले गुण मार्दवानें प्रकट करणारा आहे. सत्कार योग्य आहे हें राजानें जाणलें; पण त्याची परीक्षा पहाण्याकरता, राजानें त्याचा तसा सत्कार केला नाहीं. तरी तो मातृगुप्त राजाविषयीं प्रेम मनात बाळगून त्याची सेवा करीत राहिला.

मातृगुप्ताचा सेवाभ्यास क्रमानें वाढला, पण तो राजापुढें अगदीं दीर्घ वेळ अथवा अगदीं स्वल्प वेळ उभा राहिला नाहीं. त्यानें राजदासीवर डोळा ठेवला नाहीं; राजशत्रूशी सहासन केलें नाहीं. परगुणीं निराग्रहानें अन्यांच्या उत्कर्षाविषयी बोलून तो सभाजनांच्या आवडीचा झाला.

असे मातृगुप्तानें सहा ऋतू घालविले एक दिवस बाहेर जातांना, राजाला पुढें मातृगुप्त सर्वांगांनीं कृश, मलिन व जीर्ण वस्त्र नेसलेला दिसला. राजा मनात म्हणाला “ मी या वैदेशिकाकडून त्याची परीक्षा पाहाण्याकरता कष्ट सोसवले. शीत, वात व आतप, यांनीं सुकलेला हा पुरुषपादप मी वसन्ताप्रमाणें शोभायमान केला नाहीं. ऐवढी सेवा केली तिच्याबद्दल मी काय याला चिंतामणि देऊं कीं अमृत देऊं ? मातृगुप्ताला सेवाक्लेशातून मुक्त करण्याचा उपाय राजाला विचार करूनहि सुचला नाहीं.

हिमागम आला. शीतार्थ अम्बरमणि जो सूर्य तो वडवानलाच्या उष्म्याचा अभिलाष धरून जलधीकडे वळला. दिवस लहान झाले. अशा कालात, रसरशीत निखाऱ्यांनीं भरलेल्या शेगड्या, ज्यात प्रदीप्त आहेत अशा शयनमंदिरात उज्ज्वल दीपाच्या प्रकाशांत राजा झोंपी गेला. तो मध्यरात्रीच्या सुमारास जागा झाला. मंद झालेले दिवे पुन्हा उजळ करण्यास पहाऱ्यावर कोण आहे असें राजानें विचारलें. तवं सुखसुप्त असतां “ महाराज ! मीं मातृगुप्त ” असे शब्द त्यानें ऐकले. आंत ये अशी अनुज्ञा मिळतांच मातृगुप्त आत शिरला. दिवे उजळ असें राजानें सांगितलें. तसें करून चतुरपणें पदें टाकीत मातृगुप्त जात आहे तोंच राजा म्हणाला. “ उभा रहा.” राजा काय बोलणार याचा विचार करीत, दूर नाहीं जवळ नाहीं इतक्या अंतरावर मातृगुप्त राहिला. त्याचा शीतकम्प दुणावला. राजानें विचारलें रात्र किती आहे. तो म्हणाला “रात्रीचा अर्धभाग शेष आहे.” राजानें विचारलें तूं हें निश्चितपणें कसें जाणलेंस ? तुला निद्रा लागली होती कीं नाहीं. त्यानें क्षणार्धांत, श्लोकबद्धवाणींत उत्तर दिलें.

“ शीतेनोद्धूषितस्य माषकिणवच्चिन्तार्णवेमज्जत. ।
शान्ताग्निं स्फुरिताधरस्यधमत. क्षुत्क्षामकण्ठस्य मे ॥
निद्रा क्वाप्यवमानितेव दयिता संत्यज्य दूरंगता ।
सत्पात्रंप्रतिपादितेव वसुधा न क्षीयते शर्वरी ॥ १८१ ॥

शीतानें पीडलेल्याची, माषकणाप्रमाणें चिंतार्णवात बुडालेल्याची, क्षुधेनें क्षामकण्ठ झालेल्याची, फुटलेल्या ओठांनीं शेगडींतील अग्नि प्रदीप्त करणाऱ्याची, माझी निद्रा, अपमान केलेल्या दयितेप्रमाणें मला सोडून दूर निघून गेली. पण सत्पात्रीं दान केलेल्या वसुधेप्रमाणें माझी निद्रा क्षय पावत नाहीं. ”

राजानें कवीन्द्राचें त्याच्या परिश्रमाबद्दल, अभिनंदन केलें. व त्याला पूर्वस्थानीं लावून दिलें. राजा मनांत म्हणाला, “ या खिन्नमनस्क गुणी माणसाचें दुःखतप्त वचन ऐकून, जागच्याजागीं असा स्वस्थ बसणाऱ्याचा माझा धिक्कार असो. माझें खरें हृदय न समजून हा आपला बाहेर खेद करीत बसला आहे. याचा विचार करूनहि याला काय द्यावें तें मला सुचत नाहीं–पण तसें नाहीं–‘ सत्पात्रीं दान केलेल्या वसुधेप्रमाणें, ’ या याच्या शब्दांनीं मला आठवण करून दिली आहे. ती अशी कीं हवें हवें असें वाटणारें काश्मीर मण्डळ राजरहित आहे. त्याची मार्गणा राजे करीत आहेत. त्याची अवधारणा करून तें मण्डळ या पुरुषाला देऊन टाकावें. ”

रात्रीं हेर पाठवून राजानें काश्मीर मण्डळाच्या सचिवास

कळविलें की, मातृगुप्त नांवाचा जो कोणी माझें शासन घेऊन येईल, त्याला निःशंकपणें राज्य द्या.

राजा कृतकृत्य होऊन शेषरात्र निद्रेंत घालविता झाला. मातृगुप्ताला वाटलें आशेचा भार हलका झाला. संशय फिटला. आतां मी सुखानें फिरेन. जनप्रवादामुळें हा राजा चांगला सेव्य आहे.' असें मी समजत होतों. सरीसृपगण ( सरपटणाऱ्या प्राण्यांचा गण ) वायु भक्षण करून भोगी म्हणून प्रसिद्धि पावले आहेत. गुंजारव करणाऱ्या मृगाचें निवारण करणारे गण विस्तीर्ण कर्ण म्हणून ज्ञात आहेत. अभ्यंतरात उष्म विकृति अग्नि बाळगणारा वृक्ष शमी ठरला जातो. असें हें सर्व जग निरर्गल प्रलाप करणाऱ्यांनीं विपर्यस्त करून टाकलें आहे. उघड उघड फलप्राप्ति होण्याला, राजाचे उपजीवीच पत्करतात. प्रत्यक्ष राजापासून फलप्राप्ति होण्यास फार परिक्लेश होतात. जे पशुपतीच्या पादतलीं उभे असतात त्याना त्वरित भस्माशिवाय, दुसरें कांहीं प्राप्त होत नाहीं. पण जे त्याच्या वृषाच्या पादतलीं उभे असतात त्याना सुवर्णाची प्राप्ति होऊन कोठले दिन सुदिन नसतात ? मातृगुप्त राजाविषयीं निरादर झाला. खेद पावलेल्या तत्त्वज्ञान्याची बुद्धि विपर्यस्त होते.

प्रभातसमयीं राजानें क्षत्त्याला ( द्वारपालाला ) आज्ञा केली कीं मातृगुप्ताला घेऊन ये. अनेक धांवत गेलेल्या सेवकांनीं मातृगुप्ताला राजाजवळ नेलें. मुहूर्तभरानें भ्रूसंज्ञेनें आपला लेख लेखनाधिकाऱ्याकडून मातृगुप्ताला देववून राजा मातृगुप्ताला म्हणाला " अग ! तुला काश्मीर माहीत आहे काय ? तेथें जा व तेथील अधिकाऱ्यास हें शासनपत्र दे. वाटेंत कोणी हा माझा लेख वाचील त्याला माझ्या देहाची शपथ. ही सूचना विसरतां कामा नये."

आशय न कळल्यानें त्याला राजाज्ञा अग्निशिखाच वाटली. असा मातृगुप्त जाताना पाहून इतरांनीं राजाची निंदा आरंभली. जो नानाद्युतिमान पदार्थांचा रसिक आहे व जो इंद्रधनुष्य पाहून मुदित होतो व पुढें पिसारा करून जो मोर आशेनें नाचतो त्याला वारिकणाहून अधिक जो देत नाहीं अशा मेघाहून अधिक अन्यायाश्रय कोण म्हणावयाचा ?

मातृगुप्ताला वाटेंत अदृष्टपूर्वकेनें शुभशकुन झाले. सर्पाच्या फणाकोटीवर बसलेला खंजरीट सरडा दिसला. नौकेंत बसून सागर तरून गेलों असें स्वप्न त्यानें वाटेंत निद्रा घेत असता पाहिलें. पुष्कळ वाट चालून त्याला मंगल दधिपात्रासारखा हिमालय लागला.

काश्मीरात गेल्यावर तो तेथें पहातो तों मोठेमोठे अमात्य जमले होते. मातृगुप्तानें अमात्यांना शासनपत्र अर्पण केलें. त्यांनीं विचारलें मातृगुप्त असें श्लाघ्य नांव आपलेंच काय ? तो हिंमत करून होय म्हणाला.

सर्वत्र गडबड उडाली त्यांनीं मातृगुप्ताला स्नातानुलिप्त करून राज्याभिषेक केला. व ते म्हणाले आमचें रक्षण करावयाला राजा पाठवून द्या अशी विनंति केल्यावरून विक्रमादित्यानें स्वसमान असा राजा तू आहेस असें पाहून तुला पाठवून दिलें. सुखानें राज्य कर. मातापिता जन्माला निमित्त होतात. पण प्राण्याला कर्माप्रमाणें जीवित प्राप्त होतें. तसें हें राज्य तुला मिळालें आहे दुसऱ्या कुणी मिळवून दिलें असें मानू नकोस. ' मी तुझा आहें ' असें कुणाला वाखाणून हे राजा ! आपणाला व आम्हाला लघुता आणू नये."

धन्याची सत्क्रिया व त्याचे असामान्य गुण, आठवून मातृगुप्तानें एक श्लोक रचून, स्वात्मय ( आपलेपणाच्या ) नजराण्यादाखल धन्याकडे पाठवून दिला.

> नाकारमुद्वहसि नैव विकत्थसे त्वम् ।
> दित्सां न सूचयसि मुंचसि सत्फलानि ॥
> निःशब्दवर्षणमिवाम्बुधरस्य राजन् ।
> संलक्ष्यते फलत एव तव प्रसादः ॥

भावार्थः—तू चर्येवरून कांहीं भाव प्रदर्शित करीत नाहींस. तोंडानें विकत्थन करीत नाहींस. देण्याची इच्छा सुचवीत नाहींस. फलप्राप्ति तेवढी हे राजा ! करून देतोस. निःशब्द वर्षाव करणाऱ्या मेघाप्रमाणेंच तुझा प्रसाद फलप्राप्तीनें लक्षात येतो.

टीपः—युक्तायुक्त जाणणाऱ्या विक्रमादित्य राजाचें वर्णन कवीनें फार सरस केलें आहे. त्याहून सरस त्याच्या सेवकाचें मातृगुप्ताचें वर्णन आहे. राजदासीवर डोळा न ठेवणारा दुसरा राजभृत्य कोण सांपडेल ? त्याच्या वर्णनात एवढें सूक्ष्म निरीक्षण तरी कोणता कवि कल्हणाशिवाय दाखवील ? डाक्टर भाऊदाजींच्या मतें हाच मातृगुप्त कवि, कालिदास असावा. तें पुष्कळांस मान्य नाहीं. नसो, पण अशी अशी तुझी सेवा करीत असता अपमानित दायितेप्रमाणें माझी निद्रा उडाली असें सांगून सत्पात्रींदान केलेल्या वसुधेप्रमाणें माझी क्षयाक्षय पावत नाहीं, असें कथन करून आपल्या सेवेचा मोबदला कसा हें सुचित करणारा श्लोक रचावयास कालिदासाच्याच प्रतिभेचा कवि लागेल, यात संशय नाहीं. मातृगुप्त काश्मीरच्या वाटेनें जात असतां शुभशकुन झाले. हिमालयाला मंगल दधिपात्राची कल्हणानें दिलेली उपमा सहजरम्य व हिमालयाचें पावित्र्य दर्शित करणारी आहे.

मातृगुप्त राजा असता मेंठकवीचें हयग्रीव नावाचें काव्य प्रसिद्धीस आलें. त्याचा सत्कार मातृगुप्तानें केला. व करभक नावाची नाणी पाडून त्यांचा प्रसार केला. आपला कल्याण करणारा राजा विक्रमादित्य हा मृत झाला असें ऐकून मातृगुप्त काशीस जाऊन यति होऊन राहिला.

### ५ प्रवरसेन.

हिरण्याचा पुतण्या काशीयात्रा करून परत आला व राजा झाला. हा राजा दिग्विजयी होता. यानें वितस्तेवर पूल बांधला. तेव्हां नौकांचा पूल बांधण्याची कल्पना निघाली. वितस्तेच्या तीरावर प्रवरपूर वसविलें, त्यांत पृथक् बाजार, क्रीडागृहें, क्रीडापर्वंत पाण्याचे पाट इत्यादि सोई होत्या.

( ६ ) युधिष्ठिर—

### ७ लखूखण नरेन्द्रादित्य.

लिखित दस्तैवज चांगल्या स्थितींत रहावे म्हणून यानें जागा बांधल्या.

### ( ८ ) रणादित्य.

#### भानवरणादित्याची देवी राणी.

हा राजा पूर्वजन्मीं द्यूतकार होता. द्यूतांत सर्वस्वी हरण झाल्यावर शेवटपर्यंत न सोडणाऱ्या कितवांना मिळून यानें देवीचें अवंध्य दर्शन घेण्याचें ठरविलें. वज्रशंकु पुच्छाच्या भ्रमरांनीं तिचा मार्ग दुर्लंघ्य होता. यानें लोखंडी चिलखत घालून महिषचर्म पांघरिलें. शेणमातीचे लेप अंगाला लाविले. कोष्ठाप्रमाणें संचार करीत हा देवीच्या तमोवृत गुहेंत शिरला. भ्रमरांचीं मण्डळें उठून मृत्यूच्या तुतान्यांच्या शब्दाप्रमाणें पखाच्या ध्वनि करीत त्याला प्रहार करू लागलीं. त्याचें चिलखत गळालें पण धैर्य गळालें नाहीं. मातीच्या कणांनीं जीं अघ होत होतीं तीं परत जात. पण नव्यानीं त्याचें मांस खाऊन त्याला अस्थिशेष केलें. असा देह त्यानें देवीच्या पायावर टाकला.

देवीच्या स्पर्शानें तो पूर्ववत् झाला. देवीचें निर्दोष रूप पाहून तो तिला अप्सरा समजला, त्यानें संगमाची याचना केली. ती तो बदलीना. पूर्वी अधिवास जो प्राण्यांमध्यें विलीन असतो, तो अगावरील तिलाप्रमाणें शेवटपर्यंत विशीर्ण होत नाहीं. देवी म्हणाली पुढल्या जन्मीं तुझी इच्छा सफल होईल.

द्यूतकारानें प्रयागांत जाऊन देहविसर्जन केलें. या जन्मीं तो रणादित्य झाला. चौलराजाला लाटांवरून आलेली एक कन्या मिळाली. तीच ही भ्रमरवासिनी. तिचा विवाह रणादित्याशीं झाला. ती मर्त्याला स्पर्श कशी करणार? आपल्या सारखी दिसणारी, मायामय स्त्री राजाच्या पलंगावर ठेऊन भ्रमररूपानें ती रात्रौ बाहेर पडे.

राजानें दोन देवळें बांधलीं, त्यांत स्थापन करण्याकरता पार्वतीविवाहप्रसंगीं पुजलेल्या हरिहराच्या मूर्ती राणीनें आणवल्या. देवीनें एक स्वच्छ आरोग्यशाळा रोग्यांना औषधें देण्याकरतां बांधिवली व सेनामुखी (देवीच्या) शान्तिकरतां गृह बांधवलें.

या राजानें तीनशें वर्षे राज्य केलें व अन्तीं चंद्रभागातीरी नमूचीच्या बिळांत प्रविष्ट झाला. पौरजन पुढें पाठविलेले होते.

टीप—रणादित्य व भ्रमरवासिनी देवी यांची गोष्ट कल्पनारम्य आहे पूर्वीच्या न बदलणाऱ्या अधिवासाला कधीं न शीर्ण होणाऱ्या अगावरील तिलाची उपमा पूर्णपणें पटणारी आहे. राजाचा राज्यकाळ तीनशें वर्षें जो कवीनें लावविला आहे तो बहुधा त्यानें एकदर दिलेल्या इतिहासकालाचा सप्तर्षिकालाशीं मेळ बसविण्याकरता असेल.

### ( ९ ) विक्रमादित्य

### (१०) बलादित्य

हा रणादित्याचा धाकटा मुलगा, राजा झाला. यानें प्रतापानें वंग व जिंकला.

### राजकन्या अनंगलेखा हिची गोष्ट

या राजाची अनंगलेखा या नांवाची एक कन्या होती. ती शृंगारसागराची कौमुदी होती. एका दैवज्ञानें राजाला सांगितलें, तुझ्या अन्तापर्यंत गोनर्दाचें राज्य टिकेल. मग तुझा जामात साम्राज्य भोगील. तशी राजाची इच्छा नव्हती. पुरुषप्रयत्नानें तो दैवाला जिंकण्याचा उद्योग करू लागला. कन्या साम्राज्यहारिणी न व्हावी म्हणून त्यानें तिला कोणाहि राजाला न देतां दुर्लभवर्धन नांवाच्या एका अश्वघास (अश्वांना घांस पुरवणाऱ्या) कायस्थाला देण्याचें त्याची स्वरूपता पाहून ठरविलें. त्याच्या आईचा ती सुस्नात असता कर्कोटक नागाशीं संबंध झाला होता. तें त्या राजाला माहित नव्हतें. शंमन्य लोक ज्याला आग्रहानें अयोग्य ठरवतात त्याच्यावर ताण करण्याकरतां दैव त्यालाच शुभ ठरवितें.

भाग्यानुगामिबुद्धीनें दुर्लभवर्धन यथोचित वर्तन करून सर्वांना चक्षुष्य झाला. प्रज्ञेनें प्रकाश पावणाऱ्या जांवयास, श्वशुरानें प्रज्ञादित्य असें नांव ठेवलें. पित्याच्या लाडांनीं व तारुण्याच्या मदानें उद्धृत झालेली राजपुत्री, त्याची योग्यता जाणत नव्हती. सुखोपभोग, तरुण पुरुष, पतीचें मृदुत्व, पुढें उभें माहेर, स्वैरिणींचा संगम, इत्यादि शीलाला विघ्न करणारें काय काय तिथें नव्हतें! रोज दर्शनानें खक मन्त्र्यानें तिच्या मनांत प्रवेश केला. बहुशः जी स्त्री सखीमध्यें असतां गुप्तपणें हंसते, भर्तृदर्शनानें विवर्ण होते, पति रागावला असतां भिवया उडवते, नेत्र फिरवते, पतीचें अप्रिय भाषण ऐकून डोळे मिचकावते व हसते, त्याच्या गुणांची स्तुति झाल्यास खिन्न होते, शत्रूच्या स्तुतींत रत होते, पतीची रममाण होण्याची इच्छा कळतांच सख्यांशीं गोष्टी करण्यात चूर होते, चुम्बनाचे वेळीं मुख चोरते, पतीच्या तल्पावर झोपेचें सोंग घेते, अशा स्त्रीचा शीलनाश झालेला असतो.

एका रात्रीं खक व अनंगलेखा एकत्र सुप्त झालेली दुर्लभवर्धनानें पाहिलीं. संभोग नुकताच समाप्त झाला असें कुचावें कापणारे अंकुर व श्वासाचे वेग ही सुचवीत होतीं. हें तिन्हा-

इतालासुद्धां क्रोध यावयाला कारण पुरेसें होतें. तो क्रोधानें जळू लागला. त्या दोघांना कापावें अशी इच्छा त्याला झाली. पण विवेकानें तिचें निवारण केलें. आपण त्याना कापून पुन्हा केव्हांच परत आलों असें त्याला वाटलें. दुर्लभवर्धना शिवाय ज्या कुणाची गणना वशीजनाच्या माथ्यावर करतां येईल त्याला नमस्कार असो ! तो म्हणाला प्रेमाच्या या अनुगांच्या या चेष्टांचा धिक्कार असो. या चेष्टा विचारवध्या असतात. वध्या अशा मुलें प्रसवत नाहींत तशा या चेष्टा विचारांना प्रसवत नाहींत. शेवटीं "खकाच्या शेल्यावर तू वध्य असून तुझा वध केला नाहीं. हें स्मरण्याचें काम तुझें आहे." असें वर्णन लिहून राजा निघून गेला.

खकानें तें वर्णन वाचलें. आपले प्राण दुर्लभवर्धनाच्या दाक्षिण्यानें वांचले असें जाणून अनगलेखेला खंक अगदीं विसरून गेला अशी प्रतिक्रिया झाली.

टीपः—हीच गोष्ट थोड्या फरकानें कोंकण प्रान्तात नुसती राजाराणींची सांगितलेली प्रस्तुत ग्रंथकारानें ऐकली. ती अशी. "मंत्री व राणी यांस महालात उपरोक्त अधर्म्य स्थितींत पाहून त्या दोघावर आपल्या शेल्यानें पांघरूण घालून राजा तेथून निघून गेला.

राणी व मंत्री यांच्या या पापाची कुणकुण कांहींना लागली. राजा लवकरच कांहीं कारणानें मृत्यु पावला. तेव्हां राणी मोठमोठयानें रडू लागली. तेव्हा तिला त्या लोकांनीं विचारलें "आपण रडतां कां ? आपल्याला हवें होतें तेंच झालें." तिनें उत्तर दिलें "होय. हें सारें खरें. मी पति मृत झाला म्हणून रडत नाहीं. माझेवर आतां पांघरुण कोण घालील ? कोणी नाहीं ! म्हणून मी रडत आहे !" हा फरक इष्ट वाटतो. अपराधावर पांघरूण घालणें या शब्दप्रयोगांत असलेला विशेष अर्थ या गोष्टीवरून निघाला असेल काय ?

राजा बालादित्यमृत झाला. त्यानंतर गोनद संतति नष्ट झाली. खकमन्त्र्यानें कर्कोटक नागानें जन्म दिलेल्याला, दुर्लभवर्धन प्रतापादित्याला राज्याभिषेक केला. गोनदवंशाहून अधिक शुचि अशा कर्कोटक वंशांत भू प्रस्थापित झाली.

## तरंग ४.

### ( कर्कोटक वंश ).

### ( १ ) दुर्लभवर्धन प्रतापादित्य.

### २ दुर्लभक प्रतापादित्य २ रा.

दुर्लभक प्रतापादित्य राजा झाला.

### राजा प्रतापादित्य व नोण वणिजाची नरेंद्रप्रभा स्त्री यांची गोष्ट.

विविध विक्रेत्यांनीं संकुलित झालेल्या प्रतापादित्य राजाच्या राज्यात रोहितक नामक प्रदेशांत नोण नांवाचा वणिज राहत होता. त्यानें आपल्या देशातील ब्राह्मणांकरितां एक महागुण ( पुष्कळ सोयींचा ) मठ बांधला.

त्याला एकदा राजानें मोठ्या प्रेमानें आमंत्रण दिलें; एक दिवस ठेऊन घेऊन, नृपोचित उपचारांनीं त्याची अर्चा केली. सकाळीं राजानें त्याला एकदिवस सुखशयिका ( सुखानें आहेस का ? ) असा प्रश्न विचारला. दीपांच्या कजळानें शीर्षव्यथा त्यानें झाल्याचें सांगितलें. पुढें क्रमानें नोणाच्या विनतीवरून राजा त्याच्या घरीं रहावयास गेला. तेथें त्यानें मणिदीप पाहिले. असल्या लक्ष्मीविलासानें राजा विस्मित झाला. राजाचें आदरातिथ्य होत होत तो दोन तीन दिवस राहिला.

एकदां राजानें नोणाची नरेन्द्रप्रभा नांवाची ललिताकृति चंद्रमुखी स्त्री पाहिली. तिच्या अभिलाषानें राजा स्पृष्ट झाला. त्याच्यावर तिनें आपलें मन दृष्टीनेंच बसविलें. तिच्या स्पर्शाचा लाभ झाला नव्हता तरी, ती सौभाग्यसुधासुंदरी आपल्या आलिंगनानें संस्पृष्ट आली आहे, असें त्याला वाटलें. इथें स्तंभाआड, क्षणभर लपून वांकड्या नजरेनें माझ्याकडे पहात पहात जातांना ही माझें हृदय घेऊन जात आहे, असें राजाला तेवढ्यानेंच वाटलें.

राजा विव्हळ होऊन घरास गेला. त्याची अंतःपुरावरील प्रीति व तनु हीं कृश झालीं. त्यानें आपल्या मानसोद्यानांत रुजलेल्या प्रेमवृक्षाचा धिक्कार केला. तो म्हणाला "राजाच जर प्रजेच्या हक्काचें अपहरण करू लागला, तर नीतीचा अपक्रम झाला असता त्याचें शासन दुसरा कोण करील ?" पण साधुसेव्य पद्धतीला व त्या सुलोचनेला, राजाच्यानें सोडववेना. तो आसन्नमरण स्थितींत पडला.

सुज्ञ वणिजाला हा वृत्तान्त कळला, तेव्हां अस्वस्थ होऊन, वणिजानें कांहीं तत्त्वज्ञान लढविलें. तो राजाला भेटून म्हणाला, प्राणसंशय प्राप्त झाला असता प्राण्याला कांहीं अकृत्य नसतेंच. तुझ्याकरतां माझ्या प्राणाची गणना मी करणार नाहीं. मग इंद्रियांच्या विषयाची या स्त्रीची कथा काय ? इतकें सांगूनहि तू तिला नको म्हणशील तर, तिला मी नर्तकी म्हणून प्रथम देवदासी करतो. आणि मग तू तिचा स्वीकार कर. राजानें प्रथम लज्जेचा त्याग केला व मग सुलोचनेचा स्वीकार केला.

## ३ चंद्रापीड वज्रादित्य ( प्रतापादित्याचा मुलगा )

या राजाच्या कित्येक गुणांचा उच्चार करून, त्याची स्तुति कांहीं काळ चालवून, कवि म्हणतो. "ही स्तुति नियन्त्रित करावी लागत आहे ती गुणाची इयत्ता संपली म्हणून नव्हे. तर अतिप्रसंग भंग होईल, ( कथेचें अनुसंधान सुटेल ) म्हणून.

### सार्वजनिक कार्याकरतां मोबदला देऊन खासगी जमीन घेण्याविषयीं गोष्ट

चंद्रापीडानें त्रिभुवनस्वामीचें देऊळ बांधावयाचें ठरविलें. तेव्हां क्षेत्रोपयोगी अशी आपली कुटी एक चर्मकार देईना. नव्यानव्या अधिकाऱ्यांना, तो देतों असें म्हणे; पण ते सूत्रपात करूं लागले म्हणजे साहजिक आग्रहानें ग्रस्त होऊन त्यांना अडवी.

ही गोष्ट राजाला अधिकाऱ्यांनीं सांगितली. तेव्हां राजा म्हणाला, "धिक्कार असो तुमच्या या अप्रेक्षापूर्वक काम करण्याच्या पद्धतीला ! चर्मकाराचा दोष नाहीं. त्याला विचारल्या

शिवाय तुम्ही या कामांत प्रविष्ट झालात ! हें काम थांबवा नाहीतर, अन्य ठिकाणीं चालवा. सदसत् जाणणारे जर आम्ही धर्मविगुण क्रिया करूं लागलों तर, न्यायमार्गानें कोणी चालावें ?"

मन्त्र्यानीं चर्मकाराकडे एक दूत पाठविला. तो परत येऊन म्हणाला, "चर्मकार म्हणतो कीं मला राजाला भेटावयाचें आहे. आस्थान मण्डपांत प्रवेश नसेल तर बाह्यालींत भेटेन"

राजा त्याला बाह्यालींत भेटला तेव्हां चर्मकार त्याला म्हणाला, "हे राजा ! जसा माझा आश्रय आहे तसा मी वागतों. त्यावरून आपण अनुलिप्त होऊन राहू नये. तू पहातोसच आहेस मी श्वानापेक्षा कमी नाहीं. तू काकुत्स्था-पेक्षां श्रेष्ठ नाहींस. महाराजांची जशी सौधशालिनी राजधानी (राजवाडा) आहे तशी फुटक्या घटमुखानीं काळोख नष्ट करणाऱ्या तमोरीनीं (खिडक्यानीं) शोभणारी माझी कुटी आहे. ती जन्मापासून मातेप्रमाणें माझ्या सुखदुःखाची साक्षिणी आहे. ती मठिका माझ्यानें आज लुबाडलेली पहावत नाहीं. ज्याच्या घराचें हरण करण्यात येतें त्याच्या मनस्थितीचें वर्णन करण्यास, जर कोणी समर्थ होईल तर तो विमानातून च्युत झालेला अथवा राज्यभ्रष्ट असा पार्थिवच होईल ! इतकें असून महाराजांनीं माझे जवळ येऊन माझ्या घराबद्दल मागणी केली, तर सदाचारानुरोधानें तें देणें मला उचितच आहे."

मोबदला देऊन राजानें त्या चर्मकाराचें घर घेतलें. चर्मकार राजाचें कल्याण इच्छून निघून गेला. राजानें त्या ठिकाणीं त्रिभुवनस्वामीची स्थापना केली

टीपः—चर्मकारानें आपलें काम राजापुढें स्वतः चालविलें. त्याचें भाषण थोडकेंच असून एक तरत वक्तृत्वाचा मासला आहे. चर्मकारानें सहानुभूति मिळवून घेतली. आजच्या सुधार-लेल्या कालाला शोभेल असा न्याय राजानें दिला म्हणून त्याचें कौतुक वाचक करतीलच.

## कलियुगांत चालू नसलेलें एक दिव्य.

राजाला एकदा एका ब्राह्मणीनें येऊन सांगितलें. "माझा पति सुखनिद्रित असता, त्याचा कोणी वध करावा हें तुझ्या सदाचाराला लज्जा आणणारें कृत्य आहे. माझ्या पतीचा कोणी विरोधी नाहीं. त्याला सर्व दिशा शीतल होत्या. त्याच्या वयाचा एक ब्राह्मण अध्ययनेधम (अधमविद्येचें अध्ययन करणारा) जादुगार आहे. गुणदरिद्री क्षुद्रलोकांना निर्निद्र राहून कौशल-शाली जनाची प्रसिद्धि पाहून असूयेची बाधा होते. पुंश्चलेय दुःशील नसेल तर दुसरा कोण असेल ! वाचाल मृषा भाषण करीत नसेल तर दुसरा कोण करीत असेल? कायस्थ (कारकून) कृत नसेल तर दुसरा कोण असेल ? द्यूतगृहांत जाणारा लोभी नसेल तर दुसरा कोण असेल? स्त्रीजित सर्वहास्य (ज्यानें त्यानें ज्याला हंसावें असा) नसेल तर दुसरा कोण असेल? असा भूतार्थ समग्र आहे. (असें वस्तुस्थितीचें सार आहे.)

पंचास्थान (आरोपी) विप्राला आणून राजा त्याला म्हणाला "परिशुध्यस्व. दिव्य करून तूं शुद्ध आहेस असें सिद्ध कर." ब्राह्मणी लागलेंच म्हणाली. "हा खालोद विद्या (जादू) जाणतो. हा दिव्य प्रस्थापित करून, निःसभ्रम होईल. चार रात्री क्षीण झाल्या. मी अजून अन्न सेवन केलें नाहीं. व अनुगमन केलें नाहीं. याला दण्ड होईतों मी उपास करून प्राण देईन."

मग राजा त्रिभुवनस्वामीपुढें (केशवापुढें) उपास करीत बसला. स्वप्नोत्तम स्वप्नांत येऊन म्हणाला. "राजा ! कलि-युगामध्यें असलें सत्यान्वेषण युक्त नाहीं. तरी तुला एकवेळ प्रत्यय येईल. या देवालयाच्या अंगण्यांत शालीचूर्ण उधळून त्यावरून शंकित विप्राकडून तीन प्रदक्षिणा घालव. व त्याच्या पावलामागून ब्रह्महत्येचीं पावलें उमटलीं तर तो वधक समज."

तसें करवतां ब्राह्मणाचा दोष दिसून आला. राजानें त्याला वधाची शिक्षा वर्जून शिक्षा केली. ब्राह्मणी राजाला आशीर्वाद देऊन निघून गेली.

या राजाला त्याच्या भावानें वरील ब्राह्मणाकडून अभिचार कर्म करवून मारवलें राजा आसन्नमरण असतां त्याच्यापुढें या ब्राह्मणाला पकडून एकानें उभें केलें. हा अन्यप्रयुक्त आहे म्हणून राजानें त्याचा वध केला नाहीं. कृतयुगातील राजांच्या पङ्क्तीला याला बसवावयाला ब्रह्मदेव विसरला म्हणून काकपद घालून कलियुगांतील नृपावलींत याला ब्रह्मदेवानें बसविलें. अभिचार कर्म करविणारा त्याचा भाऊ ४ तारापीड उदया-दित्य राजा झाला.

हा ब्रह्मद्वेषी होता. ब्राह्मणास शिक्षा करी. त्यानीं याला जादू करविली. व हा मृत झाला. चंद्रापीडाचा भाऊ.

## ५ ललितादित्य (मुक्तापीड) राजा झाला.

हा दिग्विजयी होता. याच्या दुंदुभींचा ध्वनि ऐकून शत्रू वसति उठवून जात, तेव्हां हा नगराचा गर्भपातच वाटे.

कान्यकुब्ज देशांतील यशोवर्म्यानें याला पाठ दाखवून संधि केला. सन्धीविषयींच्या लिखितात्, "हा संधि यशोवर्मा व ललितादित्य यांत झाला." अशा उल्लेखानें यशोवर्म्याचें नांव आधीं आलें; तें आमच्या प्रभूला कमीपणा आणणारें आहे. व असभ्य आहे असें संधिविग्रह करण्याला अभिमानी मन्त्र्याला (मित्रशर्म्याला) वाटलें. म्हणून त्यानें पुन्हा चढाई केली. तींत यशोवर्म्याचें उच्चाटण झालें. त्याचीं पंचमहाशब्दभाजनें कर्मस्थानें होतीं. (१) महाप्रतीहार पीडा, (२) महासंधिविग्रह, (३) महाश्वशाला. (४) महाभाण्डागार व (५) महासा-धन भाग. तीं राजानें संतुष्ट होऊन मित्रशर्म्याला दिलीं.

टीपः—हीं भाजनें पूर्वी शाही राजांकडे चालत असत. हे शाही राजे मूळचे तुर्क होते. ते काबूलच्या खोऱ्यांत व गान्धार देशात नवव्या शतकापर्यंत होते.

यानें मुम्मुनीला त्रिवार जिंकिलें; कारण एकवार मिळविलेल्या जयाला, अरीचे वीर घुणाक्षर म्हणतात.

कवि वाचस्पति राजश्री भवभूत्यादी कवींनीं सवित असा यशोवर्मा ललितादित्याचा बन्दी ( गुण गाणारा ) झाला. आणखी काय सांगावें ?

प्रस्थापित केलेल्या पुरांना त्यानें उचित नावें दिलीं. उ० दिग्विजय करण्याचा ज्या ठिकाणीं त्यानें निश्चय केला, त्या ठिकाणीं वसविलेल्या पुराला त्यानें निश्चितपूर असें नाव दिलें. असें एक गांव नाहीं, नदी नाहीं, सागर नाहीं, द्वीप नाहीं, कीं जेथें यानें आपली प्रतिष्ठा स्थापन केली नाहीं.

## अधांतरीं टांगलेला नरहरि.

स्त्रीराज्यांत यानें नरहरीची स्थापना केली. तो निराळम्ब टांगलेला होता. लोहचुम्बकाच्या साहाय्यानें त्याचा मूर्धा खालींवर करतां येत असे.

दिग्विजयाला निघताच यानें कोटी दिनार घेतले होते. परत आल्यावर त्यानें भूतेश्वराला एकादश कोटि दिले.

चक्रधर येथें पुष्कळ पाणी पोंचविण्याची व्यवस्था वितस्तेवर रहाटाच्या ओळी बांधून केली.

यानें मार्तण्डाचें देऊळ बांधलें. परिहासपूर वसविलें. या प्रतिकृतेरानें मुक्ताकेशवाची मूर्ति बनविण्यास चौर्यैशीं हजार तोळें सोनें लावलें—तितकेंच हजार पळ रुपें परिहासकेशवाची मूर्ति बनविण्यास लाविलें. तितक्याच सख्येच्या वजनाचें रीतसर प्रस्थ सोनें घेऊन श्रीमान बुद्धाची व्योमव्यापी मूर्ति करविली. त्याच्या पत्नीनें ईशानदेवीनें पाण्याचें कुण्ड बांधलें. त्यांतील जल सुधारसाप्रमाणें रुग्णजनास आरोग्यदायी होतें.

## ललितादित्याच्या तोंडून लीलेनें निघालेल्या आज्ञा देव कशा पाळीत त्याची गोष्ट.

एकदां या राजानें कपित्थाचीं फळें आणावयाची आज्ञा केली. तोंच नंदनवनाचा पालक तीं फळें घेऊन आला व इद्राचा निष्ठुरपण पथ्यावह निरोप सांगताना म्हणाला, "तू पूर्वजन्मीं पृथु संपदेच्या एका गृहस्थाचा नांगर हाकणारा होतास; बैल हाकीत जात असतां श्रान्त झालास. दिवसहि क्षीणप्राय झाला. स्वामीकडून कोणी पाण्याचा कुंभ व अपूप घेऊन आला. तू खाऊं लागणार तों कण्ठांत प्राण आलेला एक विप्र येऊन म्हणाला, 'अतिथीचे प्राण वांचव.' तूं अपूप व जल दिलेंस. त्या सत्पात्री दानानें, स्वर्गांत असें ठरलें कीं तुझ्या शंभर आज्ञा अखंडित रहाव्या. त्या अल्पशेष आहेत, त्या तशा खर्च करू नकोस. पावसाळ्यांत मिळणारीं फळें शिशिरऋतूंत कशीं मिळतील." असें म्हणून पालक अंतर्धान पावला.

राजानें त्या प्रकारच्या पुण्याईच्या लालसेनें एक वार्षिक पर्वणी ( उत्सव ) स्थापिली. तिचें नांव सहस्रभक्त. तींत एक लक्षांवर एक इतकीं अन्नानें भरलेलीं पात्रें तो सदक्षिण वाटी. त्यानें शिवाय उत्तर प्रदेशात पाणपोयी स्थापल्या.

राजानें भुःकार देशांतून चकुण नांवाच्या एका रसविद्‌ पुरुषाला आणून त्याकडून रसाच्या योगानें सुवर्णाची भर कोशात टाकिली.

पचनद देशांत ( पंजाबात ) सिंधुसंगम दुस्तर झाला. राजा सेनेसह तटावर स्तंभित होऊन राहिला. अमात्य चकुणानें पाण्यात एक मणि टाकला. नदीचें पाणी द्विधा झालें. राजानदी उतरून ससैन्य गेला. अमात्यानें दुसरा मणि टाकला. पहिला आकर्षण करून घेतला. पाणी पूर्ववत् झालें.

राजा म्हणाला "माझेजवळ जी चांगली वस्तु असेल ती मागून घे व हे मणि मला दे." चकुण म्हणाला समुद्र तरून जाण्याचीं हीं रत्नें तुझीं झालीं समज. मात्र संसार तरून जाण्याची सुगत देवाची मूर्ति तू मगध देशातून आणली आहेस ती मला दे. राजानें मणि घेऊन मूर्ति दिली.

## स्वामिनिष्ठ अमात्याची गोष्ट

राजा पुन्हा दिग्विजयाला निघाला. एक प्राणार्थी छिन्नहस्त पुरुष पुढें येऊन पडला. तो राजाला म्हणाला, मी सिकतासिन्धूजवळच्या राजाचा हितकारी सचिव असून, त्याला मी तुझी ( ललितादित्याची ) प्रणति ( ताबेदारी ) हिताची आहे असें म्हटलें. तेवढ्यावरून त्यानें माझा असा निग्रह केला. असली कायारक्षण करून, सूड घेऊन वैराची शुद्धी करण्याची इच्छा आहे.

> अपकृत्याधिकं शत्रोरपकारं जयेत् मितम् ।
> गंभीरप्रतिनादेन घोषमुच्चैर्यथा गिरिः ॥ २५ ॥

शत्रूनें केलेला मित असा अपकार अधिक अपराधानें फेडावा. गिरीवर ओरडून नाद केला असतां तो गिरि त्याहून अधिक गंभीर असा उलट प्रतिध्वनि करतो.

तेथें जावयाला तीन महिने लागतील. आपण जाऊं तो वैरि तेथें कसा असेल ? मी तुला अर्ध्या महिन्यांत जाण्याचा मार्ग दाखवितो."

तुझ्या स्वामीचा निग्रह करीन अशी प्रतिज्ञा करून राजानें त्यासह सिकतासिन्धूत प्रवेश केला. पण दिवसांनीं जवळचें पाणी संपलें. आणखी दोन तीन दिवस निघतील कीं नाहीं असें वाटून राजानें त्याला शेषपन्थ किती आहे असें विचारलें. तो हसून म्हणाला "शेषपन्थ विचारतोस तो अरीचा कीं यमाचा? तुला मी स्वजीविताची उपेक्षा करून, स्वामिहिताकरतां, ससैन्य मृत्युमुखांत युक्तीनें घातलें. ही सिकतासिन्धु निर्जल आहे. तुला येथें त्राता कोण आहे ?"

हें ऐकून राजा म्हणाला "अमात्य! स्वामिहित करणाऱ्या तुझ्या या कृत्यानें, आम्ही खूष आहोंत. पण मणाच्या भ्रमानें अग्निकण उचलून आपली अगुलि मात्र भाजून घेणारा तूं खरोखर रडत नसशील. माझ्या निदेशानें मेदिनीतून पाणी निघेल."

असें म्हणून ललितादित्यानें भाला मारून पाताळातून पाणी वर आणलें. मत्री विफलश्रम होऊन प्रथम भल्याच्या नमवींत

व मग यमाच्या नगरींत प्रवेश करता झाला. मंत्र्याचीच अवस्था ललितादित्यानें त्याच्या स्वामीला आणून दिली.

ललितादित्यानें जागजागीं यथोपयोग नद्या काढल्या. अद्यापि त्या कुन्तवाहिन्या या नावानें वाहत आहेत.

या राजाचे त्रिभुवनांत अद्भुत असे. वृतान्त आहेत. पण अति प्रसंगभय होईल. कथानकाचें अनुसंधान तुटेल म्हणून येथें दिले नाहींत.

टीपः—शत्रूनें केलेल्या लहान अपकाराची फेड महान अपकारानें करावी या सिद्धान्ताला प्रतिध्वनि करणाऱ्या गिरीचा दाखला उत्कृष्ट आहे."

हा राजा कधींकधीं मलिनवृत्ति दाखवी. अंतःपुरांत मदिराक्षीब होऊन त्यानें अशी आज्ञा केली कीं, प्रवरसेनानें बांधलेलें प्रवरपूर माझ्या पुरावरसें वाटत असेल तर तें जाळून टाका. सेवकांनीं प्रासाद्याच्या राशीला आग लावली. प्रासादावरून आग पहात असतां राजाचें तोंड उज्ज्वल झालें.

पुढें क्षैब्य क्षीण झालें. राजाला पश्चात्ताप झाला. मंत्री म्हणाले "ही पुराची आग मिथ्या होती. स्वप्नात अर्वाहित झालेला पुत्र जागें झाल्यावर पुढें उभा पहाताच पुरुष जसा निःशोक होतो तसा, पुर नष्ट झालें नाहीं असें ऐकून राजा निःशोक झाला. व म्हणाला, "जें प्रिय असेल तें अनुचित असेल तरी तें करून जे सेवक राजाला रमवतात, त्याचा धिक्कार असो! पण आपल्या प्राणाची उपेक्षा करून जे पंथ सोडून जाणाऱ्या राजाचें सहसा रक्षण करतात त्या महात्म्यांनीं पृथ्वी पुनीत झाली आहे."

टीपः—अशा उन्मत्त स्थितींतील राजाला स्वप्नात असलेल्या पुरुषांची समग्र उपमा सुन्दर आहे. मॅसिडोनियाचा राजा मद्य पीऊन उन्मत्त असता एका स्त्रीची विनति धिडकारिता झाला त्यावर ती म्हणाली, "हरकत नाहीं मी वरिष्ठ कोर्टात अपील करीन" राजानें विचारलें "तें कोठलें!" ती म्हणाली "तू शुद्धीवर आल्यावर तुझ्याच कोर्टात! (from Philip drunk to Philip sober)" या दोन्हीं गोष्टींत साम्य आहे.

## गौडांची स्वामिनिष्ठा.

सामान्य राजांना उचित असा दोष या राजाच्या अंगीं होता. परिहास केशवाला साक्षी ठेवूनहि या राजानें त्रिग्रामामध्यें, गौडांच्या राजाला तीक्ष्ण पुरुषाकरवी मारविलें. शारदादेवीच्या दर्शनाच्या मिषानें त्या राजाचे सेवक काश्मीरांत शिरले. परिहास केशवाच्या भ्रान्तीनें रामस्वामीच्या देवळास वहतीनें त्यांनी वेढा दिला, व आंतील मूर्तीचें त्यांनी चूर्ण केलें. राजाच्या सैन्यानें त्यास पदोपदी ठार केलें; पण गौडांनी जें कर्म करून दाखविलें तें विधात्यालाहि शक्य नाहीं. याकाळीं कोकोत्तर स्वामीनिष्ठेचा प्रभाव दाखविणारी भूत्वरलें मिळत

## ललितादित्याची राजकीय गीता

अनाक्रान्त अशी पृथ्वी पहाण्याच्या कौतुकानें राजानें उत्तरापथात प्रवेश केला. फार दिवस झाले. वृत्तान्त कळत नाहीं. मन्त्र्यांनीं दूत पाठविला. तो परत आल्यावर म्हणाला, "स्वामी तुम्हाला असें सांगतो. सरळ विजिगीषूला अवधि नसतो मी दूर असतां तुम्हीं माझ्या राज्यविषयांत आचार कसा करावा त्याचें सार सांगतो. त्याला अनुसरून हे पुण्यशील मंत्रीहो! माझें राज्य निर्विघ्नपणें चालवा. (१) प्रभाव राज मिळवण्याची इच्छा करणाऱ्या माझ्या लोकांनीं, आपसातील भेदाला जपलें पाहिजे. निरीश्वर चार्वाकाना जसें परलोकांपासून भय नसतें तसें आम्हाला परलोकापासून (शत्रूपासून) भय नसतें. (२) गिरीगव्हरात रहाणाऱ्या लोकांना अपराधाशिवाय नित्य दण्ड करीतच रहावें. त्यांजवळ वित्ताचा संचय असतो. दुर्गाचा आश्रय करीत असल्यामुळें ते दुर्भेद्य असतात. वर्षाला पुरेल इतकीच त्यांजवळ अन्नसामग्री असू द्यावी. शेतें नांगरावयाला पुरतील इतकेच बैल त्यांजवळ असू द्यावे. अधिक वित्त उरणार नाहीं असें कार्य करावें. अधिक वित्त झालें तर ते डामर बनतात. उन्मत्त बनतात. नृपाची आज्ञा मोडावयाला ते एकाच वर्षांत तयार होतात. वस्त्र, कुया, स्त्रिया, पक्वान्नें, अलंकार, अश्व, घरें अशा ग्रामोचित वस्तू जर ग्रामीयांना मिळाल्या, राजांनी दुर्ग वगैरे संरक्षणाच्या ठिकाणीं जर उपेक्षा केली, राजभृत्यांनीं जर त्यांचे अंतरस्थ विचार जाणण्याचें सोडून दिलें, शस्त्री लोकाची (सैन्यांतील लोकांची) वृत्ति जर एकाच प्रदेशांतील लोकांवर येऊन पडली, विवाह संबंधानें कायस्थ जर परस्पर सहृत झाले, आणि राजांनीं कायस्थवृत्ति पतकरली म्हणजे प्रजेचा भाग्यविपर्यय झाला असें समजावें."

टीप :—ही राजकीय आचारांची सारभूत असलेली गीता चाणक्याची नीति, महाभारतांतील कणिक नीति, यांशीं सदृश आहे. मॅकिॲव्हेल व बेकन हे हिचें कौतुकच करतील.

कोणी म्हणतात हा राजा अर्गणव नावाच्या देशांत हिमवृष्टीनें मरण पावला. कोणी म्हणतात सकटांत सांपडून प्रतिष्ठा राहण्याकरता तो आपण होऊन अग्निप्रवेश करता झाला. मोठ्या लोकांच्या निरुपम प्रस्थानासंबंधें अद्भुतवार्ता त्यांच्या शेवटल्या दिवसांतसुद्धा उठतात.

(६) कुवलयापीड; (७) ललितादित्य, बप्पयिक वज्रादित्य.

(८) पृथिव्यापीड; (९) संग्राम पीड; (१०) जयापीड; (जज हा जयापीडाचा शालक, जयापीड दिग्विजयावर असता त्याचें राज्य बळकावतो. राजा परत आल्यावर युद्धांत त्याला मारतो.)

## जयापीडाचा दिग्विजय.

हा दिग्विजयाला निघाला तेव्हां याचें सैन्य ऐशीं हजार होतें. याचा आजा दिग्विजयाला निघाला तेव्हा त्याच्या सैन्यांत नुसते कर्णीरथ (डोळ्या) सवालक्ष होते. घरच्या प्रेमानें कांहीं सैन्य परतलें. प्रयागास पोंचल्यावर त्यानें मनोजव असे अश्व लक्षांत एक कमी, ब्राह्मणाला सदक्षिण दान दिले व असें सांगून ठेवलें कीं ही माझी–मुद्रा पहा. तीवर, "जयापीडाची" अशीं अक्षरें आहेत. बाहेरदेशांत गंगाजळाच्या कासंड्या जातील त्यांवर ती मुद्रा करावी. पण जेव्हां एक लक्ष वारू जो कोणी दान करील तेव्हां ती त्यानें मोडून आपल्या नांवाची नवी करावी. पण गंगाजळ पिऊन व जयापीडाची मुद्रा वाचून अभिमानी राजाचा ताप अद्याप वाढत असतो.

## जयापीड राजा व कमला नर्तकी यांची गोष्ट

येथून हा राजा गौडराज जयन्त या राजाच्या पौंड्रवर्धन नगरांत शिरला. कार्तिकेयाच्या मंदिरांत भरतशास्त्राप्रमाणें नृत्यगीत चाललें होतें. हा भरतशास्त्रज्ञ राजा देवद्वाराशीं शिळेवर बसला. त्याच्या तेजानें चकित झालेले लोक दूर सरले. कमला नर्तकीनें याचें रूप पाहिलें. मधून मधून तांबूलविटिकेकरतां स्कन्धावरून जाणारा याचा हात पाहिला. तिनें जाणलें कीं हा कोणी तरी गुप्त रीतीनें फिरणारा राजा असावा. म्हणून पृष्ठस्थ पर्णविटिका (विडा) घेण्याचा याला अभ्यास असून प्रतिक्षणीं याचा हात अंशदेश स्पृष्ट करीत आहे. मदोत्क मधुपाचा हल्ला सरला तरी द्वीप आपले कान हलवतो. गजाचें कुल नाहींसें झालें तरी सिंह मागें वळून पाहातो. मेघाकडे उन्मुख राहण्याची इच्छा नष्ट झाली तरी अशान्त वदनानें मोर स्वरोद्गार काढीत असतो; त्याप्रमाणें श्रेष्ठ लोकाची सवय ती असण्याचा हेतु नष्ट झाला तरी अभ्यासामुळें लाबतच असते.

**टीपः**—वर कवीची केवढी मोठी अलंकारसंपत्ति आहे ती पहा. "हेतु नष्ट झाला तरी पहिली श्रेष्ठ लोकाची सवय लागते" एवढ्याशा गोष्टीला हत्ती, सिंह, मोर यांच्या सवयींचे एकामागून एक असे भराभर सुंदर तीन दृष्टान्त कवीनें दिले आहेत.

आपल्या अभिन्नहृदय दासीला मनांतलें सांगून नर्तकीनें त्याच्याजवळ पाठवलें पहिल्याप्रमाणें पाठीकडे हात गेल्यावर दासीनें पूगखण्ड त्याच्या हातावर ठेवलें. जयापीडानें ते तोंडांत टाकले. व मान वळवून तिच्याकडे पाहिलें. भ्रूसंज्ञेनें तू कोणाची कोण असें तिला विचारलें. तेव्हां विटिका देणारीचा वृत्तान्त तिनें त्याला सांगितला.

नृत्य संपलें. दासीनें त्याला मालकिणीच्या घरीं नेलें. तेव्हा त्या परार्घश्री विलासिनीनें सभ्य व चतुर भाषणानें त्याचें आतिथ्य केलें. चंद्रोदय होताच राजाचा हात धरून तिनें त्याला शयनमंदिरांत नेलें. तिचें मनोगत जाणून राजा म्हणाला. "हे पद्मपलाक्षी, तू माझी हृदयहारिणी नाहींस असें नाहीं. पण कालानुरोधानें तुझ्या मनोभंगाचें पातक मला करावें लागत आहे." असें सांगून राजानें मांडीवर हातानें ताल धरून एक निश्वास सोडून एक श्लोक म्हटला.

असमाप्तजिगीषस्य स्त्रीचिन्ता का मनस्विनः ।
अनाक्रम्य जगत् कृत्स्नं नो सध्यां भजते रविः ॥४४१॥

(अर्थ) जयेच्छा परिपूर्ण झाल्याशिवाय प्रभावी पुरुषाला स्त्री कशी आठवेल ? सकल जगाचें आक्रमण झाल्याशिवाय रवि संध्येचा उपभोग कोठें घेतो ?

हा मोठा पुरुष आहे असें नर्तकीनें जाणलें. तो जावयास इच्छा करू लागला. रात्रीं प्रस्थान करू नये असें तिनें आर्जवानें सांगितलें. कारण येथें जीवांचा संहार करणाऱ्या सिंहाचा संचार असतो. राजा तेव्हांच बाहेर पडला व सिंहाची मार्गप्रतीक्षा करीत बसला. फुललेल्या बकुल वृक्षासारखा, यमाच्या संचारी अट्टहासाप्रमाणें शोभणारा सिंह मन्थरगतीनें येतांना त्याला दिसला. त्याला या राजसिंहानें आव्हान दिलें. सिंहानें कान स्तब्ध केले, जबडा विस्फारला, आयाळ कम्पित केली, मदीत नेत्र वटारले, देहाचा पूर्व भाग पुढें करून गर्जना केली. व राजाकडे क्रोधानें धाव घेतली. राजानें सिंहाच्या मुखात कफोणी (कोंपर) घातली, व सुरीच्या एका प्रहारानें दुसऱ्या हातानें त्याचा भेद केला. सिंहाचा प्राण गेला. राजा नर्तकीच्या घरीं जाऊन झोंपीं गेला.

**टीप**—विजिगीषु राजाला जय मिळविल्याशिवाय स्त्रीचिन्ता कर्तव्य नाहीं या सिद्धान्ताला रवि व संध्या याचा दिलेला दाखला सुन्दर आहे. तसेंच सिंहाचे वर्णनांत स्वभावोक्ति अलंकार उत्तम साधला आहे.

दुसऱ्या दिवशीं जयापीडाच्या नावानें अंकित असा केयूर सिंहाच्या जबड्यांत अडकलेला पाहून राजानें ओळखलें कीं कांहीं हेतूनें कल्लटराजपुत्र असें नाव घेऊन भुजबलावर हिंडणारा जयापीड येथें आला आहे. त्याचा शोध करून जयन्त राजानें आपली कन्या कल्याणदेवी त्याला मोठ्या आदरानें अर्पण केली. पुढें कांहीं राजे जिंकून जयापीड आपल्या गांवाला जावयास निघाला. तेव्हा पुढें जयश्री, मागें कल्याणदेवी अशा निघाल्या.

जयापीडानें स्वभूमींत प्रवेश केला. त्याचें सिंहासन बळकावून बसलेला वज्र युद्धास उभा राहिला. जयापीडाचे अनुरक्त लोक धांवत आले. त्यात एक श्रीदेव नावाचा ग्रामचाण्डाळ होता. मातेजवळून एक भाकरी मागून घेऊन तो निघाला. वज्राला मारणार अशी प्रतिज्ञा त्यानें केली होती. अश्वारूढ असलेल्या व तृषार्त होऊन सोन्याच्या झारीतून पाणी पीत असलेल्या वज्राला रोखून त्यानें गोफणीनें त्याच्या तोंडावर दगड मारून त्याला ठार केलें. वज्राचे अनुयायी पळाले. द्रोहानें मिळवलेलें राज्य तीन वर्षांनीं गेलें. ठेवी दाबून मिळवलेली वणिजांची, कामीजनाची वंचना करून मिळवलेली वेश्यांची व द्रोह करून मिळवलेली राजाची अशा या सर्व संपदा नष्ट होतात.

राजानें मग क्षीर नांवाच्या विद्योपाध्याजवळ ज्ञान संभृत केलें. परदेशातून वैय्याकरणी आणून स्वदेशात विच्छिन्न झालेली महाभाष्याची प्रवृत्ति केली. राजा या शब्दानें त्याची जेवढी प्रथा होती त्याहून अधिक प्रथा पंडित या शब्दानें झाली. कुट्टिनीमत या नावाचा ग्रन्थ करणारा कवि दामोदरगुप्त, मनोरथ, वामन इ. कवी त्याचे मंत्री होते. त्याला एकदा पश्चिम दिशेला रवीचा उदय झालेला दिसला. त्यामुळें त्याला वाटलें कीं, आपल्या देशात कोणी साधु धर्माचार्य प्रविष्ट झाला आहे. विद्वानाचा शोध करून त्याचा संग्रह करून अन्य नृपमण्डळात त्यानें विद्वानांचें दुर्भिक्ष केलें. कोणी स्पष्ट असें म्हणेल, अमूक एक मूर्ख आहे, तर त्या मूर्खाला सर्वज्ञानाच्या अभियोगानें ज्ञान देण्याचें यानें काम केलें

पुन्हा सामग्री जमवून, विनयादित्य हें नाव घेऊन हा पुन्हा दिग्विजयाला निघाला. पूर्वेकडील भीमसेनाच्या राज्यात शिरून हा निःशब्दपणें रंध्रान्वेषण करू लागला. जज्जाच्या भ्रात्यानें भीमसेनाला कळवल्यावरून भीमसेनानें या धुरीण शूरवीराला अकस्मात बन्धन केलें तेव्हां पौरुषाचा द्वेष करणाऱ्या दैवानें शिर उचलून ताठ केलें असेल. राजा सुटण्याचे उपाय योजू लागला.

## स्पर्शसंचारी रोग व स्थानत्याग

या राज्यात लूता नावाचा स्पर्शसंचारी रोग पसरला होता.. लूताग्रस्ताला स्थानत्याग करावा लागे. पित्तोद्रेकक द्रव्यें आणवून त्याच्या सेवनानें राजानें आपणास पित्तज्वर जडवून घेतला. वज्र नावाच्या झाडाचा चीक अंगाला लावला. अंगावर फोड उठले. मग राजा लूताग्रस्त आहे असें रक्षकाकडून भीमसेनाला कळविलें. राजा जयापीड हटकून मरेल म्हणून भीमसेनानें त्याला राज्याबाहेर घालविलें. नंतर राजानें भीमसेनेला जिंकलें.

## शास्त्रप्रशंसा

वरील गोष्टींचे तात्पर्यार्थावरून कवीनें पुदील श्लोकांत शास्त्राची प्रशंसा केली आहे.

> यःसर्वकालमबुधैः परिहास्यमानः।
> मूलांकुराद्यपिन जातु पुरस्करोति
> आपत्सु शास्त्रविटपी सकलंप्रसूय।
> पुंस किलैकपद एवलुनात्यलक्ष्मीम्॥ ५३०॥

अर्थ— शास्त्ररूपी वृक्षाला मूढ लोक हसतात. हा मूळ, अंकुर इत्यादी भागांचा पुरस्कार करीत नाहीं. हा अमूल आहे. अनंकुर आहे. पण संकटसमयीं हा वृक्ष, मूळ व अंकुर यांचा उदय झाल्याशिवायच फळें प्रसवतो व पुरुषाची एकदम अलक्ष्मी (दारिद्र्य) घालवितो. राजानें आपली मोकळीक शास्त्रज्ञानानें करून घेतली.

## राजा जयापीड व चतुर मंत्री देवशर्मा यांची गोष्ट

पुढें जयापीड नेपाळांत शिरला. तेथील राजा अरमुडि पळत सुटला. कधीं दृश्य होई कधीं अदृश्य होई. त्याच्या मार्गे लागून जयापीडानें श्येनकपोत न्याय धरला. जयापीड आड आलेल्या नदींत शिरला. अकस्मात आलेल्या पुरात कांहीं सैन्य वाहत गेलें. राजा पकडला गेला. कालगण्डिका तीरावर शिलामय दुर्गांत राजाला असें रक्षून ठेवण्यांत आलें कीं, कलावन्तात श्रेष्ठ असा चंद्र व तेजस्वींत श्रेष्ठ असा सूर्य त्यास रात्रीं अथवा दिवसास पाहू शकले नाहींत.

मंत्री देवशर्मा यानें अरमुडीला कळविलें कीं मी तुला जयापीडाच्या लक्ष्मीसह काश्मीरचें राज्य देतों. धनाचे विश्वस्त सैन्यांत आहेत. अरमुडीच्या अनुज्ञेनें शेष सैन्य देवशर्मा नेपाळला घेऊन गेला. अरमुडीनें त्याच्या सत्कार केला. कोशपान व शपथा झाल्या. अरमुडीच्या अनुज्ञेनें दुर्गांत येऊन मंत्र्यानें जयापीडाला विचारलें "आपलें तेज कायम ठेवलें आहेस ना? तेजोरूप भितीचा आधार असेल तरच साहसरूपी आलेखाच्या कल्पना सिद्ध होतात. तू दोन नलिका बाहेर जा. परत आल्यावर मी तयार करून ठेवलेला नदी तरून जाण्याचा उपाय करून पहा."

राजा जाऊन वेळेवर परत आला व पहातो तों अमात्य गळफास लावून गतप्राण असा भूमीवरून दिसला. "माझी तनु गतप्राण झाली आहे ती श्वासानें पूरीत आहे. ती एक दृति [ मशक, चामड्याची श्वासानें फुगवलेली अभेद्य पिशवी ] आहे. तीवर आरूढ होऊन नदी तरून जा. तुझें सैन्य तेथें आहे." असा मजकूर गळ्यामोंवतीं असलेल्या पट्टीवर त्याच्या रक्तानें लिहिलेला होता. नाथी मशक घेऊन राजा उंचावरून उडी मारता तर ती फुटली असती, म्हणून असा मशक मंत्र्यानें तयार केला.

राजा तत्काळ हत्तीवर आरूढ होऊन, नदी तरून स्वसैन्यांत प्रविष्ट झाला. व त्यानें नेपाळचें राज्य कथाशेष केलें. जेत्याला वाटलें, जयश्री मिळाली; पण गळ्यांतील रक्षामणी-प्रमाणें रुचिवाला हारवलों.

टीपः—गड हातीं आला पण सिंह गेला अशी शिवाजी महाराजाची तान्हाजीविषयींची उक्ति सदृश आहे.

नंतर राजानें स्त्रीराज्य जिंकलें हा त्याचा इंद्रियग्रामावर विजय झाला.

टीप—भीमसेन व अरमुडि हे ऐतिहासिक पुरुष होते अशाबद्दल डाक्तर स्टीन यांनीं शंका प्रदर्शित केली आहे.

## सुवर्णप्राप्तीविषयीं लोककथा

राजाला स्वप्नात एक कृताजलि पुरुष दिसला. तो म्हणाला "मी तुझ्या राज्यात, सुखानें राहणारा महापद्म नाग आहे. कुणी द्रविड मांत्रिक मला धरून विकणार आहे. मला वांचवशील तर मी तुला सुवर्णोत्पादक गिरी दाखवीन." जागें झाल्यावर राजानें हेराकडून द्रविड मांत्रिकाचा शोध करून त्याला बोलावून आणिलें व अभय दिलें. त्याच्याबरोबर राजा नागाच्या सरोवराशीं गेला. मंत्रशक्तीनें द्रविडानें दिग्बन्ध केला. जल आटवलें. चिखलांत वीतभर लांबीचा मनुष्यमुखी नाग दिसला. राजानें द्रविडाला द्रव्य देऊन नागाला वांचविलें. नागानें तांब्याचा द्रव करणाऱ्या गिरीच्या खाणाखुणा सांगितल्या. त्यांतील तांब्यानें राजानें नव्याण्णव कोटी दिनार नाणीं पाडलीं व असा करार करून ठेवला कीं जो कोणी पूर्ण शत कोटी दिनार नाणी पाडील त्यानें मला जिंकलें असें समजावें. पूर्णसरूप नाणीं पाडणाऱ्या राजांचा दर्प कुण्ठित व्हावा म्हणून त्यानें त्याच्यापुढें समस्याच टाकली.

पुढें दिग्विजयापेक्षां स्वदेशांत द्रव्यार्जन करणें बरें असें राजाला कायस्थानीं शिकवलें. लोकाग्रहास्तव राजानें इतकें क्रौर्य केलें कीं या राजाचें विपर्यस्त चरित्र वर्णन करताना बुधांनींसुद्धां काव्यात स्तुतिविपर्यय करून ठेवला आहे. त्यांतील एक उदाहरण असें आहे.

> नितान्तकृतकृत्यस्य गुणवृद्धिविधायकः ।
> श्रीजयापीडदेवस्य पाणिनेः किमन्तरम् ॥

या श्लोकाचा अर्थ (१) जयापीडपर (२) पाणिनिपर असून (३) जयापीडाची स्तुति अथवा निन्दा करणारा आहे. तो असा "जयापीड व पाणिनी यात काय अंतर आहे हो! जयापीड हा कृतकृत्य आहे. करावीं तितकीं सर्व कृत्यें करून बसला आहे. यानें गुणवृद्धि (सद्गुणाची वाढ) केली आहे. अथवा असेंहि म्हणा त्यानें सर्व कृत्यांचा (सत्कृत्यांचा) नाश केला आहे. तसें सर्व गुणांचें उच्चाटण केलें आहे. या ठिकाणीं कृत हा शब्द कृत् (हिंसाथा) कापणें व वृद्धि हा शब्द वृध (कापणें) या शब्दांपासून क्रमानें निघाले आहेत असें धरलें पाहिजे. पाणिनि कृतकृत्य आहे म्हणजे त्यानें कृतप्रत्ययाचा सावशेष विचार केला आहे. धातूची गुणवृद्धि केव्हा होते त्याविषयीं त्यानें नियम केले आहेत.

टीपः—या श्लोकांत दिसावयाला बरवर स्तुति पण आतून निंदा आहे म्हणून येथें उत्तम व्याजस्तुति अलंकार साधला आहे. तो मात्र श्लेषमूलक आहे.

## जसे राजे तसे ब्राह्मण

अहो! अशा या राजाला परिपन्थी झालेल्या ब्राम्हणाचेंच धैर्य अकुंठित झालें. कांहीं ब्राम्हणांच्या जमिनी जयापीडानें हरण केल्या. त्या परत देण्याविषयीं विनंति करण्याला गेलेल्या ब्राम्हणाना राजाच्या प्रतिहाऱ्यानीं मार दिला. विप्र ओरडून म्हणाले, "मनु, मांधाता, राम इ. मोठमोठे राजे होऊन गेले. त्यांच्यापुढें ब्राम्हणांना विमानता सोसावी लागली नाहीं. इंद्रासह स्वर्ग, पर्वतासह मेदिनी, शेषासह पाताळ ते एका क्षणांत भस्म करावयास समर्थ असत. जयापीड एक भ्रुकुटी उल्हसित करून म्हणाला. "भिक्षाकण भक्षण करणाऱ्या तुमच्या शठांचा हा कोण दुर्ज्वर आहे, कीं ज्याच्या योगें तुम्ही ऋषींप्रमाणें उक्ति करता!"

ब्रह्मतेजानें युक्त असा इट्टिल नावाचा ब्राम्हण म्हणाला.

> राजन्युगानुरूपेण भावाऽभानु वर्तिनः ।
> शासितुस्तेऽनुसारेण न कस्माद् ऋषयोवयम्?॥६४६॥

हे राजा! युगमानानें बदलत जाणाऱ्या स्थितीला धरून जसा तू राजा आहेस तसे आम्हीं ब्राम्हण ऋषी कसे नव्हेत?

राजा पुन्हा दर्पानें म्हणाला, तू विश्वामित्र का वसिष्ठ का अगस्ती आहेस? कोपानें ब्राह्मण स्फुरण पावूं लागला. फडा उभारलेल्या नागाप्रमाणें दिसूं लागला. व म्हणाला तुझ्यावर ब्रह्मदण्ड पडेल! राजा हसून पडूं दे म्हणाला तोंच छतांतून राजावर कनकदण्ड पडून राजाला व्रण झाला. कांहीं भागावर करवत चालवावी लागली. अन्तीं राजा यमाकडे गेला. यानें एकतीस वर्षें राज्य केलें.

## ११ ललितापीड

जयापीड व राणी दुर्गा यांचा पुत्र ललितादित्य राजा झाला. वेश्यांच्या गोष्टी सांगण्यात प्रवीण, व नर्मभाषणात चतुर असलेले लोक याला प्रिय झाले, तसे शूर अथवा पंडित झाले नाहींत. बन्धकीच्या पदमुद्रानीं अंकित अशीं वस्त्रें हा गौरवार्ह सचिवांना पांघरावयास लावी. कुकर्मयोगवाहित्व व द्रोहवृत्ति अंगांत असलेल्या राजांना त्यांच्या परिहाराशिवाय दुसरें औषध नाहीं. यानें १२ वर्षें राज्य केलें.

१२ राजा जयापीड व राणी कल्याणदेवी यांचा पुत्र संग्रामपीड उर्फ पृथिव्यापीड. यानें ७ वर्षें राज्य केलें.

## १३ चिप्पड जयापीड उर्फ बृहस्पति

हा राजा ललितादित्य व राणी जयादेवी याचा शिशुदेश्य पुत्र होता. जयादेवी एका उप्पनावाच्या कलालाची कन्या होती ती प्रथम वेश्या म्हणून अवरोधगृहात ठेवून घेतली होती. हिचे भाऊ पद्म, उत्पलक, मम्म व धर्म म्हणून होते. ते भाच्याचें पालन करीत. पचमहाशद्ब, मोठी अधिकाराची स्थानें, आपल्याकडे ठेवून भगिनीभगसैभाग्यक्षमव वैभवानें प्राप्त अशा भगुर भोगांचें ते सर्वजण भोक्ते झाले. आपला भाचा वयात येईल व आपलानाश करील अशी त्या अकुलीन माणसानें शंका घेऊन अभिचारक्रियेनें जादू करून त्याचा नाश केला. लौकिक वर्ष ३८८९ (इ. स. ८१३-४) या वर्षी चिप्पडजयापीड शान्त झाला.

टीपः—कल्हणाची ख्याती अर्थालकाराबद्दल आहे. पण येथें आठवे लाम वर्णाचीं रूपे घालून चागला भव प्राय नावाचा शब्दालकार साधला आहे. तो एकटाच आहे.

## १४ अजितापीड

ललितापीड व राणी मेघावली याचा पुत्र त्रिभुवनापीड म्हणून होता. तो व दुसरीच एक जयादेवी, याना अजितापीड म्हणून पुत्र झाला. त्याला उत्पलानें बलानें राजा केलें. त्याला तो मुख्य चार खात्यातून शिल्लक असलेल्या रकमाचा भरणा हेडादी पचमखात्यात (जमाखर्च खात्यात) होई असे त्यांतून याला अन्नवस्त्र तो देत असे व बाकी उत्पलावर उत्पलादी सर्व ताव मारीत असत. काहीं दानधर्म करीत. मम्मस्वामीच्या कुम्भप्रतिष्ठेच्या दिवशीं मम्मानें पचाचशी सहस्र गाई दान केल्या. गाईमागे पचोपकरणार्थ हजार हजार दिनार दिले.

मम्म व उत्पल या भावात राजे गादीवर आणण्याकरतां तुमुल युद्ध झालें. त्याला उद्देशून भुवनाभ्युदय नांवाचें शकुक कवीनें काव्य लिहीलें. राजे भराभर एकामागून एक बसविले जात. ते पूर्वीच्या * अश्वयुजी राजाप्रमाणें अस्थिर असत.

शेवटीं शूर मन्त्र्यानें विप्लव शांत करण्याकरतां उत्पलाचा पुत्र जो सुखवर्मा त्याच्या पुत्राला अवन्तिवर्म्याला राजा केलें. येथें कर्कोटक वश समाप्त झाला व उत्पलकवशाला वैपुल्य पात्र झालें. या उत्पलकवशापासून कल्हणानें गत वृतान्ताचें विस्तरशः वर्णन करून वर्ष मास व दिन हीं नमूद केलीं आहेत.

* अश्वीन शुद्ध पौर्णिमेपासून चैत्र शुद्ध पौर्णिमेपर्यन्त काश्मीर देश काळोखानें (पिशाच्यानीं) व्याप्त असे. त्यामुळे लोकांना त्या काळात (सहा महिने) देश सोडून जावें लागे त्याबरोबर तेथील राजे जात. अश्वीन शुद्ध पौर्णिमेला लोक धुळवाड खेळत. व पिशाच्यांना (काळोखाला) गाळी देत.

# तरंग ५

### उत्पलकवंश

(वक्रोक्तीनें शंकर पार्वती याची स्तुति)

## अवन्तिवर्मा

अवन्तिवर्मा विवेकी राजा व त्याचा भक्त मन्त्री शूर अशी क्षणभगुर जोडी सुकृतानें दिसून येते. अशी कोणी पाहिली नाहीं व ऐकली नाहीं. राजाला वाटलें समुद्रजलाच्या सान्निध्यानें कलुषित झालेली ही लक्ष्मी, दारिद्र्यानें तप्त झालेल्यांना विमुक्त केली असता मृगीप्रमाणें विमल होते. राजानें या विचारानें स्वर्णादिकांचें चूर्ण करून त्याची खिचडी ओंजळीनें ब्राम्हणास दिली. सर्व सपत्ति आर्थिसात् करून विभूतिचिन्ह म्हणून छत्रचामर शिल्लक ठेवलें. आपल्या बुद्धिवान व शूर सापत्न भावाला शूरवर्म्याला युवराजपद दिलें.

टीपः—अग्निशौच हे मृग अग्नीत उडी मारतात, तेव्हां स्वच्छ होतात.

काश्मीर देशात विच्छिन्न झालेला विद्येचा प्रचार पुन्हा चालू करण्यास शूर मन्त्र्यानें विद्वानांना सभेत स्थान दिलें. विद्वान राजांना योग्य अशा युग्यांतून, (मनुष्यांनीं वाहिलेल्या यानांतून, विद्वान लोक सभेत प्रवेश करीत मुक्ताकण शिवस्वामी व आनंदवर्धन (कवि ध्वन्यालोकाचा व देवीशतकाचा कर्ता) आणि रत्नाकर याची चागली प्रथा पडली.

मन्त्री शूर याचा कुवमन्दार नावाचा भाट मन्त्र्यानें आपल्या सकल्पाची स्मृति कायम ठेवावी म्हणून उत्तेजनपर कविता म्हणे.

> अयमवसर उपकृतये, प्रकृतिचलायावदस्ति संपदियम्।
> विपदिसदोभ्युदयिन्यां पुनरुपकर्तुं कुतोवसर ॥ ३६ ॥

अर्थ—जोंवर सपत्ति हातांत आहे तोंवरच उपकार करण्याचा समय असतो. तो फार टिकत नाहीं. कारण संपत्ति ही प्रकृतिनेंच फार चचल आहे. शिवाय विपत्ति ही सदैवच अभ्युदय पावणारी आहे. तसें झाल्यावर उपकार करण्याचा दुसरा समय कसा प्राप्त होणार!

शूर मन्त्र्याच्या द्वारपालानें मंदिर बाधून त्यांत प्रख्यात व्याकरणकाराला रामजाला उपाध्याय नेमलें. प्रभाकर अमात्यानें मंदिर बाधलें. त्यात देवप्रतिष्ठेच्या वेळीं गृहशुकांबरोबर आलेल्या व अन्यलोकांनीं दिलेल्या मोत्याची शुकावली केली.

शूरमंत्र्यानें शूरपूर वसविलें. त्याकरतां क्रमवर्त प्रदेशांतील ठौक (सीमेवरील नाके) उठवून तेथें आणले.

राजा वैष्णव होता. पण अमात्य शैव होता. म्हणून त्याला प्रिय असें शैव मत राजा प्रदर्शित करी.

C034P

## भूतेशालावन्य शाकेचें अर्पण, राजाचा राग, व मंत्र्यानें अपराध्याचें केलेलें शासन.

राजा भूतेश्वराला गेला. पूजकांनीं उत्पल नांवाची वन्य तिक्तशाक, देवाला अर्पण केली. कारण विचारता पूजक म्हणाले, " लोहर प्रान्तांतील धन्व नावाच्या बली डामरानें देवाचें गांव हरण केलें. म्हणून अशा नैवेद्य देवाला मिळतो. ऐकलें न ऐकिलें असें करून एकाएकीं शूळव्यथा झाली असें दाखवून राजा चालता झाला.

राजाचें हें सहेतुक आणि शूराला कळतांच त्यानें धन्वाला बोलावून आणून त्याचें डोकें उडविलें. राजाचा राग शान्त झाला व त्यानें पूजा पुरी केली.

अवन्तिवर्म्याच्या काळांत पुष्कळ सिद्धांनीं अनुग्रहार्थ अवतार घेतले. त्यापैकीं पुष्कळांचीं चरित्रें वर्णन करण्यासारखीं असतां एकाच व पावनवृत्तान्त प्रासंगिक म्हणून वर्णन करू.

## मोठा स्थापत्यशास्त्री सूय्य व त्याचें तंत्र

राज्यांत जलप्रलय होऊं लागला. दुर्भिक्ष झालें. खारीभर धान्याला दहाशें पन्नास दिन्नार पडूं लागले. तेव्हां जनाचे जीव वाचविण्यास सूय्य हाच कोणी अन्नपति अवतरला. सूय्या नावाच्या चाण्डाळणीला एक मडकें सांपडलें. त्यात एक कमलनयन बालक अंगुलि चोखीत होतें. तें फार सुंदर असून त्याचा त्याग कोणातरी मन्दभाग्य मातेनें केला, या विचारानें तिचे स्तन स्नेहानें द्रवूं लागले. तिनें त्याला एका शूद्र स्त्रीच्या घरीं पोंचविलें.

तेथें तें वाढलें व त्याचें नाव सूय्य पडलें. तो बुद्धिमान बटु अक्षरओळख झाल्यावर एका गृहपतीकडे (गृहस्थाकडे) मुलाचा शिक्षक झाला. गोष्टी सांगण्यात प्रज्ञ म्हणून लोक त्याच्या बाटोळे जमत, ते आपल्या गोष्टींत जलप्रालयाविषयीं बोलत व राजभृत्याची निन्दा करीत व त्यास दोष देत.

तो म्हणे मला बुद्धि आहे, पण ती निरर्थ आहे. मी काय करू.

हें त्याचें नियमानें बडबडणें राजाच्या कानावर गेलें. राजानें त्याला बोलावून त्याची परीक्षा पहाण्याकरता, त्याला दिन्नारानीं भरलेलीं भांडीं दिलीं. प्रलयांत बुडालेल्या गावीं जाऊन त्यानें तीं भांडीं नदींत पाणी अडलेल्या ठिकाणीं टाकून दिलीं. लोक म्हणाले हा बातुल आहे. त्याची निष्ठा पहात राजा स्वस्थ बसला. दुर्भिक्षानें पीडित लोक दिन्नार शोधूं लागले. पर्वत-तून ढांसळलेल्या शिळा नदींत पडून प्रवाहाला अडथळा करीत होत्या. त्या लोकांनीं बाहेर काढल्या. सागरमीलनोत्सुक वितस्ता वेगानें वाहूं लागली. पन्नगीला यांत्रिक खेळवतो त्याप्रमाणें ओघाचा वेध घेऊन पाट काढून सुय्यानें पाणी खेळवलें, बांध घातले. सेतू बांधले. गांवोगावीं पृथक् पृथक् पाणी वांटून दिलें. गांवोगावांतील माती आणून ती भिजवून, तिला सुकावयला वेळ किती लागतो, तितक्या काळानें तिला सेंकाई (पाणी देण्याचें) ठरवून त्याचे परीणाम व विभाग हीं कायम केलीं. ~~व काळ ठरवणा~~न्या क्षेत्रांच्या संपत्तीनें दिशांचा विभ्रम दिसूं लागला. दुर्भिक्ष असता जेथें खारीभर धान्याची प्राप्ति होण्यास दोनशें दिन्नार हेतु होत. तेथें खारीभर धान्याची विक्री छत्तीस दिन्नारांनी उदित झाली.

टीप—विचरलेला पन्नगीप्रमाणें सुय्यानें खेळवली यांतील उपमा सहजरम्य आहे.

अवन्तिदेवानें अनेक वर्षें राज्य करून लौ. ३९५९ इ. स. ८३३ या वर्षी भगवद्गीतेचें श्रवण करून क्षेत्रात जीवित सोडलें. तेव्हा गुपित असलेलें वैष्णवमत प्रकट केलें.

## १२ शंकर वर्मा

अवन्तिवर्म्याचा पुत्र शंकरवर्मा राजा झाला. शूरवर्म्याचा पुत्र सुखवर्मा राजा झाला. दोघांचें वैर सुरू झालें. राजाचे अनुयायी पिण्डस्पृहा शिकलेले नव्हते. पिण्डाकरता हवें त्याशीं लढणारे नव्हते. सुखवर्म्याला युद्धांत जिंकून, शंकरवर्म्यानें विजयाचा ओंकारच रचला. (हा बहुधा हिंदु राज शाहीचा स्थापक असावा असें डा. स्टीन म्हणतो.)

मग राजा दिग्विजयाला निघाला. आपल्या पुत्राला नीवि (ओलीस) देऊन त्रिगर्ताच्या राजानें, पृथ्वीचंद्रानें प्रणति केली. अंगुलि देऊन शरीर राखतात त्याप्रमाणें गुर्जराधिपतीनें, अलखणानें, टक्कभूमि देऊन आपले मण्डळ राखलें. उदभाण्डचा लल्लीय शाही राजा दरद व तुरुष्क यांमध्यें सापडून त्याची स्थिति हिमवान व विंध्य, यामध्यें असलेल्या आर्यावर्ताप्रमाणें, वनवराह व सिंह यांमध्यें पडल्यासारखी झाली होती. तो याच्या आश्रयाला येत होता पण त्याचें राज्य त्याला द्यावयाचें होतें; म्हणून त्यानें त्याची सेवा घेतली नाहीं. चद्राची जशी पौर्णिमा तशी याची सुगन्धा राणी होती, यानें सुगन्धेश व शंकर व शंकर गौरीश याचीं देवळें बांधलीं. पण काय?

> परकाव्येन कवयः परद्रव्येणचेश्वराः।
> निर्लोडितेनस्वकृतिं पुष्णन्त्यद्यतनेक्षणे॥ ४६०॥

अर्थ—आजच्या क्षणाला कवि हे परकृत काव्याची व राजे परद्रव्याची लूट करून स्वकृतीचें पोषण करतात.

टीप—येथें राजे परद्रव्याचें अपहरण करतात असें म्हणण्याच्या निमित्तानें कवि हे परकल्पनांचें अपहरण करतात असें म्हणून कवींचा कल्हणानें भरपूर समाचार घेतला आहे.

आपल्या पुराची स्थापना करण्याकरतां, परिहास पुरांतील सारभूत वस्तूंचा यानें अपहार केला. पट्टवानाचें (शालींचें) कारखाने, पशूंचा क्रयविक्रय, प्रसिद्धि हेतु परिहासपुरांत होते ते यानें आपल्या पुरात आणले. लोकाभ्यासानें राजा प्रजा-पीडनपंडित झाला. अट्टपति व गृहकृत्य भाग या नावाचे नवे

कर व ते वसूल करण्याचीं कर्मस्थानें (कचेऱ्या) स्थापन केल्या.

## राजा स्वतां व्यापारी होतो

राजानें देवालयांतील धूप चंदन वगैरे पदार्थांची विक्री करून येणारें क्रयमूल्य कलाच्छलानें नफ्याचा आपला भाग म्हणून घेऊन देवळांचे इनामगांव जप्त केले. त्याबद्दल त्याना कांहीं नक्त नेमणुका करून दिल्या, व त्या देशात शेतकऱ्याप्रमाणें लागवड केली. देणगीचा तिसरा भाग करून तो कम्बल वगैरे भोग्य वस्तू वाढवलेल्या किंमतीनें देवू लागला.

## वेठ बिगार

वेठीला धरण्याची पद्धति यानें काश्मीरांत पहिल्यानें पाडली. ही तेरा प्रकारची गूढ भारोढी गावाची दारिद्र्यदूतीच होती. स्कन्धकग्राम ( पटवारी, कुळकर्णी इ. ग्रामकायस्थ ) पाटील व वजनदार याच्या मालिकवृत्तीनें ग्राम निर्धन झाले. तोळाचा अपहार व उपचय करून ( वजनांत कमी अधिक करून ) मिळालेला पैसा राजानें गृहकृत्याकडे वळवला. या खात्यात भिन्नकामांवर पाच दिवीर (करून) नेमले. त्याशिवाय शकच किंवा लवट याचा सहावा भारवाह ( मजूर ) नावाचा खजिनदार नेमला. गुणिजनाच्या धनाची व यशाची हानि करणारे हे रांडलेक कायस्थ राजाने चढवल्यामुळें ही भूमि कायस्थ भोज्य कुरणच झाली.

## राजपुत्राची पित्याला विनंति

अशा स्थितींत गोपालवर्मा पित्याला म्हणाला, "हें राज्य तुमच्याकडे न्यास म्हणून आहे. पण त्रासदायक करानी प्रजेला श्वासशेष तेवढी प्राणवृत्ति उरली आहे. जनपिडेपासून तातात ! ऐहिक किंवा पारमार्थिक प्राप्ति इवली सुद्धा होणार नाही. अदृष्टाची वार्ता गहन आहे; पण जें आज दृष्ट आहे त्यापासून अनिष्टाशिवाय दुसरें कांहीं दिसून येत नाहीं. दान व सुनृत यांनीं विश्वसवहन होतें. लोभ दोहोंचा नाश करण्याचा मोठा उद्योग करतो. हा विश्वसवाहन नावाचा नवा कर जनांचा शत्रू आहे. त्याचें निवारण हे प्रजानाथा ! तू कर."

राजा म्हणाला, "तूच एक मला वचन दे तें असें कीं तुला राज्यप्राप्ती झाल्यावर मीं दिली तीहून तू अधिक पीडा प्रजेला देणार नाहीस." हें ऐकून राजपुत्र लज्जित झाला. विटानीं एकमेकांकडे बघून हास्य केलें.

या राजाचे कारकीर्दीत भल्लटादी कवी कायस्थनिर्वेतन झाले. प्रजेच्या अभिशापानें याचे बीस तीस मुलगे मृत झाले. याने वसविलेले शूरपूर नष्ट झाले. याचे नाव पट्टण पडलें. उरशादेशात फिरत असता लौ. ३९७७ इ. स. ९०२ या वर्षी एकाश्वपाकानें याला वेगवाही बाणानें ठार केले. राजाच्या मरणाची बातमी मन्त्र्यांनीं दूर ठेवली व राजाला घरीं आणलें वाटेत दर्शनाला आलेल्या सामन्ताना राजाच्या कपाळाला बांधलेली सूत्रें खालीवर करून प्रति प्रणाम करवीत असें सागतात.

## ३ गोपालवर्मा

शंकरवर्म्याचा पुत्र गोपालवर्मा राजा झाला. जननी सुगन्धा भोगप्राप्तीमुळें वैधव्यांत प्रभाकर नांवाच्या कोशाध्यक्षावर आसक्त झाली. त्यानें कोशसपदा लुटली. कोशगणना राजानें केल्यावरून त्याला ती कळून आली. त्याच्या भीतीनें प्रभाकरानें खाखोद विद्या जादू जाणणाऱ्या रामदेवाच्या बधूकडून राजाला अभिचार कर्म करून मारविलें. राजानें दोन वर्षें राज्य केलें.

## ४ संकटवर्मा पालक ( सुगन्धा राजमाता )

हा राजाचा भाऊ दहा दिवसांत मृत्यु पावला.

## ( ५ ) सुगन्धा

जननी सुगन्धा राज्यावर बसली. तिच्या मनातून निर्जित वर्म्याला ( शूरवर्म्यांच्या नातवाला ) राजा करावयाचें होतें; कारण सबंधी म्हणून, तो स्नेहानें अनुमत वागेल. तंत्री व एकाग म्हणाले, "हा विषयव्यसनी रात्रौ जागरण करतो. दिवसा निजतो. याला पशु नाव प्राप्त झालें आहे. हा उत्थान योग्य नाहीं. तंत्र्यानीं निर्जितवर्म्याच्या पुत्राला पार्थाला राजा केलें. या कारणानें तन्त्र्याशीं लढतांना ती त्याच्या हातीं सापडली. त्यांनी तिला बन्धनांत घालून ठार केलें.

टीपः—एक राजा मृत झाला म्हणजे त्याच्या मागून त्याचा वारस गादीवर बसावयाचा हें तत्र यापुढें उत्पलक वशात चाललें नाहीं. आपल्या मुलाकरतां मन्त्र्याशीं सख्य ठेवणाऱ्या मत्सरी राण्या, सत्ताभिलाषी मत्री, प्रबल शस्त्रधारी तत्री मध्यें लुडबुड करीत म्हणून कोणत्याही राजाचें पद फार वेळ स्थिर नव्हतें. वाचकाना असा प्रकार समजण्यास सोपा जावा या करता पार्थापासून उत्पलक वशाची वशावळ दिली आहे. तीवरून राजाची राज्यावर स्थापना, उच्चाटण व मृत्यु या गोष्टींची सरुवार माहिती कळून येईल.

## ६ पार्थ ( पालक निर्जितवर्मा)

पार्थ लहान म्हणून त्याचा बाप निर्जितवर्मा पालक झाला. याचे मत्री सुगन्धादित्य व मेरुवर्धन म्हणून होते. मेरुवर्धनाचे पुत्र, चक्रवर्मा, शूरवर्मा, शंभुवर्धन, व शंकर वर्धन म्हणून गहनचाक्रिक ( राजद्रोहाचीं गहनचक्रें फिरवणारे ) होते. काश्मीरचे राजे आतां तत्र्याना उत्कोच ( लांच ) देऊन एकमकाचें उच्चाटन करवीत. तन्त्र्याना हुंडिका दान ( हुंड्याचें दान ) करणें हीच त्याची जीविका होऊन बसली. तन्त्र्याना जे मत्री हुंडिका भरीत त्यानांच राजे आपले मत्री करीत. व तसले मत्री राजाची सपदा लुटीत.

निर्जितवर्म्याच्या राण्या बप्पटदेवी व मृगयावती ( मेरुवर्धनाची पुत्री ) या आपल्या मुलांना क्रमानुक्रम चक्रवर्म्याला व शूरवर्म्याला राज्यलाभ व्हावा म्हणून बीजाक्षोपम ( बळूघोड्या-

सारख्या ) सुगन्धादित्याला विधुवन श्रद्धा देऊन वरतीं दक्षिणा देत. दरिद्री माणसाच्या दोन नायका एकाच पात्रात भोजन करतात.

लौ. ३९९७ इ. स. ९२१ या वर्षी तन्त्र्यांनीं पार्थाचें उच्चाटन करून त्याच्या पित्याला निर्जितवर्म्याला राजा केलें. तो दोन वर्षांनीं बप्पट देवीच्या पोटीं झालेल्या आपल्या पुत्राला राज्य देऊन लौ० ३९९९ इ. स. ९२३ या वर्षी मृत झाला. पुढें निर्जितवर्मा ऊर्फ पगु याच्या मृगावती नावाच्या राणीच्या पोटीं झालेला पुत्र शूरवर्मा, पार्थ, चक्रवर्मा व शम्भुवर्धन हे राजे तन्त्र्यांनीं केले. तात्पर्य—

तीर्थस्थितान्स्वकुलजास्तिमिरत्ति, भुंक्ते।
मौनी बकस्तिमिमुपेत्यवनांतवासी॥
व्याधो निहन्तिच बक प्रभवन्ति ते ते।
तत्राप्युषर्य्युपरि वंचनचंचुताया. ॥ २०५॥

**अर्थ**—तीर्थवासी तिमिमत्स्य स्वकुलजाना खातो, वनान्तवासी मौन धारण करणारा बक झडप घालून तिमिमत्स्याला खातो. त्या बकाला व्याध मारतो. एवंच वर पायरी पायरीनें चढ करून फसवण्यात अधिकाधिक चातुर्य दाखवून एक दुसऱ्यावर पोट भरतो.

भ्रष्टश्री चक्रवर्मा दक्षश्री येथें असतां त्यानें संग्राम डामराचें साहाय्य मागितलें. डामर म्हणाला "तुझें कार्य झालें म्हणजे तूंच आम्हांला मारशील."

## राजांचा स्वभाव

राजे लोक कृतकार्य झाले कीं उपकार विसरतात. वृक्षावर चढताना अधोगमनाचें वेळेस मनुष्य तोडीत उतरतो. जे आमच्या बुद्धिधैर्यादिगुणानीं राजे उपकृत होतात, त्याच गुणामुळें आतां उपकार्याविषयीं शंका घेतात, व आम्हाला वर्ज्य करतात. उपकार तर विसरतातच; पण उपकार करताना आमचे झालेले प्रमाद तेवढे हृदयात बाळगून ठेवतात. स्वतां पाहिलेल्या गोष्टींवर यांचा भरवसा नसत नाहीं. हे कानीं लागणाऱ्यावर भरंवसा ठेवतात. रात्रीं उपाध्याय ( गुरु ) अशी पत्नी जें एकान्तात शिकवते, त्याविषयीं सारखा प्रजागर ठेवणें सर्वंशांनाहि शक्य नाहीं. कुशलमंत्र्यानीं कसेंबसें दिवसास दिलेलें शिक्षण, ते रात्रीं नीलगाईप्रमाणें विसरतात. स्निग्ध ओलसर लांबलचक जिव्हांनीं विलोभित होऊन मुग्धा आस्वादाकडून खाल्ल्या जातात. तसें लोकांकडून आवलांव बातांनीं विलोभित होऊन कोठले राजे भ्रष्ट होत नाहींत ! सिंहनमन करीत, सर्प कवटाळीत, वेताळ हसत व राजा, हे स्तुति करीतच मारतात.

तथापि तूंच जर सदैव आमच्याकडे अद्रोह बुद्धीनें पाहशील तर मी ससैन्य निघालोच समज."

राजा म्हणाला "तुझें आस्थ्याप्रमाणें रक्षण करीन." नंतर नृप व डामर यानीं हातात खड्ग घेऊन रक्तानें माखलेल्या मषाचे चामड्यावर चरण ठेवून कोश पान पूर्वक शपथा घेऊन दिव्य केलें.

चक्रवर्मा डामर व त्याची सेना आणि शम्भुवर्धन व त्याची तन्त्री सेना यामध्यें पद्मपुराजवळ मोठा संग्राम झाला.

अहितुण्डिक कृष्णसर्पाला पकडतो व करंडीत कोंडून ठेवतो. पोटासाठीं भिक्षा मागताना त्याला हिंडवतो व त्याला क्रूरपणें वागवतो, त्याप्रमाणें ज्या महावंशीय नृपतीला ज्या तन्त्र्यांनीं वागवलें त्याचा मोड त्याच महावंशीय नृपतीनें चक्रवर्म्यानें केला. शम्भुवर्धनाला मारून चक्रवर्मा सिंहासनावर बसला.

टीप—डामराच्या भाषणात शेवटीं आलेला दीपक अलंकार व वरची गारुडया ची तन्त्र्यांना दिलेली उपमा हे दोन्ही अलंकार सुंदर आहेत.

## ७ चक्रवर्मा

अंड्यात असताना जशी सर्पांच्या पिलांची तशी बाळपणीं चक्रवर्म्याची दुःशीलता दिसून आली नाहीं. स्वपराक्रमाचा रोमन्थ त्याला प्रिय झाला. तो विषम कृत्यें करू लागला. अशा वेळेस डोम्ब, अगदीं हलक्या जातीचा एक वैदेशिक रंग नावाचा गायक, दोन गायक मुली घेऊन आला. त्याचा जलसा राजवाड्यात झाला.

## राजवाड्यांत झालेला डोम्ब व त्याच्या मुलींचा बहारीचा जलसा

मण्डपात सचिव, सामन्त, अंतःपुरातील स्त्रिया हीं यथाक्रम व यथोचित स्थळीं बसलीं.

डोम्ब, मंडळीसह प्रविष्ट झाला. तीं व त्याच्या ललितलोचन अशा दोन मुली, हंसी व नागलता म्हणून होत्या. त्यांच्याकडे मान उचलून कौतुकानें बघणारी सभा, चित्रार्पित झाली. ललीत व चलीत अशा सविलास अंगाग विभ्रमानीं त्या दोघी सभेमध्यें फुलेंच उधळीत होत्या. "जय ! जीव !" ( वाहवा ! जितरहो ! ) अशा शब्दाचा कोलाहल उठला. एक विशेष राग गाताना त्या, आधी खालील स्वरांत गाऊन उत्तरोत्तर उच्च अशा पंचम स्वरात ताना घेऊं लागल्या. वाद्यवादें त्या स्वरांचे नेमकें स्थान ओळखून वाद्य वाजवूं लागली. त्यांच्या गीतध्वनीनें माना हालवण्यानें, भ्रुकुटी उडवण्यानें व नेत्र चालनानें राजाची दृष्टी कुरंगा प्रमाणें अस्पष्ट झाली. उद्वेचित नादाचें विशेष स्निग्धगायन सुरू झालें. राजाचा व त्या दोघींचा स्वसंवेद्य अशा दृग्व्यापारानें, सलाप चालू झाला.

राजाचें चित्त हरवलें आहे असें जाणून एका विटानें प्रणय वृद्धिकारक भाषण केलें तो म्हणाला नेत्रानीं यांचें रूप व कर्णानीं यांचा गीतध्वनि सस्पृह करण्यात काहीं दुष्कृत्य नसेल तर तशाच नेत्र श्रोत्र सदृश अन्य मनोरम अंगांना सस्पृह केलें असता दोष कां असावा !

राजाचा अभिलाषांकुर या विटभाषितानीं शत शाखात्व पावला. राजा हार केयुरादी वस्तू डोम्बाला देऊन अंतःपुरांत गेला. क्षणात अनुपपत्तियुक्त असलेली गोष्ट युक्त गोष्ट उपपत्तियुक्त (चांगली) आहे असें तर्कपटुत्वानें जाणणारे विट नसते तर नरक पुरी ओस पडली असती व तेथें मृग संचार करते !

टीप—संगीताच्या स्त्रीगायिकांच्या जाळ्यावरील लोकांचें प्रेम फार जुनें आहे असें म्हणावयाचें तर मग ! दलशाचें वर्णन कल्हणानें इतकें हुबेहूब केलें आहे कीं तो जलसा आपणापुढें प्रत्यक्ष घडत आहे असा मास उत्पन्न होतो. राजाच्या मनःस्थि-तीचें समर्थन करणाऱ्या विटाला कल्हणानें दिलेलें टीकात्मक उत्तर पुरेसें आहे.

प्रेमानें अंध होऊन त्या विजातीय शोभा असलेल्या हसीला राजानें पट्टराणी केलें. तिच्यावर व्यजन व चामरें हलू लागलीं. तिचें ज्यानीं उच्छिष्ट खाल्लें ते सभासद झाले. डोम्बाची सेवा बढतीचा हेतु झाला. कांहीं श्वपाक मूर्ख असल्यामुळें स्वतः सचिव झाले नाहींत. जे नीतिज्ञ होते त्यांनीं मन्त्र्यांप्रमाणें राजकारणें केलीं. तो ऋतुस्नात झालेली राणी आपल्या आर्तवानें अंकित असा रेशमी वस्त्रें इनाम देई. तीं पांघरून इच्छातृप्त झालेले मंत्री सभेंत येत. राजानें वैर पत्करून त्या श्वपाकीचें उच्छिष्ट ज्यानीं खाल्लें नाहीं ते सोमपान करणारे ऋषीच म्हणावयाचे ! यावेळीं काश्मीर मण्डळात उग्र स्वभावाचे देव वसत नसावे. नाहींतर राजाच्या मंदिरात ही श्वपाकी कशी शिरू शकती ? तीलद्वादशीच्या दिवशीं ही हसराणी रणस्वामीच्या दर्शनाला गेली. बरोबर सामन्तापेक्षां अधिक अभिमानी असे डामर गेले नाहींत.

राजकुटुम्बांतील म्हणून दत्त झालेल्या डोम्बाच्या आज्ञा राजाज्ञा समजून कोणी मोडीत नसत. राजानें रंगाला हेलुग्राम अग्रहार दिला. त्याचें दानपत्र पटोपाध्याय ( लेखक कायस्थ ) लिहीना. तेव्हां रंग रागानें अक्षपटलाला गेला व म्हणाला,

**रंगस्य हेलु दिण्णेति दासी सुत ! न लिख्यते ।**

( हे रांडलेका ! रंगाला हेलु दिला असें का लिहीत नाहींस ? ) रंगाला भिऊन त्यानें तसें लिहिलें.

राजानें अन्त्यजेशीं गमन केल्याची निष्कृति काय, म्हणून विचारलें. विटानीं हास्यकारक प्रायश्चित्त करवलीं.

**हिमेनैव हिमशाम्येत् दुष्कृतनैव दुष्कृतम्**

हिमानें हिम शमतात, एका दुष्कृतानें दुसरें दुष्कृत नाहींसें होते म्हणून अस्पृश्याला स्पर्श करून झालेल्या पापाचें क्षालन पवित्राला स्पर्श करून मासभर उपास करणाऱ्या ब्राह्मणीला स्पर्श करून राजानें तिला दूषित केलें.

पुढें कांहीं विश्वस्त डामरांना राजानें कारण नसतां मार-वलें. म्हणून कांहीं डामर दस्यूनीं राजाला श्रमाकीच्य शयन मंदिराजवळील अवस्करमंदिरांत ( शौचकूपांत ) लौ. ४०१३ इ. स. ९३७ वर्षीं कुत्र्याप्रमाणें मारून ठार केलें.

शर्वादादी मूर्ख मंत्र्यांनीं पार्थाच्या दुसऱ्या पुत्राला उन्मत्त अवन्तीवर्म्याला राजा केलें. हा अधिक पापी निघाला. याच्या कथेच्या स्पर्शानें सरस्वती स्थगित झाली आहे; पण मी तिला एखाद्या चिखलेल्या घोडीप्रमाणें चुचकारून चालवीत आहें. नाचानें व खाद्यानें डोक्याच्या कवचीवर आघात करून वाद्या-प्रमाणें सूर काढणारे नीच लोक त्याचे मंत्री झाले. त्या सर्वांत त्याला पर्वतगुप्त प्रिय झाला. कटिपट सोडून तो सभेंत नर्तन करी. त्याचे मनांतून गूढपणें राज्य मिळवावयाचें होतें. राजा-कडून त्याच्या भावाला बन्धनात टाकून क्षुधेनें मरू दिलें. व राजाच्या बापाला, पार्थाला, तर्थांकडून गोठ्यांतून ओढून जसें गुराना मारतात तसें मारवलें.

राजा शास्त्राभ्यास करूं लागला. स्त्रियांचा कोठा व गर्भ पहाण्याकरतां बोटवी ( नग्न ) स्त्रियाचीं व गर्भवती स्त्रियाचीं पोटें फाडी. मजुराचीं अंगें त्यांच्या कातडीच्या काठिण्याची परीक्षा पहाण्याकरता, तशींच फाडी. अशा राजाकडून ब्राह्मण-लोभानें अगर वधाच्या भीतीनें दान घेत.

पापामुळें राजा क्षयी झाला. त्याच्या चौदा राण्यांनासुद्धां संतोष वाटला. हा माझ्यापासून झाला असे ख्यात करून एका शिशुला गादीवर बसवून तन्त्री व एकांगव कम्पनाधिपति कमलवर्धन यांच्या स्वाधीन त्याला करून राजा लौ. ४०१५ इ. स. ९३९ वर्षीं मृत झाला.

कमलवर्धनानें सैन्य आणून एकांगादीनां पळविलें. राण्यानी बालराजाला पळविलें; तेव्हा कमलवर्धन स्वतां राज्यावर बसला नाहीं. तो सर्व द्विजांस जमवून त्यास म्हणाला " कोणी तरी स्वदेशज, प्रौढ व सशक्त असा पाहून त्याला राजा करा. " या मूर्खाला वाटलें " हे माझें सामर्थ्य पाहून मला राजा करतील. दुर्लभ अशी युवती एकान्तांत प्राप्त झाली असता, तिचा उपभोग न घेता, दुसऱ्यादिवशीं दूती पाठवून जो तिची आर्जवा करतो व प्राप्त झालेली विभूति टाकून जो त्याच क्षणीं ती राजनीतीच्या मार्गानें प्राप्त करून घेण्यास इच्छा करतो, तो व हा कमलवर्धन' या दोघातून अधिक शोच्य कोण ?

## राजाची निवड करणारी विप्रपरिषद्

हे विप्र स्थूल कांबळीं वाहणारे शृंगहीन बैलाप्रमाणें असलेले, विप्र गोकुल मंदिरांत जमले. त्यांचें कूर्च धूम्रानें निर्दग्ध झाले होते. कोणाला राजा करावा याची चिकित्सा करीत असत. त्यांनीं मांडलेला उपन्यास वैमत्यानें वादला. अभिषेक कोणावर झाला नाहीं. पण उच्च भाषण करताना मुखांतून उडालेल्या थुकीनें त्यांच्या लांब दाढीवर चांगला अभिषेक झाला.

आपली स्तुति देण्याच्या क्लुप्तीनें कमलवर्धन तेथें गेला, पण इष्टिकाघातानें विप्रानीं त्यास परतवलें. द्विजाची जाति पाच सहा दिवस बसून होती. काहला, ढोलकें, कास्यतालादि वाद्याचा कोलाहल चालू होता. आपली पत्नी बन्धकी झालेली जशी पहावी, तशी राजलक्ष्मी झालेली पाहून, कमल-वर्धन खचित बसला.

पूर्वी सुगन्धादेवीला कामुक प्रभाकरदेव म्हणून होता. त्याला एक भास्कर नावाचा पुत्र होता. तो फार विद्वान होता व लक्ष्मीसरस्वतीच्या विद्वेषामुळें देशांतरांत फिरत होता. तो शुभ स्वप्नाच्या दर्शनामुळें व पीठ देवीच्या आशीर्वादामुळें दुर्बल होऊन यावेळेस परत आला. तो वाक्कुशल म्हणून द्विजाजवळ गेला व द्विजांनीं त्याला राजा केलें. त्र्यायशीं वर्षे चार महिने इतक्या कालात कल्यपालाचे आठ वंशज, राणी सुगन्धा देवी, व शंभुवर्धन यांनीं राज्य केलें.

# तरंग ६ वा

## शिवस्तुति

(शिवाच्या जे अर्धशरीर पार्वतीला प्राप्त झाले आहे, तें प्रेमानेंच प्राप्त झालें आहे. अशी देवधूनीं केलेली स्तुति ऐकणारी पार्वती आमचें रक्षण करो.)

## १ यशस्कर

(लौ. ४०१९ इ. ९३९ सालीं राजा झाला)

राजवाड्याच्या कक्षेंतून मला कोणी उल्लंघुन जाऊ नये म्हणून, तसें करणाऱ्या ब्राह्मणास अञ्जलि जोडून तो म्हणाला, "तुम्ही मला राज्य दिलें म्हणून तुम्ही मला पूज्य आहात तरी कांहीं कार्याचा काल असल्याशिवाय तुम्हीं माझे जवळ येऊं नये." हा सहज मिळण्यासारखा नाहीं म्हणून सहवासलाभ लोक विसरले.

### यशस्करराजाची अपहरण करणाऱ्या कामगारांविरुद्ध मोहिम

राजा स्वतां कामें पाहूं लागला. अपहरण करणाऱ्या कामगारांना, खेड्यातील लोकांना कृषिकर्म करण्यापलिकडे दुसरें कांहीं काम राहिलें नाहीं.

### बुवाबाजी विरुद्ध मोहिम

धर्मगुरूकडून दीक्षा घेतलेल्या गृहिणी मस्तक हलवून भर्त्यांच्या शीलशोभेचा निषेध करतांना दिसत नाहींशा झाल्या.

### साक्षरता प्रसार

ज्योतिषी, वैद्य, गुरु, सभ्य (सभासद), मंत्री, पुरोहित, दूत (वकील) स्थेय (न्यायाधीश) व कारकून यांत कोणीहि अपठित राहिला नाहीं.

### राजाच्या चातुर्याची गोष्ट १ ली

एकदा प्रायोपवेशनाविषयीं चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं राजाला येऊन सांगितलें कीं एकजण राजवाड्याजवळ प्रायोपवेशन करीत आहे. त्याला राजानें बोलावून त्याचें कारण विचारलें. तो म्हणाला, राजा मी पूर्वी वैभवानें आढ्य होतों दैवयोगानें निष्कांचन झालों. ऋण झालें तें वाढत गेलें, सावकार पीडूं लागले. प्रथम माझें मंदिर मी एका वणिजाला अल्पांच किंमतीला विकलें. भार्येच्या पोटापाण्याच्या सोयीकरतां एक सोपान कूप होता. तो वर्ज केला. त्या अतिशीतळ जागेंत बसून फुलें व पानें विकणाऱ्या मंडळीं कडून जें भाटक (भाडें) येईल त्यावर तिची उपजीविका व्हावी असा हेतु होता.

नंतर दिगन्तरात हिंडून वीस वर्षांनीं अल्प वित्त मिळवून जन्मभूमीला परत आलों. तेव्हां मी माझी साध्वी स्त्री विवर्ण देहाची दुसऱ्याच्या घरीं मजुरी करून कशी तरी जीवन्त राहिलेली आढळली. तुला उपजीविकेचें साधन दिलें असतां तूं असल्या वृत्तीचा आश्रय कां केला आहेस असें विचारलें असतां तिनें वृत्तान्त कळविला तो असा कीं– "सोपान कूप तूं मला देऊन निघून गेल्यावर, वणिजानें मला लाकडानें मारून घालवून दिलें. मला दुसरी वृत्ति कोठली" असें म्हणून ती स्तब्ध बसली.

मी शोक व कोप यामध्यें मग्न झालों. प्रायोपवेश केला. जागजागीं अधिकाऱ्यांनीं प्रतिवादी तर्फे न्याय दिला. मला जडाला न्याय कळत नाहीं. सोपान कूप विकला नाहीं असें प्राण पणाला लावून पुन्हा पुन्हा सांगितलें. मी क्षीणार्थ झालों आहे. पापाचें भय असेल तर तूं या वस्तूचा स्वतां न्याय कर."

राजा स्वतां धर्मासनावर बसला. सर्व स्थेय अधिकारी त्यानें एकत्र केले. कूप सहित मंदिर विकलें अशीं अक्षरें, विक्रयपत्रांत राजानें वाचलीं. त्यावरून ते सभ्य म्हणाले, बहुशः विचार करूनच याचा पराभव केलेला आहे. न्यायाकडे पहातां हा कपटानें लेखाला दूषण देत आहे. यालाच दण्ड केला पाहिजे.

राजाचा अंतरात्मा वादीचा जय व्हावा असें सांगत होता. त्यानें मुहूर्तभर विचार केला. व दुसऱ्यावरोबर विचित्र कथा सांगत सभ्य मण्डळाला मोह पाडीत राजा बराच वेळ बसला.

मध्यंतरीं सर्वांकडून पहावयाला म्हणून राजानें रत्नें घेतली व हसत प्रतिवादीवणिजा जवळ जाऊन त्याची आंगठी घेतली. सर्वांनीं येथेंच रहावें. मी एका क्षणांत येतो असें कपटानें सांगून राजा तेथून निघून गेला. व ती आंगुठी एका भृत्या-जवळ देऊन त्याला म्हणाला "वणिजाकडे जा व ही आंगठी खूण म्हणून वणिजाच्या गणनाध्यक्षाला दाखवून, ज्या वर्षी विक्रीपत्र झालें, त्या वर्षाची गणनापत्रिका (कीर्द) घेऊन ये. ती एका निर्णयाच्या कामीं मण्डपतीला (वणिजाला) पाहिजे आहे."

राजाच्या आदेशा प्रमाणें गणनाध्यक्षानें आंगठी घेऊन कीर्द दिली. तींत अधिकरण लेखकाला (विक्रीपत्र लिहिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याला) एक सहस्त्र दिनार दिले. असें खर्चाच्या बाजूनें लिहिलेलें राजानें वाचलें. त्याची मिळकतीची योग्यता त्याला बहु धनाचें अर्पण झालेलें पाहून, राजानें असें निश्चित केलें कीं 'र' काराचा वणिजानें 'स' कार केला, व सोपानकूपरहित या शब्दाबद्दल सोपानकूपसहित असे शब्द घातले.

अधिकरण लेखकाला राजानें अभय देऊन त्याच्याकडून सभ्यांना प्रत्यय आणून दिला. सभ्यांनीं विनंति केल्यावरून वणिजाचें घर वादीला देऊन वणिजाला राजानें देशाबाहेर घालविलें.

### यशस्कर राजाच्या चातुर्याची गोष्ट २ री

एकदा राजा आन्हिक करून भोजन करणार तों क्षत्त्यानें (द्वारपालानें) अवेळ होती म्हणून भीत भीत आंत येऊन

कळवळें मंदिर विप्र उभा आहे. आज काम सपलें. विज्ञप्ति करण्याचा तुम्हा समय उद्या येईल. असें मी सांगितलें तरी ' आज दर्शन झालें नाहीं तर प्राणत्याग करीन " असें तो म्हणत आहे.

भोजन थांबवून राजानें विप्राला दर्शन दिलें. विप्र म्हणाला मी देशांतरात फिरून सुवर्णरूपक शंभर मिळविलें. तू राजा झालास. सौराज्य झालें. असें ऐकून ते रूपक घेऊन परतलो. निश्चोर मार्गात प्रवेश करता मला सुख झालें. दिन सरतांच वाटेत लवणोत्सव ग्रामी स्थिती (वसति) केली. अध्वश्रमानें मी एका बनांत तरूतळीं निजून मी रात्र घालविली. झुडपामुळें लक्षात न येणाऱ्या जवळच्या विहिरीत, वस्त्राला गाठ मारून ठेवलेलें माझें वेतन पडलें. तें मला जागे झाल्यावर समजलें. विहिरींत उतरणें अशक्य होतें. नष्टसर्वस्व असा मी शोकाविष्ट होऊन जीव द्यायला निघालों.

एक समर्थ पुरुष मला म्हणाला कीं मी तुझे वित्त काढतों. मला काय देशील ? मी म्हटलें मी विवश आहे. तुला आवडेल तें मला दे ( तुभ्यं यद्रोचतेमह्यंतत्तोदीयतांत्वया ) त्या पुरुषानें विहिरींत उतरून रुपये काढले. मला दोन दिले व स्वतःपणें अठ्ठ्याण्णव आपण ठेवले मीं या व्यवहाराची निंदा करूं लागलो.

न्यक् कुतोऽस ऐसें तुला फसविलें असें लोकें म्हणाले. यश-स्कर राजा असता सर्व व्यवहार वचननिष्ठ होतात. " मी सरळ होऊनी त्याचा त्यानें फायदा घेऊन माझें वेतन त्यानें हरण केलें तुझ्या सुव्यवस्थापकाच्या दारात आत्मघात करतो.

त्याचा प्रकृति नामल्ली " नाव व पत्ता विचारून राजा म्हणाला, " मी उद्या तुझ्या इच्छित वस्तूची प्राप्ति करून देईन. "

दुसऱ्या दिवशी त्या दूतानी बोलावून आणलेल्या त्या लव-णोत्सवग्रामस्थ जनातून त्या ब्राह्मणानें त्या साहस करणाऱ्या पुरु-षाला दाखवून दिलें. राजानें विचारता तो पुरुष म्हणाला. " ब्राह्मणानें सांगितलें तसें वृत्त आहे. वाचेप्रमाणें व्यवहार घडवून आणला, " सत्यवाक्पारतन्त्रस्य वस्तुवृत्तस्य चान्तरम् " स वाक् परतंत्र असते. एका बोलण्याचे दोन अर्थ होतात म्हणून पहिला अर्थ व दुसरा अर्थ यात अंतर पडतें. हें समजून न घेऊन लोक दोलाचलावर आरूढ होऊन खाली जमिनीकडे दृष्टि लावून बसले.

धर्मात्मा राजा म्हणाला " तुला आवडेल ते दे असें विप्र हे मत आहे. या लोभ्याला अठ्याण्णव आवडले ते त्यानें दिले नाहीत. व दोन रुपये दिले आतां अठ्याण्णव विप्राला या व साहसिकाला दोन द्या. "

या वर्णाश्रमपालक राजानें चक्रभानु नावाच्या एका द्विजानें अत्याचार केला म्हणून त्याच्या कपाळावर डाग दिला. धर्म अधर्म सूक्ष्म परीक्षेने ओळखून राजाने राज्यांत कृतयुगाचा उदय केला.

पथ्योपदेश करणारा वैद्य अपथ्य करतो. हा राजा स्वतां न्याय देत असता अन्याय करू लागला. उत्तरोत्तर एकमेकांचे पक्षपाती (पाठीमागे टाकणाऱ्या) अधिकाऱ्याच्या मध्यस्थीनें हा सत्यकार राजा अर्थसंग्रह करू लागला. याचा वडिल भाऊ मेला तेव्हां याला आनंद झाला. व राण्यांचा अभिलाष धर-णाऱ्या वेला वित्ताकडे यानें गज निमीलिकेनें पाहिलें. ( डोळे झाक केली ) लहान वेश्येला अंतःपुरांतील स्त्रियांच्या डोक्यावर ठेवलें. लहला चाण्डाळ पहारेकऱ्याशीं दुर्वर्तन करू लागली त्याच्या अंगीं वशीकरण सामर्थ्य होतें.

प्रायश्चित्त म्हणून राजानें आर्यदेशीय विप्रांकरिता मठ बांधला. मठाधिपतीला छत्रचामरादि राजचिन्हें दिली. फक्त टंक ( नाणें पाडण्याचा अधिकार ) व अंतःपुरातील अधिकार हे वर्ज्य केले.

राजाला उदर झालें, मरणाकरता तो मठात गेला. रुग्ण-स्थितीत राजा जिवंत असता उद्वेगानें भृत्यांनीं श्मश्रू न करण्याची, शिरोवस्त्र वर्ज करण्याची व काषाय वस्त्र धारण करण्याची अशा ज्या काहीं कृतज्ञता व्यंजक प्रतिज्ञा केल्या त्या सर्व राजा मरतो असें समजताच विसरले.

या राजानें नऊ वर्षे राज्य केलें. तो लौकिक ४०२४ भाद्रपद कृष्ण तृतीयेला इ. स. ९४८ रोजीं मरण पावला. त्याआधी सुलत आजा जो रामदेव त्याचा पुत्र वर्णट नांवाचा होता, त्याला राजानें राज्य दिलें. पण तो नगरांत असूनहि राजाला भेटला नाहीं. म्हणून हा आपल्यापासून झाला नाहीं असें जाणूनहि संग्रामदेवाला राजा केलें. वर्णट हा एकाह राजा होता. एका दिवसापुरता राजा होता

## ( २ ) संग्रामदेव

संग्रामदेवाची आजी पालक झाली. पर्वतगुप्त म्हणून कोणी एक याचा मंत्री झाला—" चैत्राच्या प्रथम दिवशी हें राज्य तुझ्या वंशजाना मिळेल पण अन्यथा वर्तन केलेस तर तुझ्या वंशजाच्या आयुष्याचा नाश होईल. ऐशी भूतभारती ( आकाशवाणी ) याला ऐकू आली.

म्हणून शैन्यागार बाल्यात शिरून बालराजाला मारून त्याच्या गळ्यात धोंड बांधून त्याला वितस्ता नदींत पर्वत गुप्तानें फेंकून दिलें व लौ ४०२४ इ. स. ९४९ या वर्षी फाल्गुन कृष्ण दशमीला सिंहासनावर बसला.

## ( ३ ) पर्वतगुप्त

सामन्त, तन्त्री वगैरे याचा द्रोह करीत, तरी त्याला यानी प्रगति केली. तथापि हा त्याचा द्रोह करी. एरंग मदनादित्य याचा नगारा प्रेम दानें फुटला. राजानें त्याचे अशुक फेकून अपमान केला.

गौरीप्रमणें शुद्ध अशा रूपसुन्दरी नावाच्या यशस्कराच्या एका राणीचा यानें अभिलाष धरला. ती म्हणाली "यशस्कर स्वामी मंदिराची निर्मिति पुरी झाली नाहीं तोंच यशस्कर मृत झाला. ती निर्मिति आधीं पुरी कर." त्यानें घाईनें मंदिर पुरें केलें. पूर्तीच्या यागात राणीनें आपल्या तनूची आहुती दिली. तिच्यावर पुष्पवृष्टि झाली. लौ. ४०२६ इ. स. ९५० या वर्षी त्रिता रोगानें राजा मृत झाला.

परलोकात कोणती वृत्ति प्राप्त होते हें जाणणें अतींद्रिय आहे. तरी पण या लोकीं अशुभकर्मांचा परिणाम दुःखद आहे असें अनुभवास न येतें तर आपली भरमसाट दुष्कृत्यांनी करण्यास कोण धजणार नाहीं!

## ४ क्षेमगुप्त (व त्याचे दुराचारी विट)

पर्वतगुप्ताचा मुलगा क्षेमगुप्त राजा झाला. हा दुर्जनाश्रयानें दुर्वृत्त निघाला. कृष्ण पक्षातल्या घनान्धकारित घोर रात्रीप्रमाणें भयप्रद निघाला. सारखे अलंकार घातलेले, सारखे वेष केलेले, याचे शभर दुराचारी असे फल्गुन प्रभृति मित्र होते. त्यांनीं याला व्यसनें लावून लुटलें. तरी हा लक्ष्मीबहिष्कृत झाला नाहीं. हा परायत्तासाय झाला. दुसऱ्याची इच्छा ती याची इच्छा झाली. विटांनीं यःकश्चित अशुचिरुचि उत्पन्न केली. हा परोपहास कुशल राजा वृद्धाच्या श्मश्रूवर थुंके. कर्णनालीत गाली ओती. बवळच्या माणसाच्या डोक्यावर टकरा मारी. विट जिष्णु पुत्र याला कंकणवर्षी म्हणून आपल्यावर कंकणांचा वर्षाव करून घेई. विटजन या कामुक राजाला घरीं नेऊन [कुच कुक्षी दिसतील अशा प्रकारें त्याच्यापुढें उभ्या करून] आपल्या स्त्रियांचें सौभाग्य भग्न करण्यात आपल्यांत स्पर्धा लावीत. कोणतींत काय विशेष व हृद्य कोणती असें विचारून द्रव्यप्राप्ति करून घेत. याच्या लालितांत हरी व धूर्जटी हे विट दौकण विषयात मूढ ठरले कारण यानीं आपल्या आयाचें चरित्र शुद्धच राखलें व ते भिकारीच राहिले. द्वारपति फल्गुन यानें आपली मुलगी चन्द्रलेखा क्षेमगुप्ताला दिली होती. तरी लोहरादी दुर्गाचा राजा जो जयसिंह त्यानें आपुली मुलगी दिद्दा (भीमशाही राजाच्या मुलीची मुलगी) याला दिली होती. दिद्देवर राजा आसक्त होता, त्यामुळें याला दिद्दाक्षेम ही पदवी प्राप्त झाली होती.

समामोपयोगी भाल्याची फेंक याला येत होती. तिचा उपयोग हा कोल्ह्याच्या शिकारींत करीत असे. जाळीं घेतलेले डोम, रानात फिरणारे लोक व कुतरे यानीं तो वेढलेला सदा दिसत असे. शिकारीस गेला असता एका कोल्हिणीच्या मुखातून अग्निज्वाला निघाल्या. या दर्शनें त्रस्त होऊन याला लूता नांवाचा रोग जडला. व हा लौकिक ४०३४ इ. स. ९५८ या वर्षी मृत झाला. फल्गुनाचा मुलगा याच्या अस्थी घेऊन काशीस गेला. सपत्नीनें अनुगमन केलें, म्हणून दम्भानें दिद्दा मागाहून निघाली. अनुबंधानें तिला अनुताप झाला. सदय नरवाहन मंत्र्यानें अनुगमनाचा निषेध केला.

## (५) अभिमन्यु

क्षेमगुप्ताचा मुलगा अभिमन्यु राजा झाला— निर्दय दिद्दा पालक झाली. संधिविग्रह मंत्री, अन्तःपुरातील मुख्य व दुसरे अधिकारी यानीं या राजवधूचें शयन अनन्य केलें.

शर्योदशाद इ. गुणांनीं उज्वल मंत्री फल्गुन इतराच्या डोळ्यात खुपे. त्रिभुवन मंत्री रक्क यानें दिद्देच्या मनात भरविलें कीं फल्गुन तुझें राज्य घेणार आहे. राणीनें त्याला मारण्याला पर्णोत्सव पाठविलें. आरद्ध क्षेत्रीं जाऊन फल्गुनानें वराह देवाच्या चरणीं शस्त्र अर्पण केलें व राणीचें भय घालविलें. शस्त्र किंवा शास्त्र हे न्यून गुणांचें उपकरण आहे. म्हणून कोप आला असता शस्त्र किंवा शास्त्र याचा उपयोग करणें एका विवेकी मनुष्यालाच साधतें. अध्यापक गल्लाधर जसा बल्लांना तसा मग्यान आनंद झाला,

नंदावरखें महाभय उत्पन्न झाल्यावर नरवाहन मंत्री लड लोरांचें बंड तत्काल मोडी. म्हणून राजानें नरवाहनाला राजानक ही पदवी दिली. राणी नरवाहनाला अनुकूल झाली ती इतकी कीं तो हृष्ट म्हणजे ती हृष्ट तो निर्विण्ण म्हणजे ती निर्विण्ण होई. त्याच्या आरोग्याविषयीं चौकशी केल्याशिवाय तिला बरें वाटत नसे. कोणत्याहि कामात त्याच्या सल्ल्याशिवाय व नित्यभेट म्हणजे वस्तु दिल्या शिवाय तिला बरें वाटत नसे. सिंधु म्हणून एक युग्य (मेणा) वाहणाऱ्या भोयाचा मुलगा पर्वतगुप्ताचे घरीं आवडता नोकर होता. क्रमानें राणीनें त्याला गंजाधिकारी केलें नव्या उत्पन्नाचा मार्ग म्हणून सिंधुगंज नांवाचें त्यानें एक कर्मस्थान काढलें. तो दुराशय त्या नंदावरखी राणीला म्हणाला "हा नर वाहन तुझें राज्य हरण करून बसला आहे." तसें खरें असें राणीनें उत्तर दिलें. नरवाहनानें तिला भोजनाचें आमंत्रण दिलें. मैथाकुळ राणीनें निरोप पाठविला कीं, मी स्त्रीधर्मिणी आहे, अमात्याची निष्ठा नाश पावली. याचाक्रिक उपद्व्यापी लोकांनीं तीळ व पेंड यांच्यांत असलेलें रूक्षत्व या दोघांत आणून दिलें. जे दिसण्यात बाहेरून संमूढ असतात, पण सुगुरुपेक्षा प्राज्ञ असतात, त्यांना निर्माण करणारे परमाणू कसे असतील ह्याची आम्हास माहिती नाहीं. लोकांचें अवेक्षण करण्यात ज्या राजाची बुद्धी तीक्ष्ण असते त्या राजाला खलाची वाणी सत्य वाटते. राणीनें केलेलें असले अपमान, असह्य होऊन नरवाहनानें एक दिवस आत्महत्या केली. जिचा प्रतिकार करता येत नाहीं अशा गोष्टीचा राग आला तर, स्वतेजानें सतप्त झालेल्या यशोधनाना मरणाशिवाय कोणती गति उरते!

नरवाहन विरहित राजलक्ष्मी सत्यविहीन भारतीप्रमाणें शोभत नाहींशी झाली.

मातेच्या पापामुळें विधुर झालेल्या राजपुत्राला (अभिमन्यूला) शिरीष पुष्पाला जसा सूर्याचा ताप तसा दुष्कृत्य जनांचा संगम शोषाध्यायी झाला. व हा राजपुत्र कोमजून गेला. हा अर्धमान प्रजाचंद्र कार्तिक शुद्ध लौ. ४०४८ इ. स. ९७२ या वर्षी नियति राहुने ग्रस्त झाला.

## (६) नन्दीगुप्त

मृत राजाच्या बालपुत्राला राणीनें राज्यावर बसविलें. आपल्या मृत पुत्रापासून तों या पशु राणीला खेळतांना पळतांना येत नसे म्हणून उचलून नेणाऱ्या दासीपर्यंत सर्वांच्या पुण्योत्कर्षाकरता अभिमन्युस्वामी दिद्दास्वामी इत्यादींची मंदिरें बांधणें वगैरे वैकुण्ठ निर्मित्यांनीं या राणीनें वितस्ता सिंधु संगम पावन केला.

सत्संगाचरण करीत असताहि पाप्याच्या हातून दोष परित्याग होईल असा प्रत्यवाय देतां येत नाहीं. ध्यानस्थ बगळा विश्वासानें संचार करीत असणाऱ्या मत्स्यांना खातो. वर्षमात्रानें भोगोत्सुक होऊन या चर्षणी राणीनें या व दुसऱ्या एका नातवाला त्रिभुवनगुप्ताला थोड्या अंतरानें अभिचार करून आपल्या शेवटल्या नातवाला भीमगुप्ताला राज्यावर बसविलें.

## (७) भीमगुप्त

पर्णोत्सवांतील खेड्यांत एका तुगाचा (खशाचा) बाण नावाचा मुलगा महिषीचालक (गुराखी) होता. तो आपल्या बुधि, सिंह, प्रकट नाग व अट्टयिक या पाच भावांसह कश्मिरात आला व लेखहाराचें (जासूदाचें) काम करू लागला. तो एकदा राणीला दृग्गोचर झाला. तिचें हृदय आकृष्ट झालें. व तो तिला प्रिय झाला. आपल्या स्पष्ट व दुष्ट चेष्टानीं तिनें वल्कपट भ्रष्ट केला व ती भयप्रद दिसू लागली. धिःकार असो या मोठ्या कुलांत जन्मलेल्या स्त्रियांच्या महा नद्या प्रमाणें निम्नानुसारी वृत्तीला!

भीमगुप्त महाकुलांतील होता. त्याला अभिमन्यूच्या राणीनें गुप्तपणें प्रविष्ट करून घेतलें होतें. तो आतां प्रौढमति झाला. जी काय राजव्यवस्था होती, ती व पितामहीची वृत्ती हीं नीट केली पाहिजेत, असें त्याच्या मनानें घेतलें. या शंकित राणीनें भीमगुप्ताचा विविध योजनांनीं निःपात करविला. लौ. ४०५६ इ. स. ९८० आपण स्वतां ही राणी सिंहासनावर बसली.

## ८ दिद्दा

तुग सर्वाधिकारी झाला. त्यानें पूर्वमंत्र्याच्या जागा भावांना दिल्या. तुगानें राजपुरीच्या अधिपतीचा (पृथ्वीपालाचा) मोड केला. व त्यापासून कारभार घेतला. राणीनें त्याला कम्पणाधीश केला.

## सिंहासनावर बसण्यास योग्य अशा राजपुत्राची निवड करण्यांत दिद्दा राणीचें चातुर्य

राणी लोहरदेशीय आपल्या सर्व भ्रात्यांचें शिशुप्राय पुत्र जमविले. व त्यांच्यापुढें पालवेल (शेव) फळांची माळ टाकून दिली व या फळांतून एकजण किती फळें जमवू शकतो तें पहूं असें ती म्हणाली. व तिनें त्या राजपुत्रांत कलह लावून दिला. ज्यानीं अल्प फळें घेतलीं ते पुष्कळ मार खाल्लेले दिसले. उदय राजाच्या संग्रामनामक पुत्रानें बरीच फळें घेतलेलीं दिसली पण तो अक्षतच राहिला. त्याचें कारण काय असें तिनें त्याला विस्मयानें विचारलें. तो म्हणाला अन्योन्य कलह करणाऱ्या दुसऱ्यांना श्रम ठेऊन मी निराळा राहिलों. व एवढी फळें मिळविलीं. व क्षतहीन राहिलों. दुसऱ्यांना व्यसनांत टाकून आपण स्वस्थ राहणाऱ्याचा हवा तो अर्थ क्लेश केल्याशिवाय सिद्ध होतो.

अप्रमत्तत्वाची दूतीच अशी याची वाणी ऐकून राणी स्वभावतःच भीरू अशी नारी असल्यामुळें याची राजा होण्याची योग्यता आहे असें वाटल व तिनें त्याला युवराज केलें. शूराला आपलें कार्य शौर्यानें व्हावें असें वाटतें, व भित्र्याला सावधपणें व्हावें असें वाटतें. अग्नीनें वर्जित लाकूड (वानरेन्धन) वानरांना शीत निवारक होतें. अग्निशौच मृगाच्या लोमाची शुद्धि जळ आणि वायु यांनीं होते. प्राण्याच्या कार्याची सिद्धि त्याच्या स्वभावावर अवलंबून असते. पुढें लौ. ४०७९ इ. स. १००३ या वर्षी राणीनें भाद्रपद शुद्ध अष्टमी या वर्षी स्वर्गाला प्रयाण केलें.

या काश्मीर मण्डळातील भूपाल वंशांत स्त्रीच्या माहेरच्या संबंधानें हा तिसरा परिवर्त झाला. चौसष्ट वर्षें आठ महिने सहा दिवस इतक्या अवधींत सहा राजे भूभोगी झाले.

---

# तरंग ७ वा

## शिवस्तुति

परस्पराचा द्रोह केल्याशिवाय नीट रहावें म्हणून संग्रामराज व तुगप्रमुख लोकांकडून दिद्दा राणीनें मरतांना, कोशपानपूर्वक शपथा घेवविल्या.

### १ संग्रामराज (शातवाहन कुलातील)

तुगावर सारें प्रजाकार्य टाकून संग्रामराजा आळशी झाला. त्यानें असम कुलाशीं संबंध केले. दिद्दा मठाच्या अधिपतीला त्यानें आपली लोटिका नामक कन्या दिली. कोठें लोकांचा भार वहन करणाऱ्या उद्धत राजाला देण्यास योग्य अशी राजकन्या

कोठें दान देताना सोडलेल्या पाण्यानें ओले झालेल्या हाताचा क्षुद्र मनाचा ब्राह्मण?

तुगाच्या विरुद्ध असलेल्या मन्त्र्यांनीं परिहास पुरातील ब्राह्मण परिषदेच्या सभासदाकडून प्रायोपवेशन करवलें. त्यावर तुगानें हल्ला केला. एक ब्राह्मण मेला. तुगाला अधिकारपदावरून दूर करणें हीच निष्कृति शान्ति चरू (प्रायश्चित्त) म्हणून मान्य झाली मृत ब्राह्मणाला तुगाच्या घरीं जाळू असें दुसरें-काहीं ब्राह्मण म्हणाले. त्यानीं कोठून तरी एक शव आणलें व तें तुगाच्या घरीं जाळलें. केश होमामुळें एका कृत्येचें उत्थान झालें. व ब्राह्मणांचा नाश करण्याकरतां शस्त्रें बाहेर पडलीं. ब्राह्मण पळाले. तुग विजयी झाला.

भद्रेश्वर नावाचा एक हीन कुळातील कायस्थ होता. त्याला तुगानें आपला साहाय्यक घेतला. भद्रेश्वराचें वंशक्रमोचित कृत्य आरामिकाचें (बागवानाचें) काष्टविक्रय करणाऱ्याचें कसायाचें, द्विवणिजाचें (गोमय विकणाऱ्याचें) होतें. तो कांबळ्यानें पोट झाकून, हातात दप्तरें दौती घेऊन पोटासाठीं कामगाऱ्याची मागून जाई तुगानें याला धर्माधिकारी नेमलें. देव ब्राह्मण आणि अतिथि, इत्यादि राज्योपजीवींच्या वृत्तींचा च्छेद करून हा त्यांचा अकाल मृत्युच झाला.

शाही राजा त्रिलोचन पाल * यानें तुरुष्काविरुद्ध राजाचें साहाय्य मागितलें. राजानें तुगाला सैन्य पाठविलें. पहारा ठेवणें, जागोजाग चर खणणें, सशस्त्र अभ्यास करणें. इत्यादि काहीं न करतां तुग तेथें उन्मत्तपणें राहिला. हम्मीरानें जिज्ञासापूर्वक टेहळणीकरता पुढें थोड सैन्य पाठविलें त्याचा नाश करून तुग दंग होऊन बसला. हम्मीरानें पुढें रुधिराभिसारी युद्ध करून तुगाचा पराभव केला.

तुग मार खाल्लेल्या कोल्ह्याप्रमाणें परत आला. तुगावर अवलंबून असावें लागण्यानें राजाला खेद होई. परायत्त स्थितीनें पशुहि खिन्न होतो. तुगाच्या भावाच्या (नागाच्या) प्रेरणेनें तुगाला सपुत्र मारण्याचें राजानें ठरवून त्याना आमन्त्रण दिलें. दुष्ट स्वप्न पडलें असूनहि, तुग पुत्रासह राजवाड्यात गेला व पुत्रासह मारला गेला. तेव्हां त्याचा एक भृत्य मध्यें पडून वध्य ठरला. एकाच प्रहारानें तुग निरुछ्वास व राजा सोच्छ्वास झाला. तुगाचे काहीं अनुयायी तोंडांत अंगुलि घालून मूक बसले. तुगाच्या भावाला (नागाला) राजानें कम्पनाधिपति केलें.

प्रजापीडनपण्डित अधिकारी राजाच्या कोशाशी वृद्धि करीत. त्यांत एका दिविराच्या अपूप विकणाऱ्या वेश्येचा चन्द्रमुख नांवाचा पुत्र होता. त्याच्या मुलाना सैन्य विभागात राजानें अधिकारी नेमलें. व हेमाच्या ठिकाणीं मुलें यवाचीं काडें बांधून हसू करून घेतात तसें राजानें हसें करून घेतलें. आपल्या हरिराज नावाच्या पुत्राचा राजा करून लौ. ४१०४ इ. स. १०२८ या वर्षीं राजा मरण पावला.

## (२) हरिराज

यानें मही निःश्चौर केली. रात्रीं बाजारात दारें लावणें बंद पडलें. याची कारकीर्द अचिरस्थायिनी होती. हा बावीस दिवसानीं मृत्यु पावला.

## (३) अनंत

हरिराजाचा हा पुत्र होता. याला शाहि पुत्र प्रिय असत. रुद्रपालाला प्रत्यही निर्वाहाकरता अर्धलक्ष दिनार * देई. दिद्दापालाला प्रतिवर्षी ऐशीं हजार देई.

कम्पनाधिपति त्रिभुवन डामर गोळा करून राजाचें राज्य घेण्यास आला. राजाला विक्रम होता. असें ऐकू येत असे कीं तो रणातून परत येई तेव्हां त्याच्या हातांत स्थिरमद करून राहिलेली तरवार दुधाच्या अभिषेकानें सोडवावी लागे.

या युद्धात राजाला एकांगाचें साहाय्य होतें. त्याचें वृत्त (वेतन) त्यांना नामग्रहपूर्वक सेवकाकडून मिळे. पण त्याना अक्षपटलात (हिशेबनीसाच्या कचेरींत) त्याना जावें लागे. राजानें त्यास स्थावर विलब्धि (कायमच्या नेमणुका) करून दिल्या.

म्लेच्छ, अमर, व दरदाचा राजा अचलमगल याला घेऊन त्रिभुवन परत आला. त्याच्याशीं लढण्यास रुद्रपाल निघाला. दुसऱ्या दिवशीं युद्ध ठरलें. अचलमगल, पिण्डारक नावाच्या नागभवनाला गेला. त्यानें भवनात पोवत असलेल्या नागावर अविनयानें भाला फेकला. कुंडातून कोल्ह्याच्या आकाराचा नाग बाहेर पडला. मृगयेच्या औत्सुक्यानें अचलमगल त्याचे मागें लागला. युद्धाचा समय मोडला असें समजून राजाचें सैन्य चाल करून गेलें. त्या समरोत्सवात अचलमगलाचा शिरच्छेद झाला. रुद्रपाल विजयी झाला.

मत्सरी उदयानें (रुद्रपालाच्या भावानें) ब्राह्मणाकडून प्रायोपवेशन करवलें. त्याच्याशीं रुद्रपालाची अवदालिका झाली. लूता नावाचा रोग जडून तो मरण पावला.

राजाचा एक पुत्र मृत झाला. राजा व राणी सूर्यमती राजवाडा सोडून सदाशिवाजवळ रहावयास गेलीं. पुढें हीच प्रथा पडली.

पापसूदन तीर्थाच्या जलानें नित्य तोंड धुण्याची मालवेन्द्र राजा जो भोज त्याची प्रतिज्ञा होती. ती राजानें असंख्यांत

---

* पजाबचा हा शेवटला शाही राजा. याच्यावर हम्मीरानें (गझनीच्या महुमुदानें) स्वारी केली होती. ती नववी होती. व ती १०१६ सालीं झाली.

* हीं नाणीं सोन्याची, रुप्याची अथवा तांब्याचीं असत.

काचेच्या कलशाची कुंडें तीर्थजलानें भरभरून पाठवून पुरी केली.

राजा ताम्बुलव्यसनी होता. पद्मराज नांवाच्या एका विदेशी नागवेलीच्या पानांची विक्री करणाऱ्यानें निःशेष देशोत्पत्ती (उत्पन्न) आपल्याकडे लावून घेतलें. राजाला अश्व प्रिय होते. म्हणून मोतद्दार लूट करीत राजाला अधिकाधिक झालेलें कर्ज पद्मराजानें दिलें. व पंचचंद्रादिकीं शोभणारा मुकुट व सिंहासन तारण गहाण म्हणून घेतलीं. ही राजचिन्हें दर महिन्याला समारंभाच्या दिवशीं राजवाड्यांत आणलीं जात. ही अवस्था राणी सूर्यमतीनें आपल्या खर्चानें दूर केली. पतीचे नारी विधेयत्व (पत्नीच्या तंत्राप्रमाणें चालणें) व तिचा भर्तृजय (भर्त्यावर आज्ञा चालवणें) हीं दोन्हीं तिच्या निष्कलंक शीलामुळें लोकनिंदेला पात्र झालीं नाहींत.

पण राजाचें मन स्वयंवरातील पतिवरेप्रमाणें नव्या भृत्यावर बसू लागलें.

हलधर म्हणून एक बुद्धियुक्त सर्वाधिकारी होता त्यानें शेजारचें प्रांत राजाच्या अमलाखालीं आणले. राजाराणी त्यांची मुखप्रेक्षी झालीं.

## प्रजेचा वित्तसंचय ओळखण्याचें साधन

उत्पलक्षेमानें एक पादाग्र नांवाचें कर्मस्थान होतें तेथें सोन्याचा वर्ण (कस) व मूल्य लेखावयाचा मुद्रित करावयाचा हक्क त्यानें प्रजेजवळ धनाचा संचय किती आहे तें कळून येत असे. तो या ज्ञानी मनुष्यानें बंद केला. कारण यापासून राजे लोक वित्तसंचय करणाऱ्याला त्रास देतील.

हलधराचा राणीशीं असलेला निकट संबंध आता दुष्प्रवादाचें स्थान झाला, तनयाच्या शाश्वत व मूढ प्रेमामुळें पत्नीच्या प्रेरणेनें हा मत्रशून्य राजा राज्यपरित्याग करून पुत्राला (कलशाला) राजा करण्यास तयार झाला. हलधर व परिक्षत्ता (खासगीकडील मंत्री) रणादित्य इत्यादिकीं या कृत्याचे दोष दाखवून दिले.

## अनंत देवाचा राज्यपरित्याग. व युवराजपदाचें विडम्बन

लौ. ४१३९ इ. स. १०६३ च्या बाहुलांत (कार्तिकात) शुक्लषष्ठीला राजानें कलशाला राज्याभिषेक करविला. आस्थान मण्डपात नव्या राजाला सिंहासनावर बसवून त्याच्यापुढें राजपुत्रांना व सामन्तांना मुजरा करण्यास नांवें घेऊन आणतांना, मानापमान सम्भाळण्यात निष्ठुर अशा रणादित्यानें राजमहात्म्य मनात आणून अनंतदेवाच्या मानेवर हात ठेवून, नव्या राजाला (कलशाला) म्हटलें, "महाराज, हे राजपुत्र अनंत देव आहेत. याकडे नजर द्यावी." राग येऊन अनन्त देवानें मागें वळून पाहिलें. तेव्हां रणादित्य हसून स्पष्टपणें म्हणाला "आपण
राजपरित्याग केल्यावर आपल्याला याहून निराळें पद काय मिळणार?" या हृदयंगम भाषणानें राजा प्रतिवाक्य करावयास अक्षम झाला.

हलधर राजाला म्हणाला, "आपल्या सुखाकडे पाहून मुलावर राज्याचा भार टाकून त्याला निःसुख करून म्हातारपणीं आपल्याला लाज नाहीं का वाटत? आपल्या मुलाला यौवनाचे भोग भोगावयास मोकळें ठेऊं नये का?

अनंत देवानें पुन्हां अधिकार धारण केले.

## सासुरवासाचा मासला

उचित वेष व अलंकार यांविषयीं सुनाचा उत्कर्ष या रूक्षोचित राणीला सहन झाला नाहीं पुत्राच्या महिषींकडून दासींना योग्य अशीं गृहलेपन दी (सारवण वगैरे) कृत्यें करून घेतलीं तरी त्यांनीं वैमुख्य दाखविलें नाहीं

## अशुचिमनाचा लोहरचा राजपुत्र

पुढें लोहरचा राजा क्षितिराज यानें येऊन अनन्त देवाला भेटून सांगितलें "माझा पुत्र भुवनराज राज्यलोभानें माझ्या अंगावर धावून आला. या अशुचि मनाच्या माणसानें कुत्र्यांना जानवीं घालून मला पूज्य अशा भागवतांचीं नावें दिलीं," असें म्हणून कलश राजपुत्र व लेखाराणी यांच्या दुसऱ्या मुलाला (उत्कर्षाला) क्षितिराजानं आपलें राज्य दिलें व चक्रधर तीर्थाला जाऊन सायुज्यता प्राप्त करून घेतली.

जिन्दुराज कम्पनाधिपतीनें राजपुरी इत्यादींच्या राजाकडून करभार घेतला. शोभ नांवाच्या उद्वेगकारक डामराला ठार केलें.

हलधर म्हणाला हा जिन्दुराज पराकोटीला पावला आहे. त्याविषयीं शंका घेत रहा. हा तुमच्यात व तुमच्या पुत्रांत भेद पाडील व जयानन्द होईल (जय झाला म्हणून आनन्द मानील.) जिन्दुराजाला राजानें बद्ध केलें.

कलश असाधु वृत्तीचा झाला. प्रमदकण्ठ म्हणून गम्या-गम्य विचारांचा परित्याग राजाचा उपदेशक झाला.

## बिडालभट्ट वणिज

तांत्रिक समयात चतुर, प्रत्यक्ष भैरवाची गणना न करणारा असा हा एक वणिज होता. काळें मांजर पाळल्यावरून याला बिडालभट्ट हें नाव मिळालें. याच्यापुढें विनत झाले. त्याच्या डोक्यावर हस्त ठेऊन हा स्वस्थ करी. हा द्रव्य अमूर्त होता. आपण मूर्ख आहों असा बहाणा करी. शिल्पी, रजक वगैरेंचा गुरू होऊन हा श्रेष्ठी बिडालाची विष्टा व हिंग याच्या वासानें उत्कट झालेले आपले कर पण्डितांच्या शिरावर ठेऊन तो आपणांस अनुलंघ्य करी. यानें कलशाला आन्ध्र

## चमक विट

कुण्टणगिरी करणारा हा अमंगलावह विट राजाला प्रिय झाला. हलधराच्या पुत्रानें याचें नाक कापलें. हा वेणुवाद्य कुशल होता. रात्रीं जागणाऱ्या व पुष्कळ भोजन करणाऱ्या, व ज्यांच्या घशाला नित्य अजीर्णाच्या ढेकरांनीं, दुर्गंधि सुटलेली असे, अशा गाणें बजावणें करणाऱ्या मण्डळीचा हा सेवक असे. या मण्डळींचीं तोंडें म्हणजे मोऱ्या होत्या. त्यांतून प्यायलेलें मद्य शौचाला घेतलेल्या पाण्याप्रमाणें एकदम घसरून पोटांत जात असे. या नकुक्कुराला ठक्कुर ही पदवी मिळाली. म्हणून त्यानीं आपल्या वंशाशीं संबंध तोडला. वंशभंगापूर्वी नासिका भंग पावली याचा याला अभिमान वाटला. चमक निर्लज्ज होऊन जें जें करी तें तें अवाच्य असलें तरी मध्य पाताप्रमाणें (प्रासंगिक वाक्याप्रमाणें) त्याचें दिग्दर्शन केलें पाहिजे. यानें राजाची वहीण कल्ला व तिची मुलगी नागा, यांना भ्रष्ट केलें हें कळतां राजा व राणी यानीं मनोव्यथा व राग झाकून ठेवली.

## मुठींत धरलेलें सांगणारा ग्रामजोशी

लोष्ठक नावाचा हा धान्य मुष्ठीचा भिक्षुक होता. ग्रामक्षेत्रपालाच्या प्रसादानें मुष्टिबद्ध वस्तूचें ज्ञान झाल्यामुळें याला मुष्टिलोष्ठक हें नांव पडलें. गुरूपणा, कुण्टणगिरी, दैवज्ञता इत्यादि गुणानीं राजाचें प्रेम याचेवर बसलें.

## व्योमशिव जटी

भट्टारक नांवाच्या मठाचा अधिपति, एक जटी साधु होता. खुर्खुर ही पदवी मिळावी म्हणून यानें एक व्रत धरलें होतें. पूजापाठासाठीं यानें एक परिग्रह (ज्याचा कोणी नाहीं असा) गवई ठेवला होता. तो राजाला प्रिय झाला.

असल्या वं दुवर्त्य विटाच्या चाटुकारानीं कलषाचें मन कलुषित झालें. तो दोषांना गुण मानूं लागला. शाही राजवंशांतील बिज्जू पित्यराज, पाज व आणखी एक व गजपति नाग याचा पुत्र जयानंद हे त्याचे स्नेही झाले.

## विषयी कलषाचें रात्रीचें साहस

कलशाला परवधू प्रिय वाटूं लागली. जिन्दुराजाच्या सुनेच्या संकेताप्रमाणें पांच सहा नीच मनुष्यासह तो रात्रीं गेला. कुत्रे भोंकूं लागलें. चोरांच्या शंकेनें शस्त्र घेऊन चाण्डाल पहारेकरी धावले. कलश घाबरून पडला. वर पडून त्याचें रक्षण अनुयायी जनांनीं हा राजपुत्र आहे असें कळवून केलें. नासिकारहित चमकाचा पुरस्कार करून आलों. तो मला अमंगल शकुन झाला. असें समजून कलश स्वस्थ राहिला.

## मानवन्तांची स्वामीनिष्ठा

पितरांना ही वार्ता कळली. विद्येच्या निधीला, वडील नातवाला, हर्षाला त्यानीं राजा करण्याचें मनांत आणलें व त्याला जवळ आणविलें. पितरानीं कलशाला बोलावलें तो भीत भीत जयानंदाचा हात धरून, बिज्ज पाठीमागून येत असतां पितरांना भेटला पित्यानें तोंडांत मारली. बिज्ज शस्त्राला हात घालीत रागानें म्हणाला. महाराज, आपण मानवताचे धुरीण असतां, मी राजपुत्राकडून वेतन घेणारा हातांत शस्त्र धरून असतां, माझ्या जीवांत जीव आहे तो मी त्याला कसा सोडूं? आपण पिते! हा पुत्र! तेव्हां क्षणभर नें मी जवळ नसेन त्या वेळीं जें योग्य तें करावें." अशा स्निग्ध व कर्कश वचानें राजाला मोह पाडून कलशाला बिज्ज घेऊन गेला. त्याच्या अतिमानुष धैर्याची पूजा धीर जनानीं केली.

राजा रागानें विजयक्षेत्रास सपत्नीक गेला. विशाविष्टादी द्विज म्हणाले तूं कोश मागें ठेवूं नकोस कोशहीन नष्टधार तरवार व कोशहीन आणि नष्टाधिकार राजा याला विचारतो कोण प्रासादवर्जून सर्वसंपदा घेऊन राजा निघाला अयःशङ्कु (खिळे) सुद्धां शेष ठेवले नाहींत.

विजयक्षेत्रात परिवारासह स्वर्गसुखाचा अनुभव घेऊं लागला. पण कलशानें अम्बराधिकारी (कापडनवीस) कम्पना धिरती वगैरे अधिकारी नेमून, पित्याशीं युद्ध करावयाचें ठरविलें. मी आहे तों सरळ मनाच्या राजापासून भीति नाहीं असें सांगून पुत्रवत्सल राणीनें थांबविलें. तरी पितापुत्राचीं मतें कलुषित होत.

> वैरस्वरूपमेतद्धि भेदं यातिमुहुर्मुहुः ॥
> सन्धीयमानमपियत् क्लिन्नमम्बरमिवाशयम् ॥३॥

वैराचें रूपच असें आहे कीं संधि केला तरी मन पुन्हा पुन्हा फाटतें. लड्डा नांवाची एक कोळीण बन्धकी होती. धक्क म्हणून एक डकल्या डामर तिचा वल्लभ होता. तो तिच्या बुद्धीनें चालत असे कलशाचे लोक त्यांचीं नांवें पितरांना देत व दुष्टात्मा कलश हसे. राजानें तुल्य पुरुष दान केलें.

मत्सरानें विजयेश्वराच्या देवळाला आग लावून कलशानें तें भस्मसात केलें. सौधावरून हें पाहून कलश नाचूं लागला. Nero fiddleed while Rome was burning इकडे रोम जळत असतां तिकडे नीरो वाद्य वाजवत होता ही गोष्ट इटलीच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. राणीला दुसरे दिवशीं अदग्ध रत्नलिंग सांपडलें तें तिनें तद्देशीय व्यापाऱ्याला विकलें. भोजनसामग्री व वस्त्रें विक्रीच्या पैशानें प्रजेला दिलीं व जळलेलीं घरें बांधवलीं. बोरूच्या छत्राकार पटलानीं आच्छादलेल्या नगरांत राजा राहूं लागला.

पिता पराभूत न झाल्यामुळें पुत्र त्याला वारंवार दुःसंदेश पाठवी. राणी प्रेरक आहे असें समजून राजा तिला म्हणाला, राणी सांगेल तेंच करण्यानें, अभिमान, राज्य, मति, इत्यादी पैकीं मी कोणतें वैर हरवून बसलों नाहीं! नारी हें पुरुषाचें

खेळणें आहे असें म्हणतात. पण परिणामीं पुरुषच नारीचें खेळणें होतात. जीर्ण पति काय कामाचे! शेवटीं पुत्रच वेतन देतील, म्हणून स्त्रिया पुत्राना पोषतात व भर्त्यांना शोषतात. पित्याशीं अस्निग्ध असलेला पुत्र अन्याचा समजावा. दुग्ध-न्याच्या कुलांत उत्पन्न झालेल्याला या मुलाला राणीनें घरात प्रविष्ट केला हा मार्गे ऐकलेला प्रवाह खरा ठरतो.

## गुप्तगोपनाचा स्फोट राजानें केल्यावर राणीचा जाबसाल

पुत्रोत्पत्तीचें गूढ प्रकाशित झालें. कलश हा प्रशस्त नावाच्या मन्त्राचा मुलगा होता त्याला राजाचें पहिलें अपत्य मृत झालें तेव्हा राणीनें घेतला अशी जनश्रुति होती. भर्त्यांना जिंकणाऱ्या स्त्रिया भर्त्यांचें उत्सिक्त भाषण म्हणजे शिरावर लत्ता प्रहारच समजतात. राणीनें राजानें प्राकृत प्रनदेप्रमाणें प्रतिरस्कार पुरुष (सवयीनें आलेल्या धीट पणामुळें) कठोर भाषण केलें. राणी म्हणाली "या गतश्री वृद्धावृद्ध झालेल्या मंद बुद्धाला काय बोलावें तें समजत नाहीं. जीं जीं काहीं दूषणें तू मला दिलींस तीं तीं तुझ्या कुळातील स्त्रियास लावावयाला उचित आहेत. पुत्रानें देशातून घालविलेला, व आतां पत्नीनें टाकलेला असा परिवाद तुझ्या विषयीं लोक करतील अशी भीति वाटते."

या उपालम्भानें राजा कुपित झाला. त्यानें गुदद्वारात अग्निप्रविष्ट करून घेतली. रक्तातिसार झाला. अशी वार्ता राजाश्रेनें राजभट्ट यानीं प्रसृत केली. लौ. ४१५७ इ. स. १०-१ या वर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेला राजा त्याच्या एकसष्टाव्या वर्षी विजयेश्वराच्या पुढें जीविताला मुकला. सुखोचित राजा पत्नीच्या व पुत्राच्या जाचातून सुटला. हा कुमार्गावर रागावला नाहीं, यावर कोणी रागावला नाहीं. चुकोपायो न कर्हिचित् चुकोप्यस्मैन कश्चन ॥ ४९४ ॥

## अनन्तदेवाच्या राणीचें अनुगमन

राणीनें स्वत्याकडून नातवाच्या हर्षाच्या क्षेमाकरता कोश-पानपूर्वक शपथ घववली. नातवानें रडत तिच्या पायांवर शिर ठेवलें, तिनें तें हुगलें. व सांगितलें पित्यावर विश्वास ठेऊ नको. मर्त्यांचें शेवटलें मण्डन झालें. पत्नीला शिबिकारूढ तिनें करवलें. राजानीं शिबिकेला खांदे दिले. विजयेश्वराला प्रणाम करून युग्मारूढ राणी बाहेर पडली. तूर्यवाद्यांच्या कल्लोलांत लोकांचें आक्रंदन मिश्र होऊन दिशा मग्न झाल्या. दिन अस्तास जाणाऱ्या सुमारास राणी चितृ काननात पोचली. अहो कलश आला का? असें तिनें पुत्राच्या दर्शनाला उत्सुक होऊन नगराकडून आलेल्या लोकास पहिल्यानें विचारलें. द्वेष करणाऱ्यानीं ती ती बिभीषिका घालून त्याला निषिद्ध केलें. तिची निराशा झाली. वितस्तेच्या जलाची प्रार्थना करून तिनें एक श्लोक म्हटला.

वैतस्तेन तुतोयेन जठरस्थेन ये मृताः।
मोक्ष गच्छन्त्य सदेह ते यथा ब्रह्मवादिनः ॥ ४७३ ॥

वितस्तेचें जल जठरस्थ करून जे मृत होतात, ते ब्रह्म-वाद्यप्रमाणें निःसंशय मोक्षाप्रत जातात. तिनें वितस्तेचें जल प्राशन केलें. स्नेहाचा संशय करणाऱ्या लोकाना तिने असा शाप दिला कीं, ज्यानें आमचें दोघाचें पुत्राशीं वैर उत्पन्न केलें त्याचा वान्वय परिमित दिवसानीं क्षय होवो! तिची हलधराशीं सबंध होता असा जो प्रवाद होता त्याचें शमन करण्यात परलोकाचा पण लावून त्या सतीनें शपथ घेतली. अशा प्रकारें आपल्या विशुद्ध शीलाचें प्रकाशन करून पावित्र्य दर्शक हास्य करून प्रज्वलित अग्नीमध्यें उडी घेतली. अग्नीच्या ज्वालेनें नभ शोभित झालें. असें वाटलें कीं देवानीं तिच्या आगमनाप्रीत्यर्थ नभाला शेंदरी रंग फासला. लोकांच्या आक्रन्दानें चितेचा चटाचट शब्द ऐकू आला नाहीं. सर्व लोक शोकानें तप्त झाल्यामुळें, चिताग्नि उष्ण वाटला नाहीं. तो अग्निरथावर आलिखित असा दिसला. काहीं दास व दासींनीं अनुगमन केलें. प्राणिमात्र निसर्गानें भंगुर असल्यामुळें, टिकत नाहींत. पण माणसाच्या मनांत व कांचेच्या मढात, जो एक दीर्घकाल टिकणारा गुण असतो तो हा कीं त्याच्यांत साठवलेली चमत्कृतिजनक कथा, व गीर्वाण सगोदक हीं गळून जात नाहींत.

चवथ्या दिवशीं राजा व राणी यांच्या अस्थी घेऊन तरंगाचे मुलगे गंगेला गेले.

## (४) कलश

वेतन घ्यावयाचें मान्य करून कलशानें हर्षाशीं (पित्याशीं) सधि केला.

## निधि-निक्षेप

सैल्यपुरांत एका कुटुम्बाच्या जय्य नावाच्या बुद्धिमान मुलानें व्यापारात द्रव्य संग्रह केलें. याची स्थूलोपत्ति (स्थावर उत्पन्न) पुष्कळ होती. तो डामराच्या पदवीला पोंचला. त्यानें आपली दीड कोश जमीन खणून काढली व ती दिनाराच्या न्याशानें भरून वर साळींचें बी पेरले. व बभ्रा होईल म्हणून भूर्गांत मारून टाकलें. तो पुढें हा निधि ताब्यांत घ्यावयास जात असता शेतात एका अज्ञात सैनिकाकडून मारला गेला. ही सर्व संपदा कलशाला मिळाली.

---

टीपः—हें सतीचें वर्णन फार बहारीचें आहे. चितेच्या ज्वालानीं नभशोभित झालें व असें वाटलें कीं स्त्रियांच्या आगमनार्थ देवांनीं नभाला शेंदरी रंग फासला ही उत्प्रेक्षा उत्तम आहे. ती फार पावित्र्यदर्शक आहे.

अनिज प्रमाणें नगर। करणाऱ्या या राजानें उत्पन्न उपस्थित खर्च, व मासिक खर्च यांची गणना करतांना सुवर्णपत्र व खड्डू हीं दूर केलीं नाहींत. हेरांच्या मार्फत याला सर्व प्रजेचें वृत्त कळत असे. काय कळत नसे तो प्रजेचें फक्त स्वप्न वृत्तान्तच होता. मन्त्र्यांना भरून यावयाला पडेल अशा प्रकारें यांचा अर्थ नष्ट होत नसे. कटकाचा शोध करून त्यांना न्यायानें शासन करी.

तरी दुष्ट उपदेशकारखून त्याना वाईट नाद लागलेला होताच. कुली नांवाचा एक टक्क नावदेशसंभूत अशा तुरुष्कांपासून विकत अथवा हरण केलेल्या स्त्रिया याला आणून देत असे. शिवाय रूपलोभानें आणलेल्या परदारांनीं याच्या अन्तःपुरातील स्त्रियांची संख्या ३६० झाली. मत्स्य-यूषादी वृष्य पदार्थ हा पुष्टि येण्याकरता सेवन करी.

अशीं शकल कृत्यें करताना त्यानें विजयेश्वराचें दग्ध झालेलें मंदिर बांधलें. तसेंच कलशेश्वराचें बांधलें. त्यांत सुवर्णाच्या असंख्य घटांचे पटल बांधलें. विजयेश्वरावर सुवर्णाचें छत्र बांधावयाचें त्यानें मनांत आणलें. तेव्हां तुर्क देशांतील एक शिल्पी आला. त्याला तांब्यावर सुवर्णलेप करण्याची विद्या विदित होती. नोनक मन्त्र्यानें त्याला प्रश्न विचारून ती कला अवगत केली.

सती सूर्यमतीच्या शापाची अव्यभिचारिता सिद्ध करण्याकरता जयानन्द व जिन्दुराज लवकर मृत्यु पावले. बिज साथींत मेला पाजकाला वाघानें खाल्लें. लौ. ४१६३ इ. स. १०८७–८ वर्षी एकाच वेळीं या राजाच्या नगरींत (१) नध्यपुराचा कीर्ति-(२) चम्पाचा आसट (३) वल्लापुरच्या तुक्काचा पुत्र कलश, (४) राजपुरीचा संग्रामपाल, (५) लोहराचा उत्कर्ष, (६) उर्शा येथील राजा सुगज (७) कान्दला राजा गम्भीरसिंह. (८) काष्ठवाटचा राजा उत्तमसिंह असे आठ राजे उपस्थित होते. व्यवहारज्ञ राजानें नोनक मन्त्र्याची व्यवस्था उत्तम ठेवली.

राजाचा मन्त्री मल्ल यानें एका चोराला ताडण केल्यामुळें तो चोर मरण पावला. म्हणून तो कृपाकुल व विषण्ण होवून जान्हवीला गेला.

नंतर निरंतर ( मध्यें अंतर नसलेल्या ) महागृहांचें असें नगर वसविण्यास राजा प्रवृत्त झाला.

## गायकाचा श्रोत्यानें केलेला मनोभंग

इकडे हर्ष आपल्या गुणांनीं प्रकाशित झाला. याला सर्व देशांतील भाषा येत होत्या. हा कवी होता. विद्यानिधि होता. हा गुणिजनांना वेतन देई. पित्यानें दिलेलें वेतन पुरें पडत नसे. याला एक दिवसआड भोजन देखील लाभे. गाणें म्हणून हर्ष पित्याचें रंजन करी. व त्यानें दिलेल्या पारितोषिकांनीं भर्तृत्यांचें भरण करी. पित्याकडे हा एक दिवस गात होता. सर्व सभा मुदित झाले. पण कलश उठून शौचास गेला. या प्रसंगभंगानें या बुद्धिमानाचा तेजोभंग झाला. हा कोपानें व वैलक्ष्यानें भूमीकडे पाहूं लागला.

प्रभुर्गीतक्षान्तिः सुहृदतिशठः स्त्री परुषवाक् ।
सुतो गर्वोन्नद्धः परिजन उदात्त प्रतिवच ॥
इयान् सोढुं शक्यो ननु हृदयदाही परिकरः ।
ननु श्रोतावज्ञालुलितनयनानां परिभवः ॥ ६४६ ॥

शान्तिरहित प्रभु, अतिशठ मित्र, कठोर वाचा बोलणारी स्त्री, गर्विष्ठ पुत्र, उलटे प्रत्युत्तर देणारे भृत्य, इतका सारा हृदयाचा दाह करणारा परिकर सुद्धा सोसता येईल. पण अवज्ञेनें चंचल नयन फिरवणारा प्रत्यक्ष परिभव तिरस्कारच असा श्रोता, सहन होणें शक्य नाहीं.

तेव्हां पित्याचाच भृत्य विद्याविद्ध हर्षाला हसत म्हणाला, "पित्याला ( कलशाला ) मार, व राज्य कर, हर्षानें अभिषेक केला. जवळच तन्वंगपुत्र धम्मट होता. तो म्हणाला. "हा काहीं असाप्रत बोलला नाहीं."

हर्षानें पित्याला मारण्याच्या कामीं तीक्ष्ण पुरुषाची योजना केली. राजा मारेकऱ्यांना गोचर होई, पण स्नेहळपणानें त्याना हर्षाला मारू देईना. तेव्हां या गोष्टीचा प्रतिभेद होईल, या भीतीनें विद्याविद्धानें ही गोष्ट राजाला निवेदन केली. त्याला धकादी तन्वंगाचे काहीं पुत्र भेटले. त्यांना राजानें सांगितलें की धम्मटाला धरून आणा तेव्हां तन्वंगाचे पुत्र म्हणाले "या कृत्याची आम्हांला माहिती नाहीं. तुझ्या प्रसादबलानें आम्हीं परित्राणदीक्षित होऊन विपन्नांचें रक्षण करण्याकरता आमचें दार नेहमीं उघडें ठेवतो. प्राणनाश होण्याच्या वेळीं आमचा बंधु निर्दोष असो वा सदोष असो, त्याला कसा सोडून देऊं? त्याचें रक्षण केल्यास आम्हांला स्वामिद्रोहाचें पातक लागेल. देशत्याग वर्जून आम्हांला दुसरा उपाय नाहीं" त्यांनी धम्मटाला मध्यें घेऊन देशत्याग केला.

मग हर्षाला आणवून पिता कलश त्याचें सान्त्वन करीत म्हणाला "सर्वत्र प्रख्यात अशा पित्यावरून पुत्राची ओळख होते, आपली स्थिति उलट आहे. दिशांचा दीप म्हणून जो तू माझा मुलगा प्रसिद्ध आहेस त्यावरून मला तुझा पित्याला जन ओळखतात. तू गुणवन्तांचा अग्रणी असून असाधु लोकांनी सेव्य अशा मार्गाचें अवलंबन करीत आहेस. खलांनीं तुझ्याविषयीं सांगितलें तें संभवत नाहीं. तेव्हां यथार्थ कथन करून तू अपराधाचें निराकरण करावें." हर्षानें मला कळविलें कीं मला दुर्मन्त्र्याच्या सांगण्यावरून प्रेरणा झाली. याला पकडावा अशी राजानें आज्ञा केली याला नाहींसा करा असें नोनक मन्त्र्यानें सुचविलें.

तों मोरेकऱ्यांनीं हालचाल केली. त्यांची वाट राजपुत्रांनीं लावली व हर्षाला बंधनांत टाकलें. हर्षाचा सेवक प्रयाग,चक्रिकेच्या कामाला असमर्थ असे जाणून त्याला हर्षाबरोबर राहूं दिलें. हर्षाला नाहींसा करावा असें नोनक मंत्र्यानें सुचविलें. साम्राज्याची मर्जी सभाळण्याकरतां हर्षाच्या एका स्त्रीनें विष कालवलेलें अन्न एकदा एका आचाऱ्याकडून हर्षाला पोचतें केलें. हें गुप्त दुष्टत्व आचाऱ्याकडून कळलें. तें त्यानें कुत्र्याकडून खाववलें. कुत्र्याचा जीव गेला. पुढें प्रयागानें दिलेल्या अन्नाशिवाय हर्ष कांहीं खात नाहींसा झाला.

राजामध्यें सदाचार विपर्यय झाला. त्यानें ताम्रस्वामीची (रवीची) प्रतिमा फोडली.

राजाला क्षय झाला. कुंभ प्रतिष्ठा करीत असतां कुम्भात त्याच्या नासिकेंतून रक्त गळालें. अपशकुन झाला. राजा शय्याप्रणयिता झाला. ताम्रस्वामींचा कोप झाला म्हणून हा शैवसांप्रदायी अपवर्ग देणाऱ्या विजयेश्वराला सोडून ताम्रस्वामीला शरण गेला. सर्व जग तृणासारखें मानणारा, नियोगी (अधिकारी) अंतिप्रसंग आला म्हणजे गृहदासीला नमन करतो. त्याच्या मनांत हर्षाला भेटावयाचें होतें. सेवकांनीं आज्ञा ऐकली नाहीं.

प्राणप्रयाणसमये परिसंकुचती ।
स्वप्नप्रसंग इव धावनशक्तिराज्ञा ॥

प्राणावसानसमयीं केलेली आज्ञा स्वप्नप्रसंगीं जशी धावण्याची शक्ति तशी संकोच पावते. हर्षाविषयीं व प्रजेविषयीं कांहीं शिक्षा (व्यवस्था) सांगत असतां त्याची जीभ जड पडली. त्याचा मानस झांकण्याकरता नोनकानें त्याच्या पुढें आरसा धरला. राजानें दातओठ चावले व आरसा ढकलला. लौ. ४१६५ इ. स. १०८९ या वर्षी मार्गशीर्ष शुद्ध दशमीला तो निधनाला पोंचला. सात राण्या व एक अवरुद्धिका यांनी अनुगमन केलें. कय्या नांवाच्या एका प्रसादवित्त राणीनें ती उच्च कुळातील असून एका नियोग्याचें अवरुद्धात्व पत्करिलें. भूपालयोग्य वपु ग्रामभोग्य केलें. वामनानें राजाची अन्त्येष्टी नेली. कलशाच्या मनातून वडील मुलाला (हर्षाला) राजा करावयचें होतें. पण मन्त्र्यांनीं तसें करू दिलें नाहीं. कलशानें लोहराकडून दुसरा मुलगा जो उत्कर्ष त्याला आणवून त्याला राज्य दिलें.

### उत्कर्ष

हर्ष स्नान करीत असता उत्कर्षाच्या अभिषेकाच्या तूर्यध्वनि ऐकू आला. तो त्या शकुनशास्त्रज्ञाला शुभशकुन वाटला. आपल्याला राज्यप्राप्ति होणार असें वाटलें. विश्वास येण्याकरतां ताटंकें (दागिना) देऊन हर्षानें प्रयागाबरोबर विजयमल्लाला (राजा कलश व राणी पद्मश्री यांच्या मुलाला—आपल्या सावत्र भावाला) असा निरोप पाठविला कीं तू आमचा बंधु असतां आम्हीं बंधनात आहों. विजयमल्ल विचार करतों म्हणाला. परंतु वैमनस्य घालविण्याकरतां विजयमल्लाला नेमणूक देण्याचें कबूल केलें.

कंदर्पावर राज्य टाकून राजा त्याला राज्य कसें करता विचारीत नसे. त्याचें नित्यकृत्य म्हणजे कोशाची तपासणी असे. निर्व्यय काम आलें कीं तें करी. सव्यय आलें कीं विचार करीत नसे. सापत्न मातांना मुद्गाल देई. श्रोत्रियाप्रमाणें कलुष असा राजा अप्रिय झाला.

### हर्षाचा बंध, मोक्ष व दोन आंगठ्या

नेमलेलें वेतन मिळेना म्हणून विजयमल्लानें बंड केलें. हर्षाला मारला म्हणजे बंड मोडेल, असें नोनक मन्त्र्यानें सुचविलें. उत्कर्षानें मारेकरी सज्ज केले, व त्यांना दोन आंगठ्या दाखवून म्हणाला, तुम्हीं तूर्त हर्षाची राखण करीत बसा. मी ही आंगठी धाडीन तेव्हां त्याला मारा. व ही धाडीन तेव्हां सोडा. हर्षाला जिवंत ठेवला तर त्याचा उपयोग करून घेता येईल असें त्याला वाटत होतें.

मारेकरी हर्षाकडे गेले. त्यानें प्रत्येकाला जवळ बसवून घेतलें, त्यांचीं शस्त्रें हातांतून व मारण्याची इच्छा मनांतून गळाली. वाणी कामधेनूप्रमाणें कोणत्या अनर्थाचें अपहरण करीत नाहीं !

असेभिय सृजति कीर्तिं मघ लुनीते ।
मित्रत्वमानयति हन्त विरोधिनोऽपि ॥
यात्यध्वभिः प्रतिपदं सुमनोऽनुकूलैः ।
गौः कामधुक भिववाऽपहरत्यनर्थम् ॥ ७८९ ॥
कामान् दुग्धे विप्रकर्षत्यलक्ष्मीम् ।
कीर्तिं सूते दुष्कृत या हिनस्ति ॥
तांचाप्येतां मातर मंगलानां ।
धेनुधीराः सूनृतवाच माहुः ॥ १ ॥

(या श्लोकाचा अनुवाद हा ७८९ श्लोक आहे.)

हर्ष त्यांना म्हणाला, "असें लाजून का उभे राहातां ! स्वामीच्या आज्ञेप्रमाणें वागणारे सेवक, सर्वथा निर्दोष असतात. क्षणोक्षणीं अवस्थांचें स्थित्यंतर होत गेलेलें अद्‌भुत बघावयाला मिळेल. जरा विलंब करा. आकाशांत लहान लहान अभ्रें भ्रम पावतात. द्वीप (बेट); द्वीपी, वाघ; उरग, (उंट); तुरग, (अश्व) इत्यादींचा भ्रम उत्पन्न करतात. सौम्य व क्रूर अशा क्रमानें ज्या माणसांना विकृती होतात, त्यांच्या हृदयांत क्षणोक्षणीं विकाराच्या ऊर्मी उठतात. क्षण जसा येईल तशी वृत्ति ठेऊन मी जसा येथें बसलों आहे तसे कार्यांतरावर दृष्टि देऊन

येथें आपणहि रहावें. ज्याना राज्यप्राप्ति जवळ आली आहे त्यावर असले प्राणसंशय उत्पन्न करणारे प्रसंग येतात. वा रत्नान्तर उत्पन्न करतात. वृष्टिकाल जवळ आला कीं ग्रीष्माचा उष्मा घन होतो. प्रभात जवळ आली कीं रात्रीचें तिमिर, गाढ होतें. त्या प्रमाणें पुष्कळ संपत्तीच्या लोटांबरोबर मनुष्याला विभव प्राप्त व्हावयाचें असेल. तेव्हा पुष्कळ उपद्रवाच्या उद्रेकानंतर, नष्ट होणारी विपद् बाहेर पडते. श्वासोच्छ्वास होत आहे. आपण जीवन्त आहोंत हा शुभ शकुन समजून हर्षानें शुभोदर्क (ज्याचा शेवट चांगला आहे असा) सज्जनांच्या गोष्टी आपल्या परिस्थितीला लागू अशा त्याना सांगितल्या, व कालक्षेप करण्याकरितां रसोत्पत्ति होईल अशा रीतीनें मुख्य मुख्य मुद्यांचें स्पष्टीकरण करून, हरिश्चंद्राची उपकथा सांगितली.

टीपः—हीच हुबेहुब कल्पना त्याच शब्दांत शेक्सपिअरने ॲंटनी व क्लिओपेट्रा या नाटकांत मांडली आहे. पहा अंक ४ प्रवेश १४ वा

ॲंन्टनी म्हणतो "अरे! इराज! कधीं आपण राक्षसाच्या आकृतीशीं, कधीं कांहीसा झुलणारा ढग; कधीं बोकेसारखा कोट, अस्वलासारखा अथवा सिंहासारखा, कधीं अभिमुख असा किल्ला; लम्बायमान खडक; दोन शृंगाचा डोंगर; वर वृक्ष असलेलें, जगात झुलक्या देत रहाणारें, दिमाखानें आम्हाला वेडावणारें, असें भूशीर हि आपण आकाशांत पहातो! अशा खुणा तूं आकाशात पाहिल्या आहेस ते काळोख्या रात्रीं दाखविले जाणारे चित्रपट आहेत.

असें हर्ष इकडे त्याचें रंजन करीत असता, तिकडे हर्षाला सोडावें अथवा मारावें असे अनेक वेळा उत्कर्षानें मनांत आणलें. शेवटीं दूताजवळ वधादेश देऊन त्याच्या खुणेची आंगठी द्यावयास तो विसरला. रक्षिजनांनीं तोंडी उक्ति मानली नाहीं. तें वृत्त वधादेश देणाऱ्या दूतानें परत येऊन उत्कर्षाला कळविलें. उत्कर्षानें दुसरा दूत पाठविला; पण दैवानें मोह पाडून आंगठ्याची अदलाबदल झाली. पहारेकरी पहातात तों दूताचे हातांत बंधमुक्त करण्याची आंगठी होती. त्यांनीं नाचत जाऊन हर्षाच्या पायावर डोकीं ठेवलीं व हर्षाला बाहेर पडण्याची विनंति केली. हर्षाला खरें वाटेना. तो थुक बसला. तेथेंच उभा राहिला.

हर्ष मारला जाणार म्हणून विजय रागानें निघाला. कौरव नगरात फिरून राजवाडा जाळावयास निघाला. तोच त्याला हर्ष येऊन भेटला. दोघांच्या नाना कथा झाल्या हर्ष सिंहासनावर बसला.

आतां पुढें काय करावें असा प्रश्न उत्कर्षानें मंत्र्यांस विचारला असतां, नोनक मंत्री दुसरे बोलत असतां त्यांना थांबवून रूक्षपणें म्हणाला "महाराज, सकाळीं मन्त्र सांगितला तो एकला नाहीं. मरणाशिवाय दुसरा इलाज नाहीं" सहजा राणीच्या मंदिरांत जाऊन पटच्छेद करणारी कात्री मानेवर टाकून प्राणहर नाड्या कापल्या. रक्तस्रावानें त्याचा प्राण गेला.

प्रियाच्या रक्तरूपी गैरिकानें सहजेनें दाट अंगराग केला व अग्निप्रवेश करून प्रेमाच्या सोन्याला उजळा दिला सहजेनें औचित्य दाखविलें. हिनें भर्तृप्रसादाला पात्र झालेल्या स्त्रियांचें शिर उंच राहिलें.

टीपः—प्रेमाच्या सोन्याला उजळा दिला. या शब्दांत संपणाऱ्या वाक्यातील परंपरित रूपकानें उजळा दिलेल्या सोन्याप्रमाणेंच उजळ आहे. सतीच्या पातिव्रत्यानें शोभणारें आहे.

## (६) हर्ष

हर्षानें उत्कर्षाचे मन्त्री, नोनक, भट्टारक प्रशस्तकलश इत्यादिकाना बन्धनात टाकलें.

## हर्षाच्या चर्चाकथेचें वर्णन

पुष्कळ राजे असल्या कथाप्रसंगांत येऊन गेले. आतां प्रतीतीला विषम (बुद्धीला अगम्य.) असा कष्टप्रद मार्ग लागला आहे. हर्षाची चर्चाकथा सर्व साहसाचें उदकाचें क्षेत्र, सर्व उल्हास नष्ट झाला असें सांगणारी दूती, सर्व व्यवस्थांची जननी; सर्व नीतीचा नाश करणारी, उद्रिक्त शासनाची स्फूर्ति, उद्रिक्त अभयाची क्षिति. उद्रिक्त त्यागसंपत्ति (उद्रिक्त औदार्यसंपत्ति) व उद्रिक्त हरणाकांक्षा होय. एका काळीं ती कारुण्योल्लेखांनीं सुभग, दुसरे काळीं हिंसोल्लेखांनें भयंकर, एकदां सत्कर्मांनें कलित व एकदा पापकर्मानें कलंकित अशी होय. ती स्पृहणीय व वर्ज्य; सर्वतः वंद्य व निंद्य अशी होय. ती जवळ बाळगण्याजोगी व दूर वाळवून लावण्यास लायक अशी उपहास्य; शहाण्यांनीं काम्य व शोच्य असें नामधारण करणारी, अशी ही अपकीर्तीमुळें स्मरणीय व मानसातून अगदीं त्याज्य अशी होय.

टीपः— वर हर्षाच्या गुणातील उद्रेक व विरोध हीं स्पष्ट करून कवीनें दाखविलीं आहेत. कल्हण हा बागीश खरा.

हर्ष हा तेजस्वी माणूसनीं केलेला होता. एरव्हीं हा मोठ्याना सुद्धा दुरपेक्ष कसा प्रकट असता?

* सिंहद्वारीं हर्षानें घंटा टांगविल्या. म्हणजे विज्ञप्ति करणारे कोण आहेत तें वाद्याच्या नादानें समजावें! पूर्वापार सरथांचा व्यतिक्रम न होऊं देण्याकरतां वडिलांच्या मन्त्र्यांना

हर्षानें अधिकार दिले * कदर्पाला द्वारगाधीश व मदनाला कम्पनाधीश नेमलें. प्रसादन कुल्शादिकांना बंधमुक्त केलें. अपराध ज्यानें केला त्याचा उपयोग करून घेतां यतो, उघानें घर जळून जातें, त्या अग्नीवरच घरचा स्वयंपाक करून घेता येतो, पण नोनकाला त्याच्या अपराधाचें स्मरण करून, शूळावर चढविण्यात आलें. विशाविठ्ठाचें नाक कापून त्याला त्याच्या कु व्या समूह शूळावर चढविण्यात आलें

* सतराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेलेल्या जहांगीर बादशहानें अशी न्यायशृंखळा टांगली होती. ती याचें अनुकरण असूं शकेल. कारण कल्हणानें आपला ग्रंथ ११४९ त संपविला आहे.

## स्त्रीपुरुषांचें राजमान्य वेषभूषा

जशी वनात वसंतानें फाल्गुनाची पद्धति असते तशी हर्षानें राजोचित पद्धति आपल्या मंडळात विशेष न ठेवता चालू केली. सुवर्ण शृंखलांनीं (कडींतोड्यांनी अलंकृत) असे मंत्री व प्रतीहारी राजवाड्यात कंपण करतांना आढळत. कांहीं अमात्य सुंदर पोषाखानें शोभायमान होऊन आले. राजानें दासींकरवीं त्याची आरती करविली पूर्वी राजाशिवाय सर्व देही केश मोकळे ठेवीत, शिराला उष्णीष घालीत नसत. किंवा कलापूर्ण आभरणें घालीत नसत. आतां या निःशंकर राजाच्या कालीं झुलणाऱ्या ताडपत्री पत्रांनीं, स्थूलचंदन तिलकांनीं, व खांद्यावर अंशा दीर्घ केश्यांनी लोक शोभत. स्त्रिया सुवर्ण कैतकीच्या पातीनें व फुलांच्या वर्णांनीं केश अलंकृत करीत. त्यांचीं सुरूपें कपालावरील तिलकांना शोभा देत. अपांग व कर्णप्रान्त यांना संधि, त्या अंजन रेखेनें शोभवीत, केश जरतारी आण्वलाने बांधीत, त्याच्या चोळ्या अर्धदंड व पयोधर प्रच्छादित करीत दाक्षिणात्यांची पद्धति आवडली म्हणून त्यांनीं सोन्याचें टंक (नाणें) चालू केलें.

दण्ड नायक सुजसुग्रीवच (कृपण) होता. चपक मंत्री खर्चिक होता. राजा अभयमुखी (रुबस) गाई व हरिण जिन दान करी. हा विद्वच्चूडामणि राजा पण्डितांना पालख्या छत्र्या वापरण्याची प्रक्रिया देत असे. बिल्हण कवि कर्नाटकभूपति जो परमार्दि त्याकडे गेलो, त्यानें त्याला विद्यापति करून गर्वीत उन केलें. तरी हर्षाची कीर्ति ऐकून परमार्दीच्या मान, बिल्हणाला बंधनाच वाटली. दिवसाचे दोन यांम राजा झोंप घई. रात्रीं दरबारांत जाऊन काम करी या राजाच्या मण्डळांत सौन्दर्याचा व रुपाच्या दिनरात व्यवहार चाले.

राजाच्या मनात मोह उत्पन्न झाला त्यानें पित्याचें पूर्ववैर स्मरून त्याला पाहूसेन असें नांव दिलें. व धम्मट लुटला अवरोधगृहात ती ठेविली ठेवल्या.

राजपुरीचा राजा संग्रामपाल, विकृत झाला. कम्पनेश कदर्पानें त्याच्याशीं युद्ध सुरू केलें व मृत्यूचा महान उघडला. औषधी तेलानें लिप्त बाण सोडले. कदर्प अग्नि-अस्त्र जाणतो असें समजून शत्रू पळाले. कदर्प राजाला प्रिय झाला.

पुढें परिहासपुराची व्यवस्था ठेवणाऱ्या मन्त्रात फार बिघाड होत गेला. वामन मन्त्र्यादिकांना ब्रह्मपरिषदेनें वातगण्ड असें नाव दिलें त्यांना राजानें काढलें.

कदर्पाला लोहरदेश घ्यावयाचा आहे असें कांहीं दुष्ट मन्त्र्यानीं उठविलें. मुठीतून जशी वाळू तशी राजाच्या मनांतून कदर्पावरील प्रीति जरी सुश्लिष्ट होती तरी गळाली. त्याचेवर राजानें एक असिधर पाठविला तो मारण्याच्या उद्योगात असतां कदर्पानें त्याचा हात रगडला व त्याची चामडी काढली. कदर्प वाराणसीस गेला. व एका गयावळाला मारून त्या जागीं दुसरा बसविला. अशा रीतीनें गयेस काश्मीरिकांचें श्राद्धशुल्काचें निवारण केलें.

कदर्प गेल्यानंतर दुष्ट मन्त्र्याचा हेतु साध्य झाला. स्वैराहारानें मद चढलेले मेंढे आपल्या शृंगाच्या कण्डू शमविण्याकरिता एकमेकांना टकरा मारीत सुद्धन मधल्या खांबाचा चूर करतात. तसें उन्मत्तमन्त्री दुर्वार द्वेषानें एकमेकांशीं भांडून मध्यस्थ राजाचा नाश करतात.

राज्य मिळविण्याची इच्छा करणारा तन्वंगपुत्र धम्मट हा लोहर वंशीय राजपुत्र होता त्यानें कलशाच्या एका वेश्येच्या (कळवेच्या) पुत्राला (जयराजाला) हर्षाला मारण्याकरिता प्रेरित केलें. हें वृत्त प्रयागाला कळलें. त्यानें कांहीं प्रश्न जयराजाला विचारले तेव्हा कट करणारा मीच असे, यातना सोशीत जयराजानें सांगितलें. जयराजाला विष पाजण्यांत आलें. त्याला विषघ्न मन्त्र येत होते, म्हणून तें व्यर्थ गेलें. त्याचा शिरच्छेद करून मांसास भोजन देण्यात आलें. धम्मटाला मारण्याचें काम लोहरच्या ठक्कुराला सांगून राजा म्हणाला, हें काम प्रयाग सांगेल तेव्हा कर. वामनमंत्री म्हणाला, हें काम त्वरित करून टाक नाहीतर भद्राणि दरिद्रति (सुदैवाला दरिद्र प्राप्त होते) धम्मटाला त्वरित मारण्यांत आलें.

## राजाच्या मनांत प्रवेश करणारा कुशल विट

नष्टचेष्ट अशा शवात प्रवेश करण्यांत वेताळ कुशल असतो. तसा राजाच्या मनांत प्रवेश करण्यात विट कुशल असतो. इलधराचा नातू कोष्ठधर हर्षाला कलशाचा द्वेष्टा समजून म्हणाला "तू कलशेश्वराचें नांव नष्ट कर. सुवर्ण लूट मी त्यानें वितस्तेवर पूल बांधीन. आणखी राजाचें रंजन करताना म्हणाला, "मी गगनावर चित्र सुरेख काढतो,

विस टाकूनी वस्त्र उत्तम विणणे स्वप्न इष्ट सुवर्ण घडून देतो. हिमाचे कोट व घनो, जशी समुपस्थायिका ( रुग्ण परिचर्या करणारी स्त्री ) अपथ्य वस्तूबद्दल रोग्याच्या इच्छेला निषेध करत तसा प्रभूच्या इच्छेला प्रधानाने निषेध केला

एकदा लेष्टधराच्या सांगण्यावरून भीमशाही राजानें भीमकेशवाचें मंदिर लुटलें व दुसरीं अन्य देवळें लुटून झाल्यावर देवांच्या मूर्तींचे उत्पाटण करण्याच्या कामीं एक अधिकारी राजानें नेमला त्याने जीर्ण झालेल्या नकाच्या व बोटाच्या व नग्नावस्थेत हिंडणाऱ्या अशा लोकांकडून प्रतिमांवर मल मूत्र विसर्जन राजानें करवलें. लोकांच्या औत्सुक्याप्रमाणें सुवर्णाच्या मूर्ती पेटविल्या, या तुरुष्कानें असा गाव ठेवला नाहीं. की जो याने निष्प्रतिम केला नाहीं. दोन प्रभावी असे देव अक्षुण्ण राहिले एक श्री नगरातील रणस्वामी व हारेश्व मार्तंड. एक बुद्धाची प्रतिमा कनक नावाच्या गायकाच्या विनतीवरून व एक कुशलश्री नावाच्या श्रमणीच्या विनतीवरून. पुरीवावर कर बसवून तो वसूल करण्याच्या कामीं राजानें एक अधिकाऱ्याची जागा निर्माण केली गर्भश्री नावाच्या पर्यायानें ज्ञात असे जे मतीचें भाग्य त्याचेंच प्रभावानें कुमार्गानें मिळविलेल्या द्रव्याचा व्यय राजा तदनुरोधानें करी

## राजे आपला पैसा कसा खर्च करतात

दुर्लभ मृगाक्षी स्त्रिया, व सुंदर श्याम अश्व असलेले अश्व मिळविण्यात आणि वेतालिकांची अतिशयोक्त स्तुति विकत घेण्यात, राजे आपली संपत्ति खर्च करतात. चिरकालाचा कोप व त्यांचा प्रसाद यांच्या गोष्टी, शिकारीच्या कथा, यांत राजाचा पोराप्रमाणें काळ जातो. खुशामत्यांच्या स्तवांवरून आपण खरोखर अमानुष आहोंत, पुरुषाधिक आहोंत आपल्याला तृतीय नेत्र आहे, अधिक भुजा आहेत, असें राजे मानतात. राजे व बालकें समान भाव असतात. बालकें गोड असेल तें रुचीनें खातात, व कडू असेल तें थुंकून टाकतात. राजे मिष्टभाषण चाकरी मानतात कडू धिक्कारतात. कनक म्हणून चम्पकाचा धाकटा भाऊ गायक होता त्याला राजानें एक लक्ष दिनार दिले.

## चंदलेची कथा

कर्नाटकचा राजा परमार्डि याची चंदला नावाची स्त्री सुंदर होती तिला मिळविण्याची राजानें प्रतिज्ञा केली. तेव्हां काही चारण स्तुति मिषानें हंसून परस्परांला उद्देशून म्हणाले, "या राजानें प्रतिज्ञा पुरी होईतों अपक्विय ( भट्टी लावल्याशिवाय काढलेला) * कापूर न खाण्याची प्रतिज्ञा केली आहे. ही चंदलेची माता स्वर्गातून आणविली आहे असें सांगून राजाला एके डोंब स्त्री दाखवून राजाकडून एका विरागाने द्रव्य मिळविलें. चंदलेच्या दासी देवता आहेत असें गौरीनीं त्रिक प्रांत व राजा त्यास नमन करी. राजाला पुष्कळ आयुष्य हवें होतें. या दासींनीं त्याला शंभर वर्षे आयुष्य दिलें असें विटानीं विनति केल्यावरून राजा त्यास विद्यमान आयुष्यानुरूप आयुष्य देई. चन्दलेच्या दासी कडून एका डोंबानें रसायन मिळविलें. कारण राजाला पिण्ड सिद्ध व्हावयाला पाहिजे होता. बल व रूप यांच्या प्राप्ती-करता यानें केलेले उपाय, इतके लज्जास्पद आहेत कीं ते कोणत्याहि भल्या मनुष्य सांगू शकणार नाहीं. हा मूर्ख राजा रात्रौ नर्तकीला शिकवी व स्वतः अभिनय करी यांच्या या गोष्टी इतक्या अद्भुत आहेत कीं, त्या कालीं करून खोट्या वाटतील. दुरून कोणी शत्रूनें बाण टाकलें तर ते याला लागत नसत हें त्याचें आयुष्य शेष असल्याचें अथवा त्याच्या प्रजेच्या कुकर्माचेंच फल होय. यानें अगम्य गमन केलें, निषिद्ध असें सूकर मांस भक्षण केलें.

टीप :— भट्टी लावल्याशिवाय कापराच्या झाडांतील कापूर काढताच येत नाहीं.

राजपुरीचा संग्रामपाल सेवेंत चुकला राजानें त्याच्या पृथ्वीगिरि नांवाच्या किल्ल्याला वेढा दिला. संग्रामपालानें लोभी दण्डनायकाला ( सुब्याला ) द्रव्यानें वश केलें. त्यानें सैनिकांकडून प्रतिवेतन (भत्ता) मागविलें. सैनिकांनी प्रायोप-वेशन आरंभिलें. राजाला परतावें लागलें दण्डनायकाचा द्रोह कळताच राजानें त्याला प्रतिपक्षाच्या अनुरोधानें ( काम-चालढकलीच्या कायद्याप्रमाणें ) शिक्षा केली. राजानें नव्हे

लोहरचे लवण्य सुनीपाल नावाच्या किल्ल्याच्या आधारें राजाच्या लेष्टधारावर आक्रमण करीत. म्हणून त्या किल्ल्याला वेढा देऊन राजा एक प्रयाग मार्गे राहिला. लवण्य वरून गण्डीशिला लोटील राजाचे लोक मोर्चा बांधून अति दुःसह समांध करीत. पण हिम वृष्टि झाली राजाला परतावें लागलें. परत येतांना राजा या सैन्याचें रक्षण उच्चल व सुस्सल या दोन वीरांनीं केलें हे लोहर वंशी या मल्लाचे पुत्र होते. एकाला राज्यप्राप्ति होईल असें एका दैवविदानें वर्तविलें होतें म्हणून हे या स्वारींत होते. त्यांची ख्याति झाली.

मदन कम्पनाधीश म्हणाला "राजाचा पराभव झाला. बरें झालें. राणीच्या आज्ञापत्राचें उल्लंघन करण्याचा त्याचेवर आरोप ठेवून राजानें त्याला सपुत्र मारविलें.

उच्चल व सुस्सल राजाला टाळून दूर रहात. म्हणून राजा जवळ असलेल्या प्रजेचाच छळ करूं लागला. नीच मनुष्य अल्प अपराध करणाऱ्या जवळच्या माणसाला मारतो. पण दूरच्या मोठ्या अपराध करणाऱ्या शत्रूला कांहीं करीत नाहीं.

कुत्रा जवळ येऊन पडलेल्या दगडाला रोषानें चावतो. दगड मारणाऱ्या पण दूर असलेल्या माणसाला कांहीं करीत नाहीं.

टीप :— कुत्र्याचा दृष्टान्त फार समर्पक व सर्वांना समजण्यासारखा व अनुभवानें पटण्यासारखा आहे.

राजदण्डाचा त्रास प्रजेला क्षतावर क्षाराप्रमाणें होऊं लागला. राज्यात अनर्थ परंपरा उठली. तस्कर दिवसा नृपगृहांतून कांचनरत्यालीं नेत. मरकी उद्भवली. पूर येऊन दुर्भिक्ष झालें. खारी धान्याला पाचशें दिनार पडूं लागले. एक दिनाराला मृद्विक (द्राक्षासव) दोन पळें येई– मीठ, मिरीं, हिंग इत्यादिकाचें नाव दुर्लभ झालें' कौरीच्या एका पल्ल्याची विक्री, सहाइनारानीं होऊं लागली. राजानें द्रुमच्छेद चालविला. फुलें व फळें यांनीं भरलेले वृक्ष राजानें गुहस्थाप्रमाणें पाडले.

## डामरांच्या नाशाची क्रूर पद्धति.

डामराना मारण्याकरता राजानें मण्डलेश्वराला आनंदाला दिली. डामर म्लेच्छ भूमींत गेले. गोमांस खाऊं लागले. काहीं घट्ट व अरघट्ट यावर काम करूं लागले. मण्डलेश्वरानें लव. त्यांच्या अखण्ड मुण्डमाळा पाठविल्या. या ठरविल्या लवण्यांच्या करोट्यांनीं तोरणें बांधलीं. राजद्वारीं करणबन्धादी बांधलेलीं असत. तीं जो कोणी लवन्यांचीं मुण्डकी आणून देईल तो नेत असे. या प्रमाणें मडव राज्यातील डामर नष्ट करून राजा क्रम राज्याकडे वळला.

मल्ल राजाचा धाकटा कुरूप मुलगा प्रतिवेश्मकाच्या (शेजाऱ्याच्या मर्कटासारख्या कुरूप) लक्ष्मीधराच्या गेहिनीला आल्हादकारक झाला. लक्ष्मीधरानें विचारलें "महाराज देवही, अगण्य हत्या करून या दण्डाई लक्षणाच्या सुस्सल व उच्चल याना का मारीत नाहीं?" त्यानां मारण्याचा निश्चय हर्षानें केला. उच्चल राजपुरीला गेला. व सुस्सल कलंबरचा राजा जो कल्ह त्याकडे गेला. राजपुरीच्या संग्रामपालानें उच्चलाच्या डोक्यावर अविनाश कीर्ति कापुराचें चूर्ण अयमर्दनाकरता ठेवलें या घटनेची भीति वाटून हर्षानें एक प्रमुख ठक्कूर ज्याला हर्षानें द्रव्य दिलें होत त्या संग्रामपालाला विनविलें तो संग्रामपालाला एकान्तात गाठून म्हणाला "हर्षाचा प्रसाद मिळवावयाचा सोडून भोंडाच्या गळ्यात मिठ्या मारतोस हें काय? हर्षापुढे त्या भिकारड्याचें काय चालेल? राजगिरीच्या दुर्गात त्याला धरून ठेव. म्हणजे हर्षाला त्याचें भय राहील व तो तुझ्याप्रमाणें वागेल. संग्रामपाल म्हणाला "तुझ्याकडे मी उच्चलाला पाठवितो पुढचें काम तूच कर.

उच्चलाला कटाचें वृत्त प्रथम अपशकुनानें व नंतर आप्तांनी कळविलें. तो कट उच्चलावर हल्ला करण्याचा होता. उच्चलानेंहि आपले लोक जमविलें व उलट हल्ला करण्याचें बेतानें निघाला. झगड्याला भिऊन संग्रामपालानें उच्चलाला दरबारांत बोलाविलें. उच्चलाचें भूल्य नको म्हणून असतां तो निघाला दोघांची भेट झाली. उच्चल फार क्रुद्ध झाला होता. त्याची समजूत घालीत असता वादविवादात वज्रराज व संग्रामपाल यांनी विचारलें "तुम्हीं काश्मीर राजवंशी आहांत काय? आणि म्हणाले काश्मीरचें राज्य हर्षाकडे क्रमानें आलें. त्यांना क्रोधानें व निष्ठुरपणें उच्चलानें उत्तर दिलें. "पूर्वी दार्वाभिसार प्रदेशांत भारद्वाज गोत्री नर हा राजा झाला. त्याचा पुत्र फुल्ल, त्याचा पुत्र सातवाहन, त्याचा पुत्र चंद्र, त्याचा पुत्र चंदुराज, असे राजे झाले. त्याचे पुत्र गोपाल व सिंहराज असे होते. सिंहराजाला एक कन्या दिद्दा व अनेक पुत्र होत. दिद्दा क्षेमगुप्ताला तिच्या पित्यानें दिली. ती साविरा झाली. (निपुत्रिकपणें मूल झाली) तिनें आपल्या भावाच्या (उदय राजाच्या पुत्राला संग्रामाला) राज्य दिलें त्याच्या वंशातला जसा हर्ष तसे आम्ही दिद्दाराणीचा दुसरा भाऊ जो कालिलाक त्याच्या वंशातले आहोत. हें झालें तुमच्या पहिल्या प्रश्नाचें उत्तर! तुम्ही असा सिद्धान्त करता कीं हें काश्मीरचें–पृथ्वीचें–राज्य क्रमभोग्य आहे. त्यावर मी म्हणतों कीं ही पृथ्वी वीरभोग्य आहे. स्वताच्या बाहुद्वयाशिवाय वीराला दुसरा सहाय कोण होतो? अनुकम्प्य अशा तुम्हासारख्या लोकांपुढें हस्त जोडायाला लावून मी काश्मीर मंडळींतील भूपात कुलपांसुल झालों न हीं हें नशीब! माझी शक्ति काय आहे ती पहा!"

टीपः— हे भाषण बाहुबली राजाला शोभेल असें आहे.

उच्चल सैन्य घेऊन निघाला. मारलेला ससा हातात घेऊन कोणी एकजण पुढें आला. तो उच्चलाला शुभशकून वाटला. तो काश्मीराकडे वळला. आपल्याला राज्यश्री मिळाली असें त्याला वाटले, कपिलाच्या सैन्याला पलायनांत शिष्य केलें. हा जसा काहीं आकाशांतून खालीं पडला. अथवा भूविवरांतून वर आला. असें हर्षाला वाटलें. राजाकडील एक सुलक्षणी घोडी उच्चलाकडे आली. राजलक्ष्मी समजून त्यानें तिला पकडली.

हिम सरल्यावर जसे षट्पद भूविवरांतून निघतात, तसे असंतुष्ट डामरांचे ओघ सहस्रांनीं निघाले. त्याची उठावणी उच्चलाच्या (नामानें) आनंदानें केली. हर्षानें धाडलेल्या मडलेश्वराला सकवच व शस्त्र उच्चलानें पकडलें. हें कसें काय झालें तें आम्हाला कळलें नाहीं! पण त्या स्वामिभक्तानें हर्षाचें हितच चाहिलें. मानी माणसाची स्वामिभक्ति शेवटपर्यंत विपर्यस्त होत नाहीं. त्यानें उच्चलाला अशी प्रेरणा केली कीं आता पुरप्रवेश करावा, विश्वास क्षण असा दुसरा नाहीं, असें

चित्त जसा देह जर साहसक्षम असेल तर अन्यनिरपेक्ष माणसाचे कोणते मनीषित साधणार नाहीं ?

उच्चल साहसपुराला पोचला. पुढें मंडलेश्वरानें हर्षाला इकडे निरोप पाठविला कीं, तुझ्यापुढें मी कोल्ह्याची शिकार ओढवून आणली आहे. त्वरित येऊन उच्चलाला मारावें. तेव्हा समस्त सामंत व सैन्य जमवून आज मृत्यू येवो किंवा जय होवो असा निश्चय करून नृप बाहेर पडला.

## माफीची घोषणा

या प्राणसंशयाच्या प्रसंगीं राजानें ढोलके वाजवून प्रशमाची ( सर्वांना सरसकट माफी देण्याची ) घोषणा केली. सर्व पौर त्याच्या मागून गेले. मंडळेश्वरानें फिरून उच्चलाच्या उन्मद सैन्याचा नाश करून उच्चलाला तारमूलकडे पळविलें.

## एक दैविक चमत्कार

वाटेंत राजानें परिहास केशवाची मूर्ति फोडली. दरिद्री उच्चलानें फोडली नाहीं. तेव्हापासून पुढें हर्षाचा शिरच्छेद होईतों कपोताच्या पंखाप्रमाणें धूसर अशा धुळीनें सर्व आकाश व्याप्त होतें. पूर्वी या देशांत सर्व अंधार होता. पण परिहास केशवाची मूर्ती स्थापन झाल्या दिवसापासून, तिच्या रुपेरी तेजानें दिवस प्रकाशित असे म्हणत.

शूरपूरच्या वाटेनें येऊन क्षिप्रकारी सुस्सलानें सद्द्वीवर येऊन माणिक्य सेनापतीला जिंकलें. उच्चलाच्या सैन्यांत पायदळ होतें. राजाच्या सैन्यांत घोडदळ होतें. त्रासातुर होऊन कोणीहि कम्पनाधीश होईना. तेव्हां राजा म्हणाला, " विश्वास वगळून माझा असा कोण आहे ?" तेव्हा राजाच्या हातून अधिकाराची माळा चंद्रराजानें घेतली. त्यानें आनंदाला, उच्चलाच्या मामाला ठार केला, व त्याचें शरीर राजाकडे पाठविलें. तें पाहून राजाला वाटलें विधि अनुकूल आहे. सिंह जाता जाता आपल्या मार्गे वळून पहाण्यानें प्रत्यागमाचा ( हा फिरून मार्गे वळेल असा ) भ्रम उत्पन्न करतो. तसा विधी उलट जात असताहि, मध्येंच सन्मुख दृष्टीनें अनुकूलता दाखवितो.

## जसा तुझा तसा तो माझा

राजाचा एक मण्डलेश्वर मारला गेला. सिद्धिदैवायत्त असें जाणून या मण्डलेश्वरासारख्याची, स्तुति करणें हीच वस्तुज्ञता ( गुणग्राहकता ) होय. स्वामिकार्थांत स्तुत्य झालेल्याला जन्म दिला असा गौरव विख्यात होण्याकरितां त्याच्या मातेनें अग्निप्रवेश केला. जेथ तेथें साहसाचे कर्मी आपल्या पुत्राला पाठविलेलें पाहून या स्त्रीनें स्नेहानें मोहित होऊन, एकदां राजाला म्हटलें होतें, महाराज, ज्या स्त्रीला दुसरी संतति नाहीं. अशा माझ्या एकुलत्या एक मुलाची ज्या कामांत प्राणसंदेह त्या कामांत करीत जाऊं नका राजा म्हणाला "मी तोच, काय मला तो एकच आधार आहे. तसा तो माझाहि आहे-" आपल्या पुत्राच्या स्वामिभक्तीची स्तुति झालेली पाहून, त्या मनस्वी स्त्रीला वाटलें, आपल्या मुलाला फार प्रतिष्ठा प्राप्त झाली.

उच्चल तसाच हिरण्यपुराला गेला तेथें ब्राह्मणांनीं त्याला राज्याभिषेक केला.

## उच्चलाला राज्याभिषेक केल्यावर हर्षानें पुढें काय करावें याविषयीं मंत्र्यांचा उपदेश.

राजा विवश झाला. मंत्र्यांनीं सांगितलें मूळगांवला लोहर पर्वताकडे जावें. त्यानें पुन्हा विचारलें, "तुम्हाला दुसरा कांहीं उपदेश करावयाचा आहे काय ? " ते म्हणाले " रणांत राजाला मरण म्हणजे आशीर्वाद आहे. राजव्यसनांत सापडले म्हणजे त्याचे खरे शत्रू गोत्रज नसतात पण त्याचा अनुयोग लज्जा व भय,आणि मंत्र्याचा भेद हेच खरे शत्रु असतात. समस्त कृत्यांचा भार मंत्र्यावर सोपवणाऱ्या आळशी राजाचा घात परोपरीनें होतो. अमात्याच्या वैमत्यानें राजकारण कितीहि तनु असलें तरी, त्याचा शेवट चांगला होत नाहीं. दोहों पुरुषांकडून ओढल्या जाणाऱ्या दोरीचा रस्ता, जसा तसा समग्रशक्ती राजा आपल्या समग्र शक्ती एका माणसावर अवलंबून ठेवील तर त्याचे राज्य, त्याचा सर्वांगहीन वैरी हरून नेतो, जेथें मेदिनी आक्रान्त करणारा शत्रु दिसेल, जेथें नरांप्रमाणें भंड नाचतात, जेथें मनुष्याच्या दोन्हा ओंपळा असलेल्या वीण्याच्या तारांप्रमाणें किण किण शब्द करतात, जेथें कोहिरणीच्या मुखांतून ज्वालांचें दीपांकुर तेवत असतात, तेथें वीराच्या शय्येवर पडून ज्यांची वांछा सफल झाली आहे असे कोणी कोणीच धन्य होतात. हे अन्त्यकृत्य उदात्त समजून द्यूतकाराप्रमाणें राज्य पणाला लावून, क्षत्रिय त्रासहीन होतात. " राजा म्हणाला दुसरा उपदेश असला तर करा. " एक निश्वास टाकून मंत्री म्हणाले " उत्सर्गाप्रमाणें प्राण द्यावयाला स्वतः तयार असाल तर ठीक नाहीं तर दुसरेंच कांहीं करून बसाल ! " राजा म्हणाला, " स्वतः मारून घ्यावयाला मी समर्थ नाहीं. आपणच मला मारून टाका." ही वैक्लव्यग्रस्ताची वाणी ऐकून मंत्री म्हणाले. " या प्रकारचें दैन्य ज्या स्वामीला प्राप्त झालें आहे, त्याचें दुःख पर भृत्यांना खणून टाकतां येत नाहीं त्या भृत्यांना स्वामीनें लरीखर पडा ... पाळावें म्हणावयाचं ...

भृत्यांच्या भय, शोक, दैन्य इ. विक्रिया जे भृत्य-नटांप्रमाणें स्वस्थचित्त पहातात, त्याच्या योगानें, ही भू सतीर्थ असून, अपवनी झाली आहे. क्षुधाक्रान्त मुलगा, परग-हास पाठवावी लागलेली वधू, दुःखमग्न मित्र, अशानां-

मांचें विवर होऊन हंबरडाचा उद्गार काढणारी दुबळी गाय, निष्पथ्य ( पथ्याभावी ) आसन्नमरण पितरें, व शत्रू निर्जित स्वामी, अशा गोष्टी ज्यांनी पाहिल्या, त्या मृत्याना नरकात अप्रिय असें काहीं भोक्तव्य राहिलें नाहीं.

क्षुत्क्षामस्तनयो, वधूः परगृहे प्रेष्या ऽ वसन्नः सुहृत् ।
दुग्धा गौरवसन्नाश्रम वलिवरा, हम्बारवोद्गारिणी ॥
निष्पथ्यौ पितरावदूरमरणौ; स्वामी द्विषन्निर्जितो
दृष्टो येन पर न तस्य निरये भोक्तव्य मस्त्यप्रियम् ॥१४१४॥*

भूतबोधेनें असा काहीं विमोहित होऊन राजा म्हणाला "यम व कुबेर राजाच्या ओष्ठाग्री असतात, अशी जी ख्याति ( म्हण ) या कलियुगांत आहे, ती मला एकट्यालाच शरण येऊन बसली आहे. अल्प सत्व, स्वल्पोदय लोक मला हसतील. ज्याचा मेंदू ( चेतस् ) बोटांच्या अग्रांवरें संटवून ठेवतां येईल, तो उच्चल आतां मला कोठें दांत दाखवून माझ्या सत्कृत्यांची विडंबना करील. शास्त्र व हर्दर्म जाणत असूनहि, मी जनांच्या उपजीवनार्थ जें औदार्य दाखवीत आलों, तेंच माझें जाड्य सिद्ध करावयास कारण झालें. मुनिस्वामी नांवाचा अमात्य म्हणाला, प्रतिष्ठेचें रक्षण केलें पाहिजे कीर्तिरूप शरीर कायम राहणें तेंच पौरुषाचें पूर्णत्व असतें. म्हणून महाराज दण्डकालक ( अतिसार ) नावाचा आशुकारी रोग जडला आहे. असा बहाणा करा, पुढली आपत्ति टळण्याचा मार्ग उघडा होईल."

तसा बहाणा करून राजा बसवैद्य लंघनें स्वेदन, संवादन व वमन इत्यादि उपायांनी जोंची व्याधि शिथिल झाली नाहीं. लोक म्हणाले तो मरणार. अमात्याने कुशला निवेदक, अग्निप्रवेश केला. † शेष कर्तव्य काय राहिलें तें प्रत्यक्ष न सांगता युक्तीनें उक्त अशा निष्ठुर आचारानें सुचवल्यापासून राजा अमात्यावर संतुष्ट राहिला.

राजवंशाच्या रक्षणार्थ राजपुत्र जो भोज, त्याला श्रेष्ठ कोटाला पाठवावा असा सल्ला त्यानीं राजाला दिला. प्रस्थान मंगलविधि करून निघालेल्या पुत्राला दंडनायकाच्या सांगण्यावरून, राजानें परतविलें. जो नृप संकटकाळीं धी व धैर्य-यानीं शत्रूचें आक्रमण करतो, तो नृप अमात्य येता बहमूढ होतो. तेव्हा त्यानें पृथ्वीवर पदक्रम केला हा विचार लोकांच्या मनांत येतो.

* टीप :—या शेवटल्या वाक्यखंडात उपमादीप अलंकार साधला आहे. वरील दृश्यात दुःखकारक ', हा सामान्य धर्म सर्वांवर मध्यवर्ती दीपाप्रमाणें उजेड पाडीत आहे. हा कवीचा आवडता अलंकार आहे.

† हा आत्मयज्ञ जपानी लोकांत आहे. त्याला हरिकारी म्हणतात.

तरी सैन्य नगरात असून मंत्रास्त्रबलन मारू लागलें. सैनिक जो शिक्षाध्यायी (म्होरक्या पुढें करील तो सर्व सैन्याधिकारी लोभी व अभिमानशून्य आहेत, अशी घोषणा करी योधांची समरश्रद्धा नष्ट करी. रसद वाटण्याच्या वेळीं प्रक्रियेची विशेष प्रकारची ) मागणी करी व कलह माजवी.

सुरसद व उच्चल लढत होते. त्याचा पिता मल्ल मात्र मृत होता. तो धार्मिक आहे या सबबीवर हर्षानें त्याला मारविलें. त्याच्या पत्नीनें, ( सुरसद्द व उच्चल यांच्या मातेनें ) आपणास जाळून घेतलें. अग्नींत उडी घेतांना ती म्हणाली. " हे माझ्या पुत्रांनो ! तुम्ही जामदग्नी प्रमाणें पितृघातकांच्या वंशाचा थोड्याच दिवसांनी नाश कराल !"

सुस्सल राजवाड्यापर्यंत लढत आला. त्याला भोज अपराजित पुत्र, या राजपुत्रानें पळविलें. तो उच्चल उत्तर दिशेकडून आला. मुख तोंडी असा धैर्यानें निघाला. नगरविहारी नागानें उच्चलाला वंदन केलें. राण्या शतद्वार नावाच्या राजवाड्याच्या चतुष्किकेवर ( चार खांबाच्या गच्चीवर ) हातात वह्नि घेऊन मरणाच्या इच्छेनें उभ्या राहिल्या. हर्षाचा शरविद्ध हत्ती फूत्कार करीत राजाच्या समूहें पायांखालीं मर्दन करीत विरुद्ध झालेल्या विधिप्रमाणें उलट फिरला. राजा विमुख होऊन स्वारासह शतद्वाराच्या अंगणात शिरला—मुख वर करून तो वह्निदान करणाऱ्या राण्यांचें हस्तानें निवारण करीत होता. भोजानें पलायन केलें, मग बाह्यस्थ ( बहिवासी ) जन व डामर यांनीं लुटालूट करून, दारिद्र्य घालवलें. काहीं पामरांनीं सोनेरी किंवा हलकी रेशमी वस्त्रें जाळून त्याची राख आदरानें गोळा केली. तांदूळ समजून अविद्ध मोत्यांच्या ढिगाचें चूर्ण केलें. अशी विडंबना होऊन या वंशातील लक्ष्मी जी या दशेला पोचली तिला पुन्हा प्राप्त झाली नाहीं.

## पराभूत हर्षाचें पलायन व करुणास्पद अन्त

उच्चलानें राजवाडा जाळला राजाच्या मनातून लढून मरावयाचे होतें. दंडनायक निषेध करी. लोहराकडे जा असें हेतुक म्हणे. उत्तरपक्ष प्रथम त्याला आवडला. पुत्राची वार्ता कळण्यास राजा चंपकला म्हणाला " भोजदेवाच्या मार्गानें जा. पुत्राशिवाय मला सर्व दिशा, असूनहि दिसत नाहीं. चंपक राजपुत्रानुसारी झाला. राजाला पुष्कळांनी मत सांगितलें.

भाग्यक्षयस्यैतदेवहि लक्षणम् यत् प्राकृतोऽपिसन्
अपृष्टः कथयत् धाष्ट्र्यात्पंश्च स्वहृदयोचितम् ॥१६३ ॥

( भावार्थ )—यःकश्चित् मनुष्य सुद्धां विचारलें नसतांहि धष्टपणें आपल्या मनाला वाटेल तसा सल्ला देऊं लागतो. हेंच भाग्यक्षयाचें लक्षण समजावें. राजा भांबावून गेला, एकाहि मताकडे आरूढ न होता, सर्वांचा अपराधी झाला.

सर्वो यथा निखिल रन्ध्रमुखेन वंश: ।
सपूरितो न खलु शब्दमपिप्रसूते ॥
तैस्तैस्तथा बहुपथप्रचयेन मन्त्रः ।
सकल्पितः किल न निश्चयमभ्युपैति ॥ १६१ ॥

अर्थः—कळकीचें वाद्य जर त्याच्या सर्व मुखानीं भरलें तर तें एक शब्दहि प्रसवत नाहीं. त्याप्रमाणे नाना मताच्या गलबल्यानें संकल्पित असा मंत्र निश्चयकारक होत नाहीं. राजानें रत्नग्रैवेय (रत्नाची गळ्यातील माळ) मुलाला पाथेयाकरता दिली होती. म्हणून तो गतश्री दिसू लागला. तो अक्षपटलातून मंत्र्याच्या घरोघर फिरला. राजाची व्यर्थ संभावनाभूमि होऊन बसलेले, प्रायोपवेशन कुशल ब्राह्मणबन्धू (नावाचे ब्राह्मण) उपयोगी पडले नाहींत. जो कोणी मोठा म्हणून होता, त्याच्याकडे मोठ्या आस्थेनें फिरत असता राजा कपिलनामक मंत्र्याकडे गेला. मंत्री घरीं नव्हता त्याचे मुलगे सावकाश पुढें जसे ऋणको तसे या राजापुढं लपून राहिले. राजाचीं झालेली निंदा स्वतांच ऐकावी लागली. आपण छत्तीस कुळांतील आहों। अशी ज्यानीं संभूति (प्रौढी) मिळविली, ते अनतपालादी राजकुमार आपले घोडे पदों-पदीं स्थगित करून वादळ्या अंधःकारात राजाला सोडून गेले येथें श्वशुराचें स्थान आहे, येथें रात्रभर वसति करता येईल का, असें विचारतां तें स्थळ पाहून येतो व सांगतों असें निमित्त करूनें दण्डनायक व अनुग निघून गेले. दण्डनायक वावयास निघाला तेव्हा प्रयागानें त्याचें अंगद (बाहुभूषण) पाथेयार्थ मागितलें. त्यानें सातू दिलें. तेव्हा त्या राजाची संपत्ति म्हणजे एक अंशुक उरलें. व दुसरें अवशेष म्हणजे त्यांचा जीव उरला. व अनुचर म्हणजे एक प्रयाग व दुसरा मुक्त नांवाचा एक सूद असे उरले.

टीप—ॲथेन्सचा नागरिक टायमन हा फार धनाढ्य होता. त्यानें आपली काहीं संपत्ति कवीसारख्या गुणी जनास उत्तेजनार्थ, वाटली, कांहीं मित्रकार्यांत खर्च केली. त्याच्या-पाशीं काही राहिलें नाहीं. त्यानें आपले दूत ज्यांच्यावर त्याने उपकार केले होते त्याकडे पैशाची मागणी करण्याकरता पाठविलें. त्याना सर्व लोकांनीं रागानें परत पाठविलें. एकानें दूतास विचारलें "कायरे! भेट आणलीस काय?" दूत म्हणाला "भेट कसची! मी पैसे मागावयास आलों आहे." आणखी एक मित्र म्हणाला "मी घरीं नाहीं म्हणून सांग." दुसरा म्हणाला "अरेरे! कालच एकाला दिले. नाहींतर दिले असते. आता नाहींत. वाईट वाटतें." तिसरा म्हणाला, "अरे तूं वरच्या मित्राकडे जाऊन बघ" दूत म्हणाला "त्यांकडे गेलों होतों. ते नाहीं म्हणाले. मित्र म्हणाला "असें होय! तू माझ्याकडे आधीं न येतां दुसऱ्याकडे गेलास होय! यात माझा मोठा अपमान झाला. जा!! यजमानाला सांग माफ देत नाहीं" या गोष्टीत व वरील हर्षाच्या गोष्टींत फार साम्य आहे. अनुभवाला पटतें म्हणून आनंददायी आहे.

तोंच द्रोहाच्या स्पर्शानें दूषित झालेल्या या भूमीचें क्षालन करण्याकरता मेघाचा गण वारिमोचन करू लागला, वृष्टि-पात, भूमि निर्जन, कल्लोलारांभ, दुष्ट सहायाशी गाठ, वैरिभीति इत्यादी कायकाय प्रकार, त्याला दुःखकारक झाले नाहींत?

दुष्कर्म करणाऱ्याची नावें स्मर्तव्य नसूनहि, आतां वृत्तपुरोधानें घ्यावी लागत आहेत. ही धिःकारास्पद गोष्ट आहे सोमानंद नावाचा एक सिद्ध पुरुष आपल्या देवतांची पूजा करून स्मशानात राहत होता. त्याच्या कृपण घातलेल्या अंगणांत उच्च तरूनीं छिन्न अशा वाटिकेत गुण नावाच्या एका क्षुद्रल पसाची कुटी होती. भिक्षा नावाची एक वारस्त्री होती, ती विरहभुजंगी या नावानें प्रसिद्ध होती तिच्यासह हा कुट्टनाला उचित अशा चेष्टा करीत असे. त्याच्या दुरव्स्था एका कुटींत राजाने एक रात्र काढावी असें मुक्तानें ठरवलें होतें भिजलेलीं वस्त्रें राजाच्य अंगाला डकलीं होतीं. मुक्ताचें अवलंबन राजानें, व राजाचें प्रयागानें केलें होतें. हे तिघे विद्युत्प्रवाहानें भूमि पहात अडखळत अडखळत कुटीजवळ आले. प्राकारावर चढून मुक्तानें अर्गल काढला. कुटीच्या अंगणांत प्रवेश करतांच दर्भ लागून राजाला क्षत झालें. त्यांतून रक्त गळू लागलें या अनिमित्तानें (अशुभ निमित्तानें) राजाला वाटलें मृत्यु जवळ आला. अंगणात तापस नव्हता. कुटीच्या द्वाराला अर्गल लावलेला होता. म्हणून राजानें सारी रात्र अंगणात काढली. दासाच्या कांबळ्यानें आपली तनु झाकून ती उरलेली पावसाळी रात्र राजानें अंगणात काढली. त्याला झोंप लागेना. मी कोण? मला कोणी अभिभूत केले आहे? मी कोठें आहे? आतां काय करावें? असे विचार त्याच्या मनात येऊन त्याला कापरें भरलें. राज्य गेलें! प्रिया जळून मेली! पुत्र भ्रष्ट झाला! बांधव नाहींत! मी एकटा उरलों! पाथेय जवळ नाहीं! भिक्षेवर निर्वाह करणाऱ्या अंगणांत लोळत पडलों आहे! या एक एक दुःखाचा विचार करीत असतां, दुस्थितीच्या इतक्या टोकाला पोंचलेला, राजाला दुसरा कोणी अभागी कल्पित कथात सुद्धा आढळला नाहीं!

भोज राजपुत्र हरेश्वरीला पोंचला, तेथें एका शून्य मंदिरात बसला असतां, एका द्रोह्यानें त्यावर प्रहार केला. क्षत्रधर्म पासून च्युत न झालेल्या राजपुत्राने त्याचा संहार केला व रक्तानें लिप्तांग होऊन वीरशय्येला भूषविता झाला.

उच्चल रणश्रांत होऊन सूर्यमतीच्या मठांत सुस्सलाला भेटला. भोज मृत झाला हें वृत्त त्याला कळलें. हर्षच उरला.

त्याला वाटलें कीं आपल्या मनातला शूल उपटून निघाला. आता फक्त टोंकच उरलें.

उजाडल्यावर मुक्तानें तापसाला शोधून आणलें त्यानें भ्रुकुटीचा अडसर काढला. कुटी दशमशकांनीं आकीर्ण होती. आत त्यानें गवताची हातरी पसरली होती. मुक्तानें अभ्युपेक्ष केला. राजा आत प्रविष्ट झाला. ज्याची गिरा ऐकून इतर राजांना बहुमान वाटे त्या राजाला भीक मागणाऱ्याशीं चाटु भाषण करावें लागलें. तापसाचें भाषण भिकाऱ्याला उचित असें ग्राम्य अनुदात्त, व लाज वाटावयाला लावणारें असें होतें.

आपलें अलर्कवस्त्र देऊन त्या भिक्षुकाला, प्रयागानें भोजन सामग्री आणावयास पाठविलें. मध्यान्ह झाल्यावर त्या क्षुद्र तापसानें बरोबरीच्या तपस्विनीकडून, स्कंधावर ठेवलेला भोजन सामग्रीचा करंडा आणविला. पूर्वी आपण भृत्य व भिक्षाक या दोघानाच माहित होतों. आतां या स्त्रीला माहित झालों हें जाणून राजा जीविताविषयीं निराश झाला. प्रयागाखातर राजानें नुसता अन्नाला स्पर्श केला. पण त्याचें सेवन केलें नाहीं. प्रयागानें काय वार्ता आहे असें विचारलें तेव्हां त्या तापसीनें सांगितलें. "भोजाचा वध झाला एका पडक्या मंदिरांत लपून असतां, अन्न आणावयास पाठविलेल्या त्याच्या नागेश्वर नावाच्या साथिदाराकडून मारला गेला. भोज क्षत्रियाप्रमाणें लढून मेला." हें मिथ्या आहे असें प्रयागानें म्हटलें. पण ती वार्ता खोटी नाहीं असें अपशकुनानी राजास वाटलें आपत्तींत मग्न झालेल्या राजाला इतक्या दुःखानें गाठलें कीं, अप्रिय बोलणाऱ्या शत्रूच्या वाचेनेंहि, त्याचा उच्चार करतां आला नसता. राजनीति म्हणून आपण जें या पुत्रावर नियंत्रण ठेवलें, तें त्या मुलाला दुःखदायी झालें. जरी तो समरांत पडला तरी, वात्सल्यानें, अंकावर पडलेल्या मुलाचा घात आपण बालपणींच केला असें राजाला वाटलें. यौवनानें रुंद झालेल्या त्याच्या वक्षस्थलावर, हार शोभत आहे. व आपण त्याला आशिर्वाद देत आहोंत, असें स्वप्नानें राजाला वाटलें, व तो विव्हल झाला. रक्षणीय बाळ मृत झाला. आणि मी वृद्ध असून जीविताचें रक्षण करीत आहें; या विचारानें राजा लज्जित झाला.

अशा रीतीनें पुत्रशोकाची अवाच्यव्यथा अनुभव करीत असता, त्या तापसाच्या कुटींत दुसरी रात्र घालविण्याचें ठरविलें. लम्बायमान इन्दु रात्रीचें मुख होतें. दवाच्या राजानें सान्द्र बिन्दूनीं ती अश्रु गाळीत होती. चक्रवाकाच्या आक्रन्दानें ती शोक करीत होती.


प्रातःकाळीं प्रभूला क्षुत्पिपासेनें पीडित पाहून प्रयागानें तापसाला भोजनार्थ आणण्याविषयीं प्रार्थना केली. क्षणभरानें तापसीनें त्याच्यापुढें, दहा जन अन्नानें भरलेले दोन द्रोण आणून ठेवले. कोणा एका गृहस्थाकडे वर्षोत्सव होता त्याकडून मी हे आणले असें तापस म्हणाला प्रथम दीर्घ निश्वास टाकून म्हणाला, "महाराज, स्वामीचा वियोग झाला असताहि लोकांची ही सुस्थता पहा." राजा हसून म्हणाला "काय मूढासारखें बोलतोस! जो गेला, तो गेला. एक क्षत झाला म्हणून दुसरा क्षण होत नाहीं. सर्वजण आपल्या सुखाची अपेक्षा करतात. कोणी कोणाचा शोक करीत बसत नाहीं. सर्व लोकांचा एकच चक्षु जो सूर्य तो परलोकाला (अस्ताला) गेला म्हणजे लोक आपआपल्या घरीं निजावयास जातात. माझा विरह झाला, हें विश्व कसें चालेल, याचा विचार दुसऱ्या कोणाला कसा करतां येईल! माझ्या जीविताचें जीवित असा माझा पुत्र मेल्याचें ऐकून आज स्वस्थपणें राहून मला दुसऱ्याची निंदा कशी करतां येईल!" ही उक्ति एक तर गिरणींतील सौंदर्यस्थळ आहे.

प्रयागानें तापसाला तीं भाडीं टाकून दुसरें जेवण आणावयाची प्रेरणा केली तेव्हां कालच्या पैशातील पुरेसी शिल्लक नाहीं. तथापि प्रयत्न करतों असें म्हणून तो तापस बाहेर गेला. गोप्य असें रहस्य अल्प हृदय माणसाच्या स्वाधीन केलें तर अविनाश्य पापप्रमाणें तें त्या मनुष्याला पचवायला जड जातें ही कथा मनोरथ नावाच्या विप्राला तपस्व्यानें सांगितली. तेव्हां उच्चलाचा दाणा त्याला दाखवून दिला. तर आपणाला ऐश्वर्य प्राप्त होईल असें म्हणून त्यानें तापसाला द्रोही बनविलें. हा तापस निंद्य मनुष्याच्या पोटचा असावा. कारण सदसत्कर्माचें योग्य ज्ञान, बीजच असतें. त्यानें ही वार्ता इल्ला राजाला कळवली. त्यानें उच्चलाला कळवली. त्याला वाटलें ही कोणी खोटीच कण्डी पिकवली असेल. कारण हा काल बहुश्रोत्र मुकुल (पुष्कळ उठवलेल्या कंड्यानीं आकुल) झाला होता या कामावर उच्चलानें इल्ला राजाकच नेमलें.

जसें अण्डज पिलूं घरट्यांतून बघतें, तसें तापस आतां अन्न आणील आतां आणील अशी वाट बघत राजानें खिडकींतून वारंवार पाहिलें. तेव्हां त्याला ती कुटी सैनिकांनीं भरलेली दिसली. अगणाच्या द्वाराचा अडसर काढल्याचा ध्वनि ऐकू आला. द्रोह झाल्याचें राजाला कळून आलें. राजानें भय सोडून द्वार उघडलें, व क्षुरिका हातात घेतली. एक साहसी राजावर धावला. राजा व्यायामकुशल होता त्यानें त्या पुरुषाला खालीं पाडलें. हा बराक आला पहिला याला मारून मला काय मोठेपणा असा विचार राजानें मनात आणून त्याला मारलें नाहीं. दुसरा एक सैनिक कुटीच्या छप्परांतून आंत उतरताना पडला. त्याच्यावर

वीरासन निष्ठुर असा राजा बसला. भट्ट्यांत कोंडलेल्या उंदरांभोंवतीं जशीं मार्जारें जमतात तसे शस्त्रधारी डामर कुटींत कोंडलेल्या राजाभोंवतीं जमले. एकानें प्रयागाच्या खांद्यावर व राजाच्या डोक्यावर त्याचे प्रहार चुकवून वार केले. महेश्वर असे दोन वर्ण दोन वेळां म्हणून राजा गतजीव झाला. छिन्नमूल वृक्षाप्रमाणे तो भूमीवर पडला. पळून लपून जसा चोराला योग्य असा मृत्यु या चक्रवर्ती राजाला घरकुटल्यात आला. या विभूतिमान राजाचा दोष म्हणजे न्येयबुद्धित्व होतें. मन्त्र्याचे दोष क्लेशावह झाले. तो ४२ व्या वर्षी लौकिक ४१७७ इ. स. ११०० या वर्षी मारला गेला. त्याची कुण्डली स्वकुलान्तक दुर्योधनाच्या कुंडलीप्रमाणे होती.

(पण तिच्यावरून त्याच्या जन्म मरणाची तिथी जमत नाहींत असे डॉ. स्टीन याचें म्हणणें आहे. तरी ती येथें दिली आहे.)




या राजाचा शिरच्छेद झाला तेव्हां भू सागरासह कंपित झाला. याचें शिर कापून एकानें उच्चलाकडे नेलें. त्यानें तिकडे पाहिलें नाहीं; पण त्याचें त्यानें मागाहून दहन करविलें. धिक्! धिक्! किती कष्टावह स्थिति ही! एखाद्या तस्कराच्या व नग्न अनाथाच्या शरीराच्या दहनाप्रमाणे या चक्रवर्ती राजाच्या शवाची दहनक्रिया एका गौरक नांवाच्या काष्ठागारावरील अधिकाऱ्यानें केली. याच्या अवरोध गृहात एवढ्या स्त्रिया असून कोणी रडली नाहीं. कोणी अनुगमन केलें नाहीं. आधीं नियत असें कांहीं नाहीं तसें पुढें नाहीं. मध्यंतरीं मात्र सौख्य व दौःस्थ्य याच्या अनुरोधानें काहीं घटना प्राण्यांच्या हातून आकस्मिक रीतीनें घडून येते. एखाद्या नटाप्रमाणें नाट्य करून भवजवनिकेनें अंतर्भूत होऊन (पडद्याआड निघून) तो कोठें जातो तें आम्हाला माहित नाहीं.

टीप:- नटः संसारान्ते विशति जमधनी जवनिका॥ असेंच भर्तृहरि म्हणत आहे.

टीप:- हें हर्षाच्या पलायनाचें व अन्ताचें वर्णन प्रत्यक्ष वत् आपल्यापुढें घडत आहे असे वाचकास वाटू लागतें. इतकें यथार्थ तें कवीनें केलें आहे. तें त्याच्या पित्याच्या कडून अथवा पित्याच्या नोकराच्या प्रगायाच्या, तोंडून ऐकावयाला मिळालें असलें पाहिजे.

त्या त्या माणसानें न विचारता इवातसा उपदेश करीत सुटणे हें दुर्भाग्याचें लक्षण सांगून हर्षाच्या दुर्भाग्याच्या वर्णनाला कवीनें आरंभ केला आहे. मंत्री, राजाचे आश्रित ब्राह्मण राजकुमार व अनुग यांचें साहाय्य मिळेल या आशेनें राजाचें दारोदार फिरणे इत्यादी वर्णनानें सचेतन वाचकांचीच सहानुभूति हर्षाकडे कवीनें वळवली इतकेंच नाहीं तर रात्रीं चन्द्र हिमबिन्दू आकाशाला गाळावयाला लावून व चक्रवाकांना आक्रन्द करावयास लावून वाचकेतर जड सृष्टीचीहि सहानुभूति हर्षाकडे वळविली आहे. पुत्र भोज मृत झाला असें ऐकून त्याच्या यौवनानें रुद झालेल्या वक्षावर हार रुळत आहे व आपण त्यास आशीर्वाद देत आहोत असे राजाला स्वल्पानें वाटवून कवीनें येथें उत्कृष्ट भाविक नांवाचा अलंकार साधला आहे. सर्व लोकाचा एकच चक्षु जो रवि तो परलोकाला गेला तरी लोक घरोघर जाऊन निजतात. शोक करीत बसत नाहींत. हा राजाच्या दुःस्थितींतहि लोक मजा मारतात या गोष्टीला दिलेला दृष्टान्त वाचकाच्या मनात फार कळवळा उत्पन्न करतात. कुटींत शत्रूंनें कोंडलेल्या राजाला भाड्यांत कोंडलेल्या उंदराभोंवतीं जमलेल्या मार्जाराची उपमा सहज सुंदर आहे. हर्षाच्या या अंताच्या वर्णनात करुण रसाचा जवढा परिपाक झालेला आहे तेवढा अन्यत्र फारच थोड्या ठिकाणीं सापडेल.

# तरंग ८ वा

## शिवप्रार्थना

ज्या पार्वतीच्या अर्धशरीरात वास करताना चारित्र्य चर्या जाणणाऱ्या शंकरानें तेथून प्रौढ कंचुकी वृद्धवर वृष, कुब्ज हिमकर या आप्तांचा सर्व परिकर बहिष्कृत केला ती पार्वती दुरिताचा नाश करो.

टीप:—या नाटींत चतुर उच्चलानें एकामागून एक अशा डामरादिक शत्रूंचा व बंडखोर आप्तांचा मोड केल्याचें सूचित केलें आहे.

चपकाचा भाऊ व हर्षाचा गायक जो कनक, त्यानें काशीस जाऊन जीविताचा त्याग केला. ही (जपानी लोकांची हरिकारी आहे.) व हर्षाविषयीं कृतज्ञता दाखविली.

उच्चलाच्या मनात सर्वदा दौःस्थ्य उत्पन्न व्हायला दोन कारणें होतीं.

(१) एकीभूत डामरांचा संघ, व (२) राज्याचे दोन विभाग करण्याची इच्छा करणारा त्याचा सोदर सुस्सल.

सुस्सलचा सन्मान करून त्याला लोहरकोटाशी संबंध असलेल्या दुसऱ्या मण्डळावर राज्य करावयास लावून दिलें.

हर्षाचा मुलगा जो भोज त्याला, त्याचे पहिले मुलगे मृत झाल्यावर त्याला जो एक मुलगा झाला, तो वाचावा म्हणून गुरुनीं त्याचें भिक्षाचर असें अभव्य नाव ठेवलें.

हा शत्रूच्या वशातील तन्तु याला अप्रिय प्रकारें वागविणें उचित असें असतां दर्पानें व पळून गेलेल्या लोहरच्या डामराचें जनकचंद्राचें ऐकून उच्चलानें त्याला राणीच्या अंगावर रक्षणार्थ आणून ठेवलें. याला हातात ठेऊन आपण राज्य करावें असा जनकचंद्राचा हेतु होता. तोंपर्यंत त्याचें इंगित जाणून उच्चलानें नीतिकौटिल्य धारण केलें.

## ( १ ) उच्चल

### उच्चल प्रथम सामादी उपायांनी अथवा अपायांनीं डामरांची वाट लावतो.

उच्चलानें जनकचंद्राला द्वारपति केलें. हेतु असा कीं त्याचा सत्कार झालेला पाहून आपला तो तुल्य त्याचा वरचढपणा सहन न होऊन अन्य डामर क्रुद्ध व्हावे. त्याप्रमाणें भीमादी डामरांचे मनात प्रक्रिया उत्पन्न होऊन त्याचें मात्सर्य समाप्तीस पोचलें. भीमादेवाच्या गेहगगनाधिपतीनें (दिवोविनिहानें) युद्धात द्विभाद्रपदात (अधिक भाद्रपदात) कमी नाहीं अधिक नाहीं अशा तीन पक्षानीं (पक्षरक्ष्यानीं) जनकचंद्राचा मध्य द्विधा केला.

मग उच्चलानें क्रम राज्यांतील डामराकडून आपल्या घोड्यांचा व सैन्याचा त्याग करविला. मडव राज्यातील विप्रियप्रिय डामरास शूलावर चढविलें.

### अनुयुक्त भीमदेवानें उच्चलाला दिलेल्या दान शिक्षा

एकीप्रमाणें लोकवार्ता मिळविण्यास तो सकाळीं बाहेर पडून दिवसक्षय होई तों हिंडे व दुसरीप्रमाणें उत्थानशील राहून वैन्यानें नाव ऐकताच त्याचा मोड करी.

### उच्चल जनतेची प्रीति संपादन करतो

कोणी प्रायोपवेशन करून मरण कवटाळलें तर धर्माध्यक्षाकडून हा राजा त्याची नीट प्रत्यवेक्षा करी—दुर्बलावर हा अनुग्रह करी म्हणून सर्व जनता प्रबळ झाली. व अधिकारी दुर्बल झाले. तस्करांना तो कोशदक्ष करी. व चौर्याचरणापासून निवृत्त करी व त्याचें जीविन अनिंद्य करी. हा राजा सुलभदर्शन होता. त्याचे आलाप प्रिय असत. या राजाची सेवा एका क्षणात इंद्रजालिकानीं उत्पन्न केलेल्या तरुप्रमाणे फलद्रुप होई. उच्चलाचा अवर्णनीय गुण म्हणजे, अर्थनैस्पृह्य. दण्डास योग्य पुरुषाला हा दण्ड करी व त्याच्या उपयोगानें त्याचीच शुद्धि होण्यास त्याच पुरुषाकडून सत्कर्म करवी. यानें दिलेलें दान अनुदार कालक्षेप करून सत्कार केल्याशिवाय केलेलें, किंवा दूत नीं अर्धे काढून घेतलेलें नव्हे. हा वृत्तिहीनांना वेतन देत असे. आपलें संचित अन्न अल्प मूल्यानें विकून दुर्भिक्ष तत्काल दूर करी. श्राद्धे, ग्रहणें, ग्रहशान्ति इ. प्रसंगीं ब्राह्मणांना दान देऊन भजे. याला जीर्णोद्धाराचें व्यसन होतें. हर्षानें नेलेली परिहास केशवाची मूर्ति, पुन्हा यानें पुरात स्थापन केली. शुकावलि नवयानें बांधून त्रिभुवन स्वामीचें मंदिर सुशोभित केलें.

### प्रजापीडक कायस्थांस उच्चल शासन करतो

पितरं कर्कटो हन्ति मातरं हन्ति पुत्तिका ।
हन्ति सर्वंतु कायस्थः कृतघ्नः प्राप्तसंभवः ॥ ८९ ॥

अर्थः—खेकडा, पित्याचा, वाळवी, मातेचा; व कृतघ्न कायस्थ संभव प्राप्त झाला असता सर्वांचा नाश करतो. असल्या श्लोकांतील ऐतिहासिनी नीतीवर श्रद्धा ठेऊन, अशा कायस्थांना कारागृहात शणाची वस्त्रें वापरावयास यानें लावलें. सभ्यवादानें बागलेल्या वेश्यानीं व विटानीं वेढलेल्या वृद्ध कायस्थाला आपल्या पुढें हावभाव करून नाचावयाला लावलें. तसेंच दुसऱ्या एकाला त्याचा अर्धा मूर्धा भादरून, शकटाला बांधलें, कांहीं कायस्थ मडकीं वाजवीत भिक्षा मागू लागले. कांहीं ज्योतिषांमागें आपलें जातक व स्वप्नें कळवीत, कांहीं भारतस्तवराजाचा (मुख्य मुख्य स्तोत्राचा) पाठ करूं लागले. कांहीं आचारदीक्षितांकडून स्मशानाची सेवा करूं लागले. पाहिजे ते लिखाणें हें भूर्जपत्राप्रमाणें सोपे आहे असें समजून बालांप्रमाणें आचार्यांच्या घरीं कांहीं शिक्षा घेऊ लागले. याचें शीघ्र दण्डत्व बहुमत झालें. क्षुद्राश्व (अंडेल तट्टू) कायस्थ व वैरी, याना उच्चिग केलेल्या दण्डाची प्रशंसा नीतिविशारदजन करीत नाहींत. दण्ड केलेल्यांच्या भावनाना या विचारशील राजानें पिडा केली नाहीं. चुगलखोरांना शिक्षा करून या राजानें पैशुन्याचा मार्ग बंद केला. प्रजा या राजाशीं प्रणित होती. एकावणिज्याच्या व त्याच्या कुलाच्या वादात न्यायाधिशाना गोचर न झालेल्याना सत्याचा च्छेद या राजानें केला.

### उच्चलानें केलेल्या न्यायदानाची गोष्ट ( सावकारी पाश )

एका सद्भाववंत वाण्याजवळ एक लक्ष दिनार, औपयिक (आपल्याला आयत्या वेळेस उपयोगी पडावे म्हणून राखून

ठेवलेलें धन ) ठेव म्हणून ठेवले. त्यातून त्यानें खर्चाकरता काहीं भाग मधून मधून घेतले. तीस चीस वर्षांनीं उरलेलें धन परत मिळविण्याविषयीं त्यानें वाण्याजवळ प्रार्थना केली. कुकर्मी वाणी ठेव गिळण्याच्या उद्योगात होता. कालक्षेहरणार्थ त्यानें नाना निमित्तें सांगितली.

स्रोतोभिर्न्यस्तमम्भोब्धेर्लभ्य मेघमुखेर्जलम् ।

प्राप्तिर्भूयस्तु नास्त्येव वाणिग्यहस्तन्यस्तवस्तुनः ॥

अर्थः—नद्यानीं समुद्रांत सोडलेलें जल मेघमुखानीं परत मिळेल, पण वाण्याजवळ ठेवलेली वस्तु मात्र परत मिळणार नाहीं. तैलाप्रमाणें स्निग्धमुखाचा, स्वल्प बोलणारा मृदु आकृतीचा, असा वाणी न्यास मिळावयाच्या वादांत उग्र होतो व वाघासहि मागें टाकतो. वादामध्यें पूर्वीचें सख्य दाखविणाऱ्या स्मितानें शेटजींचें शाठ्य गेलें असें जरी वाटले तरी तो प्राणान्तींहि सोडीत नाहीं. वेश्या, कायस्थ, दिम्बिर व हे वाणी, निसर्गानेंच वंचक असतात. ललाट, दृग्पुटें, श्रोत्रद्वन्द्व व हृदय यावर चन्दन लावलेला वाणी षड्बिन्दुधारण करणाऱ्या वृश्चिकाप्रमाणें क्षणात प्राणघात करतो. वर्णानें पाण्डु व श्याम, सूची ( सुई ) प्रमाणें तोंड असलेला, गहन पोटाचा तुम्बीफलाप्रमाणें दिसणारा वाणी रक्तमांस शोषून घेतो. आता सर्वंवाद संपले तेव्हा कुलाचा निर्बन्ध पाहून वाणी रागावला. भिवया जदवून, गणना पत्रिका ( हिशोबाची वही ) दखवून, तो म्हणाला आधीचें ऐवज सर्व अंऐवज झालें. ( पूर्वीची जमा होती ती सर्व खर्ची टाकली गेली. ) ही पहा ( आतंरेषु ) पुलावरून जाण्यास, बहार्थ दिन्नार, नाके पट्टी म्हणून घेतलीस, छिन्न उपानह ( फाटके जोडे ) व चाबूक शिवण्यास, चर्मकाराला शंभर दिन्नार दिलेस, पायावर विपादिका ( गळू ) झालेल्या हातीनें घृताकरतां नेले ते पन्नास. मडक्याचा भारा फुटला म्हणून आक्रोश करणाऱ्या कुम्भारणीला, कृपा करून तू दिलेस, ते पुष्कळ वेळा पहा. हे तीनशें भूर्जपत्रावर लिहिलेले आहेत. मांजराच्या पिलाना पोसण्याकरता वात्सल्यानें उंदीर विकत घेतलेस व मत्स्यरस आणलास तेव्हांचे शंभर, तसेंच पायाना लावण्याला लोणी, श्राद्ध पक्षातील, स्नान समयीं लावण्याचें तांदुळांचें पीठ, घृत व माक्षिक, हे जिन्नस तू सातशें दिन्नार घेऊन विकत आणलेस. कासमुळें झालेला आयास दवडण्याकरता, तुझ्या अर्भकानें मध व आलें नेलें, मुलाची भाषा अव्यक्त, त्याला कुठें बोलतां येत होतें म्हणून शंभर मोडलें. भूषण उपटून हातानें याचना करणाऱ्या भिक्षाचराचें निवारण करण्यास तो युद्धपटु असल्यामुळें त्याला दिलेस ते तीनशें. भट्टारादांना ( गुरूना ) घरीं आणले वेळीं, धूप, पलाडु व शंदामूळ आणण्याकरता जो खर्च झाला, त्याचे बरोबरीनें शंभर, किंवा दोनशें धर.

याप्रमाणें अयुक्त, व अपरिहार्य असा झालेल्या सर्व खर्चाची गणना करून त्यानें हळूहळू आपलेंच येणें दाखविलें. वर्ष मास, ग्रह, तिथी याची प्रत्यावृत्ति या संसार चक्रांत पुन्हा होतच असते. त्या प्रमाणें तो वाणी आपल्या बोटावर पुन्हा पुन्हा त्याच त्याच रकमा दाखवी, नंतर मूळ घेतलेली रक्कम, मध्यंतरीच्या रकमा, याची बेरीज करून ओष्ठप्रसार करीत, डोळे मिचकावीत तो वाणी, मृदु शब्दात म्हणाला "हें शल्य काढून टाक, व तुझा निक्षेप घेऊन जा. पण या रकमा विश्रमानें दिलेल्या आहेत. त्या निर्दंभ प्रकारानें सव्याज दे.

त्याचें वचन धर्म्य आहे असें वाटून, कुलानें क्षणभर निःश्वास टाकला. पण नंतर तें मधुलिप्त क्षुर (सुरी) आहे असें जाणून त्याला ताप झाला युक्तीनें हरण केलेलें त्याचें सर्वस्व धन तो अर्थक (कुळ) त्या अनार्य व क्रूर सावकाराजवळून वादांत परत घेऊ शकेना! विचारी न्यायाधिकारीसुद्धा तसेच, हा न्याय त्यानीं राजापुढें ठेवला. तो असा आहे असा निश्चय करून, राजा वाण्याला म्हणाला, अद्यापि न्यास ठेवलेले दिन्नार, मग ते किती का थोडे असतना! असले तर दाखव म्हणजे यथायोग्य असेल तें सांगेन.

तसें सावकारानें केल्यावर ते दिन्नार पाहून तो राजा मन्त्र्याना म्हणाला, "पुढें येणाऱ्या भावी राजाच्या नावानें टक पाडतात कीं काय? नाहीं. तर कलशभूपतीच्या काळीं न्यासीकृत ( ठेव ) ठेवलेल्या या दिन्नारात माझ्या नावानें अंकित असे दिन्नार कोठून आले? ठेव ठेवलेल्या दिन्नारांवर वाण्यानें व्यवहार केला. तसें ठेव ठेवणाऱ्यानें वाण्याजवळून मधून मधून द्रव्य नेलें म्हणून ठेव ठेवणाऱ्यानें ज्या रकमा घेतल्या त्या त्यानें परत व्याजासकट द्याव्या. तसेंच वाण्यानें लक्ष दिन्नारवरचें व्याज द्यावें व मौलिक मूळ ठेवीचें धन द्यावें हें सांगावयास नकोच. माझ्यासारखा सघृण मनुष्य इतकेंच म्हणेल पण श्रीयशस्कर राजाप्रमाणें याच्या बाबतीत रौक्ष्य धारण करणें युक्त आहे.

विवादे सदिहानस्य, युक्तक्षन्त्यानुशासनम् ।

भाव्यं दण्डधराचारैः प्रयुक्तः कुसृतैः पुनः ॥

( भावार्थ ) विवादामध्यें चुकून झालेल्या अपराधाचें शासन क्षान्तीनेच झालें पाहिजे. पण मुद्दाम कुमार्गानें केलेल्या अपराधाचें शासन दण्डधराच्या आचराप्रमाणें जबर असलें पाहिजे.

टीपः—या गोष्टींत वणिजाचें वर्णन स्वभावोक्त आहे. चन्दनबिन्दुधारण करणाऱ्या वाण्याला षड्बिन्दु धारण करणाऱ्या विंचवाची उपमा प्राणघातकपणाच्या समान धर्मावर दिलेली फार सुंदर आहे. कुलानें मधून मधून द्रव्य नेलें तें

कोणत्या कारणांकरतां तीं सांगताना काश्मीरी लोकांच्या चाली-रीतींवर कवीनें फार कोरडे ओढले आहेत. त्यांत विनोद भरपूर आहे. तो काश्मीरी आहे.

मनूप्रमाणें वर्तन करणाऱ्या या राजाचें वर्तन निर्दोष नव्हतें. या राजानें सख्यातीत महायोद्धे आपल्या युद्धश्रद्धा-लुतेनें नष्ट केले. द्वन्द्व युद्ध खेळणाऱ्याना तो द्रव्य देई. मद्दो-त्सवासारखी एकहि पर्वणी नव्हती की जींत बशाला ललामभूत असे घरांतून नाचत नाचत बाहेर पडलेले योद्धे राजाच्या रक्त-सिक्त अशा अंगणातून लुताग अथवा मृत झालले बान्धवानीं उचलून परत नेले नाहींत. मृत योद्धे पाहून राजाला मोह होई. व्यथा होत नसे. पती घरात परत आले म्हणजे दिवस पद्रात पडला असें वीरागना म्हणत.

कामण चूर्ण (वशीकरण चूर्ण) लावलेल्या वेश्येप्रमाणें

आज्ञा केली की ह्यांच्या नातवाचा (भिक्षाराचा) वध करा. त्यानीं त्याला राणी जयमतीच्या वाड्यातून, मध्यरात्रीला उचलून वितस्तेच्या जलांत फेकून दिलें. उराचें स्पदन चालू असताच तो एका ब्राह्मणाचे हातीं लागला. त्याला दक्षिणापथानें नेण्यात आलें. मलवेन्द्र राजानें त्याचें पुत्रवत् पालन केलें व त्यास शस्त्रविद्या शिकवली. हा राजत्रीजी, भिक्षा-चर, राजांच्या नाशा करता वाढला गेला. उपद्रवांचा उदय पाहून दिर्घावलोकीविधि. प्रतिकाराची कल्पना रचून ठेवतो. विषवृक्षाच्या जवळ त्याच्या प्रतिकाराची वल्ली रुजते. पर्ज-न्यानें पाणी गढूळ होण्याच्या वेळीच अगस्त्योदय होत असतो. याचवेळीं जगदुद्धार समर्थ असा सुस्सल राजाला पुत्र झाला. त्याच्या जन्मकालाच्या आरंभापासून सुस्सलाला जय मिळत गेल्यामुळें या पुत्राचें नाव सुस्सलनें जयसिंह असें ठेवलें. त्याच्या शरीरावर शुभलक्षणाच्या मुद्रा होत्या.

राजा स्वयमू अग्नि पहाण्यास वर्हणचक्राख्य गांवीं गेला. डोंगरात असख्य चाण्डाळांनी एक रात्र त्याचा मार्ग निरुद्ध केला. वात जसा गिरिगव्हरांत उठून अरण्यांत दिर्घत्व पावतो, तसा राजा नाहीं ही सक्षोभकारिणीवार्ता राजाच्या स्कन्धा-वारांत उठून राजधानींत दीर्घत्व पावली. य वेळेला यशस्कराचा भाजा कामदेव याच्या वशातील रड्डु, दड्डु व रुछड्डु असे भाऊ नगरांत राजानें मन्त्रिपदावर स्थापलेलें होते. त्यतील रुछडु हा नगराधिप होता. शासड सड्डु म्हणून एक भारवा-काचा पुत्र गंजाध्यक्ष होता. त्यच्या मनांत राज्यलालसा उत्पन्न झाली- परन्तु राजा जिवन्त आहे अशी वार्ता कळतांच त्यांची राज्यलालसा उडाली, राजानें रड्डुदिकांचे अधिकार काढून त्यांस मध्यम वृत्तीचें केले. रड्डुची माता शेजाऱ्याशीं प्रेमबद्ध झाली. मुलानीं शासन केलें नाहीं म्हणून राजानें

तिचें प्रथम नाक कापलें, व मग त्या नाक कापलेलीचे मुलगे कोठें आहेत असें रुक्षपणें राजा लोकांस विचारू लागला सड्डु कोशातील द्रव्य खातो असें राजाला कळल्या-वरून त्याला राजानें त्याच्या प्रवेशभागिकेच्या कामावरून दूर केलें.

रड्डुछड्डुदिकांनीं राजाला मारण्याचा वट करून शपथा घेतल्या, ते उदर, पार्श्व व पृष्ठ भाग, लोखंडी चिलखतानें झाकून, राजाच्या मागून जात भोगसेन राजाचा आदिसुहृद् होता. या वीरानें डामर जिंकले होते. सुस्सलालाहि तो जिंकणार होता. पणबद्धावत्सल्यानें राजा तसे त्याला वरू देईना. म्हणून त्यानें राजाची निंदा केली. त्याला राजानें द्वाररक्षकाच्या कामावरून दूर केलें. त्याला रड्डुदिकांनीं कटात घेण्याचा प्रयत्न केला तरी हा सरळ मनाचा वीर राजाला भेटला. व म्हणाला मला तुला कांहीं एकान्तात सांगावयाचें आहे. राजा म्हणाला "तू काय सांगणार आहेस? मी तुला पुन्हा द्वाररक्षकाच्या कामावर घेणार नाहीं." उन्हाळ्याच्या तडाक्यात निद्रिस्त झालेला पुरुष गतस्मृति होतो आणि जो त्याला जागें करतो, त्याचाच द्वेष करतो. भोगसेन द्रोही पक्षाला मिळाला.

एक दिवस रात्रीं भोजन झाल्यावर लहान दिव्याच्या उजेडांत राजा, राणी * उजळेच्या महालात जावयास निघाला. वाटेंत रड्डुछड्डुदिकांनीं त्याला वेढलें. कांहीं विनवणी करण्याच्या दमानें एकानें राजापुढें गुडघे टेंकून त्याची वाट अडवली दुसऱ्यानें त्याच्या अंगात शस्त्र खुपसलें. ज्याचें पदाहरण केलेंस तो मीं असें म्हणून रड्डुनें त्याची मान कापली. यापूर्वी त्याच्यावर एक निद्रोह कायस्थ पडला. दुसरा राजपक्षीय श्वानाप्रमाणें मुच्छोपम सुरी लपवून पळाला. भोगसेन बचत राहिला. द्रोह! द्रोह! असें मोठ्यानें ओरडून वीरवृत्तीनें रड्डुचें विदारण करून, रड्डुला क्षत करून लौ ४१८७ पौष शुद्ध सप्तमीला स्वर्गेच्या एका मृत्यु पथानें जात असता मी मारला, हा मेला, भेदाचा मद मित काळ पूरताच असतो, राजद्रोह्यांना मारण्याचें काम लोहरच्या डामर गर्गचन्द्र या वीरानें केलें.

## २ रड्डु

स्मशानातील शिळेवर जसा वेताळ, तसा उच्चलाच्या सिंहासनावर, हा रुधिरमंडित रड्डु बसला. पौरानीं अवस्कर प्रणालींत (शौचकूपाच्या मोरींत) दगडानें रड्डुचें डोकें ठेवले. इतर द्रोह्यांना बांधून त्यांची थूःकार पूजा केली.

* जयमतीवरून राजाचें मन उडालें होतें कारण कोणी म्हणतात तिनें भिक्षाचरांचें रक्षण केलें.

उच्चलाच्या दोन सावत्रभावापैकीं सल्हणाला गर्गानें राजा केलें. रात्रीं उच्चलाचीं, सकाळीं रड्डाची ऊर्फ शंख राजाची व दुपारीं सल्हणाची अशी त्रयी दृश्य झाली.

## ३ राजा सल्हण

लोहर कोटांत असलेल्या सुस्सलाला उच्चलाच्या मरणाचें वृत्त कळताच तो सैन्यानिशीं काश्मीराकडे वळला. वाटेंत गर्गाचा दूत भेटला. तो म्हणाला "आता जाऊन उपयोग काय? सल्हण नृप झाला." सुस्सलानें उत्तर दिलें, "माझा वडीलभाऊ व मी मिळून जें हें राज्य मिळविलें तें आम्हाला कोणी द्यावयाला नव्हता. ज्या क्रमानें (उपायानें) आम्हीं तें मिळविलें. तो कोठें गेला नाहीं असें म्हणून तो योग्य प्रसंगाची वाट बघत बसला. सल्हण राजाचा राज्यकाल अल्पच होता. पण तो दीर्घरात्रीं पडलेल्या स्वप्नाप्रमाणें दुःसह होता.

टीप:—अल्प राज्याला दीर्घ रात्री पडलेल्या स्वप्नाची उपमा उत्कृष्ट आहे.

राजा व्यवहारात प्रमाद करी. तापसाशीं गोष्टी करण्याला उचित अशा आपल्या भावाच्या लोठणाच्या श्वशूराला (उज-धिहाला) ज्या जागेवर निष्ठुर विक्रम करावा लागतो. त्या द्वारपालाच्या जागेवर राजानें नेमलें. कारण तो म्हणे कीं सुस्सल आला, म्हणजे मी आपल्या मंत्राचा लक्ष जप करून पळवून लावीन, राजामध्यें मंत्र नव्हता, पराक्रम नव्हता, व कौटिल्य नव्हतें.

हा योग्य काळ ओळखून सुस्सल काश्मीराकडे वळला. वाटेंत गर्गाची एक मुलगी स्त्री करून घेतली, व दुसरी पुत्राला (जयधिहाला) करून घेतली, व गर्गाशीं संधि केला. सुस्सलानें आपल्या सैन्यानिशी राजवाड्याला वेढा दिला. तमोरींचा (खिडक्यांचा) छेद करूनअंगणातील लोकांशीं पालगी वृत्तीनें लढू लागला. आतील बाहेरील लोकांचें निर्विभाग युद्ध सुरू झालें. सुस्सल सिंहासनावर बसला नसताच सुस्सलो जयति असा ध्वनि निघाला. सुस्सलानें सल्हण व लोठण यास तुम्ही अद्यापि लहान बालकें आहात असें म्हणून त्यांच्याकडून शस्त्रन्यास करविला. अशी शोचनीय स्थिति करून त्यांस लौ. ४१८८ इ. स. ११९२ या वर्षी बंधनांत टाकलें. सल्हणानें तीन दिवस कमी चार महिने राज्य केलें.

# (४) राजा सुस्सल

## (ऊच्चल व सुस्सल या भावांच्या स्वभावाचें वर्णन)

सुस्सल आर्द्रहृदय होता. पण शत्रूचें उच्चाटन करण्याला त्यानें भितींतील सर्पाप्रमाणें अवास्तव भीमत्व अंगिकारलें होतें. सुस्सलासारखा, कालवित्, इंगितज्ञ व दूरदृष्टि दुसरा नव्हता. वडीलभावाशीं (उच्चलाशीं) याचें स्वभावैक्य होतें. तथापि दोष अथवा गुण यासबंधीं म्हणाल तर ते कांहीं अधिक होते, कांहीं न्यून होते व कांहीं समान होते. सुस्सलाचा राग गार्वील माशीच्या दंशासारखा होता. उच्चलाचा पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषासारखा दुःसह होता. वडील भावापेक्षा सुस्सल गुणांनीं अधिक होता असें म्हणणें तर त्यातून फक्त अर्थनैस्पृह्य व सेवकास दुर्लभ दर्शित्व हे गुण वगळले म्हणजे झालें. हा द्रव्यलोभी संपदेचा संचय करी पण वेळीं धनाचा वर्षाव करी. पुष्कळ रेशमी वस्त्रें देणाऱ्या या राजाचा इंद्र द्वादशीचा उत्सव शोभायमान होत असे.

टीप:—अशी घटीं जानसननें कवि चरित्रात उपयोगात आणलेली आहे. (पहा विशेषतः डायडन व पोप यांच्या गुणांची तुलना.)

## राजा कोश वृद्धि करतो

लोहरचा डामर गर्ग, शमालाचा डामर पृथ्वीहर, कंपनाधि-पति तिलक, सहेल, इत्यादि महत्तमांना दूर करून, राजानें गौराभिध कायस्थाला सर्वाधिकारी नेमलें. त्यानें राजोप-जीवींच्या वृत्त्या बंद करून, कोशांत भर घातली. व सर्व द्रव्य लोहर कोटाला पाठवून दिलें. राजा अप्रिय झाला.

कनक नांवाच्या कायस्थानें आपल्या द्रव्यानें अविछिन्न अन्नछत्रें घालून नाना दिगन्तरांतून आलेल्या दुष्काळ पीडि-तांची पीडा शान्त केली.

## राजा पुन्हां डामरांकडे वळतो व एकामागून एक अशा सर्वांचा नाश करतो

राजानें गर्गाचा पुरा निःपात करण्याचें मनांत आणलें. मल्लकोष्ट म्हणून एक गर्गाचा शत्रू होता. त्याला गर्गानें बंधनात टाकलें होतें. त्याला राजानें बंधमुक्त केलें. दुसऱ्या डामराशीं त्याचें यौनसंबंधानें त्याचें नातें जुळवून त्याचें बळ वाढविलें. नीचांना राजानें समशीर्षकानें वागविलें म्हणून गर्ग शंकित झाला. गर्गाशीं युद्ध करून त्याला कंपनेश तिलकानें त्रस्त केलें. संधि करण्याकरिता गर्गानें आपली पत्नी व पुत्र राजाकडे पाठविलीं. राग मनांत ठेऊन राजानें संधि केला. व त्याच्याकडून शस्त्रन्यास करविला. व एक दिवस दरदांचा राजा मणिधर, राजाच्या भेटीला आला असतां, त्याच्याकडून गर्गाचा त्याच्या तीन मुलांसह खून करविला.

पृथ्वीहर व त्याचा भाऊ क्षीर शमालाचे अमर यांनी शमाला प्रान्तात डामरांचा लय केला. कल्पनाधिपतीला प्रवेश दिला नाहीं. त्याचा अपमान झाला. माणसें जसें सर्पाकीर्ण घर सोडून जातात त्याप्रमाणें तो प्रभूला सोडून गेला.

राजानें कार्याचें अनुसंधान सोडलें म्हणून अठरा डामरानी धान्याचीं कोठारें लुटलीं. तुरग आणि उंट रोगानीं मरण पावलीं. मण्डळावर महाभय प्राप्त होणार असें सूचित झालें. पृथ्वीहरानें श्रीनगराजवळचा नागमठ जाळला.

राजा क्रूर पद्धतीनें वागला. राजाजवळ पृथ्वीहराबद्दल जो एक नीवि (ओलीस) होता. त्याला मारून त्याच्यावर विसतन्तु टेऊन (मासावरोबर विसतन्तु खाण्याची काश्मीरात चाल आहे) तें समोज्य वस्तूची भेट म्हणून पृथ्वीहराकडे राजानें दिलें अशीं नातेवाईकाची प्रेतें राजानें अनेक डामराकडे लवून दिलीं.

भिक्षाचराचा सेनापति बली विजय विषमटाच्या मार्गानें देवसरात प्रवेश करू पहात होता. त्याला कम्पनाधिपतीनें, तिलकानें पळविलें. पळतांना विजय एका श्वभ्रावरून,(कड्यावरून) पडून मेला. त्याचें शिर कम्पनाधिपतिनें विजयश्रीचें फळ म्हणून राजाकडे पाठविलें. कृतघ्नता वरून राजानें कम्पनाधिपतीचा सत्कार केला नाहीं. उलट त्याला निरोप ठविला कीं विजयाला एका श्वभ्र नांवाच्या कम्पनाधिपतीनें मारलें. तेथें तुझ्या उत्सेकाचें काय? कम्पनाधिपति तिलकाच्या मनात अप्रीति उत्पन्न झाली. सर्व प्रकारें राजा कृतघ्न आहे. असें तिलक समजला.

> पट वन्हिस्पृष्टवल्कितमहिदंष्ट्रात्वचमरेः।
>
> श्रुति यात मन्त्र, पतननिरता जीर्ण वसतिम्॥
>
> असेवाज्ञ भूप व्यसनविमुख स्निग्धमजहन्।
>
> न धीरोऽप्यु यानोद्गतमहिमा शर्म लभते ॥६९२॥

(अर्थ) वन्हिस्पर्शानें पेटलेले वस्त्र, अहिदंष्ट्रत्वचा, शत्रूच्या कानीं पडलेला मन्त्र, पडावयाला झालेलें जीर्ण घर, सेवा न स्मरणारा भूप, संकटसमयीं विमुख झालेला स्नेही यांचा त्याग न केला तर धीराला सुद्धा त्याचा उदय पावणारा महिमा उद्धत होऊन त्याला कल्याण प्राप्त होत नाहीं.

मल्लकोष्ठानें भिक्षाचरास आणावयास पाठविलें.

## राज्यावर संकट आलें असतां पसरणाऱ्या वार्ता व त्यावर भरंवसा ठेवणारी भोळसट मण्डळी

ठिकठिकाणीं कर्णोकर्णिका पसरल्या. कीं संस्कृत नाहीं तें भिक्षाचर करीत नाहीं. तो एका बाणानें दहा शिला फोडतो. शत योजनें जातो येतो, दमत नाहीं. याप्रमाणें पलिनशीर्ष व लम्बकूर्च महात्म्यांनीं भिक्षूच्या महात्म्याची स्तुती करून त्याविषयीं कौतुक उत्पन्न केलें जणु काय आपण, साम्राज्याच्या अर्धेभागाचे भोगी होणार म्हणून जो तो राजव्यवहारात नसलेभिक्षु विषयीं वार्ता बोलू लागला व पुसू लागला. नदीकाठीं स्नान करण्याला सवकलेले वृद्ध वृद्ध क्षीण नियोगी, (काम जाऊन घरीं बसलेले सरकारी नोकर) राजगृहात न गणले जाणारे नृपात्मज, घोड्यावर बसू इच्छिणारे काही स्वभाव दुर्जन योद्धे, शिष्याकडून नखानीं शिक्षण करवून घेणार (पाठ खाजवून घेणारे) उपाध्याय, देवालयातील वृद्ध नर्तक्या व पालक, ठेवी टाकणारे व पुस्तक (पुराण) श्रवण करण्याला बसणारे सावकार, प्रायोपवेशन करण्यात कुशल असे ब्राह्मण परिषदेतील ब्राह्मण. नगरोपान्तात राहणारे शस्त्रधारी, पण कार्त्तिकाप्रमाणे (नागन्यायप्रमाणे) असणारे डामर व स्वतःला आणि दुसऱ्याला खळबळ उत्पन्न करणाऱ्या गोष्टींनीं सुखवणारे असे जे जन असतात त्यांना प्रायः या देशात राजाच्या विरुद्ध विप्लव प्राप्त झाला असतांच तो प्रिय वाटतोच.

टीप :—प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहून हें वार्ताप्रिय लोकाचें चित्र कवीनें काढलें आहे यातील विनोद काश्मीरी आहे, पण वार्ताप्रियता सर्व देशात आहे.

## सुस्सलाची युद्धाची तयारी व भिक्षूशीं त्याची पहिली लढाई

पिपीलिकाकुळाचें अण्डीअन्नत्रनेणें, गाईच्या उड्या मारण्यानें, सर्पाच्या वृक्षनूर्वावरोहणानें, पर्जन्य जवळ आला असें समजतें, राजाला दुर्निमित्तानें उपद्रव जवळ आला असें समजलें. सुस्सलानें कुटुंबांची माणसें लोहरला लावून दिलीं. वसुना स्वीव करून तो पायदळाचा संग्रह करू लागला. त्यानें शकट हाकणारे व शिकपीजन याकडून शस्त्रग्रहण करवलें. अश्वांना शिकवतें चालून प्रत्येक मार्गात, सेनापती त्याच्याकडून समरोन्मुख व्यायाम करवू लागले.

डामरानीं येऊन राजधानीला वेढा दिला, व कित्येक ठिकाणीं आगी लावल्या. युद्धाला आरंभ झाला. तूर्य वाजवीत सैनिक बाहेर पडू लागले. व शस्त्रक्षत परत येऊ लागले. त्यांना पट्ट्या बांधणें, शल्याचा उद्धार करणें, पथ्य पाण्याकरता धन देणें इ. व्यवस्था करतांना राजा सतत आढळे. प्रवासि वेतन व प्रीति दाय देण्यात राजा निःसंकोच व्यय करू लागला. कल्पनाधीश तिलक शिबिरात साक्षीभूत राहिला.

डामरांनीं उभें पीक जाळल्यास आमचें काय होईल. या भीतीनें विप्रांनीं प्रायोपवेशन सुरू केलें. तटस्थ मध्याकडून जामीन घेण्यास त्यानीं राजाला दिधवलें. पारिषद्य विप्राची ही सेना जणु काय वैऱ्याची दुसरीच सेना राजाजवळ वृद्धि पावली. लवन्यांनीं वड केलें त्यापेक्षा हें ब्राह्मणानीं केलेले बंड राजाला अधिक त्रासदायक झालें. गल रोग पादरोगापेक्षां अधिक व्यथा उत्पन्न करतो. राजाची आस्थान सभा ज्या

शठानी पाहिली नव्हती, ते अव्यवहारिक लोक राजाला अप्रिय बोलू लागले. यातील अधिक चाकिक होते त्यांना राजानें काचनमय उत्कोच ( लाच ) देऊन प्रायोपवेशन थांबविलें

पृथ्वीहरानें मोठ्या सैन्यानिशीं नगरांत प्रवेश केला. नेद मस्तीत्यचिंतयत् ( हें काहीं नाहीं, आता घडणत नाहीं ) असें राजाला वाटू लागलें. जे भृत्य दिवसा पार्थिवाजवळ ते उघडपणें रात्रीं भिक्षाचराला जाऊन मिळत. सुस्सल गेला तर भिक्षु, या महीला सुवर्णपूरीत करील असें लोकांस वाटलें. त्यांनीं भिक्षूचें औदार्य कोठें पाहिलें होतें ? जनलोक गतानुगतिक असतात.

सहस्रातै परिवृता चिरमम्बरेण ।
रेषा स्वयन खलु या शशिनोनवस्य ॥
तस्याजनः प्रकुरुते नतिमम्बरार्थी ।
चित्रलुब्धनामपसरद्सदसद्विचारन् ॥ ७९८ ॥

( अर्थ ) नव्या शशीची रेषा स्वतः अम्बरानें ( आकाशानें ) परिवृत असणारी दिसताच अम्बरार्थी ( वस्त्रार्थी ) जन तिला नमस्कार करितात. सदसत् विचारांना मागें टाकणाऱ्या लुब्धलेला नमस्कार असो.

वेळ पाहून लौ. ४०९६ इ. स. ११८६ या वर्षी राजानें पळ काढिला काहीं अनुगासह लोहाद्री चढून गेला.

## ( ५ ) राजा भिक्षु

दुसरें दिवशीं पदोपदीं घोडा थांबवून सामंतांची पूजा स्वीकारीत भिक्षूनें नगरात प्रवेश केला. भिक्षाचर राजा होणें असंभाव्य होतें म्हणून आतां तो राजा झाल्यावर तो अवतार आहे अशी दुसरीच प्रथा डामरानीं पाडली. जनकसिंहानें याला पुतणी व कपनाधिपतीनें कन्या दिली. कपनाधिपतीचा सावत्र भाऊ बिंब सर्वाधिकारी झाला. मल्लकोष्ठ उपदेशक झाला.

दुसऱ्यानें केलेलें राज्य भिक्षाचरानें पाहिलेलें नव्हतें. म्हणून तो पदोपदीं चुके, दुसऱ्यानें केलेली वैद्यकी न पाहिलेला वैद्य चुकतो. भिक्षाचर सुखाभिलाषी झाला. सभेंत बसविलें असतां त्याला निद्रा घ्याविशी वाटे. त्याचें स्थैर्य पाण्यावर काढलेल्या रेषेप्रमाणें अस्थिर असे त्याचे सचिव जे काहीं बोलत त्याचा तो नुसता पुनरुच्चार करी. त्याचें स्वतःचें असें तोंडातून काहीं निघत नव्हतें.

पृथ्वीहराच्या घराण्यातील मुलीशीं राजानें लग्न लावलें, म्हणून मत्सरानें मल्लकोष्ठ कुपित होऊन निघून गेला. राज्य व्यवहार विसूत्रित झाले. या मण्डळात अराजक झालें; अथवा बहुराजक झालें असें म्हणा. सुवर्ण पद्धति त्रुटित झाली. पुरातन दिनार निष्प्रचार झाले. जुनें शमर देऊन देशी घ्यावे लागत.

भिक्षूनें सैन्य देऊन, सुस्सलाला त्रस्त करण्यास बिम्बाला पाठविलें. विस्मय ( इस्माएल ) तुरुष्क सैन्य घेऊन, बरोबर होता. एक अश्वारोह पाश दाखवून म्हणे मी यानें सुस्सलाला बांधून आणीन.

बिम्ब गेल्यावर त्याची पृथु नेतबिनी पत्नी आमंत्रण देऊन राजाला घरीं आणी. तिच्याकडे अश्वानामागें खाल, कुम्भ व कास्यपात्रानें वादन करीत, असें प्राकृतिकशी तसें तिच्याशीं वागण्या र जाला काहीं लाज वाटल नाहीं.

सुस्सल लोभी व क्रूर म्हणून निंद्य होता. तो आता वंद्य वाटू लागला. पृथक् जन हे पशुप्राय आहेत क्षणात सन्मुख क्षणात विन्मुख होतात. मल्लकोष्ठादिकानीं दूत पाठवून राज्य प्राप्तीकरता सुस्सलाला उद्योग करावयास लाविलें.

## पुरोहित प्रायोपवेशन

तिक्काच्या ( तिलकाच्या ) लोकानीं अक्षोसुवाग्रहार लुटला, पुरोहित पारिषद्यानीं प्रायोपवेशन सुरू केलें. परिषद समाज अदृष्टपूर्व होता. पालखींत ठेवलेल्या देवाच्या प्रतिमानीं अंगण आच्छादित होतें. पदरी छत्रें व चामरें यानीं त्याला चांगली शोभा आली होती. काहल कास्य वाद्यानीं दिग्मुखें शोभित झाली होती. ब्राह्मण म्हणाले आम्हाला सुस्सलाशिवाय सद्गति नाहीं.

भिक्षाचरानें नगरात (विरक्त) भेदिल झालेल्या लोकांची सभा भरविली. शठबुद्धीच्या लोकानीं त्याला उकसोत अडथळा केला विप्रानें सस्पृष्ट झालेल्याना औषध नाहीं.

## सुस्सलाचें भिक्षूशीं दुसरें युद्ध

पर्णोत्सवांत सुस्सलानें भिक्षूला हरवलें. भिक्षू या तुरुष्क सैन्याचा सुस्सलानें कवल केल. ज्येष्ठ वद्य तृतीयेला, लौ. ४१९७ इ. स. ११२१ या वर्षी सुस्सलानें श्रीनगरात प्रवेश केला. भिक्षू पृथ्वीहरासह राजपुरीच्या सोमपालाकडे आश्रयास गेला.

## सुस्सल व भिक्षु यांचें तिसरें युद्ध

मडव राज्यातील मखप्रस्थादी डामर मिळवून विजयेश्वरी सुस्सलाच्या सैन्याला भिक्षूनें पळविलें. भीतीनें जागजागचे लोक व राजाचे स्वार चक्रधराच्या देवळात शिरले. देवळांत धन धान्य पशू होते, भिक्षूच्या सैन्यानें त्यास लुटण्यास देवळाला वेढा दिला. द्वारद्वारानें व वप्रानें रक्षित अशा या देवळाला एका डामरानें आग लावली.

## चक्रधराच्या देवळाला लावलेली आग

आतील अश्व उधळले. त्यांच्या टापांखालीं लोक मेले. मोठाल्या लांकडाच्या गांठी फुटून चटचटा शब्द निघू लागला, घरट्यावाटोळें फिरणाऱ्या पक्षाच्या आक्रन्दनानें, नभ भरलें. दह्यमान मनुष्याच्या ओरडण्यानें भूमि मुखरित झाली अग्नीनें दग्ध झाले त्याहून धामाधूम होऊन अधिक मेले. मग सर्व

निःशब्द झालें. बन्दीचा कडकडा शब्द पुष्कळ नष्ट झाला. तेव्हां शिकणाऱ्या शवौघाचा सिमसिमा ध्वनि ऐकू येऊ लागला. वसा व मेद यांचा दुर्गंधि काहीं योजनें पसरला. एक मस्तकाचा डामर शत्रें शोषित होता. त्याला कापालिकाप्रमाणें संतोष झाला. या कुकर्मानें भिक्षूचा त्याग लक्ष्मीनें केला. भिक्षु विजयेश्वराकडे वळला.

## सुस्सल व भिक्षु यांचें चवथें युद्ध

कमराज्यात आनंद द्वाराधिप होता. त्यानें पृथ्वीहराशीं (भिक्षूच्या सहायानीं) युद्ध केलें. या काश्मीर मण्डळात भाद्रपद महिन्यात एक दिवस आहे. तेव्हां मृताच्या अस्थी तीर्थाला नेत असतात. त्याप्रसंगीं अबलांच्या आक्रन्दनानें दिग्गज आक्रान्त होतो. तो प्रकार या लढाईत सर्व दिवस चालू होता.

सुस्सलाशीं चालविलेल्या या बहुवार्षिक युद्धात पृथ्वीहर व भिक्षु या दोघांच्या अनुक्रमें कादंबरी व पताका, पीत व पाण्डुर अशा बोडक्या होत्या. अनेक तुरगांचा क्षय झाला पण यांच्या पैकीं एकहि मृत झाली नाहीं. पृथ्वीहरापेक्षा अधिक उत्थानशील व भिक्षूपेक्षा अधिक क्लेशसह वीर झाला नाहीं. डामरानीं भिक्षूचा उत्कर्ष पाहून त्याच्या दायादाचा सुस्सलाचा उच्छेद केला नाहीं युद्ध चालू ठेवण्यात आपलें हित आहे असें त्यांना वाटलें. दस्यूचें (डामराचें) हें मत आपल्या हिताचें आहे असें सुस्सलाला वाटलें. त्यानें कौटिल्य व पराक्रम यांत अंतर न ठेवता दोहोंचें अवलंबन केलें. युद्धात सुस्सलानें शत्रूला पळविलें. भिक्षु व पृथ्वीहर पुष्पनाडाला परतले. सुस्सलाला शीतळता मिळाली. त्यानें मल्लकोष्ठाला राज्याबाहेर घालविलें. सिंहाला बंधनात टाकलें. वकाला कम्पनाधीश केलें. एका खिंडुरशीय राजबीजाला (प्रजीला) मल्लकण्ठाचे अधिकार दिले. याच्या आश्रयाला स्वदेशीय असा शतैकीय (शतांत एक असा) होता. स्वदेशीय शंकित होऊन शत्रूला मिळाले.

एकाक्षिपे पीडविस्युः यत्र भृत्या विशंकिताः।
तत्रापांधि प्राज्ञस्य राज्ञोऽपेक्षा प्रशस्यते ॥१०२०॥

(अर्थ) एकाला आक्षेप केला म्हणजे दुसरे भृत्य विशंकित होतात. म्हणून अपराध झाल्यानें प्राज्ञ राजानें तिकडे दुर्लक्षच केलें तर त्याची प्रशंसा होते.

## सुस्सलाचें भिक्षूशीं पांचवें युद्ध

लौ. १४९७ च्या माघ महिन्यात, मल्लकोष्ठानें आमंत्रण दिल्यावर भिक्षु व पृथ्वीहर मडव राज्यातील डामर घेऊन आले. पृथ्वीहराचा भाऊ मनुजेश्वर व काकवंशीय रत्नादी भिक्षूशीं स्फुरण पावत. उन्मेश पावणाऱ्या यांच्या बलांतील वाद्यमाण्डाची गणना केली. तेव्हां तूर्यादीवाद्य सोडून, अपराधांनीं वाजवलेली दुंदुभि वाद्यें वाराशें भरली.

सुस्सलाच्या पक्षात वीस-तीस नृपात्मज, धन्य, व उदय गर्गाचा पुत्र चन्द्र हे राजाना कुकुम आणि छत्रचामर दीं अर्पण करून, राजानें मण्डलेश्वर केलेला यशोराज, असे सज्ज होते. सुज्जी व प्रज्जी बधू मोठे रणकर्मठ होते. ते राजाचे हात होते, व राजा त्यांचे चिलखत होत. राजानें सुतनिर्विशेष वाढविलेला रिल्हण, रणाग्रीं असे. यांसह राजा रणांत हिंडे. यज्ञवेदी जसा यज्ञमण्डपांत. १४९८ च्या चैत्रात इ. स. ११२१–२२ या वर्षी उभय सैन्याचें हस्तमेलक झालें. आलेलें संकट जसें आरंभींच राजाला त्रासदायक होईल तवढेंच. मागाहून संकट वृद्धि पावलें तरी तें राजाला धैर्यदायीच होई. आरंभीं भय जेवढें क्लेशकारक असतें तेवढें तें त्याच्या भर मध्यावर नसतें. करावर टाकलेलें सराचें पाणी जेवढें शीत असतें तेवढें तें सरात बुडी मारल्यावर नसतें.

हा समाम बहुकाल शौर्य व धैर्य यांचा कसोटी होता. तसा दुसरा झाला नाहीं. राजानें भिक्षूची व भिक्षूनें राजाची अशी परस्परानीं परस्पराची शक्ति जोखली. लढतां लढतां राजाला जयापजय प्राप्त झाले पण अन्तीं प्रभुत्व प्राप्त झालें.

## सुस्सलाचें भिक्षूशीं सहावें युद्ध

भिक्षु व पृथ्वीहर यांनीं पुन्हा श्रीनगरांत प्रवेश करून, बऱ्याच आगी लावल्या. धुराचे लोट उठले. दुडुकेच्या मुखावरील चामड्याप्रमाणें रवि दृश्य व अदृश्य होऊं लागला. धूमान्धकारानें संछिन्न झालेली घरें शेवटलें दर्शन देण्याकरतां अग्निज्वालांच्या प्रकाशात एकएकदा आविष्कृत झालीं. धूमानें श्याम झालेली बुद्धाची मूर्ति, उचावर दग्ध झालेल्या द्रुमाप्रमाणें दिसू लागली. पेटलेल्या घरांचें संरक्षण करण्यास राजाचें बरेच सैनिक गुंतले तरी दिवसाचे अन्तीं शत्रूचें कंदन करून सुस्सल राजा परत आला.

## सुस्सलाच्या राणीचें मरण

मरणावर येणाऱ्या संकटानीं क्षीण होऊन महादेवी राणी मजरी कादम्बरीस यावयास निघाली व वाटेंत मरण पावली. तिच्या आगमनोत्सवाची आकांक्षा तपःफलाप्रमाणें राजा बाळगून होता. तिचें वचन त्याला गौरवानें प्रिय वाटे; ती याची अपत्याप्रमाणें लोपासना करणारी प्रिय गृहिणी त्याला उपकरणीभूत विभूतीच वाटत होती. आता त्याला लोकयात्रा विनोदशून्य वाटू लागली. त्याला जगण्यांत अथवा राज्य करण्यांत काहीं कर्तव्य दिसेना.

टीप :—रघुवंशातील अजविलाप याच शब्दांत कालिदासानें लिहिला आहे. तो असा :—गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ। करुणा विमुखेन मृत्युना। हरता वदकिं नमे हृतम् ॥ तिच्या बरोबरीच, श्रेष्ठ स्त्रियानीं प्राण दिले. एका सुदानें राणीच्या

चितेजवळील दगडावर डोकें फोडून नदींत प्रवेश करून तो भृत्यांत वध्य ठरला.

राजानें वयांत आलेल्या पुत्राला, जयसिंहाला आगवळे पण त्याला राज्याभिषेक केला पण अधिकार दिले नाहींत. हा द्रोही आहे असें पिशुनांनीं सांगितलें. पुत्र, स्त्री, मित्र व भृत्य हीं ज्या नृपतीचें शंकास्थान असतात त्याचा विश्वासभूमि कोठली?

## सुस्सलाचा वध

उत्पल म्हणून प्रथम पशुपाल, मग, देवसर येथील टिक्क नांवाच्या प्रबल अशा डामराचा सेवक हळू हळू हस्तधारण करूं लागला. हा दूताचें काम करून राजाचा आप्त झाला होता. वैश्यात भेद करण्याकरतां उत्पलाला सुस्सलानें सांगितलें तो म्हणाला तू प्रथम भिक्षूला मार व मग टिक्काला मार. सुस्सलानें त्याला गजपति केलें. लोभाचा मोह व प्रभूचा द्रोह, यांच्यामध्यें उत्पलाची बुद्धि हेलकावे खाऊं लागली.

उत्पलाची स्त्री पुत्र प्रसवली. राजानें तिला प्रसवोचित वस्तू पाठविल्या. उपचाराच्या अति प्रमाणानें तिचें मन शंकित झालें. तिनें पतीला कांहीं प्रश्न विचारले. तिच्या आग्रहावरून त्यानें तिला सर्व सांगितलें. तिनें उपदेश केला स्वामिद्रोह करूं नकोस. केलास तर द्रोही आहेस असें मानून सुस्सल म्हणून तुझाच नाश करील. विश्वास संपन्न करून तू सुस्सलाच मार. आपला पहिला स्वामी आपणास विभूति भाक् करील.

उत्पलानें हें वृत्त टिक्काला कळवलें. तो उत्पलाला म्हणाला, तू सुज्जीला किंवा सुस्सलाला मार. हा द्रोही पुरुष राजाकडे गतागत करूं लागला. विश्वास वैरिसंश्रित झाला. त्यानें व्याघ्र व प्रशस्तराज असें दोन तीक्ष्ण पुरुष ( मारेकरी ) आणविले.

याच सुमारास राजाचा प्रीतिकार्यभूत् असा मदुरा चक्रवर्ति ( अश्वशाळेतील अश्वांचा सम्राट ) नांवाचा घोडा अस्वस्थ झाला. त्याला उपचार करण्याकरतां या तुरगव्यसनी राजानें प्रतीहार लक्ष्मक व दुसरे जन बाहेर पाठविले. जवळ अनुग मोजके राहिले.

लक्ष्मकाचा पुत्र शृंगार यानें त्याला उत्पलाचें कृत्य कोठून तरी कळल्यावर तें राजाच्या कानावर घातलें. कसाई खान्यांतील पशु त्याच्या हिंसेची तयारी चालली असतां शत्रूला मित्र समजतो. त्याप्रमाणें हें मिथ्या असा अधिक्षेप घेऊन शृंगारादींकडे बोट दाखवून, राजा तेथें हजर असलेल्या उत्पलादींना म्हणाला, तुमच्या राजभक्तीनें मन स्वस्थ यावें अशी यांची इच्छा नाहीं. हे उत्पल! तू दुष्ट आहेस असें हा म्हणतो. भयानें विकृत झालेलें तोंड धैर्यानें हसरें करून उत्पल म्हणाला, "जें आम्ही बोलावें तेंच देव बोलले" काळाची कवलग्रहण करण्याची शक्ति हीन आहे कीं जन्तु जाणून बुजून मूढ होतो.

उत्पलानें झोळें मारण्यास दडून वेळ जरी दोन दिवस घालविले. एकदा एकान्त पाहून, तो व्याघ्र व प्रशस्तराजादींसह राजाजवळ गेला. राजा शीतनिवारणार्थ वस्त्र पांघरून, आसनावर बसून होता. उत्पल पायांना विनति करण्याच्या कपटानें, पुढें झाला. तोंच मारेकऱ्यांनीं राजाच्या सव्यबाजूवर, व मस्तकावर वार केले. त्याचा प्राण जावयास दोन तीन नलिका (घटका) लागल्या, मारेकरी ग्रामान्तराकडे तोंड करून पळाले. त्यावर कोणी शस्त्री धावले नाहींत ते रागानें अथवा भयानें चित्रार्पित असे दिसले. राजाच्या प्रीतीला पात्र झालेल्या, पयानें, स्थूलकाय झालेले. राजवशीय लोक कीर्तिकालुष्याला पात्र होऊन, जनविवर्जित अशा अंगणात जमले व तेथपर्यंत आलों हेंच पौरुष मानूं लागले.

हर्षदेवाच्या काळापासून आम्हीं असल्या कुटिल पुरुषांची आठवण ठेऊन त्याच्या दुष्कृतीचें वर्णन, इतें तेवढें केलें असल्यामुळें खेद पावून आतां त्याच्या दुष्कृतीचें नामग्रहण पूर्वक, वर्णन करूं इच्छित नाहीं.

मी कसा फसवला गेलों असें चिंतन राजा करीत आहे, असें त्याच्या निष्पन्द दृष्टीवरून दिसत होतें. टिक्कादी डामरांनीं लुट लूट केली. राजवशीय लोकांनीं राजाचा अग्निसात् केलें नाहीं तर नाहींच तर नुसता मडाग्नि सुद्धा दिला नाहीं. उत्पलादिकांनीं राजाचें शिर तोडून देवसरास नेलें. छिन्न शरीर राजा गावढळ जनास, एक प्रेक्षणीय वस्तु झाला. राजा लौ- ४२०३ इ. स. ११२८ या वर्षी फाल्गुनांत अमावास्येला मारला गेला. श्रीनगरात एका स्वामिनिष्ठानें घडाला अग्नि दिला विधीची रूपरेखावधि असलेली राणी देवलेखा व तीन गणिका यांनीं अग्निप्रवेश केला.

## सिंहदेवाची प्रतिज्ञा

सिंहदेवाला ही दुर्वार्ता कळताच त्या त्या दुःखकारक प्रसंगाला आठवून त्यानें स्पष्ट अस्पष्ट असा विलाप केला. तो सुस्सलाला उद्देशून म्हणाला कृप, द्रोण, जामदग्नि, यांच्या अपमानाचा सूड त्यांच्या कुळातील पुरुषांनीं घेतला म्हणून कांहीं काल त्यांचा हेवा करूं नका, कारण तुमच्या अवमानाचा सूड घ्यावयास कांहीं काळ लागेल. सर्वत्रै शत्रूंशीं लढावें लागलें तरी लढेन "

गावात हिंडून इकडून तिकडे फिरणाऱ्या, एकमेकांस आरोळ्या मारणाऱ्या लोकांनीं उत्प्लुत स्वर काढून, सारें नगर मुखर करून सोडलें. सर्वांना आकुल करणारी ती रात्र भयावह गेली. मग शक्य ती त्वरा करून जयसिंह राजनगरांत ससैन्य आला.

## सार्वत्रिक क्षमेची घोषणा

जयसिंहानें पटहध्वनीनें अशी आज्ञा पुरीत घोषित केली

की जें कोणी अपहार करून नेलें असल त्याचा मी परित्याग केला आहे. ज्यानीं अरीचा आश्रय घेतला त्याना अभय दिलें जाईल. ही वृत्ति पूर्वीच्या आचारा विरुद्ध खरी. पण तिनें राजा आता अनुरक्तजनानीं वेढला गेला.

सुस्सल मारला गेला ही स्थिति सहन न होऊन सुज्जि नागाप्रमाणें निघाला व जयसिंह राजाला भेटला. राजानें नेत्रातून अश्रू व भीति मनातून गाळली.

## जयसिंह ऊर्फ हिमराज

हिमवृष्टि चालू असतां राज्य भिक्षूला न मिळता जयसिंहाला मिळालें; म्हणून नव्या राजाला डामर हिमराज म्हणू लागले.

भिक्षुवृंद सुस्सलाचें मुण्डकें ठेवण्यात आलें. त्यानें त्याकडे कोपानें प्रदीप्त अशा दृक्पातानें पाहिलें. व कुत्सितपणानें उच्चलाचा जावई जो सोमपाल त्याकडे राजपुरीला पाठविलें. त्यानें त्या मुण्डकाला कालागुरु व चंदन यानीं रचलेल्या चितेवर गोपाळपुरात अग्नि दिला. म्हणजे गात्रें एका मण्डळांत व शिर दुसऱ्या मण्डळात असा अद्भुत अग्निसंस्कार कोणाच्या वाट्यास न आलेला दृष्टीस पडला. अशी वार्ता आहे कीं, देवाधिष्ठित असलेल्या एका दैशिकानें सुस्सलाचे वधाविषयीं एक वाक्य लिहून ठेवलें तें खरें झालें. त्याच्या अन्वयेंच सुस्सलाच शिर ज्यानें तोडलें व जागजागीं फिरवलें तो पुरुष मेलेला निजलेला आढळला.

राजा जयसिंहानें आपलें महत्त्व झाकून ठेवलें. सुज्जीला संमत नाहीं असा आहार सुद्धां हा धूर्त राजा घेत नसे. नगरात पाय पसरून पुढें आढीला घातलेल्या नीतिरूप फळाच्या पक्व दशेची वाट पहात बसला.

भिक्षु राज्याच्या आशेनें टिक्काला भेटला. त्याला टिक्कानें प्रणति केली. व त्याला भिक्षूनें श्वेतपत्रादी भाजनें दिलीं.

भिक्षूनें अदृष्टपूर्व संघटण पाहून, भिक्षूला मिळून, उच्चलाचा जामाता, जो राजपुरीचा सोमपाल, त्याला राज्य देऊ केलें. जो दास्य भावाला उचित तो राजा व्हावा ही त्रपा जरी बाजूला ठेवली तरी तो या देशाचें रक्षण करण्यास कसा समर्थ होईल? पलाश पुरुष, (पेंढ्याचें केलेले पक्षाचें बुजगावणें) भाजलेल्या मडक्याच्या तोंडानें चिमण्याना भिववून जो साळीच्या पिकाचे रक्षण करतो त्याला जर काननतरूंचें रक्षण करावयास ठेवलें, तर तो पायांखालीं तुडवून तरूना मोडणाऱ्या गजापासून त्या तरूचें रक्षण कसें करणार?

टीप: असमर्थ राजाना दिलेला बुजगावण्याचा दृष्टान्त चांगला समर्पक आहे.

भिक्षु गंभीरा तीरावर सज्ज होता. त्यावर अभियोग करण्याकरता सुज्जि निघाला. सुज्जीनें नौकाचा पूल बांधून आपलें सैन्य तिकडे नेलें व भिक्षूच्या सैन्याचा नाश केला, डामर भराभर राजाकडे येऊ लागले. मीं आधीं मी आधीं अशी अहंपूर्विका कोष्ठेश्वर व मनुजेश्वर यामध्यें लागली. कोष्ठेश्वर हा शीलबहिष्कृत होता. अतिरूप अशा भिक्षूच्या स्त्रियांवर त्याची दृष्टि होती पण सिंहाची आयाळ, नागाचें फणारत्न, अग्नीची ज्वाला, व भिक्षूच्या राण्या यांना जीवत असतां कोण धरू शकेल!

टीप:—हा कल्हणाच्या आवडत्या अशा दीपकालंकाराचें उदाहरण आहे. मूळ श्लोकात सिंहाची आयाळ नागाचे फणारत्न, अग्नीची ज्वाला कुल बालिकेचे स्तन एवढ्या वस्तू आहेत त्यांतील शेवटल्या वस्तूबद्दल भिक्षूच्या स्त्रिया ही वस्तु घालून हा अलंकार कवीनें साधला आहे.

भिक्षूला थारा उरला नाहीं तो शेवटी राजपुरीच्या सीमाप्रान्ती सुलहरी नावाच्या गावीं गेला.

## प्रान्ताप्रान्तांतील लोकांचे स्वभाव

त्रिगर्तांमध्यें दया, चम्पामध्यें शील, मद्रमंडळांत त्याग व दार्वाभिसरांत मैत्री असे असलेले गुण अमर्त्यधर्मी देवांतही आढळत नाहींत.

असो. पित्याच्या मरणापासून चार महिन्याच्या आंतच जयसिंहानें आपलें राज्य [illegible] केलें

## जयसिंहाच्या राज्याच्या आरंभीची स्थिति

निवास नगरांत पौर सामर्थ्यहीन झाले होते. पार्थिवोपथ डामरानीं सर्व राष्ट्र आकीर्ण झालें होतें. सर्व भार सहन करण्यास समर्थ असा भिक्षु दूर नव्हता. आतले व बाहेरचे सामन्त व मन्त्री यांनीं वैन्याचा आश्रय घेतला होता. उपदेश सूद्र असा एकाची पण नृपाजवळ सत्ता नव्हती. सर्व भृत्य अधर्मबहुल व द्रौहिक बुद्धि झाले होते.

## जयसिंह राजाच्या गुणांचें वर्णन

प्रसंग प्राप्त म्हणून या जयसिंह राजाच्या गुणांचें प्रदर्शन बहुशः लेशावरून करण्यात येत आहे. या राजाच्या ठिकाणीं गुण व दोष या गुणाची अद्भुत निष्ठा होती. हा राजा चांगला अथवा वाईट म्हणता येईल, याच्या वधाला तुलना म्हणजे एकच धार असलेल्या तलवारीची होय. याचा प्रसाद स्थिर होता. या राजाच्या प्रखर तेजापुढें पूर्वींच्या राजाचें तेज फिकें पडे. जो जो त्याच्याकडे पाही त्याला असे वाटे की जशी शंकराची सरळ घडवलेली मूर्ति, पहाणाऱ्याकडे बघत असते तसा हा माझ्याकडे पहात आहे.

या राजाच्या प्रत्ददप्रतीहारी लक्ष्मकाला. अन्य मंत्र्याची उद्गति (राजाजवळ जाणें) सहन होत नसे. प्लक्ष नावाचा वृक्ष आपल्याशजारी अन्य वनस्पतींची उद्गति स्तंभित करतो. [illegible]कानें सर्व प्रयोग [illegible]

कांहीं दिवसांनीं राजाला अंगावर स्फोट, सूज, अतिसार, अग्निमांद्य इत्यादी विकार जडले. राजपक्षीय विचार करू लागले. हितकृत्य कोठलें. राजा जयसिंह व राणी गुणलेखा यांचा पंचवर्षदेशीय पुत्र परमाडी यास राजा करावा असें सुज्जीनें राजपुत्राचा मातुल जो गार्गी (गर्गाचा पुत्र पंचचंद्र) त्याच्याशीं मंत्र चालवला. ही संधि साधून लक्ष्मकानें चिथवलेले धन्य व उदय, राजाला भेटले व म्हणाले "हा द्रोही सुज्जि, व त्याचे पुत्र यांनीं पंचचन्द्राशीं अहर्निश, मंत्र चालविला आहे." राजाला खरें वाटलें. राजेलोक दुसऱ्याच्या बुद्धीनें हरवले जातात.

## विटपराक्रम वर्णन

शौचस्थानीं स्त्रीव्यवयालयांत, वसति करणारे असे कुशल गर्भच्छेद, ज्या राजाला गाठून ज्याच्या मनांत प्रवेश करून भूतानीं संचार केलेल्या माणसाप्रमाणें ज्याला विवश करतात त्या राजापासून कल्याण कसें होणार ! हा विट निर्हेतुक राजाजवळ हंसत हंसत प्रविष्ट होतो. राजा प्रीतीनें नयन उत्फुल्ल करून "कां ! कसें काय"? असें त्या अस्वच्छ मनाच्या माणसाला विचारतो. मग मिशाना, किंबहुना भान, प्राण व गुण–या सर्वांना पीळ देत बोचक बोलतो. व सर्वांवर पाणी सोडतो. तो मोठ्या संभ्रमानें गतागत करीत, कांहींतरी बोलत प्रभूची दृष्टि, आपल्याकडे वळली असें पहातांच, जगाकडे अवज्ञेनें पहातो. प्रणयताडणानें झालेली आपली मुखाची विक्रिया अनुग्रह असें मानतो. असा नृपतिवल्लभ दुःखद होतो. हातांतील केवळ यंत्रपुतळा बनलेला असून जो राजा निःसक्षोभवृत्ति राहून, लबाड जन जसा नाचविल तसा न नाचणारा असा कसा आढळेल?

आस्थान द्विजाचा पुत्र चित्ररथ नांवाचा एक सुज्जीचा आश्रित होता, तो राजाच्या विरुद्ध मंत्र करीत असे. प्रभूचें आरोग्य कसें आहे याची नित्या प्रमाणें चौकशी करण्यास सुज्जि गेला असतां पहातो तों तेथें पहारेकरी ठेवलेले होते. असा अविश्वास झालेला पाहून सुज्जीला खेद झाला. दाक्षिण्य वाम झालें. उलटें फिरलें. तें आरशांतल्या प्रमाणें राजाच्या आशयांत उलटें प्रतिबिंबित झालें. असें पाहून तो पराङ्मुख झाला.

टीपः—दाक्षिण्य वाम झालें. या वस्तुपुढे तें राजाच्या आशयरूपी आरशांत उलटें प्रतिबिंबित झालें अशी प्रतिवस्तु ठेवून येथें प्रतिवस्तूपमा हा अलंकार किती उत्कृष्ट साधला आहे बरें !

राजा बरा झाला. त्यानें सुज्जीचे अधिकार काढून घेतले. राजस्थानाची जागा धन्याला दिली. व त्याच्या वडील भावाला उदयाला कम्पनाधीश केलें. सुज्जीचा पुत्र भागिक, हा लोहर पर्वतावर होता. त्याला काढून राजाचा सावत्र भाऊ प्रेम याला कोट्ट धिकार दिले. खेरी येथील अधिकार रिल्हणाला दिला. अमात्याचा वध चिह्नप्रमाणे पाडण्यात व उठवण्यांत लक्ष्मक समर्थ होता. त्याची प्रथा चांगली बसली. सुज्जीचा प्रतिमल्ल असा एक कृष्यमाण (हस्तक) राजमंगल नांवाचा होता. त्याची स्थापना लक्ष्मकानें द्वाराधिकारावर केली. पण अयोग्य अशा माणसांस योग्य माणसाचें काम करण्यास कोणालाहि नेमता येईल; पण योग्य माणसाचे जे गुण आहेत त्याशीं त्या अयोग्य माणसांचा संयोग पंचमहाभूतानासुद्धां करतां येणार नाहीं. शंकराच्या शरीरावर श्रीखण्डाच्या (चन्दनाच्या) बद्दल अनुचित असें चिताभस्म धाडधाईनें प्रक्षिप्त करता येईल. पण जो शंकर जगत्रयाचा नाश अथवा उदय आपल्या स्वेच्छेनें घडवून आणतो. त्याला सुद्धां त्या चन्दनाचा गंध त्या भस्मात उतरवतां येत नाहीं.

टीपः—अयोग्य माणसास योग्य माणसाचें काम करण्यास कोणाला नेमतां येईल पण योग्य माणसाचे गुण त्या अयोग्य माणसात उतरवतां येणार नाहींत या सिद्धांताला दिलेला, शंकरविषयक दाखला फारच सुंदर आहे.

सुज्जि अपमान झाला म्हणून सुस्सलाच्या अस्थी गंगेत टाकण्याचें निमित्त करून जान्हवीकडे निघून गेला. प्रतिज्ञा करून त्यानें राजपुरीच्या सोमपालाला राज्य देऊ केलें.

लक्ष्मकानें सोमपालाला गाठलें, जयसिंहाची मुलगी त्याला दिली. व त्याची मांची राजाला करून घेतली. दोन्हीं राज्यें सन्धिबद्ध झालीं.

देंगपालाकडे बसलेल्या भिक्षूला आणण्यास सुज्जि निघाला पित्याचा (सुस्सलाचा) वध करवल्यामुळें जयसिंहाचा शत्रू झालेल्या टिक्कानें भिक्षूस आमंत्रण दिलें. तो बाणशाला नावाच्या, टिक्काच्या जांवयाच्या (भागिकाच्या) खशाच्या राजाच्या, किल्ल्यांत येऊन सुज्जीची वाट बघत बसला.

राजाच्या सांगण्यावरून सोमपालानें सुज्जीला पुन्हा अधिकार देण्याचें व्याज केलें. व सुज्जीला फितवलें. सुज्जीनें राजाकडे तोंड फिरवलें. कम्पनाधीश उदयानें बाणशालेला वेढा दिला. उल्हारयंत्र व धनु, यांवरून दगड व बाण इ. विविध आयुधाची वृष्टि नृपचमू खालून किल्ल्यातून लोकांवर व वरून दुर्गस्थ लोक नृपचमूवर, दगड व भिक्षूचे नामलक्षित शर, याची वृष्टि करीत होती. नृपचमूनें दुर्गाचें मूळ (पाया) फोडून, सर्वच धान्याचें व पाण्याचे साठे ताब्यांत घेतले. राजकार्य व भानु लबायमान होत असता लक्ष्मकानें टिक्काला धन देऊन फितवलें. आपली अंगुली कापून टिक्क दूर जाऊन बसला. एकादी (कुम्भदासी) कुम्भानें पाणी भरणारी दासी दुसऱ्यानें मनांत आणलेले कुकट दवडू शकते.

भिक्षूला बाहेरून मदत येईल म्हणून किल्लेदाराला आनदाला राजानें मयवून ठेवलें होतें. भिक्षु लढाईला उत्सुक होता तो आपल्या अन्ताचें भय सोडून खेळून चालवीत होता. तो शस्त्रधारी लोक किल्ल्यात शिरले. थोडा उरलेला डाव तोडून जसा कोणी कामी कान्तेसह खेळत असतां सुहृत् आला म्हणून त्याला प्रत्युत्तर देण्याकरता क्षुब्ध व त्याशिवाय उठतो, तसा भिक्षु उठला. असिधेनु घेऊन बाहेर पडला. त्याच्या मुखावर अहंक्रियेचें हास्य होतें. त्याची दृष्टि, हात, पाय व मन ही एकाच प्रकारें चाल (प्रचार) करीत होती. त्याची चर्या औचित्याला उचितता आणीत होती. अहंकृतीचा अलंकार होती. अभिमानी विभूतीचा उत्सेक होती. त्याच्या तोंडावर मृत्यु जवळ आल्याचे दिसत नव्हतें. तो एकदम क्षिप्रपातानें शत्रूच्या जवळ आला. त्यानें युद्ध सुरू केले. शस्त्रप्रहार होऊं लागले. कुमरीय रक्तिक व मागिक हे वीर जवळ होते. घोर युद्ध झालें. अन्ती भिक्षु यकृत्पिंडावर बाण लागून तीन पावलें मागें सरून भूवर मगें पडला. याप्रमाणें हर्षनृपतीच्या राजचक्रामध्ये भिक्षूंनें मानाचें—अवमानाचें नव्हे—असें स्थान मिळविलें. शत्रूचे सैनिक अहो पुरुषिका (अहो आमचें पौरुष) या अभिमानें त्याला वेढा देऊन राहिले. भिक्षाचर तीस वर्षें नऊ मास वयाचे भोगून, कौ. ४२०६ इ. स. ११३० च्या ज्येष्ठ वद्य दशमीला मृत झाला. त्याचा एक तेजोमय देह अप्सरांच्या समार्थ अगात प्रविष्ट झाला. व दुसरा जड पार्थिव देह भूमीवर अग्नींत प्रविष्ट झाला. शत्रूचा अन्त्य सत्कार योग्य रीतीनें करावा अशी आज्ञा राजानें सौजन्यानें दिली.

## सुस्सलाचा ( जयसिंहाच्या पित्याचा ) सावत्रभाऊ लोठण लोहरचा राजा होतो

वीर पुरुष कृत्ये करून विश्रांतिकरिता जरा मन शिथिल करणार, तों विधि अन्य दीर्घ कार्यांच्या भाराचें समर्पण त्यास करतो. घोड्याच्या रिकिबीतून दीर्घ दमन करून श्रान्त झालेली बोटें, पहिला स्वार काढून घेतो व घोड्याला वाटत भागवतानें सुख होईल तोंच असह्य झालेली त्याची पृष्ठ भू दुसऱ्या स्वारानें अधिष्ठित होते याप्रमाणें एक रात्रभर राज्य निःशत्रु असता एक लेख हारक नृपाच्या पुढें शोकमूक होत्साता प्रविष्ट झाला व तो विचारस्थ वरून म्हणाला "ज्या दिवशी भिक्षु शांत झाला त्या दिवशी सुस्सलानें आपले सावत्र भाऊ मल्हण व लोठण, हे बे लोहर कोटांत कोंडून ठेवले होते; त्यांतील ज्येष्ठ मल्हण अगोदर मृत झाल्यामुळें उरलेला कनिष्ठ जो लोठण, त्याला कोट्टभृत्यांनीं बळानें अभिषेक केला आहे लोठण त्याचा सुत दिल्ह व पुतण्ये तीन असे पाच बंधनातून मुक्त झाले आहेत. सर्व कोश त्यांच्या स्वाधीन आहे. आकार, आचार व चेष्टा यांनीं आपली प्रागवस्था नृपानें टाकली नाहीं.

हें वृत्त ऐकून राजानें लोहर येथील एक मंत्री सुज्ज द्वारपति (आनंदवर्धनाचा पुत्र) व रिल्हण यांना किल्ला घेण्यास पाठविलें. बरोबर प्रतीहार लक्ष्मक राजपुत्र अमात्य व हयारोह डामर यांचें समिभ व दीर्घ सैन्य दिलें.

भिक्षाचर गेला, आता सुज्जीचें काम काय, असें समजून राजानें त्याची उपहर्षणें अवहेलना केली. त्यानें लोठणाचें साचिव्य पत्करलें. हें खरें पण हिमशर्करेप्रमाणें शुक्ल अशा जलपानानें ज्या काश्मीरात अन्न चांगलें पचतें, त्या मृदु स्निग्ध कार्‍ मीरात तो सुखें राहू शकत नव्हता. शुष्क सतुष सत्वादी बाहेरील अन्नाचा भोग त्याला पार पडत नव्हता. म्हणून ते ते उपाय करून तो पुन्हा काश्मीरात शिरावयाची इच्छा करूं लागला.

राजाचें सैन्य व सुज्जीचें खश व सैंधव लोकाचें सैन्य मिळलें. राजाचें सैन्य पळालें. सुज्जीच्या सैन्यानें राजाच्या सैन्याची वस्त्रें त्याना लुटून हरण केलीं. लाल रंगाच्या अंबर वस्त्रांनीं वेष्टित असे ते लोक उडया मारीत अद्रीचें लंघन लंघन करीत असता लाल तुणांच्या मर्कटाच्या गतीचें पाटव मिळविते झाले.

टीपः— या वर्णनांत काश्मीरी विनोद आहे. मूढ प्रतीहारिला (लक्ष्मकाला) पकडून सुज्जी पुढें उभे करण्यांत आलें. तो नुकत्याच पकडलेल्या वरिकेप्रमाणें, घाबरला होता. त्याने आपल्या अंशुकांनी आपले तोंड झाकलें. "एषनो आर्चितो वृद्धराजः (हा आमचा पूज्य महाराजा) असें म्हणून त्यानें त्याला वस्त्रें दिलीं. व सोमपालाला तो अर्पण करण्यात आला. सोमपाल हा सुस्सलाचा जामात होता. व द्रव्यलोभानें तो लोठणाचा पक्षपाती झाला होता.

लक्ष्मकाला सोडवून आणण्याकरता लोठणानें छत्तीसलक्ष दिनार दिले. व सुज्जि द्रव्यलोभानें लोठणाचें साचिव्य पतकरता झाला. मागिकाच्या कन्येशीं लोठणाचा विवाह केला. त्याची विधुरावस्था दूर केली. विश्वास दृढ झाला.

## जयसिंह लोहर येथें सुस्सलच्या एका पुत्राला ( मल्लार्जुनाला राजा करतो )

लोहर येथील भागिक, वृदारक व दुसरे चाक्रिक लोक, यांनी राजाला कळविलें कीं, सुस्सलाला त्याच्या सहजा नावा राणीच्या पोटीं जो पुत्र मल्लार्जुन म्हणून झाला आहे त्याला राज्य देऊं पण तुम्ही लोठणाला बंधनात टाका.

सुज्जीनें पद्मरथ राजाची मुलगी लोठणाला देण्याकरतां आणवली. लोठण तिला दर्पितपुराला सामोरा गेला. ही संधि पाहून चाक्रिकांनीं मल्लार्जुनाला कोट्ट राज्यावर अभिषेक केला

हा फार खर्चिक होता. यानें एकदा सुपारीबद्दल मोत्यें भरून विडे वांटले. जनतेला उपद्रव देऊन मिळवलेलें द्रव्य शत्रुसात् किंवा अग्निसात् व्हावयाचें. चोर, चाक्रिक, वेश्या, विटादींनीं याच्या खजिन्याची पुष्टलूट चालविली.

जयसिंहानें चित्ररथाला द्वाराधिपाचे व पादाग्राचे अधिकार देऊन मल्लार्जुनावर पाठविलें. मल्लार्जुनानें आपली विधवा माता, चित्ररथाकडे संधि करावयास पाठविली. तिनें वैधव्याला उक्त पण ऐश्वर्याला उचित असा वेश करून आपल्या चक्षुरागानें चपल चित्त अशा चित्ररथादींना सोत्कण्ठ केलें. तिनें खण्डणी देऊन संधि केला.

मल्लार्जुनाला कांहीं काळ पादप्रसादिका ( पाय पसरण्याला वेळ ) मिळाली. मल्लार्जुन अहर्निश मूढ होता. निष्परिपाक प्रज्ञ होता. वाक्प्रौढीमुळें त्याला बालिश लोक, कुशलाशय समजत. अभद्र हेतु धूमकेतुप्रमाणें त्याच्या प्रदीप्त वदनाशिवाय अन्यत्र कांहीं सौष्ठव नव्हतें.

नंतर जयसिंहानें उग्र विक्रमाच्या सुज्जीशीं संधान बांधलें न जाणो उग्रश्री सुज्जीला, मल्लार्जुन आपलासा करील. म्हणून राजस्थानाच्या ( न्यायाधीशाच्या ) पदाशिवाय, कम्पनाधीशाचें पद त्याला घरीं आणवून सोमपाल बरोबर असताना दिलें. सुज्जीला संतोष वाटला नाहीं. म्हणून डाव्या हातानें जटाजूटांतील माळ जोरानें काढून अर्पण केली. सुज्जि संतुष्ट झाला. त्याच्या सांगण्यावरून, उदय व चन्य, याना राज्यांतून घालविलें मनातून नव्हे.

इतक्यात प्रतिहारी लक्ष्मक मृत्यु पावला. अशा संधीला लोहर घेण्याकरतां राजानें सुज्जीला पाठवलें, मल्लार्जुन कोश घेऊन पळाला. लौ. ४२०८ इ. स. ११३२ वैशाख कृष्ण द्वितीयेच्या दिवशीं वयाच्या १८ व्या वर्षी राज्यभ्रष्ट झाला.

सुज्जि आपल्याबरोबर हर्षट नांवाच्या एका मनुष्याला मण्डळेश्वराच्या जागीं नेमण्यास घेऊन गेला होता. व मण्डलाला स्वास्थ्य येण्याकरतां तेथें राहिला. तेव्हां त्याच्याविषयीं पिशुनांनीं राजाचें मन कलुषित केलें. आश्रित जोंपर्यंत राजाचें समूर आहेत तोंपर्यंत, त्याला खल लोक जळू शकत नाहींत. जसें सूर्यकांत मण्याच्या पुढें ठेवलेलें इंधन रवीचे कर जाळूं शकत नाहींत; पण तेंच मागें ठेवलें म्हणजे रविकरांना प्रसार पावण्याला अवकाश मिळून, ते त्या इंधनाला भस्मसात् करून टाकतात.

सुज्जि परत आला. मडव राज्यांत असतां सुज्जीच्या अनुगांनीं एका ब्राह्मणाला लुटलें. तो ब्राह्मण सुज्जीविषयीं कांहीं कठोर बोलला. त्या ब्राह्मणाची रागानें कोल्ह्याप्रमाणें शिकार केली, आम्हांला सुज्जी कम्पनाधीशनको म्हणून मडव राज्यातील ब्राह्मणांनीं प्रायोपवेशन केलें. राजाला वाटलें आपल्याला दुःस्थितीला औषध सुज्जीच्या मरणाशिवाय नाहीं.

राजानें या कामावर महौजस अशा सज्जपालाची व्यवस्था केली. कपटानें प्रहार करण्याला तो वीर तयार नव्हता. त्यानें कोशपानपूर्वक शपथ घेतली व सुज्जीची मैत्री संपादन केली. सुज्जीनें त्याच्या मार्फत राजाला कळविलें कीं तू जर आम्हांवर विश्वास टाकून स्वस्थ बसणार नाहींस, तर आम्हीं दुसरा दायद आणून राज्यावर बसवू. राजा म्हणाला अल्पसत्त्व लोकापुढें मंत्र केला. राजाना मूर्खपणाचें फळ भोगावें लागलें. खल हे कुत्रीं आहेत. ते जिव्हा लौल्यानें शोभतात. व परपिण्डाचें अपहरण करतात. राजा सुज्जीच्या वधाला सिद्ध झाला.

## सुज्जीचा वध

कुलराज म्हणून व्यायामविद्याख्यात असा राजाचा एक सेनापति होता. त्यानें या सुज्जीच्या वधाच्या साहसाचा अंगीकार केला. कुलराजचें धैर्य अव्याज होतें. त्याचा चेहरा नेहमीं अविकृत दिसे. हा तांबूलवाह म्हणून याच्या हातात राजानें सुज्जीला देण्याकरता एक तांबूल दिला. सगण असो अगण असो मी सुज्जीला मारला असें समज असें म्हणून तो बरोबर दोन शस्त्री घेऊन गेला.

तेथें पोचवून त्याला द्वारपालानें सुज्जीजवळ नेलें. सुज्जीनें राजाकडील तांबूल वंदन करून घेतला. कुलराज म्हणाला "कुणी एकशस्त्रभृत् कैवर्त माझा आश्रित आहे. त्याला द्वारप्रवेश होण्याची आज्ञा व्हावी. व त्याच्या तोंडून विनंति ऐकावी." परंतु "आज जा! सकाळीं आम्हाला काय करावयाचें तें करू" असें म्हणून पाठ फिरवून सुज्जि विश्वासानें पलंगावर वपु टाकून राहिला. तेव्हा कांहींसें मागें परतून जवानें क्षुरी काढून कुलराजानें सुज्जीच्या डाव्या कुशींत ती खुपसली, नोकरांशीं झालेल्या झटापटींत, कुलराज सुज्जीचें डोकें कापून पळाला. हा विप्लव लौ. ४२१९ इ. स. ११३२ च्या आषाढ शुद्ध पंचमीला घडून आला.

कुलराजाची संभावना त्याला नगराधिप करून राजानें केली. चित्ररथाला राजानें द्वारेश पदावर स्थिर केलें.

कोष्ठेश्वराने सैन्य उभारलें. त्याचा पराभव द्वारेशानें ( चित्ररथानें ) केला. हा कोष्ठेश्वराच्या पुढील अनेक पराजयांचा मंगलोकारच झाला व वेळींच तयारी ठेवणें. रात्रीं जागरण करणें, सैन्याशीं साम करणें, नाना युक्त्या करून वेळ येईल तसा त्या योजून अथवा सोडून मिळालेल्या भूमीचा त्याग न करणें इ० विजुगीषू द्वारेशाच्या गुणानीं कोष्ठेश्वराला राज्यांत कोठें थारा मिळाला नाहीं. तो

सत्ताशून्य झाला, छिन्नपद झाला, पाय ठेवावयाला जागा उरली नाहीं.

कोष्ठेश्वर मग गंगा नदीवर स्नानाला गेला. त्यावेळेस मल्लार्जुन सूर्यग्रहणानिमित्त कुरुक्षेत्राला गेला. दोघांची भेट झाली. कार्यपरत्वें दोघे एक झाले त्याच्या मागें राजानें ठक्कूर लावून ठेवला.

हें सूर्यग्रहण कुरुक्षेत्रात ठाणेश्वरात इ. स. ११३४ मध्यें दिसलें असें लेले म्हणतात

## चित्ररथावर ांतिक हल्ला

चित्ररथ कर वाढवण्याचा आग्रह धरी. ब्राह्मणांनीं प्रायोपवेशन केलें. चित्ररथाच्या आश्रितांनीं धर्मधेनूची रानें जप्त केली. कारुण्यप्रवण एका गोपानें प्राणत्याग केला. भट्टउद्भट वंशात विजयराज म्हणून एक तरुण पृथ्वीराजाचा पुत्र होता. तो ही विषमदशा पाहून आपल्या मावाला म्हणाला, "या दण्ड्याला दंड केला पाहिजे, कधीं लोह अश्माला पाडील तर कधी अश्म लोहाला पाडील. वधा शिवाय या चित्ररथाला दुसरा उपाय नाहीं. सर्वांवर उपकार करण्याकरतां एका क्षुद्राचा नाश करणें हा धर्म आहे. सर्व जन्तूंचा अन्तक अशा अजगराला जनानें मारलें. त्याप्रमाणें अशा दुर्वृत्ताचें जर आम्हीं दमन केलें; तर जनांतून दुसरा कोणी तेजस्वी पुरुष पुढें येऊन मारील या भीतीनें पुन्हा कोणताही अधिकारी पुरुष प्रजेचें पीडण करणार नाहीं. या कार्यानें जर अनेक जीव सुखी होतील तर हे बन्धो ही वणिज्या मोठी नव्हे काय ? मावानें होय म्हणून त्याला तीर्थजलाच्या शपथा व्हावयास लावलें.

संधि साधण्यास विजय राजाला जागरणें पडलीं. जनसमूहात चित्ररथ एकवेळ दृश्य होई, एकवेळ अदृश्य होई, विजय राजाचें नैष्ठुर्य अचल होतें. एकदा राजवाड्याच्या पायऱ्या चढून जात असता चित्ररथाच्या मागोमाग जाऊन विजय राजाने त्याच्या डोक्यावर प्रहार केला. मेला असें समजून त्याच्यावर दुसरा प्रहार केला नाहीं. त्याचा भाऊ लोटराज धावत जाऊन एका नर्तकीचें थान तोंडांत धरून तिला शरण गेला. तुझा आहे. असें समजून मला राख असें म्हणाला.

टीप.—एकाद्या मनुष्यावर दुसऱ्याच्या स्त्रीशीं गमन केलें असता तो अपराधी तें नाकारून शपथा वाहू लागतो. तेव्हां अन्य पुराव्याच्या अभावी त्या अपराध्याला त्या स्त्रीचें थान चोख असें लोक म्हणतात. आरोपी कचरला म्हणजे त्याचा अपराध सिद्ध करतात. कारण तो तिला आई म्हणावयाला कबूल नसतो.

द्वारेशाला कोणी मारलें अशी अन्वेषणा राजानें चालविली असतां, तो मी असें विजय राजानें दाखवून दिलें. विजयराज मारला गेला तेव्हा "परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे," हा श्लोक वर लिहिलेली. व आपल्या कृत्याचें कारण दाखविणारी पत्रिका त्याच्या करात मिळाली. व त्या श्लोकामुळें त्याची पावनी प्रशंसा झाली. बरेच दिवस शयनतलावर पडल्यावर चित्ररथाचें क्षत बरें झालें.

## मल्लार्जुन राजाला शरण जातो

सावर्णिक गावात मल्लार्जुनाला ठक्कुरानें पकडलें. उदय सेनापति त्याला आणावयास गेला. मल्लार्जुन उदयाची स्तुति करीत त्याला म्हणाला, "आपल्यासारखा रक्षामणि मला मिळाला नाहीं म्हणून माझी अशी हानि झाली. कोणी प्रौढ कवि पद व अर्थ याची प्राप्ति होऊन पद पुरें करण्याच्या प्रसगीं मूढ होतो तसा मी थोर पद (पदवी) व अर्थ (द्रव्य) उपभोगानें त्याची पूर्ति होण्याच्या वेळीं मूढ झालो. आपण आता सत्यकार व्हा, व जिचा अन्त चांगला होतो अशी स्थिति मला एक वर देऊन आणून दाखवा." असें म्हणून त्यानें द्वारपतीच्या पुढें एक स्फटिकाचें लिंग स्पर्श करण्याकरतां आणून ठेवल. याला लढावयाचें आहे असें समजून उदयानें त्याला लिंगाला स्पर्श केला. मल्लार्जुन म्हणाला, जीव घेतल्याशिवाय राजाजवळ मी तुला नेईन असा वर मी तुझ्याजवळ मागतो. "हें कार्पण्योपहत वच ऐकून सर्व लोक त्रपाक्रान्त झाले. त्याचें हृदय आर्द्र झालें. राजाच्या पाठच्या मावाला (मल्लार्जुनाला) नैर्गुण्य दाखविणें इष्ट नाहीं असें त्यास वाटलें. पांचालीच्या केश कर्षणादी गोष्टी ऐकून, श्रोत्यांना पाण्डवापेक्षां धृतराष्ट्राचा राग अधिक येतो, पण त्याच श्रोत्यांना दुःशासनाच्या रुधिराचें केलेलें पान आणि ऊरुभग्न झालेल्या दुर्योधनाच्या मूर्ध्यावर, भीमानें केलेलें ताडन ऐकून पांडवाचा द्वेष वाटू लागतो. तटस्थ राहून तमाशा पाहणाऱ्याचा अनुभव बदलत असतो. राजानें अभय देऊन मल्लार्जुनाला लौ. ४२११ इ. स. ११३५ आषाढ शुद्ध पौर्णिमेला एका मठात कैदेंत ठेवलें.

टीप :—आरंभीचा कविविषयक व शेवटचा धृतराष्ट्र विषयक असे दाखले फार समर्पक आहेत.

मल्लार्जुन राजाला म्हणाला, "चित्ररथ व कोष्ठक हे दोघेजण द्रोही आहेत, त्याना ठार मारलें पाहिजे. या उद्यमाला राजानें स्वतां स्पर्श केला. कोष्ठकाच्या लोकांची व राजाच्या लोकांची झटापट झाली. त्यांत कोष्ठकाला मानेवर क्षत झालें. त्याला बन्धनात ठेवण्यांत आलें. नतर अशी एक गोष्ट घडली तशी आम्हीं पाहिली नाहीं किंवा ऐकिली नाहीं. तुझा पति भेटेल अशी आपल्या बंधूंची उक्ति न जुमानून त्याचें अग्नि प्रवेश केला. मग कोष्ठकाचा व्रण कृमिसात् होऊन त्याला मृत्यु आला. तेव्हां अभिमानाने त्याचें शिर वर केलेलें होतें. कारण डामरांच्या वधूना वैधव्य प्राप्त झाले असता द्रव्याकरतां साध्या सामाधिकाऱ्यांना नितंब

भोगभोगी करीत. नतर चित्ररथाचें नानाभूयिष्ठ द्रव्य राजानें लुटलें. चित्ररथ मरण्याच्या इच्छेनें सुरेश्वरीला गेला. तेथें तो मर्मव्यथेनें कथाशेष झाला. चित्ररथ एकभार्य होता.

टीप :—पुरुष एकभार्य असल्याची ही नोंद सर्व ग्रथांत एकच दिसते.

## जयसिंह व त्याचे सेवक यांची धर्मकृत्यें

द्राक्षांना माधुर्य जुनेंपणानें येतें. तसें राजाना मनोज्ञत्व जुनेंपणानेंच येतें. पुरवासी जनाकडील पुत्रोत्सव, विवाहादी प्रसगीं तो औपयोगी वस्तूंचें दान करी. जे लाकडाचे कर राजांची धनवृद्धि करतात. ते लोकांच्या स्वाधीन करून त्यानें सर्व पूर नवीन करून घेतले. कोश रत्नादिकावर प्रजेचा हक्क आहे असें राजानें ठरविलें म्हणून चोर तेते उत्सव करीत. याचा रिल्हणमंत्री, कृष्णाजिनें, सवत्स-गोदानें, धर्मकन्या विवाह इ. धर्मकृत्यें करी. यानें एक यज्ञ केला, त्यांत याच्या चौसष्ट जातींस, भव्य भोग भोगण्याला मिळाले. हा राजाचा पूर्वपथिक ( मार्गदर्शक ) झाला.

## स्वामिभक्त मार्जारी

जयसिंहाची प्रिय कान्ता सुस्सला हिची एक मार्जारी होती तिचें तिर्यक् जातीला उचित असें प्रेम सुस्सलेवर होतें. सुस्सलेचें पतीशीं जरा कालुष्य उत्पन्न झालें, तर ही क्रीड मार्जारी तिच्याजवळ पुढें मागें माणसाप्रमाणें सारखी राही. सुस्सलेला यक्ष्मा नांवाचा रोग जडला. तीर्थांत देह ठेवण्याला ती गेल्या-पासून ही मार्जारीसारखी ओरडत राहिली. पुढें आणलेल्या भोजनाचा त्याग करून जीविताचा तिनें त्याग केला. सुस्सलेच्या नांवानें बांधलेला विहार ती मृत झाल्यावर या मार्जारीच्या नावानें ख्याति पावला

## कांही धर्म भोळेपणा

या राजाच्या राज्यांत रात्रीं राक्षसाची भूतवेताळांची भाषा ऐकू येई. धूमकेतु इत्यादि उत्पात झालेले दिसत. पण प्रजेला त्रास होत नसे.

## लोठणावर ( काकाची ) जयसिंहाची स्वारी

लोठण आपली उत्थानेच्छा अखण्डित ठेवून, सबान्धव कृषिकर्म व वाणिज्य करून होता. त्याचा पक्षलिप्सु (पाठ राखणारा ) अतिक्षुद्र असा जनकभद्र नावाचा एक मित्र होता. त्याच्याकडे दुर्लक्ष झालें. यानीं उपेज ( बड ) आरंभिलें त्याच्या बरोबर डामर, अलकारचक्र, सुस्सलाचा पुत्र विग्रहराज व सल्हणाचा पुत्र भोज हे होते. बड मोडण्यास उदय व धन्य या द्वारपतीस, राजानें पाठविलें. उदयानें बहु दिवसांनीं उल्लंघ्य असा मार्ग एक दिवसात उल्लंघिला म्हणून अलकार जनाच्या अपूर्ण्य कन्या ( अ.पा ) असिद्ध झाल्या. लोठणानें मधुमती व सिंधु याच्या मधील शिर:शिला या नावाच्या किल्ल्यात आश्रय घेतला.

## शिर:शिला किल्ल्याचा वेढा

उदयानें द्रगस्थ ( द्वारांशीं ) राहून मागील मार्ग रोख-ण्याची पुच्छपद्धति स्वीकारली. हटानें हल्ला करणें व रणात झटापटी करणें, हीं वर्ज केलीं व शत्रूला शोषण्याचें चालू ठेवलें. मधुमती तीरावरचा द्रुमसबाध नाहींसा केला. नगर-स्पर्धिनी झोपड्या बांधल्या व कटक प्रबल केलें. शस्त्र प्रेषणाचें कार्य अखंडित चालू ठेवलें. किल्ल्यांतील लोकांची जीवधासार ( रसद ) तोडणें वगैरे दैव्यदायी उपायांनीं किल्ल्यातील लोकांचें काहीं वाकडें झालें नाहीं. कृषीवल शेती सोडून व द्विज वेद सोडून, हातांत शस्त्र घेऊन होते. सर्वत्र हिमाची म्हणजे काळरूप कावसाची गोधडीच पसरली होती तिच्या भीतीनें जन व राजसेना सारखीच कापत होती. दगडाचा वर्षाव करून व पाणवठ्याचें रक्षण लोठण करीत होता. किल्ल्यातील लोकांनी श्लिष्ट दरवाजे लावले. तो किल्ला मीलिताक्ष ( डोळे मिटून बसल्याप्रमाणें ) दिसू लागला.

टीप:—राजा जॉन या नाटकात शेक्सपियरनें बाईस्राइनें लावलेले किल्ल्याचे दरवाज्याना किलकिले केलेल्या नेत्राची उपमा दिली आहे.

निद्राच्छेद करण्याकरतां रात्रौ एकमेकांना ओरडून हाका मारताना किल्ल्यातील लोकाना झोप आली नाही. भोज रात्रीं निसटून जाण्याच्या विचारानें पहातो तो खालीं शिबिरात सैनिक शेकोट्या पेटवून जागत आहेत असें त्यास आढळलें. लक्षांत आल्याशिवाय पीपिलिकेलासुद्धा मुख्य मार्गानें जाणें शक्य नव्हतें.

रात्र गेल्यावर एका डामरासह कमरेला दोरी बांधून एका कक्ष्यावरून पुढें आलेल्या प्रतर्दिकेवर एका डामरासह भोज उतरला. आसनापुरती दोघाना जागा होती पडण्याच्या भीतीनें पाच रात्रीं त्यांनी निर्निद्र घालविल्या सक्तुपिंडावर प्राणयात्रा करून तेथूनच ते घरट्यातील पक्षाप्रमाणें विष्ठा विसर्जन करीत. सहाव्या दिवशीं घनांनीं तुषारवृष्टि चालवली, तेव्हा त्यांनीं दतवीणा वाजविण्याचा उपक्रम चालविला. अरिकटकाच्या जाळ्यात पक्षांप्रमाणें पडू असें त्यांना वाटलें. कपुत्कुर्वः ( कोणाला हाक मारू ) असें ते म्हणाले. मग त्याना डामरानीं वर ओढून एका रिकाम्या घरांत नेऊन ठेवलें. लोठण व विग्रहराज याची स्थिति अधिक वाईट होती. ते अपूप खाऊन होते. अन्नसामग्री क्षीण झाली होती व यशस्कर या नावाच्या सेवकाना अन्नदानानें वश करून कल्यानें भृत्य भेदनीतीनें आपलेसें केलें. त्यांनीं लोठण व विग्रह यांना शत्रूला विकण्याचें ठरविलें. एकाद्या कथाशरीराचा

(कथानकाचा) शेवट नीट करणारा अप्राप्य असतो तसा भानगडीच्या कार्याचा शेवट करणारा मन्त्रीहि अप्राप्य असतो.

लोठण व विग्रह राज याना तेजानें सोडलें. तें त्यास पुन्हां प्राप्त झालें नाहीं. निर्वीर्य वानरेंधन अग्नीसमानेंहि जळत नाहीं. निद्राभंग झालेल्या अर्भकाप्रमाणें उद्वेगामुळें बाहेर ओठ काढून रडावयाची इच्छा लोठण करू लागला. लोठणाला डामरानें अलकारचक्रानें राजाच्या मन्त्र्यांच्या स्वाधीन केलें. त्याना दया आली. ते म्हणाले महाराज सौजन्यसुधेचे सिंधुच आहेत. अपकार करणारे असे विपद्ग्रस्त परके लोक आपल्या क्षमेची परीक्षा करण्यास कारण होतात, म्हणून ते त्यास उपकारीच समजतात.

लोठण जीर्ण कम्बल पांघरून, गोठ्यांतून जसा बलिवर्द तसा राजाकडे निघाला. लोकाना तो गुहेतून घालविलेला घुबड वाटला. लोठण राजाला शीतार्त गाईप्रमाणें दिसला. लोठणाला पृथ्वी भग्न झाल्यासारखी दिसली. व पर्वत पर्यस्त होऊन पडत असल्यासारखे वाटलें. राजापुढें कसा उभा राहू याचा विचार करून तो क्षितीवर जानू टेकून राजाच्या पदकमलावर मूर्धा ठेवून राहिला. राजानें हस्तस्पर्श करून त्याचें शिर वर उचललें. भिऊ नको असे म्हणणे दर्पोक्ति होईल, पुन्हां सुखाची प्राप्ति होईल या म्हणण्यात गाम्भीर्य नाहीं. माझा राग गेला असें म्हटलें तर पूर्वीच्या सर्व वैराचें विस्मरण झालें असें होईल. तू आमचा बान्धव आहेस या वाक्यानें थट्टा केली असें होईल. तुम्हीं दुःखानें कष्टी आहांत असा सांगण्यानें स्वताचा प्रभाव दाखविणें होईल. असा विचार करून राजा कांहींच बोलला नाहीं.

टीप:—वरील राजाच्या स्वभाववर्णनात त्याचा धीरोदात्तपणा व्यक्त होत आहे. पुढे विग्रह राजाचाहि राजाशीं असाच भेटीमध्ये सन्धि झाला.

## भोजाशीं जयसिंहाचें युद्ध

लोठण व विग्रहराज यांच्या ओष्ठद्वयांतून मन्त्रवित् जयसिंह राजानें गारुड्याप्रमाणें राष्ट्र ओढून काढलें. तरी त्याला दंश करणाऱ्या भोजाच्या दातांची चिंता होती.

डामरानीं विनर्दिकेवरून वर ओढून काढल्यावर भोज किल्ल्यांतच एका शून्यगृहात वसति करून होता. आपला लोठणाप्रमाणेंच विक्रय होईल, या भीतीनें तो तेथून एका रात्रीं निसटला. वाट चालत असतां त्याला दुर्गावरोह प्रस्तुत असता अप्रस्तुत वाटे. ऊर्ध्वारोह असता वारंवार अधोगति आहे असें वाटे. तो दुग्ध व टक किल्ल्याशीं मधुमतीच्या तीरानें आला. अभिपतीनें त्याला सामुग्री पुरविली. दरदांच्या राजाने विद्धसिंहानें छत्रचामरादि प्रक्रिया पुरवली. स्वकोशानें स्वामित्व दिलें हिमालयाच्या खोऱ्यांतले म्लेंच्छ आणून दिले. रजागृहयात राहून भोज राजायमान झाला. राजासारखा वागू लागला.

## रिल्हणाचा पराक्रम

राजाशीं बेबनाव झालेला बलहराचा ओजस्वी मुलगा राजवदन भोजाला मिळाला. जनाची उत्पलेच्छा शतशाखी झाली. त्रिलक डामरानें बंड केलें. मन्त्री अलकार, दस्यूशीं संगेट करतो. म्हणून राजानें त्यास दूर केलें. पृथ्वीहरचा पुत्रचतुष्क व कोष्ठकाचा धाकटा भाऊ हे राजाच्या कारागृहातून पळाले व त्रिलकाला जाऊन मिळाले. गर्गाचे पुत्र श्रीचन्द्र व जयचन्द्र यांचे वेतन राजानें बुडविलें म्हणून ते बंडांत सामील झाले. भोजाला वाटलें मही हस्तगत झाली.

यांच्या विरुद्ध लढण्यास, राजानें कम्पनेश, उदय, रिल्हण व गर्गपुत्र षष्ठचन्द्र याना पाठविलें. काळ येताच साळू जशी पिसाचे बाण सर्व दिशांनीं सोडते तसे कर्म रिल्हणानें आरंभिलें. तों पर्जन्य वृष्टीनें जलस्थलें सारखीं झालीं. वर मेघांनीं भरलेलें अम्बर व खालीं दूरवर जलानें पूर्ण भरलेलें भूतल, यांच्यामध्यें विजली स्यून होत होती. शिवण घालीत होती. राजपक्षीय रिल्हण याचें सैन्य त्याला सोडून पळालें, तरी तो एकटाच शत्रुसैन्यांत घुसला. तृणमणि (अम्बर) घासला म्हणजे त्यावर तृणें येऊन चिकटतात. त्याप्रमाणें त्याच्या खड्गावर शत्रूचा खड्ग घासला म्हणजे त्याच्या खड्गावर शत्रु शिरें चिकटत. तो मृत्यूच्या मुखात सप्रविष्ट झाला. आणि कोठल्या तरी मार्गानें बाहेर पडला. जसें तिमि माशाच्या श्रोत्ररन्ध्रातून पाणी बाहेर पडतें तसा. रिल्हणावर चतुष्कानें मागाहून येऊन हल्ला केला. रिल्हणानें दोहोंकडून मारा करणारें अरिसैन्य पाहिलें तरी दुतोंड्या साप पाहून मोर जसा सम्भ्रमपावत नाहीं व उलट नाचावयासच लागतो. तसा हा आनंदानें नाचावयास लागला. व शत्रूच्या दोन्ही सैन्यांना पर्यायानें मुख व पृष्ठ दाखवू लागला. घोड्यावर स्वार होऊन तो वाळ्याच्या झोत्याप्रमाणें इकडून तिकडे फिरत होता. शेवटीं त्यानें रन मार्गानें अरीला पळविलें.

टीप:—सर्वत्र बाण मारणाऱ्या रिल्हणला दिलेली साळूची उपमा, वर आकाश व खालीं भूतल याना वीज जणू शिवण घालीत होती ही उत्प्रेक्षा; शत्रु शिरें चिकटून घेणाऱ्या रिल्हणाच्या खड्गाला अंगावर तृण चिकटून घेणाऱ्या, तृणमणीची उपमा, शत्रुमुखात शिरून कोठल्या तरी मार्गानें बाहेर पडणाऱ्या रिल्हणाला, तिमिमत्स्याच्या श्रोत्ररन्ध्रांतून बाहेर पडणाऱ्या पाण्याची उपमा; दोहोंकडून झालेल्या अरीच्या माऱ्याला न भिणाऱ्या रिल्हणाला दुतोंड्या सापाला पाहून न भीता उलट नाचणाऱ्या मोराची उपमा, इकडून तिकडे अरीच्या सैन्यात स्वार होऊन फिरणाऱ्या

त्याच रिल्हणाला दिलेली बोल्याची उपमा असउत्कृष्ट अलंकार एका वर एक रचून कवीनें आपलें असामान्य निरीक्षण शक्ति दाखविली आहे. तिचें केवढें केलेलें कौतुक अपुरेंच ठरेल. रिल्हणाचें शौर्यहि असामान्य खरेंच !

नाग हा समृद्ध डामर होता. त्याची भिक्षूच्या युद्धात उपेक्षा झाली होती. म्हणून आपण करावयाचें वड दुसऱ्यानें केलेलें पाहून त्याला शोक झाला, जसा आपला अर्थ दुसऱ्यानें आणलेला पाहून कवीला होतो तसा.

" राजाचा शत्रु जो भोज, त्याला आपल्या पक्षाला आणण्या करतां, नाग त्याला म्हणाला " राजवदनाला सोडून तू माझ्या पक्षाला ये. कामधेनूला सोडून शेळीच्या गळ्यात मिठी कोण मारील ? "

राजवदनाची प्रतिष्ठा कमी करण्या करता, राजाच्या पक्षाला नाग मिळाला. लोक प्रिय किंवा अप्रिय, मित्र किंवा शत्रु होतात, ते सर्व स्वकीय तात्पर्यामुळें होतात. त्यांना स्नेह किंवा वैर यांतलें काहीं ठाऊक नसतें. मधुदान देऊन जें कमळ भ्रमराचें पोषण करतें त्याचा नाश हत्ती करतो. म्हणून हत्तीचा द्वेष भ्रमर करीत नाहीं कारण हत्तीच्या मद—दानाचा आस्वाद भ्रमराला घ्यावयाला मिळतो.

टीप :—कवीची प्रतिभा येथें सारखी तापत गेलेली दिसते. आपलें वड दुसऱ्यानें केलें म्हणून नागाला झालेल्या शोकाला, आपला अर्थ दुसऱ्यानें आणला म्हणून कवीला झालेल्या शोकाची उपमा ; राजवदन हा शेळी व नाग हा कामधेनु या शब्दानीं ध्वनित केलेला दृष्टान्त, व स्वार्थाकरितां लोक स्नेह किंवा वैर करतात याला भ्रमर व हत्ती याचे दिलेले दृष्टांत फारच आल्हाददायक आहेत.

भोजाचे अनुयायी भोजाला घेऊन डोंगरात पळाले. राजवदनाला दोरी तुटून विहिरींत पडल्यासारखें झालं. भोजानें पळता पळतां युद्ध चालू ठेवलें ही त्याच्या धैर्याची मोजणी झाली.

भोज व अलंकारचक्र यांना धरू जाणार राजाचें सैन्य यांचा न्याय चिखलातून पळून जाणारा ककच पक्षी व त्याच्या मागें लागलेला व्याध याच्या न्यायासारखा झाला.

भोज क्षीणार्थ झाला. ज्यानें वृत्ति मिळेल तें करण्याचें त्याचें मनात आलें. राजकारण रहाटाच्या दोरीप्रमाणें फिरत होतें. राजा जणु बुद्धिबळांचा डाव खेळत होता. लोठण व विग्रहराज हे दोन मोठे मोहरे घेऊन राहिलेला मोहरा जो भोज तो घेण्याकडे तो लक्ष देत होता. त्याकरता वाजी व प्यादीं ( घोडदळ व पायदळ ) हीं बळि देण्यास तो सज्ज होता. म्हणून भोजाचे लोक जें जें मागत तें तें देऊन भोजाशीं सधान बांधण्याचें तो पहात होता.

नाग या डामराचें राजवदनाला भय वाटत होतें. राजाचा डाव लक्षांत घेऊन, राजवदनानें द्वारपति धन्याला कळविलें कीं तुम्हीं राजवदनाला माझ्या स्वाधीन करा. म्हणजे मी भोजाला तुमच्या स्वाधीन करीन. त्याप्रमाणें भोजाचा निष्क्रय करून विक्रय नागाला धरून आणण्यात आले. त्याला जयचंद्रानें वैर साधून कपटानें मारलें.

भोजाचें मन राजवदनाविषयीं शंकित झालें. समुद्र घरट्याच्या वाटोळें बांधलेल्या जाळ्यांत, कोठल्याहि रंध्रानें बाहेर पडलें तरी; पतन हें आहेच. हें कळून आलेल्या पक्षाप्रमाणें राजसैन्यानें सर्व बाजूनीं वेढला गेल्यामुळें भोज तडफडूं लागला.

भोजाला या समयीं एक समरात क्षत झालेला ब्राह्मण भेटला. भोज ह्याचें समरात रक्षण करू शकला नाहीं म्हणून त्यानें भोजाची निंदा केली स्वतःच्या दुःखानें आर्त झालेला भोज, त्याच्या दुःखानें व्यथित झाला. आधींच उग्र असलेल्या एकाच्या दुःखाचें, दुसऱ्याचें दुःख अनुषंगिक होतें. कमलाच्या कोषांत बद्ध झालेल्या मधुपाला चक्रवाकाच्या विरहार्त स्वरानें अधिकच दैन्य प्राप्त होतें. भोज म्हणाला, " हे ब्रह्मन् मी निंद्य नाहीं. उलट माझी तुला दया आली पाहिजे. इतक्या विषम स्थितींत मी सापडलों आहे. " ब्राह्मण म्हणाला, " हे राजपुत्रा ! आपलें प्राण संकटात टाकून, प्रजेला नाना प्रकारची पीडा देऊन आपले कोणतें कार्य साधणार आहेस तें सांग ! जो तुला जेतव्य वाटतो तो अग्निशौच सारंगाप्रमाणें, शत्रूच्या शौर्यरूप अग्नींत उड्या मारून, स्वतःची शुद्धि करून घेतो. ज्याच्या पुढें पृथ्वीहर व अवतारी भिक्षाचर हे जित झाले, त्याच्याशीं युद्ध करणार कोण बरें क्षुद्रप्राय वाटणार नाहींत ? द्वैराज्य जीवींच्या ( राज्यात भेद पाडून पोट भरणाऱ्याच्या ) कृती तू जाणतोस पृथ्वीचा भार वाहणाऱ्या नागाच्या कुलात जन्मलेल्या, पकडलें जाऊन पटींत कोंडलेल्या, व तोंड वासून आत पडेल ते गिळून असलेल्या सर्पांना गारुडी पेट्यातून बाहेर काढतात, तें लोकाना भिवविण्याकरतां असते. स्वतःचें पोट भरण्याकरता असतें, सर्पांना खावयाला घालण्याकरता अथवा त्यांचे यश वाढविण्याकरतां नसतें. "

राजाचें प्रसाधन करण्याचा मार्ग भोज शोधू लागला. तेव्हा भोजाला केव्हातरी भेटलेला असा एक जयसिंहाच्या पक्षाचा चारण भोजाजवळ येऊन जयसिंहाची स्तुति करू लागला. भोजाचें मन द्रवलं दोघाच्या भाषणातील दैर्घ्य संक्षिप्त करावयाचें म्हणजे एवढेंच सांगणें कीं एक आप्त संधीचें बोलणें करावयास जयसिंहाकडे पाठविणें इष्ट आहे असें ठरलें. भोज पोरका असता त्याचें मातृकृत्य ज्या धात्रीनें केलें त्या स्त्रीत्वामुळें अप्रतिम दिसत असलेल्या नोना नावाच्या धात्रीला भोजानें

राजाकडे पाठविलें. भोजाची इच्छा मान्य करून राजानें आपल्या निर्मत्सर पट्टराणीला कल्हणिकेला तारमूलक येथें अमात्यांसह पाठविण्याचें ठरविलें.

राजधर्म पाळताना कांहीं क्रूर कर्मे करावी लागतात. म्हणून प्रस्थानसमयीं ती म्हणाली. "शत्रूवर विश्वास-ठेवण्या.पूर्वी विचार करावा. अमानुषाच्याच ठिकाणीं उन्मेष पावणारी जी शेमुषी बुद्धि ( दुसऱ्याच्या मनांतील खोल विचार जाणण्याची शक्ति ) तींत विमाइन करण्याचें तू बघतोस, तें शक्य झालें तर मनुष्यांचें मर्त्यधर्मत्व कोठें राहिलें ! भोजानें हिमालयात हिम विक्रय चालविला आहे. हल्ली प्राकृत जनात मदादोष वाढला आहे. ते शमाचें ग्रहण करीत नाहींत आपण व दुसरा यातील अतर जाणीत नाहींत. राणीच्या शका शांत केल्याशिवाय राजाने तिची रवानगी केली कांहीं डामरास राजबदन निमित्त काढून सधि न होऊ देण्याच्या तयारींत होता. त्यांचें निवारण भोज करीत होता. राजाचें रजन करणारे विट आता संकटाचे काळीं वैकल्य पावून पळाले.

## राजाच्या विटांस कवीचा शेवटचा रामराम

ज्याचा ज्याचा राष्ट्रात दुदुरभिरवानें घोष केला जातो, तें तें हे रंजक राजाच्या कानांत गुप्त म्हणून सांगतात. मर्माचें कर्तन करणाऱ्या ज्या गोष्टींचा उच्चार अरि सुद्धा करणार नाहीं. त्या गोष्टी हे श्लाघापूर्वक सांगतात. शाठ्य व मौर्ख्य यांचे कोठे निधी असतील. तर ते हे राजाचे रजक जन होत. भाण्ड ( विदूषक ) तांडवनृत्य मंडपांत. कन्याकवि ( गोष्ट्या कवि ) कटुकथा विणण्याच्या कार्यांत, खटाकू नांवाचा प्राणी पर्वताच्या भूगर्भात, व विट पिण्डीशूरतेनें ( परपुष्टतेनें ) राज मदिरांत पटुत्व दाखवितात; पण अन्य ठिकाणीं दृश्य झाले म्हणजे न्हादाच्या पाण्यातून बाहेर पडलेल्या कासवाची तुलना पावतात हें विचित्र आहे.

## युद्ध कार्याचा गोड शेवट

इकडे नदीच्या एका तीरावरील झाडीत भोज श्रान्त होऊन ठाण देऊन बसला. दिवसहि पर्वताच्या शिखरावर विसावा घेत बसला. दिवस व रात्र यांच्यामध्यें मध्यस्थपणा सध्येनें पतकरला. व हात जोडलेल्या सर्वजनांस वद्य झाली

त्या प्रमाणें कल्हणिका राणीनें भोज व राजा या मध्येंसधिकरण्याचा मध्यस्थपणा पतकरला व हात जोडलेल्या सर्वजनांस ती वद्य झाली. तिकडे पैलतीरावर धन्यादी राजभृत्य, कार्याच्या शेवटाची वाट बघत बसले.

टीपः— एकीकडे मानव सृष्टींत चाललेला दोन युद्धमान राजांचा सधिकरण ... काळ व दुसरीकडे निसर्गाच्या सृष्टींत दिवस व रात्र ... मील सधिकाल व राणीचें सध्येप्रमाणें मध्यस्त होणें व ... होणें हे देखावे फार रम्य आहेत.

रात्र सरताच तरूषण्डातून मितपदातियुक्त, असा एक वीर पालखींत बसून बाहेर आला.. सर्व बाजूनी येऊन त्याला अडविणाऱ्या डामराचे ओघ तो आपल्या दृष्टिक्षेपानें प्रतिहत करीत होता. धन्यादी त्याच्या वाटोळे जमले. मध्यानीं भोजाला राणीकडे नेलें. काककुलातून पिकाला दुसरे पिक काढून नेत असता काक जसे आक्रोश करतात, तसा आक्रोश कांहीं-लवण्यांनीं केला- राणीकडे गेल्यावर तिला भोजानें वदन केलें. प्रिय पुत्राप्रमाणें तिला अभिवदन केलें. तिच्या अव्याज माधुर्यादी अकृत्रिम गुणानीं राजाचें शीलहि विशद आहे असें भोजाला वाटलें.

मुखरागो मनोवृत्ते द्वारोज्वल्य गृहश्रियः
भर्तुःस्वभावस्याचारो योषितामनुमापकः ॥

अर्थः— मुखरागावरून ( चर्येवरून ) मनोवृत्तीचे, दारांच्या औज्ज्वल्या वरून गृहलक्ष्मीचें व स्त्रीच्या आचारावरून भर्त्याच्या स्वभावाचें बरोबर अनुमान करता येतें.

टीपः या श्लोकांत केवढें मार्मिक व भव्य सत्य आहे ! पतीनो ! या पासून योग्य तो बडा घ्या !

नतर तो राजाला भेटावयाला राजसभेंत गेला: भोजाच्या पायाना स्पर्शकरून भोजानें आपली तरवार त्याला अर्पण केली. राजा म्हणाला, "तू समरांत जित केलेला नाहींस. तुझे शस्त्र आम्हीं घेणार नाहीं."

भोज म्हणाला, "महाराजांचें दाक्षिण्य उत्पन्न करण्याकरता किंवा उपचार म्हणून मी बोलत नाहीं. कवींची प्रतिभा जितका भास्वर प्रताप निर्माण करूं शकते तितका भास्वर महाराजांचा प्रताप मी पाहिला. सधि घडावा अशी इच्छा धरून मी होतों. जें जें पापमूलक केलें तें तें माझे अगीं जीव-स्फुरत आहे हें दाखविण्याकरता केलें. विग्रह करण्याच्या इच्छेनें नव्हे. पुढें जें करावयाचें त्याला महाराज प्रमाण आहेत."

भोजाचें शस्त्र भोजाच्या मांडीवर ठेवून राजा म्हणाला "हें शस्त्र मी तुला देतो. तें धारण करण्यास विमुख होऊ नकोस इतकीच माझी आज्ञा पाळावी." कल्हणिका राणीनें या कामात सर्व भाग घेतला होता. तिचा मान करण्याकरतां हा सौजन्यनिधि राजा, तिच्या महालात भोजासह गेला. ती निपुण राणी सस्मित म्हणाली, "तू आताच नृपाचा आप्त झाला आहेस. तिनें स्वागतार्थ केलेली उक्ति पतीनें प्रणतीनें मान्य केली. तेव्हा राणीनें लाजून मुख खाली केलें.

टीपः—हा राजाचा, भोजासह राणीच्या महालातील इल्लाला प्रवेश फार बहारीचा आहे, राजाचें सौजन्य, राणीवरचें त्याचें अव्याज प्रेम, राजाविषयींची, राणीच्या मनातील पूज्य बुद्धि व तिचा विनय या गुणाच्या

आविष्करणांत या प्रवेशाला अत्यन्त शोभा आली आहे. ती पाहून मनाला फार आनंद होतो.

नंतर सर्व उपकरणांनीं पूर्ण अशी एक जागा राजानें भोजाला दिली. आप्तपणाचा गौरव दाखवण्याकरितां, राजा त्याला जेवते वेळेस उजव्याबाजूस बसवी.

## संधिनंतर भोजाचें राजाशीं वर्तन

जसे क्षुद्रकवी महाकवींच्या काव्यांत दोष काढण्याकडे लक्ष देतो, तसें लक्ष भोज राजाचें कार्य करतांना, प्रमादानें कांहीं चुकलें; कांहीं हीन राहिलें; कांहीं अधिक झालें, तर त्यांत दोष काढण्याकडे लक्ष देत नसे. आपण प्रभु जयसिंहासारखे आहांत, असा कोणी विचारकानें (खुशमस्कऱ्यानें) चाटुवाद केला, तर धीर व धृष्ट दृष्टिपातानें भोज त्याला धमकावून, अपुनर्भाषी (पुन्हा कधीं बोलतो असें) करी. राजानें त्याची नजर कैद कांहीं काळानें शिथिल केली तरी तो शिकवलेला अश्व जसा पळत नाहीं तसा हा पळून नाहीं. तो सदैव राजाच्या पुढें असे. पण राजा जर अवरोधगृहात अथवा मद्यागारांत शिरला, तर तो निषेध केल्याशिवाय स्तब्ध पद होई. स्वप्नसुद्धा राजाला न सांगण्यासारखें भोजाला वाटलें नाहीं. मत्र्यानीं केलेली परस्परांची निंदा तो स्वप्नवत् विसरून जाई.

टीप:—वरील भोजाचें कवीनें काढलेलें चित्र सुंदर आहे. या वर्णनांत भोजाचें सत्शील दिसून येतें. क्षुद्रकवींचा समाचार कवीनें थोडक्यांत जातां जातां घेतला आहे तें टीकाकारानीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आतां राजा त्रिलकाकडे वळला. सज्जपालानें त्रिलकावर हल्ला केला. त्रिलकाचा पुत्र जयपाल लढत असतां त्याचे तीन घोडे हत झाले तरी चातुर्यानें तो पदाति असा दिसला नाहीं. त्याच्या अनुजाला शिशुपणांत लढाई प्राधान्यानेंच उपलब्ध होती तरी त्यानें जुन्या योद्ध्यास चकित केलें.

कोठून कांहीं लाभ नाहीं असें पाहून त्रिलकानें आपुली अंगुली कापून राजाच्या स्वाधीन केली व आपलें शीर्षफळ मागून घेतले जसें माकडाच्या हातचें फळ त्याला कांहीं देऊन घेतात तसें. लोठक पकडला गेला व मारला गेला. राजवदन एका लढाईंत कपटानें मारला गेला. त्यानें शेवटपर्यंत संधि केला नाहीं.

रड्डाराणीच्या ज्येष्ठ मुलाला लोहर कोट्टाच्या राज्यावर बसविलें.

## जयसिंहाचे प्रिय मंत्री कुलराज

यानें कांहीं चिर प्ररूढ व्यवस्था निर्माण केल्या. विवाहित अंगनेचें शीलभ्रष्ट झाल्यास तिच्या पतीला दंड करण्याकडे प्रवृत्ति होती. तिचें यानें विचार करून, निवारण केलें. पण पुढें राजानें याला नगराधिपति केल्यावर परिणित गृहस्थाशीं बद्ध झालेल्या नर्तकीशीं संप्रयुक्त झालेल्या लोकांना तो दंड करूं लागला. पण असल्या क्लेशाच्या दोषगुणाचें चिंतन कशाला पाहिजे? याच्यासारखा अद्रोही व निर्लोभी कोणी झाला नाहीं. हा मृत झाल्यावर याच्या सत्काराला पुरेल इतकें द्रव्य याजवळ नव्हतें.

## जयसिंहाच्या अमात्यांचा दानधर्म

कंपनाधिपति जो उदय त्याच्या विताल्ल पत्नीनें विहार बांधला, त्यांतील प्रासादप्रचक्र हा धर्मानें उभारलेला हा उंच पांच कोटांचाच पत्रा होय. पत्नादि मल्यानीं गवांदिकांना चाण्याला वितस्तेवर पूल बांधला. व सवारोत्तरण पुण्य कर्म केलें. रड्डा देवीनें मल्यावह यात्रा केल्या.

## ग्रंथसमाप्ति

जयसिंह व रड्डा राणी, ही सुंदर पांच पुत्र व चार कन्या अशा अपत्यांनीं सुशोभित आहेत एक सोमपालक व एक त्याच्या मुलाला दिलेल्या आहेत.

हल्लीं हा अतिक्षमाशील राजा, मेदिनीला आनंदित करीत असतो. जशी गोदावरी नदी उत्सुक अशा सात मुखांनीं सागराला मिळते तशी ही राजतरंगिणी (सात) आठ तरंगानीं मधुरालाप करणाऱ्या काव्यानीं श्रीकांत राजाच्या विपुल अभिजात यशाला सागरांत विश्रांति देण्याला मिळते.

॥ शुभमस्तु ॥

## राजतरंगिणीचें पहिलें वृत्त

या ग्रन्थाकडे परकीयाचें लक्ष जहानगीर बादशहाचे काळांत प्रथम गेलें. बादशहानें या ग्रन्थाचें संक्षिप्त भाषांतर पर्शियन भाषेंत प्रथम करविलें. त्यानंतर पॅरिस येथील रॉयल एशियॅटिक सोसायटीनें फ्रेंच भाषेंत तसेंच करविलें. पुढें डाक्तर स्टोन यानें इ. स. १९०० सालीं इंग्लीश उत्तम भाषांतर छापून प्रसिद्ध केलें. डाक्तर स्टीन यांच्या कार्यनिष्ठेस व परिश्रमास तोड नाहीं.

या काव्याची मूळप्रत शारदा लिपींत आहे. तिची नक्कल देवनागरींत उतरून घेताना लेखकानें कांहीं शब्द गाळले व कांहीं जावई शोध केले. मूळ प्रतीचें गोषांतल्या स्त्री प्रमाणें आपल्याला क्षणदर्शन झालें असें डाक्तर स्टीन यांनी सांगितलें. त्यावरून डाक्तर स्टीननें त्या प्रतीचा शोध चालविला. त्यास असें आढळलें कीं त्या प्रतीचा स्वामी दिवंगत असून त्याच्या वारसांनी तिचें वांटप करून घेतलें होतें. वाटणी पत्रवार नसून तरंगवार होती. यावरून ते वारस सुबुद्ध होते म्हणावयास हवे!

या मूळ प्रतीची अष्टपत्री सत्रयाची (स. १७ व्या शतकाची) असून तींत विविध पाठ आहेत. थोडी खोडाखोड आहे. एखादी अवान्तर टीप आहे; पण अर्थबोधिनी टीका नाहीं.

डाक्तर स्टीननें या ग्रन्थात निर्दिष्ट केलेलीं ठिकाणें आयवा त्याचे अवरोष हीं बाग्यावर जाऊन पाहिलीं. व त्यांवर आपल्या ग्रन्थात भरपूर टिपा दिल्या आहेत. इतिहासाचें संशोधन करणारा असा ग्रंथ विरळा.

यानंतर इच्छाराम सूर्यराम यांनें गुजराथी भाषांतर श्रीमंत सयाजीराव गायकवाड ग्रंथमालेंत छापून निघालें. कै. मा. व्य. लेले यांचे मराठी भाषांतर त्यांनीं पुणे येथील चित्रशाळेच्या मालकांनीं प्रसिद्ध केलें.

यानंतर माझ्या हातांत एक राजतरंगिणीची संस्कृतांत छापलेली प्रत पडली.

तिचें भाषांतर करण्याचा मोह मला झाला. मीहि माझें स्वताचें असें मराठींत भाषांतर केलें. तें संस्कृत भाषेची गोडी घेत घेत केलें. पोपनें होमरच्या इलियडचें भाषांतर इंग्रजींत केल्यावर ड्रायडनेंन नाहीं का केलें!

हें भाषांतर केल्यावर माझे हातीं अलाहाबादेचे बॅरिष्टर पंडित यांनीं आपले इंग्रजींत भाषांतर छापून प्रसिद्ध केलें. त्यांत नवीन माहिती पुष्कळ घातली. उत्तम कागदावर उत्तम छपाई व उत्तम सोनेरी बांधणी यांनें अलंकृत असें अंतर्बाह्य सुंदर पुस्तक मुंबई रॉयलएशियेटिक सोसायटीच्या ग्रन्थालयात पाहून मला फार आनंद झाला. जसा हिऱ्याच्या आंगठीला सोन्याचें कोंदण पाहून होतो तसा!

असो, माझ्या भाषांतरित ग्रन्थांचें सार काढून छापलें त्याचें कारण ह्या ग्रंथाच्या पहिल्या पृष्ठावर पहा.

## हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांला शोभणाऱ्या कांहीं गोष्टी.

पहा तरंग ३ पृष्ठ १२. ललितवण राजानें लिहिणार दैस्ते वज नीट रहाण्यास जागा बांधल्या. कवीनें राजाचें मुख्यत्वें वर्णन केलें आहे तरी सामान्य जनाच्या व्यथेचेहि वर्णन लक्ष लावून केलें आहे. (पहा तरंग ५ पृष्ठ २२)

गोपाळ वर्म्याचा पित्याला शंकर वर्म्याला उपदेश. त्यात त्यानें वेठबिगारीचा निषेध केला आहे. चंद्रापीड रणादित्य राजानें एका चर्मकाराची कुटि मोबदला देऊन सार्वजनिक कार्याकरता विकत घेतली. (पहा तरंग ४ पृष्ठ १४)

अशी, गोष्ट हल्लीं लॅन्ड ऍक्विझिशन कायद्या खालीं करण्यात येते. स्थापत्य शास्त्री सूय्य हा दगडांनीं मार्ग बुजालेल्या वितस्ता नदीचा मार्ग ते दगड काढून मोकळा करतो व कालवे खणून तिचें पाणी सर्वत्र खेळवतो. (पहा तरंग ५ पृष्ठ २१)

पहा तरंग ५ पृष्ठ २१ साक्षरता प्रसार यशस्कर राजा करतो. — एकांगांना (एका लढाऊ जातीच्या राजाला युद्धात उपयोगी पडणाऱ्या शिपायांना वेतन घेण्यास अक्षपटलांत (डिव्हिजन नवीसच्या) हल्लींच्या अकाउंटन्ट जनरलच्या-कचेरींत) जावें लागे. व तें नामग्रह पूर्वक मिळे. ते त्यांचे श्रम वांचविण्यास अनंत राजानें त्यांस नक्त नेमणुका करून दिल्या. तरंग ७ पहा पादाग्र नांवाचें एक कर्मस्थान होतें. तेथें सोन्याचा वर्ण (कस) व मूल्य लेखावयाचा व मुद्रिन करावयाचा राजाचा हक्क होता. तेणें जनाजवळ वित्तसंचय किती आहे तें कळून येत असे. तो राजाचा क्षेम नावाचा एक उग्रधी अधिकारी होता. त्या ज्ञानी मनुष्यानें हें कर्मस्थान बंद केलें. कारण त्यापासून राजे वित्तसंचय करणाऱ्या प्रजेला त्रास देतील. हल्लींच्या भाषेत म्हणावयाचें म्हणजे त्यानें सोन्यावरचें नियंत्रण (कंट्रोल) उठविलें. सार्वत्रिक माफीची घोषणा हर्षानें एका युद्धप्रसंगीं केली. ही हल्लींची जनरल ॲनेस्टी होय. पहा तरंग ७ एका बौद्धधर्मानुयायी राजानें खाटकाचा धंदा बंद केला तेव्हां त्यास उपजीविकेचें अन्य साधन करून दिलें. पहा तरंग ३ मेघवाहन हें दारूबंदी केल्यावर माड वाहणाऱ्यांना दुसरा धंदा देण्यासारखा आहे. आगींत पेटलेल्या घरांचे रक्षणाचे कामांत सैन्याचा उपयोग राजानें केला. दाद लावून घेण्याकरता व्यक्तिशः किंवा सामुदायिक उपोषण हल्लींप्रमाणें करीत. ही उपोषणाची पद्धत जुनीच होती म्हणावयाची. प्रजापीडक कायस्थांस (कारकुनांस) शासन करणें. पहा उच्चलाची कारकीर्द. जयसिंह राजा पुरवासी धर्मांकडील पुत्रोत्सव विवाहादी प्रसंगीं औपयोगिक वस्तूचें दान करी. राजाच्या कराची वृद्धि करणारे जे लाकडावरचे कर ते प्रजेच्या स्वाधीन करून नगर नवीन वसवून राजानें घेतलें. पहा तरंग ८ उच्चल राजा. उपोषण करून कुणी मरण कवटाळतें तर धर्माध्यक्षाकडून त्याची नीट प्रत्यवेक्षा करी. तेणें जनता प्रबल झाली व अधिकारी निर्बंध झाले. तस्कराला तो कोशाध्यक्ष करी व चौर्याचरणापासून निवृत्त करी दंडास योग्य पुरुषाला हा दंड करी व त्याचीच शुद्धि होण्यास त्याच पुरुषांकडून धर्म करावी. यानें उदारपणें दिलेल्या दानांत दूतांचा अर्धा वाटा नसे. हा वृत्तिहीनास वतन देई. अन एम्प्लाय मेंट बरोबर कामकरी! आपलें संचित अन्न अल्पमूल्यानें विकून दुर्भिक्ष नाहीसें करी. हीं हल्लींची स्वस्त धान्याची दुकानें होत. पहा तरंग ८ उच्चलाच्या कारकीर्दीचा आरंभ.

अन्नानें भरलेलीं पात्र ललितादित्य राजा सहस्रांनीं वाटी पहा तरंग ४ पृष्ठ १६

शेवटल्या राजानें सर्व राज्यें एकसूत्री केलें. हें हल्लीं लहान राज्यें मोठ्या राज्यात विलीन करण्याचा जो मार्ग तो देशमुख.रणेचा मार्ग अवलंबिला जात आहे.

## काश्मीरची संस्कृति व राजतरंगिणीचें ऐतिहासिक महत्त्व

काश्मीर हा देश हिमालयाच्या एका उच्च भागात आहे. सर्व दिशांनीं वाटोळच्या अधिक उच्च रांगांनीं तो वेष्टित आहे. इतर देशापासून त्याच्या पृथकपणामुळें त्याचा इतर देशाशीं फारसा संबंध नसे. त्यामुळें त्याची संस्कृति हजारों वर्षें जशीच्या तशी टिकून असे. मध्यन्तरच्या मुसलमानी अमलानें ती बदलली नाहीं. अजूनहि पुढील हजारो वर्षांत ती साफ पुसून जाणं शक्य नाहीं. ही गोष्ट पुढें दिलेल्या राजकीय, सामाजिक, व आर्थिक अशा स्थितीकडे लक्ष दिलें म्हणजे कळून येईल.

### काश्मीरची राजकीय स्थिति

राज्यप्राप्ति बरी परापरागत असे. निर्वंश झाल्यास मंत्री अथवा पौरजन राजाची निवड करीत. पहिला राजा मेघवाहन याला गांधार देशातुन आणविलें होतें.

पहा तरंग पृष्ठ ९. काश्मीरचा राजा हिरण्य निःसंततिपणात मृत्यु पावला. त्याचा वारस पुतण्या तोरमाण, यात्रेला गेला होता. म्हणून रिकामें असलेल्या काश्मीरच्या राज्यावर बसण्या प्रजेनें उज्जयनीचा चक्रवर्ती राजा जो विक्रमादित्य त्याजवळ राजा पाठविण्यास विनति केली. त्यानें मातृगुप्ताला पाठवून दिला पहा ३ तरंग पृष्ठ १. ब्राह्मण परिषदेनें एकदां यशस्कर राजाला निवडलें. स्त्रीलाहि राज्यप्राप्ति होत असे. श्रीमान दामोदर राजा त्याचा मित्र जरासंध व कृष्णाचा बन्धु बलराम, यांच्या युद्धांत श्रीकृष्णाचे चक्रानें मारला. त्याची स्त्री यशोमति गरोदर होती. मंत्री विरुद्ध असता श्रीकृष्णानें नीलमल पुराणाच्या आधारानें तिला राज्यावर बसविलें. व ती सर्वांस मान्य झाली. पहा तरंग १ पृष्ठ ४.

याच्यापुढें मात्र तरंग ५ मध्यें टीप दिल्याप्रमाणें हें राज्यपदप्राप्तीचें तंत्र पुढें टिकलें नाहीं. वारसा प्रकरणात मत्सरीराण्या सत्ताभिलाषी मंत्री, प्रबल डामर व शस्त्रधारी तंत्री वगैरे लुडबुड करू लागले. युद्धें परस्परात सुरू झालीं तीं तरंग ६ च्या शेवट पासून तों आठव्या तरंगात जयसिंहानें सर्व भांडखोर लोकाचा मोड करीतों टिकलीं. तेथें ग्रंथ समाप्ति झाली.

साधारणतः म्हणावयाचें झालें म्हणजे राज्य प्रांतीच्या आड येणाऱ्या शत्रूचा काटा उपटून टाकण्याकरिता, मारेकरी घालणें जादूटोणा करणें इ. प्रकार राजरोज चालत. विजय मल्लानें (एका खाजगी व्यक्तीनें) जयसिंहाच्या एका कर वाढवणाऱ्या जुलमी अधिकाऱ्यावर चित्ररथावर प्राणान्तिक हल्ला केला. हेतु असाकीं अशा दुर्वृत्तांचें जर आम्हीं दमन केलें तर त्याला दहशत पडून तो पुन्हा जुलूम करावयाला प्रवृत्त होणार नाहीं. पहा तरंग ८ जयसिंहाच्या कारकीर्दीचा आरंभ

चित्ररथाचें क्षत बरें झालें. धूर्त राजे सामदाम दण्डाचा उपयोग करीत.

### राज्यकारभार

राजसत्ता अनियंत्रित असे. निरनिराळीं कर्मस्थानें स्थापलेलीं असत. त्यावर तितकेच मंत्री नेमलेले असत. निरनिराळ्या करांच्या रूपानें द्रव्य वसूल केलें जाई त्यातून राज्य व्यवस्थेला लागणारा खर्च चालविला जाई.

आयात व निर्यात मालावर कर बसविला जाई हें हल्लींचें कष्टम खात होय. एका राजानें पुरीजावर (मैलावर) कर बसवून द्रव्य करून घतलें.

दिवाणी कामें न्यायाधिकारी करीत. त्याच्या विरुद्ध राजाकडे अपील चाले. दाद मागण्यात येई पहा तरंग ६ यशस्कर राजा.

## दण्डनीति ( मालमत्तेस व शरीरास इजा केल्यास करणाऱ्यांस शासन ).

साधी शिक्षा म्हणजे दण्डाची, बंधनांत टाकण्याची, कडक म्हणजे मुडके कापून नदींत फेकून माशांना खाद्य देण्याची; अर्धमूर्छा मारून खटाऱ्याला बांधण्याची.

ब्राह्मणास देहान्ताची शिक्षा सोडून शिक्षा देण्यात येई एका ब्राह्मणाला अत्याचाराबद्दल कपाळावर डाग देण्यांत आला.

आरोपीला मारहाण केली जाई; चोराला पोलिसची समजूत देत असतां तो मेला. अधिकाऱ्यानें काशीस जाऊन प्रायश्चित्त घेतलें, असें एक उदाहरण आहे.

व्यभिचाराबद्दल एका स्त्रीचें नाक कापण्यांत आलें. स्त्रीवध निंद्य मानला आहे.

### देशाचें रक्षण

देशाचें संरक्षण सैन्य करी. सैन्यात लढाऊजातीचे लोक असत. कधीं कधीं ब्राह्मण वेद सोडून सैन्यात काम करीत. सैन्यात घोडदळ व पायदळ असे. शस्त्रास्त्रें साधीं असत. बाण, खड्ग, भाले, परशु इ. दगडाचा मारा गोफणीनें (उल्हाट यंत्रानें) केला जाई. हिमवृष्टिहि प्रबळ शत्रूच्या सैन्यास शत्रूप्रमाणें दगडांसारखा मारा करून युद्ध बंद करी. कधीं कधीं आधुनिक तंत्रें योजलीं जात. सैन्याकडून व्यायाम ( कवाईत ) करून घेत. युद्ध चालू असतां शल्योत्पारण करून क्षतावर मलमपट्ट्या बांधीत. डोळ्या सैन्याबरोबर असत.

### सामाजिक स्थिति

राजानें राण्या किती कराव्या त्याला निर्बंध नसे. शिवाय अवरोध गृहात ( जनानखान्यांत ) अनेक स्त्रिया असत.

देवदासी देवळात अर्पण केल्या जात. पहा तरंग ४ पृष्ठ १३. पट्टराणीला मान अधिक असे. कधीं कधीं राजकारण म्हणून प्रेम जुळविण्यात येत. दोघा युद्धयमान पक्षांत संधि करण्यात स्त्रिया मध्यस्थाचें काम करीत. पहा तरंग ८. एक पत्नी मताचें मम्माचें एकच उदाहरण आहे. शाकुरवाताचा मामला एकच आहे स्त्रियांना पडदा नसे.

राज्यांत स्त्रियांची वेषभूषा सुधारलेली असे.

सती जाण्याची चाल धूमधडाक्याने चाले. सती जात असता राणीला वरवाहन मम्माने परत फिरविलें. असें एकच उदाहरण आहे.

राजांच्या व राण्यांच्या मरणानंतर दास, दासी व भृत्य जाळून अथवा डोकें फोडून प्राणहत्या करीत. ही चपानी हरीकारी होय.

वर्णव्यवस्था मुद्रबद्ध नव्हती. नागाची संतत असलेल्या संततीला राज्य प्राप्ति झाली आहे. पहा कर्कोटक वंश तरंग ४ पृष्ठ १३ कल्यपालाच्या कलालाच्या मुलीशी लग्न झाले-ल्याच्या संततीला राज्य प्राप्ति झाली आहे. पहा उत्पलक वंश

## धार्मिकस्थिति

अस्पृश्यता अस्तित्वात होती. चाण्डाळांना पहारेकऱ्यांचें काम अस कलशानें रात्रींचें घातल तरंग ७ पहा

काश्मीरी लोक बहुधा शैवपंथी. शिव विश्वात्मा असून त्यांत विलीन होण्याची त्यांची इच्छा असे पार्वती ही विश्व निर्माण करणारी शिवाची शक्ति आहे. जन्म व मरण यांच्या मधली स्थिती शिव आपल्या ताण्डव नृत्यानें चालू ठेवतो. अर्धनारी नटेश्वर हें या तत्त्वाचें कलात्मक रूप आहे-गणपति, विष्णु वगैरे सर्वत्र देवांची देवळें बांधली जात. असा एक राजा नाहीं, राणी नाहीं. मंत्री नाहीं किंवा भृत्य नाहीं की ज्यानें किंवा जिनें देवळें बांधिलीं नाहींत, किंवा मठ स्थापिला नाहीं. व त्यांस आपलें किंवा आपल्या प्रियमाणसाचें नाव दिलें नाहीं.

देवास अग्रहार देण्यात येत. वरील धर्मकृत्यें पापाचें निरसन करण्यास क्वचित् पुण्यार्जन करण्यास केलीं जात. देवास नृत्यांगना अर्पण करीत. पुनर्जन्म अथवा सदेहस्वर्गास जाणे यावर भरवसा असे. कोशपान पूर्वक शपथा घेतलेल्या नीट पाळल्या जात. ज्योतिष, शकुन, स्वप्नें दृष्टांत, जादू, मंत्र, तंत्र जपजाप्य, इंद्रजाल वशीकरण इत्यादींवर लोक भरवसा ठेवीत. जुगाराचीहि शोकाळली होती. मृत्यु समयीं गंगोदक पीत. प्रेताचे दहन झाल्यावर अस्थी गंगेत टाकीत. मृत्युसमयी गीता हातात धरीत.

अन्यायाची दाद लावून घेण्यास प्राणान्तिक उपोषण करीत. ही उपोषणाची पद्धति जुनीच आहे. असें उपोषण कुणी केलें तर त्याची दाद लावून देण्यास स्वतंत्र अधिकारी असत पहा

## आर्थिकस्थिति

राजाजवळ संपत्ति विपुल असे. ललिता दित्य प्रतिकुबेर होता. मुक्ताकेशवाची मूर्ति ललितादित्यास चौऱ्यायशीं हजार तोळे याने लावलें.

लोक संपन्न असत. तांब्या रुप्याचीं व सोन्याचीं नाणीं (दिनार) पाडलेलीं असत. दरिद्री कवड्या नवृत्या. महंमदाच्या राज्यातील चामड्याचीं नाणीं नव्हतीं.

## उत्पलक वंश ( तरंग ५ वा )

राजा ललितादित्य याची राणी जी जयादेवी कल्यपालाची ( कल्लालाची कन्या ) तिचा भाऊ

उत्पलक

सुखवर्मा

१ अवन्तिवर्मा राज्यारोहण
लौकिक ३९३१ इ. स. ८५६–६
मृत्यु लौ ३९५९ इ. स. ८८३

सापत्न शूरवर्मा
( याव युवराजपदीं
अवन्तीनें स्थापिलें )

२ शंकरवर्मा ( राज्यारोहण इ. स. ८८३
लौकिक ३९५९ मृत्यु. लौ. ३९७७
इ. स. ९०२ )

सापत्न सुखवर्मा
युवराजपद शंकर
वर्म्यानें दिलें )

३ गोपाळवर्मा ( माता सुगंधा )
राज्यारोहण लौ. ३९७७ इ. स. ९०२
मृत्यु लौ. ३९७९ इ. स. ९०४

४ संकटवर्मा ( पालक सुगंधा माता )
राज्यप्राप्ति लौ. ३९७९ इ. स. ९०४
मृत्यु दहा दिवसांनीं लौ. ३९७९ इ. स ९०४

५ राजमाता सुगंधा

निर्जितवर्मा ऊर्फ पंगु

निर्जितवर्मा
ऊर्फ पंगु

(५) पार्थ ( पालक निर्जितवर्मा )
राज्यारोहण ३९७७ इ. स. ९०४
उच्चाटण ( तन्त्र्यांनीं केलें )—(६) निर्जितवर्मा बाप — निर्जितवर्मा
लौ. ३९९७ इ. स. ९२१

(६) निर्जितवर्मा बाप
राज्यारोहण
लौ ३९९७ इ. स. ९२१
मृत्यु
लौ. ३९९९ इ. स. ९२३.

निर्जितवर्मा
राणी
बप्पट देवी

(७) चक्रवर्मा
राज्यारोहण.
लौ. ३९९९ इ. स. ९२३

तन्त्रीकृत उच्चाटण
लौ. ४००९ इ. स. ९३३–४
( तन्त्र्यांस पार्थापेक्षां अधिक द्रव्य दिल्यानें पुनः स्थापना इ. स. ४९११ इ. स. ९३५ ( तन्त्र्यांच्या हुंडया न देतां आल्यामुळें लवकरच त्यानें पलायन केलें. )

निर्जितवर्मा
राणी
मृगावती

शूरवर्मा
राज्यारोहण तंत्रीसंमत लौ. ४००९ इ. स. ९३३–४
उच्चाटण तन्त्र्यांचें देणें न दिल्यानें
लौ. ४०१० इ. स. ९३४–५
चक्रवर्म्यानें मन्त्री शुभवर्धन याला तंत्र्याकडे दूत म्हणून पाठविलें त्यानें तन्त्र्यांना अधिलाच देण्याचें कबूल करून आपल्याला राजा करून घेत.
लौ. ४०११ इ. स. ९३५

पण पद्मपुराजवळ संग्राम करून शंभुवर्धनाला मारून चक्रवर्मा सिंहासनस्थ राजा झाला. तो लौ. ४०१३ इ. स. ९३७ या वर्षीं दुष्कर्मानें मारला गेला.


तरंग ६ वा

- वीरदेव
  - कामदेव
    - प्रभाकरदेव ( हा सुगंधादेवीचा कामुक होता. )
      - यशस्करदेव. हा तरंग सहामधील १ ला राजा. याला विप्रपरिषदेनें राजा केला.

# लोहर वंश

## तरंग ७ व ८

- नर ( दारवाभिसारच्या देशांत मारद्र ज कुलांतील पुरुष राजी झाला )
  - नरवाहन
    - फुल्ल
      - सातवाहन शालवाहन
        - चन्द्र
          - चंदुराज
            - सिंहराज
              - उदयराज
                - विग्रहराज
                  - क्षितिराज
                    - भुवनराज
              - संग्रामराज
                - हरिराज
                - अनंत
                  - कलश
                    - हर्ष
                      - भोज (पुत्र)
                        - भिक्षाचर
                      - सल्ह
                    - उत्कर्ष
                    - विजयमल्ल (माता पद्मश्री विजयमल्ल हा हर्षाचा सावत्र भाऊ)
                      - जयमल्ल
                    - जयराज
                    - भोज
                - उदयनवत्स
                - लोठिक
                - कल्हण
                  - नाग
              - कान्तिराज
                - जस्सराज
                  - तन्वंग
                    - थक्कन
                    - जम्मट
                      - रड्डण
                      - सड्डण
                    - भज्जक
                      - तुल्ल
                      - विजयराज
                      - बल्ल
                      - गुल्ह
                  - गुङ्ग
                    - + मल्लार्जुन
            - गोपाळ




## कल्हणाची कालगणना

ही कालगणना काश्मीरांत चालू असलेल्या लौकिक शकाप्रमाणें आहे. याच शकाला सप्तर्षि शक म्हणतात पहिल्या तरंगातील पहिला राजा जो पहिला गोनद तो कौरव पाण्डवांचा समकालीन होता. धर्मराजाला अभिषेक झाला तेव्हाच या गोनदाला झाला. भारतीय युद्ध द्वापारयुगाच्या शेवटीं झालें हें मत कल्हणाला मान्य नाहीं. त्याच्या मतें कलियुगाचीं सहाशें त्रेपन्न वर्षें झालीं तेव्हांच भारती युद्ध थांबलें व तेव्हाच गोनदाला राज्याभिषेक झाला.

| | |
|---|---|
| पहिल्या गोनंदापर्यंत कलियुगाचीं | ६५३ वर्षें. |
| पहिल्या गोनदापासून युधिष्ठिर राजाच्या अन्तापर्यंत पहिल्या तरंगांत येतात. | २२६८ |
| यांत नष्ट नाम झालेल्या राजांचीं वर्षें येतात. | |
| तरंग २ ते ८ यांतील वर्षें जयसिंह राजाच्या कारकीर्दीला आरंभ होण्यापर्यंतचीं | १३२८ |
| | ४२४९ |

जयसिंह राजाच्या कारकीर्दीला आरंभ लौकिकवर्ष ४२२४ या वर्षी झाला. वर दाखविलेल्या बेरजेंत फक्त २५ वर्षांचा फरक आहे. तो तीन चार हजार वर्षांत भारी नाहीं. कांहींनीं या गणनेला हरकत घेतली आहे. तिचा विचार या लघुग्रन्थांत घेणें अवश्य नाहीं. तरी येथें एवढें म्हणणें भाग आहे कीं तिसऱ्या तरंगातील रणादित्य राजाच्या गाठीस तीनशें वर्षांचा राज्यकाल कवीनें जुळवा जुळव करण्याला घातला असावा.

# शब्दकोश

अ

अंकित अभिधा–यद्दत दिलेले नांव
अगस्त्योदय–अगस्ति या ताऱ्याचा उदय भाद्रपद मासीं होतो. नंतर पावसाळ्यांत गढूळ झालेले पाणी निवळतें.
अग्निशौच मृग हे मृग अग्नीतून उडया मारीत जातात व आपले ऊर्णामय अंग स्वच्छ व शुद्ध करतात. अशी कविकल्पना आहे.
अग्रहार–एखाद्या देवालयाला, विप्राला, विप्रसंघाला अथवा धार्मिक संस्थेला जहागीर ( इनाम ) करून दिलेला गाव किंवा जमीन. हें दान आचंद्रार्क असे.
अंगुलि कापून बसणें–शत्रूला शरण जाणें. ही शरणागति क्षत्रिय असते. उष्णीष ( डोक्याचें वस्त्र ) गळ्यांत बांधणें किंवा जोडा डोक्यावर ठेवणें, हे दुसरे शरणागतीचे प्रकार असत.
अट्टसूद–खाणावळींतला आचारी.
अतितात्पर्यतः–घ ईघ ईनें.
अधर्मक–ऋणको.
अधिकरण लेखक–एक सरकारी अधिकारी. जमिनींची विक्री ठरल्यावर तिचें मोजमाप करणारा लेख लिहिण्याचें काम याचकडे असे.
अधोरिक–अर्धोबडी
अन्नपति–उत्तम पीक उत्पन्न करून देणारा देव.
अम्बराधिकारी–सैन्याला कपडे पुरवणारा कापडणवीस.
अनुलेपन–पोहण्याची कळा; पोंबाणी.
अभिचार–जादू.
अयःशङ्कु–खिळे.
अवरुद्धा–धर्मशास्त्रप्रमाणें जिच्याशीं विवाह करतां येत नाहीं अशी स्त्री आवडली म्हणून अवरोध गृहात ( जनानखान्यांत ) ठेवलेली.
अवस्कप्रणाली–शौचकूपांतील मोरी.
अवस्कर मंदिर–शौचकूप.
अव्ययत्–जमेकडील रकमेला नाहींशी करणारी खर्चाची रक्कम.
अश्वपाल–घोड्यांना घास पुरवणारा अधिकारी; घासवाला.
अक्षपटल–मुख्य हिशोबनीसाची कचेरी.
अक्षपाताळ–कागदपत्र. ठेवण्याची जागा.

आ

आतोपु–नाकेपट्टी
आमलक–रायआवळा [illegible] आकाराचा सोन्याचा दागिना. देवालया[illegible] घुमटांवर बसवतात तो.
आम्नाय–ऐतिह [illegible] लख.
आरामिक–सोनखताचा उपयोग करण्याच्या कामीं योजलेला अधिकारी.
आस्थान मण्डप–राजसभागृह.
आहो पुरुषिका–अहो ! आमचें केवढें हें पौरुष तें पहा ! अशी बढाई.

इ

इतिहासिनी ( नीति )–इतिहासावरून अनुमित ( नीति )

उ

उत्कोच–लाच.
उत्थान शील / उत्थास्नु–उठून पुन्हा साहस करण्यालायक, चपळ.
उपताप–चहाडी.
उपपति–जार.
उपस्थायिका–रोग्याची शुश्रूषा करणारी स्त्री.
उत्पन्नध्वंसी–उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावणारीं संकटें.
उत्पात पीटिका–कोळपुली.
उत्पिंज–बंड
उभयमुखी धेनु–सवत्स गाय.

ऊ

ऊष्मवारिणी–छत्री.

ए

एकांग–खड्गधारी राजाचे संरक्षक, त्यांचे प्रतिस्पर्धी.

औ

औमयिक–आयत्या वेळीं उपयोगी पडावें म्हणून राखून ठेवलेलें धन

क

कर्णीरथ–डोल्या. माणसांनी वाहून नेण्याची वाहनें
कर्मकृत्–कामकरी; मजूर.
कर्मस्थान–सरकारी खात्याची कचेरी.
कन्था–गोधडी प्रमाणें जुळवलेले लाल रंग व सोल पद
कर्ष–पहा पळ.
कल्यपाल–कलाल.
कल्याण प्रकृति–प्रकृतीनेच (स्वभावानेच) कल्याण करणारा.
क्रमराज्य–पहा मत्स्य राज्य,
काक–काकवश
कांदिशिक–कोणत्या दिशेला जाऊं अथवा न जाऊं अशा स्थितींत सापडलेला
कापालिक–स्मशान भूमीचा रक्षक, प्रेत जाळण्यापूर्वी त्यावरील वस्त्र काढून नेणारा.
काम्बोज–अफगाणिस्थानाच्या पूर्वेचा प्रदेश.
कायस्थ–कारकूनी करणारा. कायस्थ जातीचा नव्हे.

कार्य निवारण–कामावरून दूर करण्याची क्रिया.

कालण्डिका–गण्डिका

कुटुम्बी–राजवंशीय. भायाद.

कुम्भदात–पाणक्या.

कुम्भदासी–कुम्भानें पाणी भरणारी दासी.

कोटिवेधिनी शिला–इलक्या धातूस स्पर्श करून कोट्यावधि सोनें उत्पन्न करणारा. परीस.

कोशपान–काहीं पेय पिऊन शपथ घेणें व पुढील काळीं परस्पर विश्वास संपादन करणें. हें एक संधि करण्याचें साधन होतें. केलेला कट गुप्त ठेवण्याचा संकल्प यांत केला जाई. हा स्मृतिकथित दिव्याचा प्रकार आहे. असें कोशपान कधीं रक्तानें सिंचलेल्या मृग चर्मावर उभें राहून केला जाई.

कौसीद्य–रिकामपणाची विश्रांति अथवा विश्रांति करता रिकामपणा. उसन्त.

क्लेशपंच–अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश

ख

खश–वितस्तेच्या आसपास डोंगरी मुलखांत राहणारी जात व ही वर राजपुरीचे राजे अम्मल करीत होते येथील राजे खश होते.

खारी–१९२० पळें ४ तोळे–पळ. ३२ पळें–प्रस्थ ६० प्रस्थ खारि म्हणजे एका खरांचें (गाढवाचें) ओझें

खार्गोदकिया–जादू.

ग

गजनीमीलिका–डोळे झांक.

गणना पत्रिका–हिशोबाची वही अथवा खरडा.

गार्हस्थ्य भिक्षु–जे भिक्षू गृहस्थाप्रमाणें, स्त्री गृह व पशू बाळगतात. ते गर्ह झालेले भिक्षू.

गंज–निधि खजिना.

गंजपति<br>गंजवर<br>गजाध्यक्ष<br>गंजाधिकारी } खजिनदार

गूढलेख–खोटेलेख.

गेहगणनाधिपति–घरचा हिशोब ठेवणारा.

गौड–बंगालप्रांत.

गृहपति–गृहस्थ

च

चर्चाकथा–विस्तृतपणें कथन केलेलें वृत्त

चाक्रिक–द्रोहाची चक्रें फिरवून खलबतें करणारा.

चंद्राचार्य–एक प्रसिद्ध वैय्याकरणी.

चैत्य–उचीचा प्रश्न मनांत न बाळगून बांधलेलीं देवळें.

ज

जन्मवसुधा–जन्मभूमि.

जय ! जीव !–संगीताच्या दलदशाच्या वेळी संतुष्ट होऊन रसिक श्रोत्यांनीं तोंडांतून काढलेले वावा ! जिते रहो ! सुभानअल्ला इत्यादि उद्गार.

जयस्वामी–विष्णु.

ट

टक–नाणी पाडण्याचा राजाचा अधिकार.

ठ

ठक्कुर–दक्षिण काश्मीरांतील डोंगरांत राहणाऱ्या रजपूत लोकाना दिलेली ठाकूर ही पदवी.

ड

डामर–दस्यु अथवा अवन्त. हे जमीनदार होते. यांच्याजवळ द्रव्य जमलें म्हणजे हे शत्रू; सैनिक व लोक बाळगून प्रबळ बनत. यांतील एकाची ओळख पहिल्यानें पांचव्या तरंगांत अवन्तिवर्म्याच्या राज्यांत होते. शेवटीं कल्हणाच्या काळांत यांच्या दुर्दम्य राजकीय चळवळींचें स्वरूप दिसून येतें. राजानें यांचा मोड करावा लागे. नाहीतर यांना वश करून घ्यावें लागे. यांची वसतिस्थानें म्हणजे किल्ले असत. दोन तीन खेड्यांइतक्या भूभागावर यांची सत्ता चाले. मूळ जमिनी यांच्या ताब्यांत कशा आल्या त्याचा व मालकी हक्क कोणत्या अटीवर यांस प्राप्त झाला त्याचा पत्ता लागत नाहीं. पण पुष्कळ द्रव्य व्यापारात मिळवून सशस्त्र लोक ठेऊन डामर झाल्याचें एका कुटुंबी माणसाचें (जट्याचें) उदाहरण आठव्या तरंगांत आहे. यांचा अवमान राजानें केल्यास ते शत्रु पक्षाला मिळत यांचा मोड कावेबाजपणानें उच्चकानें केला. तसेंच राजांपासून व त्यांच्यापुढें हे अर्धवट स्वतंत्र झाले. राजांची वेळीं उपयोगी पडणाऱ्या शर्तीवर यांस जमिनी मिळालेल्या होत्या. केव्हां तें कळत नाहीं.

ढक्क–पहारा करण्याची जागा.

ढक्का–नगारा. (डंगा ?)

त

तमोरि–तमचा शत्रु. खिडकी

ताम्र स्वामी–रवि.

तन्त्री–एक लढाऊ संघटित जाति हील पदाति असत; घोडेस्वार नसत.

तीक्ष्ण पुरुष–मारेकरी

तुलापुरुषदान तुला.

द

दण्डनायक–मुख्य पुर संरक्षक कोतवाल.

दरद्–काश्मीरच्या उत्तरेस उत्तर व उत्तर दक्षिण दिशेस (ऐशानी दिशेस) असलेल्या डोंगराळ मुलखात चित्रल व गिलगित या प्रांतांत राहिलेले लोक, यांच्याकडून होणाऱ्या पीडेचे निवारण करण्या करता त्यांवर राजांना स्वारी करावी लागे.

दस्यु–डामर शब्द पहा.

दुर्नामकव्याधि–मूळव्याध

दिद्दा–वडील बहिणीला हांक मारण्याचे नाव. वडील भावाला आपण दादा म्हणतोच.

दूत–वकील

दिष्टवृद्धि–अभिनंदन.

देडादि खातें–पचमजमाखर्चाचें खातें. यात चार खात्यातील शिल्लक असलेल्या रकमा जमा करण्यांत येत.

देशिक–परकी. काश्मीरच्या बाहेरचा. सपाट मुलखातून आलेला

द्रङ्ग–सीमेवरील डोंगरात असलेलीं रक्षा स्थानें. पहाऱ्याचीं ठिकाणें

द्रंग बाहेरून येण्याऱ्या मालावर जकात घेण्याचीं ठिकाणें.

द्रङ्गेश / द्रंगेश — द्रंगाच्या ठिकाणी पहारा ठेवणारा, मार्गेश.

द्वाराधिप, द्वारपति / द्वारनायक, द्वाराधिपति / द्वारेश, द्वारेश्वर — डोंगरी सीमाप्रांतातून काश्मीरात प्रवेश करू देणारीं जीं द्वारें आहेत. त्यावरचे मुख्य रक्षक.

द्वैराज्य- राज्याचे दोन विभाग करणारें युद्ध अथवा कलह.

ध

धर्माध्यक्ष–न्यायाधीश.

न

नक्रिका–चटका.

नाग–जलाधिष्ठित देवता; त्या भूमीवर नागाचें (सर्पाचें रूप घेतात; व मेघाचे रूप घेऊन आकाश व्यापून टाकतात हिमवृष्टि करतात,

व भूवर उतरतात. कधीं मनुष्याचेंहि रूप घेतात. नाग पिकांचा नाश करून पोट भरीत. (पहा सुश्रवस नागाची गोष्ट.) शंख व पद्म या नांवाचे नाग काश्मीर मण्डलात होते. यांतील पद्मनाभ नावाच्या नागानें कोल्ह्याचें रूप घेतलेलें आहे. कर्कोटक, वासुकी व नील या नागाचें नीलमत पुराणांत उल्लेख आहे. कर्कोटक वंशाला राज्यप्राप्ति झाली होती. तो वंश गोनद वंशापेक्षां शुचि असें कल्हण म्हणतो.

नागार्जुन–बौद्ध भिक्षु.

नियोगी–मोठा अधिकारी

नीवि–ओलीस.

नीलमत पुराण–काश्मीरातील धार्मिक आचारांचा ग्रन्थ. काश्मीरांतील तीर्थांचा इतिहास. हे पुराण नीलमुनीनें लिहिलें

प

पट्टोपाध्याय–सरकारी कागद पत्राचा संरक्षण करणारा.

परित्राण दीक्षित–आपन्नाचें रक्षण करण्याचें व्रत घेतलेला.

पादप्रसारिका–पाय ताणून विश्रांति घ्यावयाची संधि

परिषद्–तीर्थस्थ अथवा देवालयांतील पुरोहिताची सभा.

पल– चार तोळे. वीस पल–शेर. (पहा खारि)

पातंगी वृत्ति–पतंगाप्रमाणें शत्रूदीपावर झेंप घालण्याची मनीषा.

पादाग्र–कर वसूल करणाऱ्या मण्डलेश्वराच्या वरची जागा.

पायुक्षालनवेश्म–शौचकूप.

पाल–शाहीराजांच्या नांव चीं अन्त्याक्षरें.

पंचमहाशब्द–पहिलीं पंचकर्मस्थानें १ महाभाण्डागार; २ महासंधिविग्रह, ३ महाश्वशाला, ४ महाभाण्डागार ५ महासाधनभाग मागून हीं स्थानें आठ झालीं होतीं. १) धर्माध्यक्ष, २) धनाध्यक्ष (महसूलावरचा अधिकारी.) ३) कोशाध्यक्ष, (खजिनदार,) ४) सेनाध्यक्ष, ५) दूत (वकील) ६) पुरोहित, ७) दैवज्ञ व ८) न्यायाधीश.

पारिषद्य–मागें निर्दिष्ट केलेल्या परिषदेचे सभासद. यांचें राजकारणात महत्व असे. ते उपासाचा धप करून आपलें म्हणणें राजास ऐकवण्यास लावीत. उपोषणाची ही प्रथा जुनीच आहे.

पीतकोश–कोशपान करून घेतलेला मनुष्य.

पुरोधा–पुरोहित.

पूर्वपथिक–पुढें जाऊन मार्ग साफ करून ठेवणारा.

पृष्ठपाती–एकमेकास मागें टाकणारा.

पौंड्र–चंदनाचे टिळे.

प्रकृति–राजाचा प्रधान.

प्रकृतिनामनी–पत्ता व नांव.

प्रतिकर–नगदी नेमणूक.

प्रतिकार–सार्वजनिक कामाकरता घेतलेल्या जागेचा दिलेला मोबदला.

प्रतिक्रिया–प्रत्युपकार.

प्रतिभू–जामीन.

प्रतिभान–प्रसंगावधान.

प्रतिहार–कंचुकी.

प्रत्यभियोग–उलट हल्ला.

शंकित } आरोपी.
शंकास्थान }

शाहीराजे—गज्नन सुलतानच्या पूर्वीचे काबूलच्या खोऱ्यांत (गान्धार प्रदेशांत) नवव्या. शतकापर्यंत असणारे हिंदु राजे हे मूळचे तुर्क होते.

शिक्षा—हिताच्या गोष्टी.

शिक्षाध्यायी—मतप्रचारक. म्होरका.

शिक्षिताक्षर—अक्षर ओळख असलेला. लिहितां वाचतां येणारा

शीलबहिष्कृत—शीलानें (सद्वर्तनानें) ज्याला बहिष्कार घातलेला आहे असा.

शीर्षक—मथळा.

शीर्षिका—लहान मथळा.

शुभोदर्क—ज्याचा शेवट चांगला आहे असा.

श्रमण—बौद्धसंन्यासी.

श्रेयस्—क्षमा.

श्वपाक—हीनजातीचा. मूळार्थाप्रमाणें श्वानाचें मांस खाणारा.

स

समकार्य—दोघांचें कार्य एकच समजून केलेलें सह कार्य

संकट—डोंगरांतील घांटी.

संभृति—कोठार (धान्य भरून ठेवण्याचें)

सर्वाधिकारी—मुख्यप्रधान.

सादीमण्डळ—घोडेस्वारांची तुकडी.

स्थावर विलंबित—कायम नेमणूक.

स्थूलोत्पत्ति—स्थावर उत्पन्न.

सिंधु—वितस्ता नदीचा सर्वांत मोठा फांटा.

सुखासिका—सुखी आहेस का असा प्रश्न.

स्वभावमाहिमा—सृष्टिसौंदर्य.

स्थेय—न्यायाधीश.

स्पर्शसंचारी—केवळ स्पर्श झाल्यानें संचार पावणारा रोग.

स्त्रींचास्तन तोंडांत धरणें—मी तुझा मुलगा आहे असें शरण जाणें.

स्थिरकरणें—अधिकाराच्या जागेवर नोकरास कायम करणें

ह

हस्तमेलक—उभय सैन्याची समोरासमोर युद्ध सुरणें.

हिमालयांत हिमविक्रय करणें—अगदीं फायदेशीर न होणारा असा व्यापार करणें. ही म्हण व Carrying gold to Lanka ही म्हण अशा समानार्थ आहेत.

हुक्का—वर वारा तोंडानें एकीकडे वारा भरण्यास नळी लावलेली चामड्याची पिशवी. वरच्या नळीनें तोंडांतील वारा आंत भरत असतां खाकेंत ती पिशवी धरून दाबली असता दुसरीकडील नळीच्या रन्ध्रांतून वारा जात असतां त्या रंध्रावर बोटें ठेऊन वाजवणारा सूर काढीत असतो.

हुण्डिका—पैशांची हुंडी.

हेडादिखातें—मुख्य चार खात्यांतील शिल्लक ज्या पांचव्या खात्यांत जमा करतात तें खातें.

क्ष

क्षत्ता—द्वारपाल.

क्षातिचरु—प्रायश्चित्त.

क्षेत्रपाल—क्षेत्राचें पालन करणारी देवता.

क्षेपणीय—दगडाचें क्षेपण करणारें यंत्र, गोफण.

क्षेमेंद्र—ककाळि नांवाच्या घरेवाईक स्त्रीचें चरित्र वर्णन करणाऱ्या समयमातृका नांवाच्या ग्रंथाचा कर्ता.

ज्ञ

ज्ञमन्य—आपणाला शहाणा समजणारा.

मुद्रक—न. मो. जोशी, हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.

स्थिति—अनाक्रमण.

स्थिति—परत फिरणें.

प्रशस्तिपत्रें—प्रशस्तिपर कोरीवलेले देवळात किंवा अन्यत्र ठेवलेलें.

प्रवासवेतन—प्रवासांत दिलेला सरकारी नोकरांचा भत्ता

प्रवेशमार्गिका—देशात येणाऱ्या मालावर कर घेणाऱ्याचें काम.

प्राग्ज्योतिष—असामची ( कामरूपाची ) राजधानी.

प्रायोपवेश / प्रायोपवेशन — व्यक्तिशः अथवा सामुदायिक प्रकारें उपवास करणें. दाद लावून घेण्याचा हा एक मार्ग होता अशा घटनेची चौकशी करण्याकरतां राजाहि एक धर्माधिकारी नमी त्याच्या नंतर त्याला दाद लावी.

ब

बालमत्रक—न्हावी

बाह्याली—राजसभेची पदवी.

बीजाश्व—वळू घोडा.

बोधिसत्त्व—अपराध्यावर न रागावणारे, उलट त्यांवर उपकार करणारे गतक्लेश असे जन.

भ

भक्तशाला—शिजवलेला भात वाटणारी अन्नछत्रें जिथें शिजवलेलें आयतें अन्न वाटण्यांत येतें

भाटक—भाडें

भाण्ड—विदूषक.

भाण्डपति—वणिज.

भीमस्वामी—विनायक देव.

भूतभारती—आकाशवाणी

म

मडवराज्य—श्रीनगरच्या वरच्या परगण्यास मडवराज्य म्हणतात. खालच्याला क्रमराज्य म्हणतात.

मण्डळ—इलाखा.

मण्डळेश्वर—इलाख्याचा ( मण्डळाचा ) अधिकारी

मणिदीप—रत्नांच्या वातीचे दिवे.

मणलोकार—मगळ असा ओनामा

...मंख—लोकप्रकाशाचा कर्ता

मातृका—जन्म, मरण, सौंदर्य, इ. दींच्या अधिष्ठित देवता.

मातृचक्र—गूढ आकृति (दगडावर कोरलेली) उदाहरण देवीचक्र. श्रीचक्र इ.

मार्तंड—आदित्य.

...शाला

...—सर्व अश्वशाळांतील अश्वांचा सम्राट.

मुष्टिंपच—चिकट.

म्लेंछा—महमदी धर्म स्वीकारलेले दरद लोक.

य

यष्टिधर / याष्टिक — यष्टि ( काठी ) धारण करणारा दण्डुकधारी कारकुरी.

युग्य—शिबिका. मेणा.

यौनसंबंध—लग्न संबंध

र

रक्षामणि—इष्टमणि. दृष्टीपासून रक्षण करणारा मणि.

राजगृह्य—राजगृहातील ( राजवाड्यातील ) सेवक.

राजबीजी—राजवंशीय लोक.

राजस्थान—मुख्य न्यायाधिशाची जागा.

राजानक—जवळ जवळ राजाचे सर्व अधिकार असलेला अधिकारी. हल्लीचा रिजन्ट

रूढ भारोदी—वेठ बिगार. रूढ असलेली भार वाहण्याची सक्तीची पद्धति.

ल

लवट—धारिक लवट नावाचा सरदार.

लवन्य—एक डामर

लौकिक अथवा सप्तर्षिशक—हा शक काश्मीरांत व त्याच्या आसपासच्या मुलखात चालू आहे.

लेखहार—जासूद.

लोहर—काश्मीरच्या दक्षिण व पश्चिम भागातील डोंगरी प्रान्त तेथील राजा जयसिंह हा भारद्वाज गोत्रांतला होता. त्याच्या वंशाला सार्थवाह अथवा शातवाहन म्हणतात

व

वक्रपट—तोंडावरील पदर.

वानरेंधन—जी लाकडे जाळल्याशिवाय पुढें ठेऊन नुसतें जवळ असून वानर हिवाळ्यांत थंडीचें निवारण करू शकतात अशीं लाकडें.

वारिक—पहारेकरी.

वितस्ता—झेलम नदी.

विचार वध्या—चांगले विचार न प्रसवणारी.

विस्रम भवन—एकांतांत बसून विचार करण्याची जागा.

विहार—मठ

वृथा वृद्ध-वृद्धावस्थेपर्यंतहि सर्व आयुष्य व्यर्थ घालविलेला पुरुष

वेळाविस—प्रसादवित्त मर्जीसंपादित करून वित्त मिळवलेला पुरुष.

वैयारा—दंगा.

व्याज मूर्ख—आपण मूर्ख आहोंत अशी बतावणी करणारा

श

शतैकीय—शतांत एक.

शंकित } आरोपी.
शंकास्थान }

शाहीराजे–गझनी सुलतानच्या पूर्वीचे काबूलच्या खोऱ्यांत (गान्धार प्रदेशांत) नवव्या. शतकापर्यंत असणारे हिंदु राजे हे मूळचे तुर्क होते.

शिक्षा–हिताच्या गोष्टी.

शिक्षाध्यायी–मतप्रचारक, म्होरका.

शिक्षिताक्षर–अक्षर ओळख असलेला, लिहितां वाचतां येणारा

शीलबहिष्कृत–शीलानें ( सद्वर्तनानें ) ज्याला बहिष्कार घातलेला आहे असा.

शीर्षक–मथळा.

शीर्षिका–लहान मथळा.

शुभोदर्क–ज्याचा शेवट चांगला आहे असा.

श्रमण–बौद्धसन्यासी.

श्रेयस्–जमा.

श्वपाक–हीनजातीचा. मूळार्थाप्रमाणें श्वानाचें मांस खाणारा.

स

समकार्य–दोघांचें कार्य एकच समजून केलेलें सह कार्य

संकट–डोंगरांतील घाटी.

सभूति–कोठार ( धान्य भरून ठेवण्याचें )

सर्वाधिकारी–मुख्यप्रधान.

सादीमण्डळ–घोडेस्वाराची तुकडी.

स्थावर विलक्षिच–कायम नेमणूक.

स्थूलोत्पत्ति–स्थावर उत्पन्न.

सिंधु–वितस्ता नदीचा सर्वांत मोठा फांटा.

सुखासिका–सुखी आहेस का असा प्रश्न.

स्वभावमाहिमा–सृष्टिसौंदर्य.

स्वेष–न्यायाधीश.

स्पर्शसंचारी–केवळ स्पर्श झाल्यानें संचार पावणारा रोग.

स्त्रीचास्तन तोंडांत धरणें–मी तुझा मुलगा आहे असें शरण जाणें.

स्थिरकरणें–अधिकाराच्या जागेवर नोकरास कायम करणें

ह

हस्तमेलक–उभय सैन्याची समोरासमोर युद्ध सुरुणें.

हिमालयांत हिमविक्रय करणें–अगदीं फायदेशीर न होणारा असा व्यापार करणें. ही म्हण व Carrying gold to Lanka ही म्हण अशा समानार्थ आहेत.

हुडुका–वर वारा तोंडानें एकीकडे वारा भरण्यास नळी लावलेली चामड्याची पिशवी. वरच्या नळीनें तोंडांतील वारा आंत भरत असतां खाकेंत ती पिशवी धरून दाबली असतां दुसरीकडील नळीच्या रन्ध्रांतून वारा जात असतां त्या रन्ध्रावर बोटें ठेऊन वाजवणारा सूर काढीत असतो.

हुण्डिका–पैशांची हुंडी.

हेडादिखातें–मुख्य चार खात्यांतील शिल्लक ज्या पांचव्या खात्यांत जमा करतात तें खातें.

क्ष

क्षत्ता–द्वारपाल.

क्षांतिचरु–प्रायश्चित्त.

क्षेत्रपाल–क्षेत्राचें पालन करणारी देवता.

क्षेपणीय–दगडाचें क्षेपण करणारें यंत्र, गोफण.

क्षेमेंद्र–कंकालि नांवाच्या धंदेवाईक स्त्रीचें चरित्र वर्णन करणाऱ्या समयमातृका नावाच्या ग्रंथाचा कर्ता.

ज्ञ

ज्ञमन्य–आपणाला शहाणा समजणारा.

मुद्रक—न. मो. जोशी, हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.